2288



REFBK-0018709

# स्त्री-पुरुष सहजीवन

दादा धर्माधिकारी

२२७७ निबंध
संदर्भ
८०५५८
७।१।७३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ८०५५८ वि: निबंध
क्रमांक २२७७ नों: दि: ७।१।७३

76 DEC 1984

# स्त्री-पुरुष सहजीवन

-स्त्री-जीवन स्वायत्त व आत्मनिर्भर व्हावे म्हणून केलेले विवेचन-

दादा धर्माधिकारी

REFBK-0018709

★

१९७३

परंधाम प्रकाशन, पवनार

प्रकाशक

रणजित देसाई
परंधाम प्रकाशन, ग्राम सेवा मंडळ,
पो. पवनार, (वर्धा) महाराष्ट्र

आवृत्ति दुसरी : प्रति २०००

एप्रिल १९७३

मुद्रक :

दि. गो. लवाटे
मॅजेस्टिक प्रिंटिंग प्रेस,
टिळक पुतळा, नागपूर-२

# दोन शब्द

कौटुंबिकता समाजव्यापी झाल्यास सामाजिक व्यवहारात स्त्रीचें स्वातंत्र्य सार्थ होऊ शकेल या दृष्टीने मुख्यत्वेकरून या भाषणात विचार केलेला आहे. स्त्रीपुरुषसंबंधाचा समग्र व सांगोपांग विचार केलेला नाहीं. तसा विचार होणें आजच्या परिस्थितीत अगत्याचें झालेलें आहे. परंतु या भाषणात स्त्रीच्या भूमिकेचा विचार मुख्यतः मानवीय व्यक्ति या नात्याने केलेला आहे. स्त्री म्हणून स्त्रीचा पुरुषाशी, व पुरुष या नात्याने पुरुषाचा स्त्रीशी, संबंध-स्त्रीच्या स्वायत्त जीवनाच्या दृष्टीने कशा प्रकारचा असावा याचा मूलग्राही विचार होणें आवश्यक आहे. मनुष्येतर प्राण्यांमधे हा संबंध शुद्ध नैसर्गिक असल्यामुळे तो प्राकृतिक नियमांनी नियंत्रित आहे. स्त्री-पुरुषांचा अशा प्रकारचा संबंध जितका प्राकृतिक, तितकाच स्वेच्छाप्रेरितहि आहे. त्या संबंधाला

कुठल्याहि प्रकारची बंधनें किंवा मर्यादा असता कामा नयेत अशी एक प्रबल आकांक्षा आधुनिक सुशिक्षित तरुणतरुणींमधे जागृत झालेली आहे. त्या आकांक्षेचें सामाजिक जीवनात अभूतपूर्व उलथापालथ घडवून आणणारे प्रत्यक्ष परिणाम दिसून येत आहेत. विवाहसंस्था व कुटुंबसंस्था यांचा पायाच ढासळण्याचीं लक्षणें प्रकट होऊ लागलेलीं आहेत. या स्वैरतेला विवाहाच्या किंवा रक्तसंबंधाच्या मर्यादेचें वावडे आहे, जगात सर्वत्र शिक्षण-संस्थांमधून या प्रवृत्तीचा जो प्रचंड स्फोट होत आहे ही काही सामान्य घटना नव्हे. तिची उपेक्षा किंवा निंदा करून भावी पिढीच्या जीवनावर होणारे परिणाम टाळता येणार नाहींत. सद्भावपूर्ण उदात्त उदासीनतेनेहि या स्वैर वर्तनाचे स्त्रीजीवनावर होणारे परिणाम टळू शकणार नाहीत.

### मानव उपभोगाचें साधन नाही

एका मानवाने दुसऱ्या मानवाला आपल्या सुखाचें, विलासाचें किंवा उपभोगाचें साधन बनवता कामा नये, हे मानवीय सहजीवनाचें आधारभूत सूत्र आहे. आर्थिक क्षेत्रात दुसऱ्याला आपल्या सुखोपभोगाचें साधन बनविण्याचा परिणाम अमानुष शोषणात होतो. राजकीय क्षेत्रात त्याचाच परिणाम गुलामगिरीत होतो, आणि धार्मिक क्षेत्रात अस्पृश्यतेसारख्या आसुरी प्रथेंत होतो. स्त्री व पुरुष यांनीहि जर एकमेकांना आपल्या सुखोपभोगाचें साधन मानलें, तर त्यातून वैषयिक भूमिकेवरील अनर्थकारक शोषणच निष्पन्न होईल. स्त्री-पुरुष संबंधात स्वच्छंदतेची व स्वैराचाराची जी प्रवृत्ति आज बळावत आहे, तिच्या संदर्भात या मुद्याकडे दुर्लक्ष करणें भयावह ठरेल. या प्रवृत्तीचे परिणाम स्त्री-स्त्रीचा व पुरुष-पुरुषाचा परस्पर

संबंधहि दूषित होण्यात झाल्यावाचून राहणार नाहीं. तसा तो होत असल्याची चिन्हें आज स्पष्ट दिसत आहेत.

### आदरयुक्त मर्यादा हवी

या विषयाचा समग्रतेने व सखोल विचार करण्याचा माझा अधिकार नाहीं. आणि आज तसा माझा कलहि नाही. पण स्त्रीच्या स्वायत्त जीवनाच्या दृष्टीने एक इशारा देऊन ठेवणें आवश्यक वाटतें. मुक्त संबंधांचा परिणाम स्त्रीच्या भूमिकेवर प्रतिकूल होण्याचा संभव फार. स्त्री-पुरुष संबंधाच्या बाबतीत स्त्री व पुरुष यांच्या भूमिकांत एक मूलभूत अंतर आहे. पुरुषाच्या अभिमुखतेची व क्षमतेची जशी आवश्यकता असते तशी स्त्रीच्या अनुकूलतेची आवश्यकता अपरिहार्यपणें असत नाही. परिणाम मात्र स्त्रीला अपरिहार्यत: भोगावे लागतात. तिच्यावर अवांच्छित मातृत्वाचें संकट येण्याचे संभव असतो. तिला मातृत्व हें वरदान किंवा गौरवाचें प्रतीक वाटण्याच्या ऐवजी अभिशाप व शिक्षा वाटू लागेल. ते टाळण्याचे सर्व उपाय केल्यावाचून स्त्री राहणार नाही. संततीचा विवाहित मातापित्यांशी संबंध नसल्यामुळे वात्सल्य हें सांस्कृतिक मूल्य नाहीसें होईल. अपत्याला मातेचें कोमल, मधुर संरक्षण लाभणार नाही. मातृत्वाचें संकट स्त्रीला आधुनिक वैज्ञानिक उपायांनी बहुतेक टाळताहि येईल. तरी पण तिच्या शरीरावर अवांतर परिणाम होणें अपरिहार्यच आहे. म्हणून कुठल्याहि स्थितीत तिचा मर्यादाभंग होता कामा नये. मर्यादा म्हणजे जुनाट, बुरसलेली, नासलेली, परंपरागत नीति नव्हे. त्या नैतिक बंधनांचे पाश तोडून मुक्त होण्याकडे आजच्या तरुणांची प्रवृत्ति आहे. तिचें स्वागत किंवा धिक्कार करण्याचें प्रयोजन येथे नाही. स्त्रीजीवनाच्या मर्यादेच्या दृष्टीनेच विचार

येथे प्रस्तुत आहे. दुसऱ्याबद्दल वाटणाऱ्या अगत्यातून व आस्थेतून त्याच्याशी वागतांना जो सहज संयम उत्पन्न होतो, त्याचे नांव मर्यादा (Honour) आहे. यात दमन नाही, समाजाच्या भीतीने, वडील मंडळींच्या धाकानें किंवा कुठल्या तरी व्रताच्या अगर संकल्पाच्या दडपणाने स्वतःवर माणूस जी बळजबरी करतो, तें दमन होय. दमनाने चारित्र्य क्षीण होते, व्यक्तित्व खुरटून जातें, पारस्परिकतेत विकृति निर्माण होते. मर्यादेत परस्पर भीति किंवा साशंकता यांचा लवलेशहि नसतो. स्त्री व पुरुष यांना एकमेकांच्या व्यक्तित्वाविषयीं वाटणारी कदर व पूज्यबुद्धि यांच्यापोटीं दोघांच्याहि वर्तनात जो स्वाभाविक संयम जन्माला येईल त्या संयमाला मर्यादा ही संज्ञा आहे. तेव्हा आधुनिक समाजक्रांतिवादी तरुणांना (यात तरुणीहि आल्या) अभिप्रेत असलेल्या मुक्त संबंधात स्त्रीची शारीरिक मर्यादा व आत्ममर्यादा यांची जोपासना कशी होईल हा स्त्रीच्या दृष्टीने जीवनमरणाचा प्रश्न आहे. तिच्या या द्विविध मर्यादेचें अतिक्रमण झालें तर तिचा आत्मनाशच होईल. इतका अगत्याचा हा विषय असल्यामुळें या ठिकाणीं त्याचा उल्लेख करणें आवश्यक वाटले.

### थोर स्त्रियांनी लक्ष द्यावें

कितीहि सत्प्रवृत्त व उदार अंतःकरणाचा पुरुष असला, तरी तो या समस्येचें समर्पक समाधान शोधू शकेल असा संभव फार कमी. आज आपल्या समाजात आध्यात्मिक, शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात मानव्याला ललामभूत झालेल्या व पुरुषांनी गुरुस्थानीं आणि नेतृस्थानीं मानलेल्या अनेक थोर स्त्रिया आहेत. तसें लक्ष या विषयाकडे गेलेलें दिसत

नाहीं. त्यांनी व्यापक मानवतेच्या तटस्थ भूमिकेवरून स्त्रीजीवनात उद्भवलेल्या या जिव्हाळ्याच्या प्रश्नाचा अभ्यास व विचार करावा एवढाच या विवेचनाचा हेतु आहे.

### कृष्ण-द्रौपदी : कृष्णार्जुन

या भाषणांतील विवेचनाची दुसरी एक मर्यादा आहे. कुटुंबाबाहेरील सामाजिक जीवनात पुरुषाच्या बरोबरीने स्त्रीला वावरता यावें ही या विवेचनातील मुख्य दृष्टि. म्हणजे यौन-संबंधनिरपेक्ष सहजीवनाचा विचार येथे विशेषेकरून केलेला आहे. त्या दृष्टीने एक व्यावहारिक उपाय सुलभ वाटला. तो म्हणजे, कौटुंबिक जीवनातील नात्यांचा व मूल्यांचा विस्तार सामाजिक जीवनात करणें. याला एक महत्त्वाचा अपवाद पति-पत्नी संबंधाचा. या बाबतीत काही अत्यंत चारित्र्यवान व स्वयं-प्रज्ञ तरुण स्त्रियांनी एका मुद्याकडे माझें लक्ष वेधलें. "कुटुंबसंस्था कितीहि आदर्श मानली तरी तिचा उगम यौनसंबंधातून आहे, आणि ती रक्तसंबंधाच्या आधारावरच टिकून राहते. कुटुंबसंस्थेत माता या नात्यानें स्त्रीची भूमिका गौणच राहणार. कुटुंब-संस्थेच्याभोवती भावनेचा केवढाहि मनोज्ञ फुलोरा गुंफला तरी वस्तुस्थिति बदलत नाही. पत्नी झाल्यावाचून गृहिणी माता बनू शकत नाही. या परिस्थितीचा परिणाम असा होतो की स्त्रीच्या दृष्टीने कुटुंबसंस्थेला अगदी तुरुंगाचे निकृष्ट स्वरूप प्राप्त होत नसले, तरी किल्लयाच्या प्रतिष्ठित बंदीगृहाचे स्वरूप प्राप्त होतेच. तेव्हा कुटुंबसंस्थेला आदर्श मानून कौटुंबिक जीवनातील नात्यांचा विस्तार सामाजिक संबंधात करण्याची तुमची युक्ति स्त्रीच्या दृष्टीने आम्हाला क्रांतिकारक वाटत नाही. कारण, त्यात

स्त्री-पुरुष-भेद भावना क्षीण होण्याऐवजी परोक्षपणें पुष्टच होते. पुरुषा-पुरुषात किंवा स्त्रिया-स्त्रियात सहजस्फूर्त मैत्री राहू शकते. एकमेकांपासून सावध राहण्याची आवश्यकता त्यांना वाटत नाही. प्रेमाला कुठल्याहि अवांतर उपाधीची आवश्यकता उरत नाही. दोन व्यक्तींतील मैत्रीला कुठल्याच प्रकारची मर्यादा सहन होत नाही. मानवीय व्यवहारात जास्तीत जास्त निरुपाधिक व निरपेक्ष प्रेम मैत्रीतच व्यक्त होतें. ही निरवळ मैत्री कौटुंबिक संबंधात नसते. कौटुंबिक संबंधांचा उपाधि सख्यत्वात दाखल करून तुम्ही त्याचें पावित्र्य क्षीण करता" असा त्यांच्या म्हणण्याचा आशय.

या आक्षेपाने मला विचार करायला लावलें. त्यांतील मुद्दा माझ्या लक्षात आला. मी आतापर्यंत तीनच प्रतीकांचा उल्लेख केला आहे, सीताराम, राधा-कृष्ण आणि कृष्ण-द्रौपदी. यांपैकी सीतारामाचा संबंध पतिपत्नीचा, तो अर्थातच कुटुंबापुरताच मर्यादित राहू शकतो. राधाकृष्णाचा संबंध कौटुंबिकहि नाही आणि सामाजिकहि नाही. तो व्यक्तिपुरताच मर्यादित राहू शकतो. आजच्या जगात तो संबंध प्रियकर-प्रेयसीच्या संबंधात परिणत होण्याचा संभव आहे. म्हणून मी कृष्ण-द्रौपदीचा संकेत आदर्शभूत मानला. पण त्यातहि कृष्ण व द्रौपदी यांना कौटुंबिक नात्याचें आलंबन स्वीकारावें लागले. कृष्णार्जुनाच्या मैत्रीला त्या आधाराची अपेक्षा वाटली नाही. त्यांच्यात रक्ताचे नातें होतें. पण त्या आधाराच्या वर उठून त्यांनी एकमेकांशी निर्भेळ मैत्रीचें नातें जोडलें. हें शुद्ध, निखालस सख्यत्व. स्त्रीपुरुषांमध्ये असा काम-निरपेक्ष प्रेमसंबंध स्थापन झाल्यावाचून मानव्याच्या दृष्टीने दोघांचीहि भूमिका सदोषच राहील, आणि स्त्रीची तर गौणच

राहील या मुलींच्या आक्षेपांतून मला हा बोध झाला. अंतःकरण धन्यतेने भरून आलें. पण या समस्येचें उत्तर त्यांनाच शोधता येईल. तो माझा अधिकार नाही. मी आपल्या अधिकाराला अनुसरून मधल्या मार्गाचा निर्देश या भाषणांतून केलेला आहे. "शेषं धर्मेण पूरयेत्".

–दादा धर्माधिकारी

# अनुक्रम

१. **सहजीवनाचा आधार** १–१०

स्पर्श-भावना २, सहजीवनाचें प्रयोजन ४, सहजीवनाला निर्भयता अपरिहार्य ५, स्त्रियांत सख्य-भावना ६, स्त्रियांचें सहजीवन ८.

२. **स्त्री-जीवनाचा यक्ष-प्रश्न** ११–३२

सहजीवनाला श्रेष्ठत्वाच्या भावनेचें वावडें १२, खरीखुरी तुल्यता १४, सहशिक्षणाचें परिणत स्वरूप १५, स्त्री-पुरुष-भेदाची परंपरा १६, स्त्री ही व्यक्ति कीं विषय ? १९, संपर्कात पवित्रता २०, अस्पृश्य माणूस म्हणजे मूर्तिमंत विटाळ २१, दृष्टीचा स्पर्श २२, वाघाच्या पोटात शेळी २६, उपक्रम स्त्रीला करावा लागेल २८, इंद्रियाच्या उपयोगाच्या दोन बाजू २९, अनास्था म्हणजे अनासक्ति नव्हे ३०, पावित्र्य आणि सौंदर्य यांची युति ३०, सौंदर्य ही ईश्वराची व्यवस्था ३१, प्रेममूलक संसार ३२.

३. **स्त्री-पुरुषांमध्ये तुल्य सत्त्व** ३३–५१

फ्राईड्चा सिद्धांत ३४, एक निरर्थक वाद ३६, भयानक तत्त्वज्ञान ३७, दोन भावनात्मक गोलार्ध ३८, भीति व नीति : साहचर्य अशक्य ४०, कुटुंबातील स्नेह-संबंध आणि मैत्री ४१, माणसाचें आध्यात्मिक व मौलिक सत्त्व ४४, मत-दानाचा घटक ४५, कुलीनता आणि संपत्तीची भावना ४६, स्त्रीमध्ये अधिक देहात्मवाद ४८.

४. सौंदर्य-मीमांसा ५२–६७

विवाह स्वभाव नाही, संस्कार ५३, सहजीवनात मित्रत्वाची प्रधानता ५५, सहवास आणि सहजीवन यांत अंतर ५६, पुत्र आणि कन्या यांत महान अंतर ५८, समाजात कौटुंबिकता ६०, सहजीवनाचें अधिष्ठान : कौटुंबिक आत्मीयता ६१, आत्मीयतेचा आधार – भावनात्मक संबंध ६१, साधकाची सूक्ष्म इंद्रिय-शक्ति ६२, सौंदर्यानुभूतीत वासना आणि विकार बाधक ६३, सुंदरता भगवंताची मूर्ति ६३, रसिकतेत स्वामित्व आणि भोगासक्तीचा अभाव ६४, परिग्रहाचें सूक्ष्म रूप ६५, इंद्रियांचा अधम उपयोग ६५, विषयाच्या जागीं समर्पणाची भावना ६६.

५. सख्य-भावना ६८–८०

व्यवहाराची सुसंस्कारजन्य मर्यादा ६८, दोन प्रकारचा स्पर्श-निषेध ६९, संस्काराची परिणति मनोभूमिकेत ७१, मानवमात्राचें शरीर तीर्थक्षेत्र ७३, पलायनवाद ७४, सोबत आणि समाजशीलता यांत अंतर ७५, स्त्रीजीवनात मित्रतेचा अविकास ७६, प्रेमपूर्ण मित्रता ७७, गांधींची अमर देणगी ७८.

६. भक्तियुक्त सख्य-भावना ८१–९४

स्त्री-पुरुषांच्या समान मर्यादा ८२, शीलवान पुरुषांचें उदाहरण ८३, ब्रह्मचर्यात स्त्री-द्रोहाचा अभाव ८३, सदाचार आणि नैतिकता यांचे दोन आदर्श ८५, ब्रह्मचर्याविषयी मत-भेद ८६, विधि शब्दाची व्याख्या ८६, अपूर्व विधि ८७, नियम विधि ८८, परिसंख्या विधि ८८, मातेचा स्पर्श पुण्य-कारक ९०, कृष्णार्जुन आणि कृष्णकृष्णायोग ९०, प्राणिमात्र एकाच जीवन-तत्त्वाचें प्रतीक ९२, सख्याबरोबर भक्ति ९२.

७. **माता-पित्यांची सांस्कृतिक भूमिका** ९५–११२

कुटुंबाबाहेर पत्नी शब्द अपमानजनक ९५, भीरुता स्त्रीचें भूषण ९६, स्त्री-जीवनाचें तथ्य : पुरुषपरायणता ९७, स्त्रीची गौण भूमिका ९८, सवती-मत्सर १००, भ्रष्टाचाराची साधनें : कांचन, सत्ता, स्त्री १०२, स्त्रीच्या कौमार्यात आणि वैधव्यात विवशता १०४, वैदिक संकेत १०६, मानव-जीवनाचें वरदान : बुद्धिमत्ता १०७, उपासनेचें स्वरूप १०७, विश्वमानवच संन्यासी १०८, पति-पत्नीत्व भावनेचा परित्याग १०९, समाजात कौटुंबिक नात्यांचा अंतर्भाव ११०, स्त्री-पुरुष परस्परावलंबी ११२.

८. **स्त्री-पुरुषात समानता** ११३–१२५

शिवाची विभूति ११४, उभय-सत्त्व-संपन्न पुरुषात समग्र मानवाचीं लक्षणें ११४, बाळाचें पोषण, रक्षण आणि शिक्षण आईवर निर्भर ११५, शिव-पार्वती एकदुसऱ्यात ओत-प्रोत ११६, मातृमुखी पुत्र आणि पितृमुखी कन्या ११८, संपूर्ण नारीनरेश्वर ११९, साधेपणा आणि विद्रुपता यांत अंतर १२०, बंधुभगिनीत्वांत सामासिक विभूति १२१, स्त्रीत्ववादी आंदोलन १२४.

९. **स्त्री-जीवनाची धन्यता** १२६–१३६

स्त्री-जीवनाचें कोडें १२७, पवित्रता आणि आत्म-बल हीच स्त्री-शक्ति १२८, आत्महानीच्या अंधकूपात पतन १२९, नैतिक शक्तीने स्त्री स्वरक्षित १३१, पवित्रतेचें अधिष्ठान मानवी मन १३४, संवादी मानवीय विभूतीचा जन्म १३६.

१०. **उपसंहार** १३७–१४५

लोकतांत्रिक समाज १३८, आदर्शनिष्ठ स्त्रीमध्ये स्त्री-पुरुष-भावना नाही १४१, वीरतेचे लक्षण १४३, अंतिम अभिलाषा १४५.

११. परिशिष्ट : १ प्रश्नोत्तरें १४६–१७१

चार आश्रम १६०, ब्रह्मचर्याश्रम १६२, गृहस्थाश्रम १६६, वानप्रस्थाश्रम १६८; संन्यासाश्रम १६९.

१२. परिशिष्ट : २ एका चर्चेचा समारोप १७२–१८१

माझी भूमिका १७३, पुरुषनिरक्षेप जीवन १७४, सैल वाक्य १७५, सुलभ व सुखद मातृत्व १७७, समान भूमिका असावी १७८, समाजनीतीत बदल १८०, स्त्रियांचाच प्रत्यय प्रणाम १८०.

---

# स्त्री-पुरुष सहजीवन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व
अनुक्रम ८०५५८ वि. निबंध
क्रमांक २२७७३ नों. दि. गाडगीळ

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८७०९
ठाणे

# १
# सहजीवनाचा आधार

एकमेकांबरोबर राहण्याची इच्छा हा सहजीवनाचा आधार आहे. फक्त मनाने एकमेकांच्या जवळ राहण्याने समाधान होत नाही. आपल्याला शरीराची निकटताहि हवी असते. आणि तिच्याकरता आपण प्रयत्न करतो. संगतीत जीवनाचा आनंद व सुगंधहि आहे बागेत जीं फुलें फुलतात त्यांच्यापैकी दरेकाचा निराळा सुगंध असतो. त्याचप्रमाणे जीवनात आपल्या सभोंवती राहणाऱ्या माणसांचाहि एक विशिष्ट गंध असतो. कधी तो गंध चांगला असतो, कधी वाईट असतो. पण, जेथे सुगंध असेल तेथेच राहायला आपल्याला आवडतें. यात स्त्रियांचा एक विशिष्टच गंध असतो. आई म्हणून, बहीण

म्हणून, मुलगी म्हणून, पत्नी म्हणून, आणि मित्र म्हणून वातावरणात ती एक मधुर सुगंध पसरवीत असते. पुरुषाच्या सान्निध्यातहि एका सौरभाचा अनुभव येतो. म्हणूनच पुरुषाला पुरुषाबरोबर, स्त्रीला स्त्रीबरोबर आणि स्त्री-पुरुषांना एकमेकां-बरोबर राहण्याची उत्कंठा असते. ही उत्कंठाच सह-जीवनाचा आधार आहे.

माणसाला एकटयात बरें वाटत नाही. आतापर्यंत फक्त दोन प्रकारच्या व्यक्तींना एकटेपणा हवासा वाटला आहे. योग्यांपैकी विरक्त साधू-संन्याशांना आणि भोग्यांपैकी स्त्रियांना ! माणसाची निकटता, सान्निध्य व स्पर्श या दोन्ही प्रकारच्या व्यक्तींनी जणू संसर्गजन्य रोगासारखा मानला आहे. संस्पर्श म्हणजे संसर्ग असेच त्यांनी मानलें आहे. इंग्रजींत ज्याला काँटॅक्ट म्हणतात तो त्यांच्या दृष्टीने काँटेजीन आहे. संस्पर्श म्हणजे काही प्रत्यक्ष आलिंगनच नव्हे. माणूस निव्वळ दृष्टीने व हृदयाच्या भावनेनेहि दुसऱ्याला स्पर्श करतो. वडील क्षयरोगाने आजारी असताना त्यांची फक्त इतकीच इच्छा होती की मी त्याच घरात राहावें. येवढाच स्पर्श त्यांना पुरेसा वाटत होता. हा भावनात्मक स्पर्श आहे.

### स्पर्श-भावना

परंतु माणसाला अव्यक्त किंवा भावनात्मक स्पर्श नेहमीच पुरेसा वाटत नाही. प्रत्यक्ष किंवा शारीरिक संपर्काचीहि गरज वाटते. त्यात एक आगळा आनंद वाटतो. म्हणून माणसें गांवें वसवून एकमेकांबरोबर राहतात. एकमेकांचा शेजार इच्छितात. नेहमीच काही मनासारखा शेजार मिळत नाही. तरी पण

माणूस शेजारावाचून राहू इच्छित नाही. संपर्काची ही भावना म्हणजेच स्पर्शभावना माणसात ती उपजतच आहे. पण, गांधीजींनी आपल्या एकादशव्रतात तिचा समावेश केला आहे. आपण कोणाला अस्पृश्य मानीत नाही, येवढेंच पुरेसें नाही. आपल्या शेजारी राहणाऱ्याचा स्पर्श पवित्र आहे असें आपल्याला वाटलें पाहिजे. काशीविश्वनाथाच्या देवळात केवळ दर्शनाने लोकांचें समाधान होत नाही. ते विश्वनाथाला स्पर्श करतात. पंढरपुरला विठोबाला आलिंगन देतात. त्या स्पर्शाने ते स्वतः पुनीत होतात. त्या पावन स्पर्शाचा महिमा व आनंद काही औरच आहे !

सत्संगतीतहि हीच उदात्त स्पर्शभावना आहे. असें नसतें तर विनोबा येथे आमच्यात साधनाकेन्द्रात असले काय किंवा पवनारच्या आश्रमात असले काय, आम्हाला काहीच फरक वाटला नसता. मग विनोबांच्या सत्समागमात राहण्याची आकांक्षा आणि आवश्यकताहि वाटली नसती. प्रेम हें भौगोलिक नाही, हृदयाची भावना आहे असें मानलें तरी, जाजूजींच्या मृत्यूची वार्ता ऐकून विनोबांना अश्रू गाळताना आपण पाहतो. तसें म्हटलें तर जाजूजींच्या फक्त शरीराचाच तर वियोग झाला होता; पण त्या वियोगानेहि शोक झालाच. आपलें शरीर अधम आणि अमंगळ नाही. तें पवित्र आहे. म्हणूनच, जेव्हा एखाद्या विभूतीचा अगर संताचा देहान्त होतो तेव्हा आपण शोक करतो.

आपण जेव्हा दुसऱ्याचें शरीर हें आपल्या सुखाचें किंवा भोगाचें साधन अथवा विषय मानतो तेव्हा त्याच्या शरीराविषयीची पावित्र्याची भावना नाहीशी होते. अशा प्रकारच्या शारीरिकतेत मानव व ईश्वर दोघांचाहि उपमर्द आहे. भगवंताची मूर्ति व संताचा विग्रह जितका पवित्र आहे तितकाच मानव-

मात्राचा देहहि पवित्र आहे. संत व भगवंत यांच्या स्पर्शाइतकाच पवित्र स्पर्श मानवाचा आहे. हा गांधीजींच्या स्पर्शभावनेचा अर्थ आहे. एरव्हीहि माणूस शेजारावाचून राहू शकत नाही. तो वस्तीत राहतो. तेथे एकमेकांचा आधार व भरवसा असतो.

**सहजीवनाचें प्रयोजन**

आधार व आश्रय यांच्या आवश्यकतेखेरीज माणसांच्या एकमेकांबरोबर राहण्याचें एखादें प्रयोजनहि असतें. ज्याप्रमाणे आगगाडीत प्रवासाकरता, सभेत भाषण करण्याकरता किंवा ऐकण्याकरता आणि देवळात उपासनेकरता माणसें जमतात त्याचप्रमाणे एखाद्या विशिष्ट प्रयोजनाकरता वसाहतीत किंवा वस्तीतहि एकत्र जमतात. प्रयोजनावाचून जेव्हा माणसें गोळा होतात तेव्हा त्याला आपण जमाव किंवा गर्दी म्हणतो. पण जेव्हा माणसें एखादें गांव वसवितात तेव्हा त्यात त्यांचें काही तरी प्रयोजन असतें. त्याकरता त्यांना एकमेकांच्या संपर्काची आणि सहकार्याची गरज वाटते.

सान्निध्य, निकटता किंवा जवळीक ही मानवाची स्वाभाविक आकांक्षा आहे. तिला येथे स्पर्शभावना असें म्हटलें आहे. त्या भावनेतील मूलतत्त्व असें की दरेक मानवाचा स्पर्श पवित्र आहे. याच भावनेच्या पोटी नीति, सदाचार, शिष्टाचार, व्यवहारसौंदर्य इत्यादींचा जन्म होतो. सारींच शरीरें पवित्र आहेत म्हणून तर आपण आजारी माणसांची शुश्रूषा करतो. असाध्य रोग्यांना देखील जगविण्याचा प्रयत्न होतो. आत्म्याला तर मरण नाहीच. मग शरीराला जगविण्याचे हे सारे प्रयत्न कशाला ! असा वाद कोणी घालीत नाही. सृष्टीतील सारींच

शरीरें पवित्र आहेत. मानवीय शरीराच्या पवित्रतेपुरती आम्ही आपली मर्यादा मानली आहे. एवंच काय की दरेक मानवाचें शरीर पवित्र आहे. दरेक मानवाचा संस्पर्श आणि संपर्क पवित्र आहे. सहजीवनात हा संकल्प दडलेला आहे.

**सहजीवनाला निर्भयता अपरिहार्य**

आपण असें पाहतो की संपर्काला स्त्री घाबरते, निकटता टाळू इच्छिते, स्वतःला वेगळें व सुरक्षित राखू इच्छिते. ज्याच्यापासून आपण दूर राहू इच्छितो त्याच्याबरोबर किंवा त्याच्याजवळ आपण राहू इच्छित नाही हे तर उघडच आहे. ज्याला आपण टाळू इच्छितो त्याच्या सहवासात आपल्याला आनंद होत नाही. चोरून विडी ओढणारा मुलगा आईबापांचा सहवास टाळण्याचा प्रयत्न करीत असतो. त्याला जर कोणी असें सांगितलें की विडी ओढणारी मुलें देवालादेखील आवडत नाहीत तर तो ईश्वरदेखील काही वेळ झोपी जावा किंवा बेशुद्ध पडावा असें त्याला वाटू लागेल. काशीत राहणाऱ्या एखाद्या गावगुंडाची जर मला भीति वाटू लागली तर एक तर त्याने काशीत राहू नये किंवा मी काशीत राहू नये अशीच माझी इच्छा राहील. सारांश, जेथे भीति असेल तेथे सहजीवन अशक्य आहे. ज्याला आपण भीतो त्याच्याबरोबर राहू शकत नाही. सहजीवनाकरता निर्भयता अपरिहार्य आहे. आपणहि रोज 'सर्वत्र भयवर्जन' चा उच्चार करतो.

दुसरें असें की ज्याच्याबरोबर आपण राहतो त्याच्याविषयी आपल्या मनात अरुचि, तिरस्कार किंवा घृणा असता कामा नये. उंदराला आपण भीत नाही, सापाला भीतो. तरी

पण उंदराची आपल्याला किळस येते. तिला जुगुप्सा असें म्हणतात. एकमेकांबरोबर राहणाऱ्यांनी एकमेकांचा तिरस्कार करू नये. एरव्ही सहजीवन अशक्य आहे. स्त्रीला जोपर्यंत पुरुषाची भीति किंवा तिरस्कार वाटतो तोपर्यंत त्यांचें पवित्र सहजीवन अशक्य आहे. आणि असें पवित्र सहजीवन जोपर्यंत अशक्य आहे तोपर्यंत स्त्रीचें स्वत:चें असें काही जीवनच उरत नाही. ती पुरुषाबरोबर जगू शकत नाही. त्याच्या आधाराने आणि त्याच्या भरवशावर जगेल. फक्त स्त्रियांबरोबरच काय तें ती मोकळेपणाने जगू शकेल. रामचरितमानसाच्या उत्तरकांडात एके ठिकाणी तुलसीदासजींनी ज्ञानापेक्षा भक्तीची श्रेष्ठता दाखविली आहे. ज्ञान पुरुष आहे आणि माया स्त्री आहे. म्हणून ज्ञान लुब्ध व मुग्ध होऊन मायेच्या पाशात सापडतें (हिन्दी भाषेत नपुंसकलिंग नाही, म्हणून ज्ञान पुल्लिग आहे.) तुलसीदासजी म्हणतात ज्ञानाच्या बाबतीत हा धोका आहे, पण भक्ति बोलून चालून स्त्री आहे. 'मोह न नारि, नारि के रूपा' स्त्री काही स्त्रीच्या रूपाला भुलणार नाही. म्हणून साधकाची सुरक्षितता भक्तीतच आहे, ज्ञानात नाही. तात्पर्य असें की स्त्रिया जर एकमेकींच्या बरोबर राहिल्या तर त्यात धोका नाही. परंतु, स्त्री आणि पुरुष यांच्या एकमेकांबरोबर राहण्यात मात्र दोघांनाही धोका आहे. निष्कर्ष हा की दोघांचें सहजीवन अशक्यच नव्हे, तर अनुचितहि आहे.

### स्त्रियांत सख्यभावना

येथे असा प्रश्न उपस्थित होतो की स्त्रीला स्त्रीविषयी मोह नसेल; पण काय स्त्रीला स्त्रीविषयी प्रेम असू शकते ?

एका स्त्रीला दुसऱ्या स्त्रीचें शरीर प्रिय व पवित्र वाटतें काय ? साधारणपणे आपण असें पाहतो की आपल्या येथे परंपरेने अधिकांश स्त्रिया स्वतःचेंच नव्हे तर इतर स्त्रियांचें शरीरदेखील अपवित्र मानतात. स्त्रीच्या शरीरापेक्षा पुरुषाचें शरीर त्या श्रेष्ठ मानतात. स्त्री स्त्रीचें शरीर निकृष्ट मानते. याचा परिणाम असा झाला की पुरुषांच्या मानाने स्त्रियांमधे परस्पर सख्यभावना कमी असते. पुरुष आपल्या सगळ्या कुटुंबाचा त्याग करून मित्राकरता आपल्या जिवाची कुरवंडी करील. बायबल म्हणतें, एका माणसाने दुसऱ्या माणसाकरता जीव द्यावा, यापेक्षा अधिक प्रेम एकाचें दुसऱ्यावर कोणतें असू शकेल ? पतीच्या प्राणाकरता आपल्या पंचप्राणांची आहुती स्त्री देईल. पुत्राकरता देखील ती स्वतःचा बळी देईल. प्रसंगविशेषी आईवडील, भाऊ-बहीण किंवा मुलगी यांच्याकरताहि जीव देईल. परंतु एखाद्या स्त्रीने आपल्या सगळ्या कुटुंबाचा त्याग करून आपल्या मैत्रिणीकरता स्वतःच्या प्राणांची आहुती दिल्याचें उदाहरण क्वचितच आढळेल. इतिहासात कृष्णार्जुनांची मैत्री प्रसिद्ध आहे. स्त्रीच्या जीवनात ही उणीव असल्यामुळेच त्यांच्या संस्थांत जिवंतपणा कमी असतो. कुटुंबाच्या बाहेर कुठल्याहि संस्थेत आपला जीव ओतण्याचें त्यांना वळण नाही. मुलींमध्ये दोस्ती वाढली पाहिजे, ती इतकी की त्या एकमेकींकरता प्राणदेखील पणाला लावायला तयार होतील. मत्सर, हेवादावा पुरुषांच्या ठिकाणी काही कमी नसतो. पुरुषांनी स्त्रीकरता इतर पुरुषांना ठार करायला कमी केलें नाही. तरीपण गिरिधर कविराय म्हणतात, 'कौरव पांडव वंश को कियो द्रौपदी नाश ।' रामरावणाच्या युद्धाला निमित्त सीता झाली. दोष सीतेला लावण्यात

आला. होमरच्या सुप्रसिद्ध इलियड या महाकाव्यात हेलन नांवाची एक रूपवती युवतीच युद्धाला निमित्त झाली आहे. इष्काकरता एक पुरुष दुसऱ्या पुरुषाला ठार करतो तरी पुरुषाचा मत्सर प्रसिद्ध नाही. सहपतींचा किंवा सहप्रियकरांचा मत्सर वाक्‌प्रचार बनलेला नाही. सवतीमत्सर मात्र वाक्‌प्रचार बनला आहे. या परंपरेचा स्त्रियांनी अंत केला पाहिजे. स्त्रियांमध्ये सौख्याची व सौहार्दाची स्थापना झाली पाहिजे.

**स्त्रियांचें सहजीवन**

स्त्रियांच्या संस्थांच्या अनेक नांवांपैकी भगिनीमंडळ हें एक नांव आहे. भगिनी शब्द सापेक्ष आहे. कोणाच्या अपेक्षेने हें नांव ठेवण्यात आलें असावें बरें ? सगळ्या स्त्रिया एकमेकींच्या बहिणी आहेत असा संकेत त्यात आहे काय ? उत्तर उघड आहे. पुरुषाच्या अपेक्षेने हें नांव देण्यात आलें आहे. पुरुषांना स्त्रिया असें सुचवू इच्छितात की सगळ्या स्त्रियांना तुम्ही आपल्या बहिणी माना. पुरुषापुरुषांत काय बंधुत्व नसतें ? तरीपण त्यांची बंधुमंडळें फारशी आढळत नाहीत. असलींच तर विश्वबंधुमंडळें असतात. प्रयोजनपरत्वे निरनिराळ्या मंडळांची आवश्यकता असते---शिक्षणमंडळ, व्यायाममंडळ, क्रीडामंडळ इत्यादि. सगळे पुरुष एकमेकांचें बंधू आहेतच. त्या बंधुत्वाचा मुद्दाम उल्लेख करण्याची गरज नाही. स्त्रियांमधे परस्पर भगिनीत्व नाही. पुरुषांशी जो त्यांचा संबंध आहे तो भीतीचा, संशयाचा व संकोचाचा आहे. सख्ख्या बहिणीदेखील सवती होऊ शकतात आणि त्यांच्यात मत्सर उत्पन्न होऊ शकतो. स्त्रियांचें परस्पर सहजीवनदेखील स्वायत्त नसतें. बहुधा तें

कुटुंबापुरतेंच असतें. म्हणून तें पुरुषाच्या द्वारा अस्तित्वात येतें. स्त्रीचें सहजीवन स्वतंत्र नाही, पर-तंत्र आहे. पुरुषाची दोस्ती आणि वैर त्याचें स्वत:चें असतें. ज्यात कुठल्याहि पुरुषाचा संबंध नसेल अशी दोस्ती आणि वैर स्त्रियांत फार क्वचितच दिसून येते. स्त्रीच्या जीवनात प्राधान्य दोस्तीला नसून नात्याला आहे. ती कुटुंबिनी आहे. ती संसार मांडते. कुटुंबांत मैत्रीपेक्षा नात्याचा संबंध अधिक असतो. म्हणूनच स्त्रियांचें स्वतंत्र असें सहजीवन आढळून येत नाही.

सारांश, एका स्त्रीला दुसऱ्या स्त्रीची भीति वाटत नाही येवढेंच सहजीवनाला पुरेसें नाही. आज स्त्री स्त्री-शरीराला अपवित्र मानते. हा सुंदर नरदेह, हा श्रेष्ठ नरदेह, इत्यादि गौरवपूर्ण विशेषणें विशेषेकरून पुरुषशरीराला अनुलक्षून आहेत. नरदेहच मुख्य आहे. नारीदेह गौण आहे. म्हणून त्याचें मानव्यहि गौण आहे. मुख्य नागरिकता पुरुषाची आहे, गौण नागरिकता स्त्रीची आहे. अव्वल पुरुष, दुय्यम स्त्री ! स्त्रीची नागरिकता देखील दुय्यम आहे. सैनिकतेची गोष्ट कशाला ? धर्मक्षेत्रात-देखील तिची भूमिका पुरुषाच्या नंतरची आहे. फार काय गीतेसारख्या उदार ग्रंथातदेखील तिला जो मोक्षाचा अधिकार देण्यात आला आहे तो 'सुद्धा' हें क्रियाविशेषण जोडून. 'तेऽपि यांति परां गतिम् । ते देखील परागतीला प्राप्त होतात. या 'देखील' मध्ये ब्रह्माण्ड साठवलेलें आहे.

स्त्री व पुरुष यांच्यांत जेव्हा परस्पर निर्भयता व विशुद्ध स्नेह नांदू लागेल तेव्हाच वास्तविक समानतेची स्थापना होईल. औपचारिक समता किंवा एकता निराळी. कायद्यात, घटनेत व शिष्टाचारात त्यांना जी समानता देण्यात आली आहे ती केवळ

औपचारिक समानता आहे. कायदेशीर समानता आहे. तिचें रूपांतर वास्तविक व भावरूप समानतेत झालें पाहिजे. कौटुंबिकतेत सुरक्षितता व आश्वासन आहे. पण त्यात भावरूप आशय नाही. कुटुंबात स्त्री आणि पुरुष एकमेकांच्या बरोबर राहतात. त्यामुळे स्त्रीला संरक्षण मिळतें, पण पुरुषाचें दायित्व वाढतें. स्त्रीचा सांभाळ होतो, पुरुषाची जबाबदारी वाढते. खरें म्हटलें तर व्हायला असें पाहिजे की दोघांच्याहि बरोबर राहण्यामुळे दोघांनाहि दुप्पट संरक्षण व आश्वासन मिळावें, दोघांचेंहि जीवन द्विगुणित व्हावें.

परंतु स्त्रीचें जीवन पुरुषनिर्भर व पुरुषतंत्र आहे. म्हणून त्यांच्यात परस्पर विश्वासाची उणीव आहे. स्त्रीच्या चारित्र्याबद्दल कांगावा करण्यात स्त्रियाच अधिक पुढाकार घेतात. स्त्रीला स्त्रीविषयी जास्त संशय असतो. स्त्रीच्या चारित्र्यात पावित्र्यापेक्षा पातिव्रत्य किंवा पुरुषनिष्ठेला महत्त्व अधिक आहे. पतीशी ईमान राखणें, पतिनिष्ठ राहणें, हेंच तिचें शील मानलें जातें. पातिव्रत्य निराळें व पावित्र्य निराळें. स्त्रियांमध्ये एकमेकींविषयी व स्त्रीपुरुषांमध्ये एकमेकांविषयी कुटुंबनिरपेक्ष स्नेह व विश्वासच पवित्र सहजीवनाचा आधार होऊ शकतो.

शांतिसैनिक विद्यालय
साधना-केन्द्र, काशी

२१-१२-६०

# २

# स्त्री-जीवनाचा यक्ष प्रश्न

आपण जेव्हा बाजारात एखादी वस्तु विकत घ्यायला जातो तेव्हा बहुधा अगदी नवीन-तम फॅशनची मागतो. मोटर घ्यायची झाल्यास ती अगदी आजच्या म्हणजे अखेरच्या मॉडेलची मागतो. जी वस्तु अगदी 'अप-टु-डेट' अद्यावत असेल तीच उत्कृष्ट मानली जाते. जें नवीन-तम तेंच उत्तम असा जणु आधुनिकतेचा संकेतच आहे. एक स्त्री आपल्या पतीला म्हणाली, स्त्री ही भगवंताच्या सृष्टीतील मानव्याचें 'लेटेस्ट मॉडेल' आहे, म्हणून ही प्रत्येक बाबतीत पुरुषा-पेक्षा सरस आहे. देवाने अगोदर मनूला किंवा आदमला निर्माण केलें. आणि नंतर स्त्री निर्माण केली. अर्थात स्त्री ही त्याची उत्कृष्ट कृति आहे. मानव्याची ती

नवीनतम आवृत्ति आहे. पतीने उत्तर दिलें, हें खरें नाही. त्याचें असें झालें, की देवाला जेवढ्या कलापूर्ण वस्तू निर्माण करायच्या होत्या त्या त्याने आधी निर्माण करून घेतल्या. आपण अगोदर जर स्त्री निर्माण केली तर ती दरेक बाबतीत सल्ला देऊ लागेल अशी त्याला भीति वाटली. एकदा तिने ढवळाढवळ करायला सुरवात केली तर कुठलीहि कृति पूर्ण होणार नाही. ही सल्ला देण्याची खोड स्त्रीच्या ठिकाणी उपजतच आहे. म्हणून देवाने स्त्री अगदी शेवटी निर्माण केली.

### सहजीवनाला श्रेष्ठत्वाच्या भावनेचें वावडें

स्त्री स्वत:ला पुरुषापेक्षा श्रेष्ठ मानू लागली, आणि पुरुष स्वत:ला स्त्रीपेक्षा श्रेष्ठ मानू लागला तर दोघेहि आपापल्या विशिष्ट शक्तीच्या आधारे एकमेकांवर वर्चस्व स्थापन करण्याचा प्रयत्न करतील. एकमेकांवर अंमल गाजवण्याची धडपड जेथे असेल तेथे सहजीवन अशक्य आहे. तेथे दरेक व्यक्ति दुसऱ्या व्यक्तीवर आपलें प्रभुत्व स्थापन करण्याचा प्रयत्न करते आणि व्यक्ति व्यक्तीला आपली संपत्ति बनविण्याचा घाट घालते, जेथे एक व्यक्ति दुसऱ्या व्यक्तीची संपत्ति बनते तेथे एका व्यक्तीचे व्यक्तिमत्वच नाहीसें होऊन जातें. मग सहजीवनाला वावच राहत नाही. जी व्यक्ति दुसऱ्या व्यक्तीवर ताबा गाजवते तिचेंच व्यक्तित्व तेवढें शिल्लक राहतें. दुसऱ्याचें वर्चस्व जो कबूल करतो त्याचें जीवन शिल्लक राहत नाही. स्त्री व पुरुष यांनी आपापल्या विशिष्ट शक्तींच्या बळावर एकमेकांना कह्यात ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांना एकमेकांच्या बरोबर तर राहता आलें पण तें फक्त सहअवस्थान झालें. सहअवस्थान

किंवा सहअस्तित्व म्हणजे बरोबर असणें, बरोबर जगणें नव्हे. म्हणूनच स्त्रीपुरुषांच्या आतापर्यंतच्या सहअस्तित्वातून उभयतांचें सहजीवन निष्पन्न झालें नाही.

सहजीवनाला बरोबरीची गरज आहे. बरोबरी म्हणजे बरोबरीचें नातें, समान भूमिका. बरोबरी म्हणजे एकरूपता नव्हे. स्त्री पुरुषकल्प बनली आणि पुरुष स्त्रीप्राय झाला; अर्थात् पुरुष जवळजवळ स्त्री बनला आणि स्त्री जवळजवळ पुरुष बनली म्हणजे त्यांच्यात एकरूपता येऊ शकेल. परंतु त्यात दोघांचीहि वैशिष्टचें, त्यांच्या ठिकाणी असलेले विशेष गुण नाहीसे होतील. स्त्री स्त्री राहणार नाही आणि पुरुष पुरुष राहणार नाही. हा काही बरोबरीचा अर्थ नव्हे. बरोबरीचा अर्थ इतकाच की स्त्रीपुरुषांचें नातें बरोबरीचें राहील. घरी आपला भाऊ आहे आणि बहीणहि आहे. भाऊ भाऊच राहील, बहीण बहीणच राहील परंतु नात्याच्या बाबतीत दोघांचीहि भूमिका समान असेल. स्त्री व पुरुष यांची भूमिका जोपर्यंत समान होणार नाही, त्यांचा दर्जा बरोबरीचा होणार नाही तोपर्यंत सहजीवन अशक्य आहे.

ब्राह्मण व भंगी आणि त्याचप्रमाणे अमीर व गरीब यांच्यात समानता असावी असें जेव्हा आपण म्हणतो तेव्हा आपला अर्थ निराळा असतो. तेव्हा आपल्याला असें म्हणायचें असतें की ब्राह्मण ब्राह्मण म्हणून राहणार नाही आणि भंगी भंगी म्हणून राहणार नाही. तेथे आपण तो भेदच नाहीसा करू इच्छितो. येथे आपण पुरुष व स्त्री यांच्यातील भेद नाहीसा करू इच्छित नाही. तें आपलें उद्दिष्ट नव्हे. स्त्रीपुरुष यांच्यातील समानतेचा

खरा अर्थ तुल्यता आहे. एकाच तागडीच्या दोन पारड्यांत दोघांनाहि ठेवलें तर त्यांचें वजन सारखें राहील. समाजात दोघांचाहि दर्जा, कदर व किंमत सारखी राहील. सहजीवनाची ही अनिवार्य अट आहे.

**खरीखुरी तुल्यता**

सहजीवन म्हटलें की आम्हाला सहशिक्षणाची आठवण होते. मुलामुलींचें एकत्र शिकणें सुरू झालें आहे. अनेक विचारवंतांच्या मनात आजहि या उपक्रमाबद्दल अनेक प्रकारच्या शंका उत्पन्न होत आहेत. मुलामुलींना एकत्र शिक्षण देणें कितपत योग्य आहे अशी शंका यांच्या मनात येते. पण या प्रश्नाचा विचार करण्यापूर्वी याहिपेक्षा मूलगामी असा एक प्रश्न आपण स्वत:ला विचारला पाहिजे. तो प्रश्न म्हणजे स्त्रीपुरुषांचें एकमेकांबरोबर राहणें इष्ट आहे काय? याबाबतीत अजून आपल्या मनाचा पूर्ण निश्चय झालेला नाही. आतापर्यंत हा प्रश्न कुठल्याहि देशात सोडवण्यात आलेला नाही. इतर देशांत हा प्रश्न सोडवण्यात आला आहे ही समजूत चुकीची आहे. बाह्य व्यवहाराच्या काही बाबींपुरता स्त्रीपुरुषांमधे सहयोग स्थापन झाला आहे. आर्थिक क्षेत्रात आणि काही प्रमाणात सामाजिक जीवनातहि स्त्रीपुरुष एकमेकांशी सहयोग करतात. पण याचा खरा अर्थ इतकाच आहे की आजपर्यंत जी कामें फक्त पुरुषांचींच मानली जात होतीं आणि जीं कार्यक्षेत्रें पुरुषांनाच खुलीं होती तेथे आता स्त्रियांनाहि प्रवेश मिळाला आहे. पण ही बाह्य व्यवहाराची समानता झाली. तुल्यता आतली वस्तु आहे. स्त्रिया पुरुषांचें अनुकरण करू लागल्या तर त्या नकली पुरुष बनू शकतील. पण त्यायोगे त्यांचें

सत्त्व नाही वाढणार. सहजीवनात सत्त्वसंपन्न पुरुष व सत्त्वसंपन्न स्त्री यांच्या सहयोगाची अपेक्षा आहे.

### सहशिक्षणाचें परिणत स्वरूप

स्त्रीपुरुषांचें एकमेकांबरोबर राहणें अनिवार्य तर आहेच, पण पर्याप्त मात्र नाहीं. पूर्वी मुलांना व मुलींना एकमेकांपासून अगदी वेगळ्या अशा हवाबंद खुराड्यात ठेवण्यात येत असे. म्हणून सुरवातीला सहशिक्षणावर जोर देणें जरूरीचेंच होतें. परंतु नुसतें सहशिक्षण पर्याप्त नाही. सुमारे वीसपंचवीस वर्षांपूर्वी सहशिक्षण रद्द करण्यात आलें. परंतु त्याचा असा आशय मात्र नव्हता की मुलामुलींचें पुन्हा विभक्त शिक्षण सुरू करावें. मुलामुलींना एकमेकांच्या जवळ आणण्याची जी गरज सुरवातीला होती ती नंतर उरली नाही येवढाच त्याचा अर्थ आहे. म्हणून सक्तीचें सहशिक्षण रद्द करण्यात शिक्षणाचें पाऊल मागे पडलें नाही, उलट पुढेच पडलें. मुलामुलींनी एकत्र शिकणें आता एक सामान्य व्यवहार झाला आहे. त्यामुळे सहशिक्षणाच्या नियमाची आवश्यकता राहिलेली नाही. स्त्री आणि पुरुष जोपर्यंत बिनधोकपणे आणि निर्धास्तपणे एकमेकांबरोबर राहू शकत नाहीत, मुलगे आणि मुली त्यांच्यावर पाळत ठेवल्यावाचून जोपर्यंत एकमेकांबरोबर शिकू शकत नाहीत, तोपर्यंत दोघांच्या सहजीवनाचे आणि सहशिक्षणाचे अवसर समाजात निर्माण करावे लागतात. म्हणून सुरवातीला सहशिक्षणाचा आग्रह ठेवावा लागतो. परंतु आता स्त्रीपुरुषांचें एकमेकांबरोबर राहणें हा समाजाचा सामान्य, रूढ व्यवहार झाला आहे. अशा स्थितीत मुलगे व मुली यांना आपापल्या वैशिष्टयांचा

विकास करता यावा म्हणून सहशिक्षणाबरोबरच पृथक् शिक्षणाचीहि योजना करण्यात येते. मानव या नात्याने दोघांचें-हि शिक्षण एकत्र होईल; पण स्त्री व पुरुष या नात्याने त्यांचें शिक्षण विभक्तहि होईल. याचें नांव सहशिक्षणाचें परिणत स्वरूप.

पुरुष आणि स्त्री यांच्या विशिष्ट गुणांना अनुरूप अशी त्यांची विशिष्ट कार्यक्षेत्रें असणारच. परंतु ती कार्यक्षेत्रें अन्योन्य व्यावर्तक मात्र असू नयेत. स्त्रीच्या ठिकाणी काही विशिष्ट गुण व विशिष्ट शक्ती आहेत. त्यांना अनुसरून तिच्या कार्याची एक विशिष्ट कक्षा राहील. त्याचप्रमाण पुरुषाच्या कार्याची विशिष्ट कक्षा असू शकेल. पण दोघेहि मानव आहेत. मानवता हा त्यांचा मुख्य गुण आहे. आणि तो उभयतांना सामान्य आहे. म्हणून त्यांचें जीवन व शिक्षण बहुतांशी संयुक्त राहील. त्यांचें जीवन जर संयुक्त नसेल तर कुटुंबात व समाजात त्यांचा सहयोग कसा होऊ शकेल ? संयुक्त जीवनाकरता समान भूमिका अगत्याची आहे. एकमेकांबरोबर राहताना दोघांपैकी कोणालाहि दुसऱ्यापासून सावध व सतर्क राहण्याची आवश्यकता असता कामा नये. मला तुमच्यापासून सावध रहावें लागलें आणि तुम्हाला माझ्यापासून सावध रहावें लागलें तर आपण एकमेकांचा भरवसा करू शकणार नाही. आणि जेथे परस्पर विश्वास नसेल तेथे सहजीवन कसें शक्य आहे ?

### स्त्री-पुरुष भेदाची परंपरा

परंपरागत धर्माने स्त्रीला एक तर पुरुषाच्या वरचें स्थान दिलें आहे किंवा खालचें. स्त्री देवी तरी असेल किंवा मग

संपत्तिच असेल. एकीकडे धर्मशास्त्र म्हणते 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवताः। यत्रेतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः ॥' स्त्रियांची जेथे पूजा होते तेथे देवता रमतात, म्हणजे प्रसन्न होतात. त्यांची पूजा जेथे होत नाही तेथे सगळ्या क्रिया निष्फल होतात. हे मनुवचन आहे. मनुस्मृतीला मानव-धर्मशास्त्रहि म्हणतात. तेच शास्त्र दुसरीकडे असेंहि म्हणतें 'पिता रक्षति कौमार्ये, भर्ता रक्षति यौवने। पुत्रो रक्षति वार्धक्ये; न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ॥' कुमारी असताना स्त्रीचें रक्षण पिता करतो, युवती झाली म्हणजे पति तिला सांभाळतो. शास्त्रमर्यादेप्रमाणे तरुण स्त्रीचें अविवाहित राहणें निषिद्ध आहे. सनातनी हिंदु परंपरेप्रमाणे स्त्रीला ब्रह्मचर्य विहित नाही. म्हणून तारुण्यात पति तिचें रक्षण करील आणि म्हातारपणी पुत्र रक्षण करील. सारांश, पुरुषाच्या दृष्टीने स्त्री एक तर पूजेचा विषय असेल किंवा सांभाळण्याचा ऐवज. पुराणमतवादी शास्त्रज्ञांच्या दृष्टीने स्त्री स्वातंत्र्याला पात्रच नाही. त्यांचें म्हणणे असें की हें काही शास्त्राचें विधान नाही. यात कुठल्याहि तत्त्वज्ञानाचें प्रतिपादन नाही. ही वस्तुस्थिति आहे. स्त्रीला आपण स्वातंत्र्य देतो म्हटलें तरी तें तिला पेलणार नाही. ती मुळी स्वातंत्र्याकरता घडविण्यातच आलेली नाही. यात बिचाऱ्या शास्त्राचा काय बरें दोष ! उदाहरणार्थ गाय घ्या. ती पूजार्हा आहे. पूजा करण्यास योग्य आहे. तिची पूजा करावी. तिला पवित्रहि मानावी. पण म्हणून जेथे वाघलांडगे संचार करीत असतील अशा रानात आपण तिला मोकळें सोडू काय ? तसेंच स्त्रीचें आहे. 'प्रजननार्थं महाभागाः पूजार्हाः गृहदीप्तयः।' त्या आमच्या घरच्या प्रकाश-ज्योति

आहेत. त्या वंशवृद्धीकरता आहेत म्हणून महाभाग आहेत. आणि म्हणूनच 'रक्षणीयाः अतियत्नतः'– जतन करून सांभाळण्यासारख्या आहेत. फक्त जीर्णमतवादी, जुनाट शास्त्रीपंडितांचेंच हें मत नाही. आजच्या अनेक मानवविज्ञानवेत्त्यांचेंहि हेंच मत आहे. ते म्हणतात स्त्री व पुरुष यांच्यांत नैसर्गिक भेद आहे. त्यांचीं शरीरें भिन्न प्रयोजनांकरता घडविण्यात आलीं आहेत. त्या प्रयोजनांना अनुरूप असाच त्यांचा स्वभावहि आहे. तुम्ही निसर्गावर बळजबरी कशी करू शकणार ! नैसर्गिक भेदामुळेच त्यांच्या गुणांत व शक्तीत भिन्नता आली आहे. स्त्रीच्या शरीराची रचनाच अशी आहे की स्वतःच्या भरवशावर जगू शकत नाही. त्याला बापड्या शास्त्रकारांचा काय इलाज ! त्यांनी फक्त नैसर्गिक वस्तुस्थितीचा अनुवाद केला आहे. 'न स्त्री स्वातंत्र्यं अर्हति' हें विधान नव्हे वस्तुकथन आहे. ज्या संप्रदायांनी अथवा धर्म-प्रवर्तकांनी स्त्रियांच्या स्वतंत्रतेचें व समानतेचें प्रतिपादन करण्याचा आव आणला आणि त्या दिशेने प्रयत्न करण्याचा हव्यास धरला त्यांची शेवटी फजिती झाली. निसर्गाच्या वाटेस गेलेलें त्याला खपत नाही. तात्पर्य, स्त्री व पुरुष यांचें समान भूमिकेवरील म्हणजे तुल्य भूमिकेवरील सहजीवन शक्य कोटीतील आहे काय हा स्त्री-जीवनाचा यक्ष प्रश्न आहे. शास्त्रकारांचें म्हणणें, या प्रश्नाचें उत्तर निसर्गच देऊन चुकला आहे. म्हणून क्रांतिकारी स्त्रीच्या जीवनाची हीच मूलभूत समस्या आहे. निसर्गावर आधारलेला हा युक्तिवाद जर मान्य केला तर स्त्रीची मानवता गौण किंवा 'सेकंडरी' होऊन जाते. ती मनुष्य आहे हें कबूल, पण दुय्यम दर्जाची मानव आहे. मुख्यार्थाने मानव पुरुष, गौण अर्थाने मानव स्त्री ! काय, आपल्याजवळ

या प्रश्नाचें काही उत्तर आहे ? आपल्याजवळ म्हणजे स्त्रियांच्या जवळ. स्त्रिया जर स्वतःच्या वृत्तीने व जीवनाने हा प्रश्न सोडवू शकल्या नाहीत तर त्यांनी गौण भूमिकेचा स्वीकार केला पाहिजे. याखेरीज गत्यंतर नाही.

## स्त्री ही व्यक्ति की विषय ?

ईश्वरकृपेने ही समस्या अशी नाही की जिचें काही उत्तरच नसेल. पण तें उत्तर शोधण्यासाठी स्त्रीला शारीरिकतेच्या व रूपनिष्ठेच्या वर उठावें लागेल. स्त्रीच्या ठिकाणी शारीरिकतेचीं अनेकविध रूपें आहेत. म्हणूनच स्त्रियांच्या ठिकाणी पुरुषांच्या मानाने अस्पृश्यतेची भावना अधिक असते. ती जणू स्वतःला लाजाळूचें रोपटें मानते. या रोपट्याला इंग्रजीत 'टच मी नॉट' म्हणतात. हात लावताच आपोआपच संकोचून जातें. हिंदी भाषेत त्या रोपट्याचें नांव लज्जावंती असेंहि आहे. स्त्री स्वतःला लज्जावंती मानते. 'टच मी नॉटिझम,' सोवळेंपणा हें तिचें शील किंवा ब्रीद होऊन बसलें आहे. पुराणप्रिय ब्राह्मण गंगास्नान करून शुचिर्भूत होऊन सोवळें नेसून रस्त्याने चालू लागला म्हणजे जणू काही सगळ्या जगापासून स्वतःला बचावीत अंग चोरून चोरून चालतो. रस्त्यावर पाणी शिंपडल्याचें सोंग करीत असतो. ही अस्पृश्यता पवित्रतेचें अपत्य आहे. मी स्वतःचें शरीर इतकें पवित्र मानतो की दुसऱ्याचा स्पर्श टाळतो. दुसऱ्याचा विटाळ झाला तर माझें शरीर अपवित्र होईल. अस्पृश्यतेच्या या प्रकाराचें नांव 'सोवळेंपणा' आहे.

पण स्त्रीच्या ठिकाणी आढळून येणारी पवित्रतेची व सोवळेंपणाची भावना निराळ्या प्रकारची आहे. त्या सोवळें-

पणात दोन परस्पर विरोधी भावना दडलेल्या आहेत. सोवळें नेसलेल्या ब्राह्मणाप्रमाणे ती स्वतःचें शरीर पवित्र मानीत नाही. उलट, दरेक स्त्री स्वतःचें शरीर पुरुषशरीरापेक्षा कमी पवित्र मानते. किंबहुना स्त्रीशरीर हें अमंगळ, अपवित्र आणि घाणेरडें आहे अशी तिची भावना असते. पुरुषहि स्त्रीदेहाला अशुचिच मानतो. मग ते खुद्द त्याच्या आईचेंच शरीर का असेना ? शालिग्रामाला स्त्रीचा विटाळ होतो. ती केवळ असमर्थच नाही तर अस्वच्छहि आहे. म्हणून स्त्री एका दृष्टीने रक्षणीय, म्हणजे सांभाळण्याची वस्तु आहे तर दुसऱ्या दृष्टीने गोपनीय, म्हणजे झाकून ठेवण्याची वस्तुहि आहे. जी वस्तु सांभाळायची असते तिचें जतन करावें लागतें. पुरुषाच्या स्पर्शाने स्त्रीचें शरीर विटाळतें असा याचा अर्थ नसून तिचें शील भ्रष्ट होण्याची भीति असते असा आहे. आपण कांचेचें भांडे हाताळू लागलो तर तें अपवित्र होण्याची भीति नसते, पण फुटण्याचा मात्र धोका असतो. या दोन अगदी भिन्न भावना आहेत. पापड, बत्तासे आम्ही अगदी जपून ठेवतो. कारण की हात लावताच ते फुटतील अशी भीति असते. त्याचप्रमाणे स्त्रीदेहहि जपून व सांभाळून ठेवावा लागतो. सोवळ्या ब्राह्मणाचें शरीर नेहमीच सांभाळून ठेवावें लागत नाही. पण स्त्रीला तर पुरुषाचा संपर्कच संसर्ग आहे. त्याचा स्पर्श विटाळ आहे.

### संपर्कात पवित्रता

खरें पाहिलें असता संपर्कानें पावित्र्य व सामर्थ्य वाढतें. म्हणूनच आपण साधूंचा व सज्जनांचा संपर्क शोधतो. 'कुलीनैः सह संपर्कम् । सज्जनैः सह मित्रताम् ।' सज्जनांच्या संपर्काने आपण शुद्ध व पावन होतो. महापुरुषांच्या चरणांना आपण

स्पर्श करतो. येशूच्या झग्याच्या पदराचें लोक चुंबन घेत असत. जेथे स्नेह किंवा पवित्रतेची भावना असेल तेथे संपर्कातून सामर्थ्याचा लाभ होतो. सार्वजनिक कार्यकर्त्यांना आपण लोक-संपर्क साधायला सांगतो. लोकांच्या संपर्कावाचून चळवळीला जोम येणार नाही. तिच्यात वास्तविकता येणार नाही संपर्क इष्ट असतो. त्याची गरज असते. जो संपर्क आपण टाळू इच्छितो त्याचें नांव संसर्ग, विटाळ. जो डॉक्टर कुष्ठरोग्यांची सेवा करतो तो शक्य तोवर त्यांच्या शरीराचा स्पर्श टाळतो. आणि स्पर्श करण्याची गरज पडल्यास आधी स्वतःचें शरीर जंतु-नाशक औषधांनी सुरक्षित करून घेतो. वस्तुस्थिति अशी आहे की स्त्री संपर्कमात्राला संसर्ग मानते. स्वतःच्या शरीराच्या बाबतीत तिच्या ठिकाणीं सोवळेंपणा व ओवळेंपणा अशा परस्पर विरुद्ध भावना आहेत.

## अस्पृश्य माणूस म्हणजे मूर्तिमंत विटाळ

अस्पृश्यतानिवारणाचें आंदोलन चालू असता आम्ही कित्येकदा असें म्हणत असू की अस्पृश्यता हें महान पातक आहे. तिच्यात मानवद्रोह आहे. तेव्हा कित्येक पुराणमतवादी शास्त्री-पंडित म्हणायचे की तुमचें हें विधान धादांत खोटें आहे. अस्पृश्यतेत तिरस्कार किंवा माणूसघाणेपणा मुळीच नाही. आम्ही जेव्हा स्नान करून, सोवळें नेसून पूजेला बसतो तेव्हा आपल्या प्रिय पुत्राला किंवा लाडक्या नातवाला देखील शिवत नाही. यात तिरस्कार कुठे आहे ? याहि पेक्षा भयंकर असा आणखी एक युक्तिवाद हे पुराणमताभिमानी करीत असत. ते म्हणायचे की आम्ही त्यांना अस्पृश्य मानतो याचें त्यांना वाईट वाटत

पणात दोन परस्पर विरोधी भावना दडलेल्या आहेत. सोवळें नेसलेल्या ब्राह्मणाप्रमाणे ती स्वतःचें शरीर पवित्र मानीत नाही. उलट, दरेक स्त्री स्वतःचें शरीर पुरुषशरीरापेक्षा कमी पवित्र मानते. किंबहुना स्त्रीशरीर हें अमंगळ, अपवित्र आणि घाणेरडें आहे अशी तिची भावना असते. पुरुषहि स्त्रीदेहाला अशुचिच मानतो. मग ते खुद्द त्याच्या आईचेंच शरीर का असेना ? शालिग्रामाला स्त्रीचा विटाळ होतो. ती केवळ असमर्थच नाही तर अस्वच्छहि आहे. म्हणून स्त्री एका दृष्टीने रक्षणीय, म्हणजे सांभाळण्याची वस्तु आहे तर दुसऱ्या दृष्टीने गोपनीय, म्हणजे झाकून ठेवण्याची वस्तुहि आहे. जी वस्तु सांभाळायची असते तिचें जतन करावें लागतें. पुरुषाच्या स्पर्शाने स्त्रीचें शरीर विटाळतें असा याचा अर्थ नसून तिचें शील भ्रष्ट होण्याची भीति असते असा आहे. आपण कांचेचें भांडे हाताळू लागलो तर तें अपवित्र होण्याची भीति नसते, पण फुटण्याचा मात्र धोका असतो. या दोन अगदी भिन्न भावना आहेत. पापड, बत्तासे आम्ही अगदी जपून ठेवतो. कारण की हात लावताच ते फुटतील अशी भीति असते. त्याचप्रमाणे स्त्रीदेहहि जपून व सांभाळून ठेवावा लागतो. सोवळ्या ब्राह्मणाचें शरीर नेहमीच सांभाळून ठेवावें लागत नाही. पण स्त्रीला तर पुरुषाचा संपर्कच संसर्ग आहे. त्याचा स्पर्श विटाळ आहे.

**संपर्कात पवित्रता**

खरें पाहिलें असता संपर्कानें पावित्र्य व सामर्थ्य वाढतें. म्हणूनच आपण साधूंचा व सज्जनांचा संपर्क शोधतो. 'कुलीनैः सह संपर्कम् । सज्जनैः सह मित्रताम् ।' सज्जनांच्या संपर्काने आपण शुद्ध व पावन होतो. महापुरुषांच्या चरणांना आपण

स्पर्श करतो. येशूच्या झग्याच्या पदराचें लोक चुंबन घेत असत. जेथे स्नेह किंवा पवित्रतेची भावना असेल तेथे संपर्कातून सामर्थ्याचा लाभ होतो. सार्वजनिक कार्यकर्त्यांना आपण लोक-संपर्क साधायला सांगतो. लोकांच्या संपर्कावाचून चळवळीला जोम येणार नाही. तिच्यात वास्तविकता येणार नाही संपर्क इष्ट असतो. त्याची गरज असते. जो संपर्क आपण टाळू इच्छितो त्याचें नांव संसर्ग, विटाळ. जो डॉक्टर कुष्ठरोग्यांची सेवा करतो तो शक्य तोवर त्यांच्या शरीराचा स्पर्श टाळतो. आणि स्पर्श करण्याची गरज पडल्यास आधी स्वतःचें शरीर जंतु-नाशक औषधांनी सुरक्षित करून घेतो. वस्तुस्थिति अशी आहे की स्त्री संपर्कमात्राला संसर्ग मानते. स्वतःच्या शरीराच्या बाबतीत तिच्या ठिकाणीं सोवळेंपणा व ओवळेंपणा अशा परस्पर विरुद्ध भावना आहेत.

### अस्पृश्य माणूस म्हणजे मूर्तिमंत विटाळ

अस्पृश्यतानिवारणाचें आंदोलन चालू असता आम्ही कित्येकदा असें म्हणत असू की अस्पृश्यता हें महान पातक आहे. तिच्यात मानवद्रोह आहे. तेव्हा कित्येक पुराणमतवादी शास्त्री-पंडित म्हणायचे की तुमचें हें विधान धादांत खोटें आहे. अस्पृश्यतेत तिरस्कार किंवा माणूसघाणेपणा मुळीच नाही. आम्ही जेव्हा स्नान करून, सोवळें नेसून पूजेला बसतो तेव्हा आपल्या प्रिय पुत्राला किंवा लाडक्या नातवाला देखील शिवत नाही. यात तिरस्कार कुठे आहे ? याहि पेक्षा भयंकर असा आणखी एक युक्तिवाद हे पुराणमताभिमानी करीत असत. ते म्हणायचे की आम्ही त्यांना अस्पृश्य मानतो याचें त्यांना वाईट वाटत

असेल, तर त्यांनीच आम्हाला अस्पृश्य मानावें म्हणजे झालें. आम्ही मुळीच तक्रार करणार नाही. कसा उफराटया काळजाचा युक्तिवाद आहे ! त्यांना येवढेंच हवें आहे की कसेंहि करून या अस्पृश्याने आम्हाला शिवू नये. तुम्ही जेव्हा पूजेला बसता किंवा शौचादीला जाऊन येता तेव्हा कोणाला शिवत नाही आणि शिवूहि देत नाही. ही काही अस्पृश्यता नव्हे. यात प्रेमाची हानि होत नाही. दुसऱ्याच्या शरीराचा तिरस्कार किंवा उपमर्दहि नाही. स्वतःच्या शरीराचाहि अपमान नाही. आपण जेव्हा दुसऱ्याचा संपर्क हाच संसर्ग मानू लागतो तेव्हा त्या भावनेला अस्पृश्यता म्हणतात. लोकांना हा विचार त्यांना कळेल अशा सुबोध पद्धतीने सांगितला पाहिजे. हा प्रश्न दिसतो तितका सरळ नाही. त्याचा विचार करण्याकरता अंमळ खोलात शिरलें पाहिजे. मी पूजेत असलो किंवा शेतखाना साफ करीत असलो म्हणजे मी कोणाला शिवत नाही आणि कोणी मला शिवत नाही. ही स्थिति अगदी निराळी आहे. ही अस्पृश्यता नव्हे. व्यवहाराची मर्यादा आहे. परंतु जेव्हा आपण एखाद्या माणसाला त्याच्या जन्मामुळे सदासर्वदा सर्वस्थितीत अस्पृश्य मानतो तेव्हा त्याच्या अंगी असलेले नैतिक गुण आणि आध्यात्मिक श्रेष्ठता देखील त्याला स्पृश्य बनवू शकत नाही. त्याचा संस्पर्शच आम्हाला संसर्गाप्रमाणे वर्ज्य आहे. ती व्यक्ति विटाळाची जिवंत प्रतिमाच आहे.

### दृष्टीचा स्पर्श

अस्पृश्यतेची ही भावना पुरुषाच्या मानाने स्त्रीच्या ठिकाणी जास्त प्रमाणात आहे. तिचें स्वरूपहि काहीसें भिन्न आहे. स्त्री

जर कुठला एखादा स्पर्श जास्तीत जास्त टाळत असेल, कुठल्याहि एखाद्या स्पर्शाला जास्तीत जास्त घाबरत असेल तर तो पुरुषाचा स्पर्श होय ! दर्शन स्पर्शन सारेंच वर्ज्य आहे. फक्त शरीरस्पर्शापुरती त्याची मर्यादा नाही. मुली जर नटून नटून रस्त्यातून जाऊ लागल्या तर मुलें त्यांच्याकडे रोखून पाहतात. हा डोळ्याचा किंवा दृष्टीचा स्पर्श आहे. त्याचा परिणाम असा झाला, की कुठलीहि स्त्री अगदी स्वाभाविक गतीने बहुतेक चालतच नाही. कवितेत तिच्या गतीचें मोठें रसभरीत वर्णन आढळून येतें. तुलसीदासांनी देखील गजगामिनी, पिकबैनी, मृगशावकनैनी असें वर्णन केलें आहे. रस्त्याने चालताना तिला आपल्या स्त्रीत्वाची अधिकच जाणीव असते. लाजत, मुरकत, कचरत असल्यासारखी चालताना दिसते. नजर सरळ ठेऊ शकत नाही. जणू कांही साऱ्या जगाची नजर तीराप्रमाणे आपल्याकडेच नेम धरून सरसावली आहे असा तिला भास होतो. मनोविज्ञानात ज्या वृत्तीला 'सेल्फकाँशस' म्हणतात ती तिची नित्य स्थिति असते. या वृत्तीत कुणाला सौंदर्य दिसत असेल, कलेचाहि भास होत असेल; परंतु ती आत्ममर्यादेची किंवा स्वातंत्र्याची स्थिति नव्हे येवढें मात्र खरें. समाजातदेखील स्त्री अशीच लाजत लाजत, वचकत वचकत जगते. स्वतंत्र व स्वाभाविक जीवन तिच्यासाठी नाहीच. याचें कारण पुरुषाने स्त्रीचें शरीर आणि स्त्रीनेहि स्वतःचें शरीर विषय मानलें आहे. म्हणून स्त्रीहि मानवीय व्यक्ति न राहता उपभोग्य वस्तु किंवा विषय होऊन बसली आहे. म्हणून मुळात हा प्रश्न आध्यात्मिक आहे.

हा टप्पा अजून अमेरिका किंवा रशिया यांनी देखील गांठलेला नाही. स्त्रीच्या शरीराचा व्यापार होणार नाही, तिचें

शरीर प्रदर्शनाचा विषय मानला जाणार नाही येथपर्यंतची मजल रशियाने गाठली आहे. मनोरंजनाकरता किंवा व्यापाराकरता स्त्रीच्या शरीराचा उपयोग किंवा प्रदर्शन रशियात निषिद्ध आहे. कुठल्याहि प्रकारचा समाजवाद ही गोष्ट विहित किंवा वाजवी मानू शकत नाही. अशा प्रकारच्या पोस्टरांविरुद्ध येथे आम्हाला चळवळ करावी लागते तशा प्रकारचीं पोस्टरें कुठल्याहि समाजवादी देशात असू शकणार नाहीत. पानपट्टी व सिगारेटच्या विक्रीकरता स्त्रीला बसविणें, साहित्य किंवा उपयुक्त वस्तूंच्या विक्रीकरता स्त्रीचा किंवा स्त्रीच्या चित्राचा उपयोग करणें समाजवादात बसूच शकत नाही. अमेरिका अजून या टप्प्यापर्यंत देखील पोचलेली नाही.

पुरुषाने स्त्रीदेहाला विषय मानलें आहे आणि स्त्रीनेहि स्वत:चा देह विषय मानला आहे. जेव्हा आपण एखाद्या वस्तूला विषय मानतो तेव्हा दोनच विकल्प आपल्यासमोर असतात. निर्बंध किंवा मोकळीक. तिसरा पर्यायच नाही. घरात एक लहान मुलगी आहे, तिला दम्याचा विकार जडला. वैद्यराज म्हणतात तिला दररोज औषधाची एक मात्रा घ्यावी लागेल. पण एक अट आहे. सकाळपासून दहा वाजेपर्यंत औषधाच्या त्या एका मात्रेव्यतिरिक्त मुलीने काहीहि खाता कामा नये. आईबाप म्हणतात, तें महाकर्म कठिण आहे. आमच्या घरात जागजागी खाण्याचे जिन्नस पडलेले असतात. आम्ही कुठे कुठे पाहणार ! कृपा करून असें औषध द्या की ज्याच्यावर मुळी पथ्यच नाही. स्त्रीदेह हा पुरुषाचा विषय आहे. म्हणून एक तर दोघांनाहि एकमेकांपासून अगदी वेगळें ठेवा किंवा मग संपूर्ण मोकळीक द्या. सुधारलेले म्हटल्या जाणाऱ्या काही देशांनी संपूर्ण मोकळिकीचा

मार्ग पत्करला आहे. स्त्रीचें शरीर जर उपभोग्य असेल तर त्यात काय बिघडलें ? त्यात निर्बंध हवेत कशाला ? एकच अट पुरेशी आहे. तिची संमति असली म्हणजे पुरें झालें. बळजबरी किंवा बलात्कार होता कामा नये. संमतीत स्वतंत्रता आलीच.

समाजवाद म्हणतो, फक्त स्वतंत्रता पुरेशी नाही, समानताहि पाहिजे. आपल्या बागेत वाघहि आहेत आणि शेळ्याहि आहेत. शेळ्यांकरता एक स्वतंत्र कठडा आहे. वाघांकरता स्वतंत्र पिंजरे आहेत. आता अशी कल्पना करा की दररोज एक तास दोघांनाहि संपूर्ण मोकळीक देण्यात आली. म्हणजे, शेळ्यांना कठड्याच्या बाहेर काढलें आणि वाघांनाहि पिंजऱ्यातून मोकळें सोडलें. म्हणजे दोघांनाहि संपूर्ण स्वातंत्र्य दिलें. तर काय होईल ? या योजनेला शेळ्यांची संमति मिळू शकेल काय ? कारण या स्वातंत्र्याचा परिणाम येवढाच होईल की वाघाला शेळ्यांवर यथेच्छ ताव मारता येईल. शेळी हा खाद्य पदार्थ आहे तो खाण्याची संपूर्ण मुभा आहे. येवढाच या स्वातंत्र्याचा अर्थ झाला. बिचाऱ्या शेळ्यांच्या संमतीचा प्रश्नच कोठे आहे ? म्हणून स्वातंत्र्याला संमतीची अपेक्षा आहे हें प्रमेय अगदी बरोबर असलें, तरी बरोबरीच्या नात्यावाचून संमतीला अर्थ नाही. वाघ व शेळी यांचें नातें बरोबरीचें असलें पाहिजे. समान भूमिकेवाचून संमतीला अर्थ नाही. येथपर्यंत समाजवाद आला आहे. म्हणजे स्त्री व पुरुष दोघेहि एकमेकांचें शरीर सुंदर मानू शकतात व त्याची अभिलाषाहि करू शकतात. दोघांचीहि मुक्त संमति असली म्हणजे झालें. परंतु हें पुरेसें नाही. आपलें म्हणणें असें आहे की एका माणसाने दुसऱ्या माणसाचें शरीर फक्त सुंदरच नव्हे तर

पवित्रहि मानलें पाहिजे. मुक्त संमतीत या भावनेचा अंतर्भाव होत नाही. माणूस म्हटलें की त्यात स्त्रीहि आलीच.

आपण जेव्हा एकमेकांचें शरीर पवित्र मानू लागतो तेव्हा एकमेकांचा संपर्कहि पावन करणारा ठरतो. यात उभयपक्षांची शक्ति वाढते. जेव्हा आपण एकमेकांचें शरीर उपभोग्य विषय मानतो तेव्हा त्याचा आपल्या सुखासाठी दुरुपयोग करण्याचा प्रयोग करतो. याचें नांव शोषण. हें अत्यंत भयंकर आणि गंभीर स्वरूपाचें शोषण आहे. कारण त्यात माणूस माणसाचें साधन बनून जातें. व्यक्ति म्हणून त्याचें जिणेंच संपुष्टात येतें. केवढें भयानक शोषण आहे हें! जेव्हा एकमेकांच्या संपर्कानें उभयतांची शक्ति व गौरव सारख्याच प्रमाणात वाढतात तेव्हा सहजीवन सिद्ध होतें ज्या स्थितीत एक सांभाळणारा व दुसरा सांभाळण्याची वस्तु म्हणून राहतो, त्या स्थितीचें नांव विषमता आहे. मी आगगाडीतून प्रवास करीत आहे, सोबतीला म्हणून माझ्याबरोबर लोकेंद्र व भ्रमरजी आहेत माझी काळजी घेता यावी म्हणून या बिचाऱ्यांची केवढी धांदल व धावपळ चालू आहे! त्याने त्यांची सावधानता व तत्परता वाढते. पण मी तर एक सांभाळण्याचा ऐवज बनून जातो. माझी शक्ति क्षीण होते. आणि बत्थडपणा वाढतो. जेव्हा दोन्ही पक्षांना एकमेकांना संपर्क पवित्र वाटतो तेव्हाच उभयतांचा उत्कर्ष होतो.

### वाघाच्या पोटात शेळी

आज स्त्रीचा संपर्क पुरुषाला शक्तिदायक होत नाही म्हणूनच तो पवित्रहि नाही. तो संपर्क आनंद-विलासाचें साधन आहे. लग्नाच्या वेळी पुरुषाला असें नाही वाटत की बायको-

बरोबर संयुक्त जीवन जगल्याने माझे सामर्थ्य वाढेल. उलट तो असेंच मानतो की जबाबदारी वाढेल. प्रभु रामचंद्रापासून तो भगवान रामकृष्ण परमहंसदेव आणि महात्मा गांधीपर्यंत कुठल्याहि पवित्र पुरुषाला विवाहाने स्वत:चें सामर्थ्य वाढल्याची प्रतीति नाही आली. फार फार तर पुरुषाला येवढेंच वाटते की विवाहामुळे व्यभिचारापासून व स्वैराचारापासून माझें रक्षण झालें. एच. जी. वेल्स म्हणून एक मोठा भविष्यदर्शी इंग्रज लेखक अलीकडे होऊन गेला. त्याच्या साहित्यात भविष्य काळातील जगाची मोठी बिनचूक चित्रें पाहायला मिळतात. त्याने जगाचा इतिहासहि लिहिला आहे. त्याच्या अनेक कादंबऱ्यांपैकी ' न्यू मेकियाव्हेली ', म्हणून एक कादंबरी आहे. त्यात एका प्रसंगी एक पुरुष दुसऱ्या पुरुषाला त्याच्या पत्नीला अनुलक्षून विचारतो, या कोण ? तो दुसरा पुरुष उत्तर देतो, ' द वूमन हू सेव्ह्ड मी ' जिने मला वाचविलें ती ही स्त्री आहे. अर्थात् दुसऱ्या स्त्रियांपासून वाचविलें. आणि ती स्त्रीदेखील म्हणेल, ज्याने मला इतर पुरुषांपासून वाचविलें तो हा पुरुष आहे. पण त्या दोघांच्या म्हणण्यातील आशयात केवढे तरी अंतर आहे. त्या दोघांनाहि विचारलें की आता तुम्ही काय करता तर ते दोघेहि उत्तर देतील, आता आम्ही एकमेकांबरोबर राहतो. आपण जर अधिक खोदून विचारलें, म्हणजे तुम्ही एकमेकांच्या भरवशावर जगता ?' तर बायको उत्तर देईल, नाहीं मी यांच्या सावलीत जगते, यांच्या छत्राखाली वावरते. वाघाच्या पोटात शेळी राहते तशी पुरुषाच्या पोटात स्त्री राहते. हें सहजीवन नव्हे. नैतिकतेचीच गोष्ट कशाला ! स्त्रीची नागरिकता औपचारिक आहे. तिची मानवता गौण आहे हें वस्तुगत तथ्य आहे.

### उपक्रम स्त्रीला करावा लागेल

तर मग सुरवात कोठून करायची ? सुरवात स्त्रीने स्वतः-पासूनच करायला हवी. कारण प्रश्न तिच्या जीवनाचा आहे. तिने स्वतःच्या शरीराला विषय मानणें सोडून द्यावे. पुरुष ऐकेल किंवा नाही देवाला माहीत. पण स्त्री-जीवनाचा हा प्रथम शुभ-संकल्प आहे. आजपर्यंत ती पुरुषाचा विषय व संपत्ति मानली गेली. पुरुषाच्या वैभवाच्या सामग्रीत तिचीहि गणना होत असे. त्याच्या हत्ती, घोडे, रथ इत्यादि ऐश्वर्यांबरोबर स्त्रियांचाहि उल्लेख होत असे. पुरुष स्वतःच्या श्रीमंतीची जाहिरात स्त्रीच्या शरीरावर करतो. त्याने स्वतःच्या बायकोला किंवा सुनेला किती दागिने वाहिले यावरून त्याच्या श्रीमंतीची कल्पना करण्यात येते. आमचे वडील जेव्हा एखाद्या लग्नाला जात असत तर नाटकातील राजाप्रमाणे मखमाली व जरीचे कपडे व अलंकार घालून काही जात नसत. पण मातोश्री मात्र आपलें सारे शरीर दागिन्यांनी भूषवूनच जात असत. तीर्थरूपांच्या ऐश्वर्याची ‘ शो केस ’ बनण्यात त्यांना जणू अभिमान वाटत असे. म्हणून आपल्याला पहिला संकल्प असा करावा लागेल की स्त्रीचें शरीर हें काही प्रदर्शनाचे किंवा उपभोगाचें साधन नाही, अर्थात् या संकल्पाचें पुण्याहवाचन स्त्रीला करावें लागेल.

स्त्रिया जेथे जेथे म्हणून समाज-सेवा करीत असतील त्या प्रत्येक क्षेत्रात व संस्थेत या परंपरागत भावनेचा अंत करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. स्त्रिया जी समाज-सेवा करीत असतील तिचा मुख्य हेतु समाजपरिवर्तन असला पाहिजे. येथे समाजपरि-वर्तन म्हणजे स्त्रीच्या भूमिकेत क्रांति. या मूलभूत क्रांतीचा हा

दंडक राहील की कुठल्याहि मासिकात, जाहिरातीत किंवा मनोरंजनाच्या कार्यक्रमात कुठेहि स्त्रीचें रूप व शरीरप्रदर्शनाचा विषय होता कामा नये. अशी स्थिति आली म्हणजे आज आईचा स्पर्श जितका पवित्र मानला जातो तितकाच स्त्रीचादेखील मानला जाईल आज तर आईचा स्पर्शदेखील पूर्णपणे पवित्र मानला जात नाही. विनोबांसारख्या एखाद्या पवित्र पुरुषाच्या मांडीवर एखादा तरुण पुरुष बसला तर त्याचें फारसें काही कुणाला वाटणार नाही. पण विनोबा जर स्त्री असते आणि एखादा तरुण त्यांच्या मांडीवर बसला असता तर लोकांना ते अप्रशस्त वाटलें असते. आई या नात्यानेदेखील स्त्रीचा स्पर्श पूर्णपणे पवित्र मानला गेलेला नाही. मुलगी या नात्याने तर प्रश्नच नाही. म्हणूनच स्त्री पुरुषांच्या परस्पर संपर्काने स्त्रीशक्तीचा विकास होऊ शकला नाही.]

## इंद्रियाच्या उपयोगाच्या दोन बाजू

इंद्रियाचा उपयोग बरा व वाईट दोन्ही प्रकारचा होऊ शकतो. एक उपयोग पवित्र आहे, दुसरा अपवित्र. निर्भेळ आनंदाकरता इंद्रियांचा जो उपयोग होतो तो पवित्र आहे. उपभोगाकरता जो होतो तो अपवित्र आहे. बागेत फुलें फुललेलीं आहेत. ताटवेच्या ताटवे बहरलेले दिसतात. पाहून मन प्रफुल्लित होतें. हा निरामय आनंद आहे. पण गुलाबाचें फूल पाहिल्याबरोबर तें तोडून घ्यावेसें वाटते किंवा कुस्करून त्याचा गुलकंद करावासा वाटतो तेव्हा आनंदाच्या जागा वासना बळकावते. वासनेचा प्रवेश होताच आनंद निघून जातो. गोंडस मूल खेळताना पाहून हृदय नाचायला लागतें. हा विशुद्ध आनंद आहे. पण दुसऱ्याच

क्षणी जर असें वाटलें की आपल्यालाहि असें मूल असावें तर आनंदाच्या जागी मोह दाखल होतो.

जेथे उत्कट प्रेम असते तेथे आसक्ति टिकत नाही. दोन आधुनिक स्त्रिया बागेत फिरत होत्या. दुरून बाबा-गाडीत बसलेलें एक सुंदर मूल पाहून त्यांच्यांपैकी एकजण म्हणते, किती गोड मूल आहे ! म्हणून दोघीहि बाबा-गाडीच्या जवळ जातात. तोच ती पहिली स्त्री म्हणते, अरे, हा तर आमचा मन्या ! दुसरीने विचारलें, लांबून नाही तुम्ही ओळखलें त्याला ! तसें ती म्हणाली, अहो, मी आमच्या आयाला ओळखते. तिच्यामुळे ओळख पटली.

**अनास्था म्हणजे अनासक्ति नव्हे**

ही अनासक्ति नव्हे. उपेक्षा आहे, स्वार्थजन्य अनास्था आहे. मुलाविषयी प्रेमहि नाही, आदरहि नाही. मुलगा विलासाच्या आड येतो म्हणून त्याला तो दूर ठेवते. ही निर्ममता आहे. मातृत्वाच्या भावनेचा येथे मागमूसहि नाही. मूल म्हणजे विरंगुळा आहे, करमणुकीचें साधन आहे, मालकीची वस्तु आहे. मातृप्रेमात वासना व विकार असलाच तर कमीत कमी असतो. जें शरीर आमच्या उपभोगाचा विषय किंवा उपयोगाचें साधन नसेल त्याच्याविषयी आमचें प्रेम अधिक उदात्त व उत्कट राहील. ईश्वर आमच्या उपभोगाचें साधन नाही. म्हणून भक्ताचा ईश्वराविषयीचा अनुराग अलोट आणि अढळ असतो. जेथे स्वार्थ नसेल तेथे प्रेमाला सीमाच उरत नाही.

**पावित्र्य आणि सौंदर्य यांची युति**

पवित्रता व सुंदरता यांचा जेव्हा योग होतो तेव्हा सुंदरता सुरक्षित होऊन जाते. तसें म्हटलें तर देवळापेक्षा, मशिदीपेक्षा

किंवा इतर देवमंदिरांपेक्षा ताजमहालात सुंदरता अधिक आहे. पण ताजमहालाच्या संरक्षणाकरता सरकारला एक स्वतंत्र खातें निर्माण करून तरतूद करावी लागते. देवळाच्या संरक्षणाची व्यवस्था लोक-जीवनातच आहे. लोक-भावनेचें संरक्षक कवच अभेद आहे. त्याचप्रमाणे कुठल्याहि अवांतर शक्तीच्या धाकावाचून माणसें समाजात सुरक्षित राहू शकली पाहिजेत. विशेषे करून स्त्रिया. ही आकांक्षा स्त्रीच्या ठिकाणी जागृत झाली म्हणजे ती क्रांतिप्रवर्तक होईल.

### सौंदर्य ही ईश्वराची व्यवस्था

काही पावित्र्यवादी लोक असें म्हणतात की अगदी उघडचावर जी वस्तु सुरक्षित ठेवायची असेल ती असुंदर असली पाहिजे. कुरूप वस्तु असली तर कोणाला तिचा मोह होणार नाही, वस्तु सुंदर असली तर ती सांभाळणे कठिण होईल. लहानपणी माझ्या दोन बहिणी बालविधवा झाल्या. पावित्र्यवादी लोक म्हणू लागले, यांचें वपन करून टाकावें, आणि यांना काठाचीं किंवा रंगीत लुगडीं नेसू देऊ नयेत. म्हणजे कोणत्याहि पुरुषाला यांच्या विषयी आकर्षण वाटणार नाही. त्यागी तपस्वी आणि संन्यासीहि आपलें शरीर विद्रूप करून टाकतात. कुरूपता आध्यात्मिकतेचें एक अंग बनली आहे सुंदरता व रसिकता निषिद्ध मानली गेली आहे. एकीकडे सुंदरता ही ईश्वराची विभूति मानली गेली आहे. परंतु दुसरीकडे व्यवहारात सुंदरता उपभोगाचा विषय मानली गेली आणि विलासिता किंवा वैषयिकता म्हणजेच रसिकता असें समीकरण झालें.

पुरुष व स्त्री यांची शरीरें भगवान श्रीकृष्ण व भगवती लक्ष्मी यांच्या शरीरांइतकींच सुंदर व प्रमाणबद्ध असलीं पाहिजेत. हें सौंदर्य जीवनाची विभूति आहे ; उपभोगाचा विषय नव्हे. सुंदरता निषिद्ध नाही. सौंदर्य हें संस्कृतीचें अविभाज्य अंग आहे. स्त्रीचें शरीर जितकें सुंदर तितकेंच पवित्रहि आहे. भगवती शारदामाता, मां आनंदमयी किंवा पांडीचेरीच्या मदर यांचा स्पर्श पवित्र आहे. संत पुरुष व साध्वी स्त्रिया यांचा स्पर्श जर पवित्र असेल तर पुरुषमात्र व स्त्रीमात्र यांचा स्पर्शहि पवित्र आहे.

**प्रेममूलक संसार**

काही मनोवैज्ञानिकांच्या मते विकार व वासना यांच्यावाचून सौंदर्याची अनुभूति किंवा प्रतीति अशक्य आहे. या मनोविज्ञानाला ‘सायकोॲनालिसिस’ म्हणतात. या सिद्धांताने मोठाच अनर्थ केला आहे. या तत्त्वज्ञानाप्रमाणे समस्त लोकव्यवहार, साहित्य व कला, धर्म व सदाचार काममूलक आहे. ‘किमन्यत् कामहैतुकम् ।’ यांच्यापैकी काही महानुभावांनी तर महात्मा गांधीचेंहि ‘सायको-ॲनालिसिस’ करायला कमी केलें नाही. भगवान श्रीकृष्ण, येशू आणि श्रीरामकृष्ण परमहंसदेव यांचें मनोवैज्ञानिक विश्लेषण अजून व्हायचें आहे. एक म्हणतो सृष्टि अर्थमूलक आहे, दुसरा म्हणतो काममूलक आहे; आपण म्हणू या की प्रेम-मूलक आहे.

शांतिसैनिक विद्यालय,
साधना केंद्र, काशी.
२२-१२-’६०

३

## स्त्री-पुरुषांमध्ये तुल्य सत्व

विनोबा अनेकदा भगवद्गीतेच्या दोन वचनांचा उल्लेख करतात. एक 'बोधयन्तःपरस्परम्' 'कथयंतश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च।' एकमेकांचें उद्‌बोधन करतात, देवाचें नाम संकीर्तन करतात; त्यातच संतुष्ट आणि आनंदित होतात. दुसरें वचन आहे, 'परस्परं भावयंतः श्रेयं परमवाप्स्यथ ।' भावयन् म्हणजे एकमेकांच्या संरक्षणाची एकमेकांना सांभाळण्याची भावना व योजना करीत करीत, सामुदायिक प्रार्थनेत ही भावना आहे. अलीकडे काही आश्रमांत अशा प्रकारच्या सामुदायिक कार्यक्रमाला 'कम्यूनियन' असें नांव दिलें जाते. सामुदायिक प्रार्थनेची ही आधुनिक पद्धति आहे, एकमेकांच्या संरक्षणाची, संवर्धनाची

व विकासाची भावना करीत करीत, एकमेकांच्या कल्याणाची साधना करीत करीत आम्ही परम श्रेय प्राप्त करू असा यात संकल्प आहे. आम्ही एक दुसऱ्याचें अभिभावन व उद्बोधन करू–म्हणजे एकमेकांना सांभाळू, एकमेकांना सावध करू, एकमेकांचीं मनें उजळू व एकमेकांना सामर्थ्य देऊ. सारांश, सहजीवनाकरता तुल्य भूमिका–बरोबरीचें नातें पाहिजे. दोन व्यक्तींचा दर्जा जेथे बरोबरीचा नसेल तेथे सहजीवन, अर्थात् संयुक्त जीवन असू शकणार नाही. आपल्याला स्त्रीपुरुषांचें सहजीवन हवें आहे. म्हणून स्त्रीचा सामाजिक दर्जा व भूमिका पुरुषाच्या बरोबरीची असली पाहिजे. बरोबरीची भूमिका म्हणजे एकच भूमिका किंवा एकरंगी भूमिका नव्हे. येथे समानता म्हणजे तुल्यता. सारखी नव्हे, बरोबरीची भूमिका.

### फ्राईडचा सिद्धांत

यात सगळ्यात मोठी अडचण अशी आहे की स्त्री आणि पुरुष दोघेहि एकमेकांच्या संपर्काला घाबरतात. त्यातल्या त्यात पुन्हा स्त्री, पुरुषाच्या संपर्कापासून अधिक कचरते. कारण पुरुष हा कामी आहे आणि स्त्री कामिनी, म्हणजे कामवासनेचा विषय किंवा तिचें प्रतीक. फ्राईड नांवाच्या नांवाजलेल्या समाजशास्त्रज्ञाने स्वप्नविज्ञानाच्या बाबतीत काही शोध केले आहेत. स्वप्नें कोठून येतात? आपल्या मनात काही वासना दडलेल्या असतात. काही वासना व आकांक्षा अतृप्त अवस्थेत असतात. या वासना व आकांक्षा स्वप्नरूपाने आपल्या मानसिक जगात साकार होत असतात. फ्राईडच्या मते या सर्व वासनांपैकी कामवासना हीच प्रमुख व मूलभूत वासना आहे. ती इतकी व्यापक

व उग्र आहे की तिचा रंग सगळ्या जीवनाला लागतो. पश्चिमेकडे व पूर्वेकडे देखील या मताचे समाज-शास्त्रवेत्ते जुन्याकाळी झाले आणि आजहि आहेत. त्यांचें म्हणणें असें की माणसांच्या सगळ्या धार्मिक प्रतिकांच्या कला, साहित्य, स्थापत्य व मनोरंजन यांच्या साधनांच्या मुळाशी कामवासना हीच प्रेरक शक्ति आहे. या मतवादाचा उल्लेख भगवद्-गीतेत 'किमन्यत् कामहैतुकम्' या वाक्यात केला आहे. ही सारी सृष्टि वासनेचे अपत्य आहे, दुसरें आहेच काय ! बायबलमध्ये सृष्टीच्या आरंभाची जी आख्यायिका आहे, तिच्यातहि हाच संकेत आहे. आदम आणि ईव्ह यांनी नंदनवनात एकत्र येऊन ज्ञानवृक्षाचें फळ चाखलें. त्यांना आपल्या पुरुषत्वाचा व स्त्रीत्वाचा बोध त्यामुळे झाला. या प्रसंगातूनच सृष्टीचा आरंभ व पापाचा प्रादुर्भाव झाला. म्हणून याचें नांव 'फर्स्ट फॉल'––'पहिलें पतन' ! या आद्य जोडप्याच्या मनात कामवासना उत्पन्न झाली आणि तेव्हापासून मनुष्यजातीच्या अधःपाताला सुरवात झाली. सृष्टीच्या जन्माची कहाणी एका अर्थानें पापाचीच जन्मकथा आहे. आपल्या येथे अशी समजूत रुजलेली आहे की जन्म-मरणच साऱ्या अनर्थपरंपरेचें कारण आहे.

उपनिषदात एक आख्यायिका आहे. सुरवातीला आत्मा एकटा होता. त्याला ओकें ओकें वाटू लागलें, म्हणून त्याला इच्छा झाली की, आपल्याला बायको असावी. 'सःअकामयत् जाया मे स्यात् इति'. या कामनेतून सृष्टि उत्पन्न झाली. उपनिषदात तर असेंहि म्हटलें आहे की ब्रह्मालाच 'एकः अहं, बहु स्याम्' असें वाटू लागलें. याप्रमाणे साऱ्या सृष्टीचें मूळ कामनेत आहे. फ्राईडची मजल याच्या पुष्कळ पुढे गेलेली आहे. याच्या म्हणण्याप्रमाणे बापाचें मुलीवर अधिक प्रेम असतें व

आईचें मुलावर अधिक प्रेम असतें. त्याचप्रमाणे मुलीचें बापावर व मुलाचें आईवर अधिक प्रेम असतें. हादेखील स्त्री व पुरुष यांचे ठिकाणी असलेल्या भिन्न लिंगीय व्यक्तीच्या विषयी असलेल्या सहज आकर्षणाचाच परिणाम आहे. म्हणजे हें देखील सुप्त कामवासनेचेंच फल आहे. फ्राईडची तर अशीहि एक चमत्कारिक कल्पना आहे की आईचें स्तनपान करणाऱ्या अर्भकाच्या मनातसुद्धा बापाबद्दल मत्सर असतो आणि बापाच्या मनात त्या मुलाबद्दल मत्सर असतो. अर्थात् कामहैतुक सृष्टीचा हा सिद्धांत विशुद्ध किंवा निरामय नाही. किंबहुना तो एकांगी आणि म्हणून अवैज्ञानिकहि आहे.

सृष्टि व प्रजनन या प्रक्रिया यज्ञरूप मानण्यात आल्या आहेत. यज्ञ शब्द पवित्रतेचा द्योतक आहे. त्यात स्वार्थ-त्यागाची व आत्मविसर्जनाची भावना आहे. भगवद्-गीतेत एक वचन आहे. 'सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः । अनेन प्रसविष्यध्वं एष वः अस्तु इष्ट कामधुक् ।' प्रजापतिने यज्ञाबरोबर प्रजा उत्पन्न केल्या आणि त्यांना तो म्हणाला, 'या यज्ञाच्या योगे तुम्ही प्रसव पावा, हाच तुमची कामधेनू ठरो !'

फ्राईडच्या तत्त्वज्ञानात व या यज्ञाच्या तत्त्वज्ञानात फार मोठी तफावत आहे.

### एक निरर्थक वाद

एक निरर्थक प्रश्न विनाकारण विचारण्यात येतो. आणि कित्येक खंदे विचारकहि त्याच्या आधारावर सामाजिक नीतीची इमारत उभी करतात. तो प्रश्न म्हणजे अगोदर पुरुष उत्पन्न झाला की स्त्री ? या प्रश्नाच्या उत्तराचा संकेत आमच्या भाषेत आढळतो. हा परंपरागत संकेत धार्मिक असून देखील अवैज्ञानिक

अशास्त्रीय आणि अप्रस्तुत आहे. आम्ही ज्या नांवाने ओळखले जातो त्यातदेखील तो संकेत आहे. आम्ही मनुज-मानव किंवा आदमी आहोत. मनु आणि आदम हे आमचे मूळ आदिपुरुष. त्यांच्यापासूनच मानवांचा जन्म झाला. ईव्हदेखील आदमपासूनच उत्पन्न झाली. म्हणजे ती देखील 'आदमजाद' किंवा 'आदमी' आहे. स्त्री देखील मानव आहे. हिंदु शास्त्राप्रमाणे शतरूपेचा जन्म मनूपासून झालेला नाही. हिंदूंचा आदिपुरुष ब्रह्मदेव आहे. त्याची-हि उत्पत्ति विष्णूपासून आहे. पण मूळ पुरुष ब्रह्मदेव मानला जातो. तो अज आहे. त्याने जी पहिली स्त्री निर्माण केली ती सरस्वती, वास्तविक ती त्याची कन्या. आदमने आपली कन्या ईव्ह, हिच्यापासून संतति उत्पन्न केली. ब्रह्मदेवानेहि सरस्वतीशी लगट करण्याचा प्रयत्न केला. एवंच काय की पुरुष अगोदर झाला असे जर मानलें, तर त्याला आपल्या कन्येशीच कांता म्हणून व्यवहार करावा लागेल. आणि स्त्री अगोदर झाली असें मानलें तर, तिला आपल्या पुत्रालाच पति म्हणून वरावें लागेल. म्हणून हा वाद फुकट आहे. वस्तुस्थिति अशी आहे की स्त्री-पुरुषांचा जन्म एकमेकांवाचून होत नाही. म्हणून या भाकड चर्चेत आपण कशाला पडावें !

### भयानक तत्त्वज्ञान

मनोविश्लेषणाच्या ज्या तत्त्वज्ञानाबद्दल आपण विचार करीत आहोत त्या तत्त्वज्ञानाप्रमाणे स्त्री आणि पुरुष यांच्यात नर आणि मादी यांच्याखेरीज दुसरें कुठलें नातेंच राहू शकत नाही, हें अत्यंत अनर्थावह आणि भयावह तत्त्वज्ञान आहे. आपल्या देशातील सर्वच भाषांमध्ये आधुनिक साहित्यिकांच्या एका संप्र-

दायाने या तत्त्वज्ञानाच्या आधाराने साहित्य-रचना केली आहे. त्यांच्या मते ब्रह्मचर्य हें अस्वाभाविकच नव्हे तर अश्रेयस्कर आहे. जगात जे ब्रह्मचारी व ब्रह्मचारिणी होऊन गेल्या त्या सर्वांचें मनोविश्लेषणात्मक विवेचन करण्याचा प्रयत्नहि झाला आहे. काही बहाद्दरांनीं तर रामलक्ष्मणांचेंहि 'सायकोॲनॅलिसिस' करून दाखविलें आहे. येशूदेखील त्यांच्या तावडीतून सुटला नाही. मग बिचाऱ्या राधाकृष्णांची काय कथा ! पुरुष आणि स्त्री यांचा नर-मादीव्यतिरिक्त दुसरा काही संबंधच शक्य नसेल तर याचा स्पष्ट अर्थ असा आहे की त्यांच्यात पतिपत्नीचें नातें हेंच एकमेव, प्रशस्त व शास्त्रशुद्ध नातें मानलें जाईल. आणि मग दुसऱ्या कुठल्याहि भूमिकेत किंवा नात्यात त्यांच्या सह-जीवनाची कल्पना करता येणार नाही. हेंच जर विज्ञान आणि तत्त्वज्ञान असेल तर मग दरेक स्त्री कुणाची तरी प्रत्यक्ष किंवा संभाव्य पत्नी असली पाहिजे. आणि दरेक पुरुष कुठल्या तरी स्त्रीचा प्रत्यक्ष अगर संभाव्य पति आहे असें मानल्यावाचून गत्यंतर नाही. जे तिचे प्रत्यक्ष पुत्र, पिता किंवा भाऊ असतील किंवा ज्यांची ती प्रत्यक्ष आई, मुलगी किंवा बहीण असेल त्यांच्यापुरताच अपवाद करता येईल. फार काय हीं नातींदेखील कालांतराने नर-मादीच्या नैसर्गिक नात्यात विलीन होऊ शकतात. म्हणून प्रश्न असा आहे की स्त्री-पुरुषांमध्ये काय हेंच एकमेव नातें असेल ? आणि त्यांची संस्कृति याच नात्यावर आधारलेली असेल ?

### दोन भावनात्मक गोलार्ध

काही परंपरावादी समाजशास्त्रांच्याप्रमाणेच काही नव-मतवादी विज्ञानवेत्त्यांनीहि हें नैसर्गिक नातेंच स्त्री-पुरुष संबंधाच्या

व्यावहारिक नीतीला आधारभूत मानलें आहे, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. पुराणप्रिय नीतिविशारदांनी स्त्री-पुरुषांच्या परस्परांच्या अस्पृश्यतेलाच पवित्रता मानलें आहे. ही अस्पृश्यता लैंगिक नीतिमत्तेचें मुख्य सूत्र आहे आहे. दोघांचा परस्पर संपर्क व संबंध जितका कमी असेल तितकेंच दोघांचेंहि जीवन शुद्ध व पवित्र मानलें जाईल. दोघांचेंहि शील उत्कृष्ट मानलें जाईल. याचा अर्थ असा की दोघेहि दोन निरनिराळ्या भावनात्मक गोलार्धांत जगत राहतील. या दोन भावनात्मक गोलार्धांचें प्रतिबिंब आमच्या सगळ्या सामाजिक जीवनात उमटलें आहे. आमच्या घरात, संस्थांत आणि समाजात या भूगोलाच्या दोन गोलार्धा-प्रमाणे हीं दोन सामाजिक गोलार्धें निर्माण झालीं आहेत. ' फिमेल हेमिस्फिअर ' आणि ' मेल हेमिस्फिअर '–' अंत:पुर ' व 'बहि:पुर'; ' राणीवसा ' व 'राजवसा'. दोघांचीं छात्रालयें वेगळीं, क्रीडांगणें वेगळीं, सांस्कृतिक भवनें वेगवेगळीं राहण्याचें व विहार करण्याचे चौक निरनिराळे, वाडा चौसोपी; पण दरेक सोप्याच्या चहूंकडे प्रचंड भिताडें. या सदाचार-नीतीचा मूळ झराच स्त्री आणि पुरुष यांच्यातील यौनसंबंधाव्यतिरिक्त इतर संबंध गौण व कमी टिकाऊ मानणारें हें भयानक तत्वज्ञान आहे.

या देशाची देवधानी जी काशी नगरी, तेथे विनोबांना एक प्रश्न विचारण्यात आला होता. मुलामुलींना एकत्र शिक्षण द्यावें की देऊ नये ? विनोबांची मोठी गंमत आहे. कधी कधी ते अगदी सरळ, स्पष्ट व बाळबोध उत्तरें देतात. पण एखादे वेळीं वेदांप्रमाणे सूचक भाषेत बोलतात. ते म्हणाले, तुमच्या प्रश्नाचें उत्तर तर देवानेच देऊन टाकलें आहे. तो फक्त एकाच घरांत नव्हे तर एकाच स्त्रीच्या कुशीतून मुलगे व मुलीं दोघांनाहि

जन्माला घालतो. आपल्या प्रश्नाचें उत्तर भगवंताच्या या योजनेत साठवलेलें नाही काय ? दोघांनाहि एकमेकांपासून वेगळ ठेवण्याची त्याची इच्छा असती, तर स्त्रियांच्या पोटी फक्त स्त्रियाच जन्माला याव्यात आणि पुरुष पुरुषांच्या पोटी जन्माला यावेत अशी योजना करता आली असती. येवढ्या भव्य सृष्टीची ज्याने रचना केली त्याला येवढें करणें अवघड वाटलें नसतें.

**भीति व नीति : साहचर्य अशक्य**

विनोबांनी काशीच्या मंडळींना दिलेल्या उत्तराचा आशय मी माझ्या शद्वात सांगितला आहे. ईश्वराच्या योजनेत व निसर्गाच्या व्यवस्थेत आपल्याला अनुकूल असें परिवर्तन करणें मनुष्याचा अधिकार आणि कर्तव्यहि आहे. पण जीवन दोन स्वतंत्र गोलार्धांत विभागून स्त्री व पुरुष यांची दोन वेगवेगळीं विश्वें निर्माण करून त्याने काय मिळविलें ? स्त्री-पुरुष एकमेकांपासून लांब राहतील. एकमेकांच्याकडे आकर्षित होत राहतील आणि एकमेकांविषयी सावधहि राहतील. एकमेकांविषयी ओढहि राहील आणि एकमेकांना टाळतहि राहतील. यात नैतिकताहि नाही आणि प्रामाणिकताहि नाही. हा इकडे कामिनीची कामना करीत राहील आणि तिकडे ती कांताच्या प्रतीक्षेत राहील. परंतु दोघेहि एकमेकांच्या संपर्कापासून दूर राहण्याचा प्रयत्न करीत राहतील. यातून काय निष्पन्न होईल ? एकमेकांना जे भितात त्यांना एकमेकांविषयी प्रेम कसें वाटू शकेल ? एकमेकांचा संपर्क जर त्यांनी अपावन मानला तर त्यांच्या जीवनात पावित्र्य कसें येईल ? शारीरिक आवश्यकतेमुळे उत्पन्न होणारी आवड म्हणजे प्रेम नव्हे. तो वासनेचा व विकारांचा विषय आहे. त्यात संस्कृति आणि नीति कुठून असणार ! विनोबांचें

एक महनीय सूत्र आहे. जेथे भीति असेल तेथे नीति राहूच शकत नाही. अर्थात् सहजीवनाला अवकाशच उरत नाही. अशा नीति-मत्तेत सहजीवन हें 'अब्रह्मण्यम्' आहे. त्याचें नांव घेताच 'विष्णवे नमः' असें म्हटलें पाहिजे.

**कुटुंबातीत स्नेहसंबंध आणि मैत्री**

धर्मशास्त्राचें एक सूत्र आहे, 'गृहिणी गृहमुच्यते' स्त्री म्हणजेच घर. म्हणून आपल्या देशातील काही भाषांत पत्नीला कुटुंब किंवा खटलेंहि म्हणतात. स्त्री ही गृहिणी आहे म्हणूनच कुटुंबिनी आहे. पार्वतीला 'त्रिलोचन-कुटुंबिनी,' म्हटलें आहे. जी कुटुंबिनी आहे तिचें क्षेत्र कुटुंबापुरतेंच राहील आणि कुटुंब हेंच जिचें क्षेत्र असेल तिचा संबंधहि नात्यागोत्यापुरताच मर्यादित राहील. म्हणूनच स्त्रीच्या जीवनात नात्याला जें स्थान आहे तें मैत्रीला नाही. तिच्या जीवनात नातें मुख्य आहे, सख्य गौण आहे. ती आपल्या पतीकरता किंवा पुत्राकरता आपल्या जिवाची कुरवंडी करील. पण यात संबंध नात्याचा आहे, मैत्रीचा नाही. स्त्री-पुरुषांच्या तुल्य भूमिकेवरील सहजीवनाकरता स्त्रीच्या जीवनात कुटुंबातीत स्नेहसंबंध दाखल झाले पाहिजेत. कुटुंबातीत स्नेहसंबंधाचें नांवच मैत्री आहे. पुरुषाच्या जीवनात मैत्रीला जें स्थान आहे तेंच स्त्रीच्या जीवनातहि ज्या दिवशी प्राप्त होईल त्या दिवशी आजची गृहिणी समाजाचा घटक बनेल. ज्या समाजात स्त्री आणि पुरुष तुल्य सत्त्व राहतील, त्या समाजाची स्थापना या सख्यभावनेच्या पायावरच होईल.

सामाजिक संबंधात संपर्काचें माध्यम सेवा असेल की नागरिकता? असा आणखी एक प्रश्न आहे· सेवा हा नित्यधर्म असून नागरिकता नैमित्तिक धर्म आहे असें म्हणतात. एका

अर्थाने तें खरेंहि आहे, पण सेवादेखील सहजीवनाचें माध्यम होऊ शकत नाही. एका मर्यादेबाहेर नागरिकता एका सामाजिक दोषात परिणत होऊन जाते. त्याचप्रमाणे सेवाहि जर फार व्यापक झाली तर ती समाज-कल्याणाचें साधन होण्याऐवजी सामाजिक अस्वास्थ्याचें लक्षण बनून जाईल. सेवेची कुणालाच गरज राहू नये, असें आपणांपैकी दरेकाला नाही वाटत ? सेव्य-सेवक भावात समानता राहत नाही. कधी एक उपकर्ता असेल, कधी तोच उपकृतहि असेल. कधी सेव्य श्रेष्ठ असेल, कधी सेवक. 'मातृ देवो भव' 'पितृ देवो भव' 'आचार्यो देवो भव' इत्यादि भावनेप्रमाणे जी सेवा होते त्यात सेव्य व्यक्तीला आपण देवता मानतो. पण जेव्हा एखाद्या साधारण व्यक्तीची सेवा कुणी करते त्यावेळी सेवक उपकारकर्ता असतो आणि सेव्य उपकृत होतो. सेव्य-सेवकाचें नातें बरोबरीचें नाही, स्नेहाचेंहि नाही तो संबंध औपाधिक आहें. निरुपाधिक व निरपेक्ष नाही. भक्ति-योगातदेखील सख्यभक्ति ही जवळ जवळ शेवटची भक्ति मानली गेली आहे. भक्तीचा कळस म्हणजे आत्मनिवेदन. सख्यभक्ति ही आत्म-निवेदनाच्या पूर्वीची स्थिति, अर्जुनाला भगवान म्हणतात, 'भक्तोऽसि मे सखा चेति' तू माझा भक्त अणि सखा आहेस म्हणून हें उत्तम रहस्य तुला सांगतो. समाजात सेव्य-सेवक संबंधच उरू नये, निखळ स्नेहसंबंध उरावा, हें पामचें उद्दिष्ट आहे. मी आजारी आहे, तुम्ही शुश्रूषा करायला आलात. स्वत: पथ्याचें तयार करून मला खाऊ घातलें. तुम्हाला समाधान आहे, मी कृतज्ञ आहे. पण असें समजा की मी आजारी नाही. बाजारातून तुम्ही अगदीं सुग्रास मिष्ठान्न आणलेंत. एक घास घेतल्याबरोबर तुम्हाला माझी आठवण येते. माझ्यावाचून

खाण्यात तुम्हाला मौजच वाटत नाही. इतक्यात मी अचानक येतो. मला आनंद वाटतो, तुम्हालाहि आनंद वाटतो. दोघांचाहि दुप्पट आनंद मिळून कमीत कमी चौपट तरी होतो. याचें नांव स्नेहसंबंध. हीच मित्रता. हिला तुल्य भूमिकेची अपेक्षा आहे.

सहजीवनाचा हा आधार समाजात स्थापन करणें स्त्रीच्या करता अधिक अवघड आहे. तिची स्थिति मोठी चमत्कारिक आहे. तिच्या भूमिकेत परस्पर विरोध आहे. एकीकडे पुरुषाचा संबंध आणि संपर्क तिला धोक्याचा वाटतो, आणि दुसरीकडे पुरुषावाचून तिचें संरक्षण होऊ शकत नाही. दुसऱ्यापासून भय आहे. एकटेपणात विशेषच भय आहे. म्हणून बुद्धि आणखी घोटाळ्यात पडते. भगवान बुद्धदेखील पेचात पडले. आनंदाने जेव्हा त्यांना म्हटलें की आपल्या मठात काही स्त्रियांनाहि प्रवेश दिला पाहिजे, तेव्हा भगवान बुद्धांनी अशी शंका प्रकट केली की एरव्ही माझा धर्म हजार वर्षें टिकणार असेल, तर तुझी सूचना मान्य केल्यास तो शंभर वर्षांतच संपुष्टात येईल. आत्ता-आत्तापर्यंत रामकृष्ण-मिशनचीहि अशी मर्यादा होती की त्यात संन्याशिणीला स्थान नव्हतें. जैन-धर्मात पुष्कळशा साध्वी स्त्रिया आहेत. त्यांना काय काय सहन करावें लागलें तें आपल्याला माहीतच आहे. ख्रिस्ती धर्मांत साध्वींचे मठ (ननरीज) आहेत. त्यांच्यावर काही कादंबऱ्याहि लिहिल्या गेल्या. सारांश, पुरुषाचें ब्रह्मचर्य व संन्यास बीनदिक्कत टिकू शकतो. तसें स्त्रीचें ब्रह्मचर्य किंवा संन्यास टिकू शकत नाही.

तात्पर्य असें की एकट्यात ही भीति आहे आणि शेजाऱ्या-पासून धोका आहे. ही स्थिति पुरुषाला काय किंवा स्त्रीला काय, कोणालाच इष्ट नाही. एकट्यात भीति वाटू नये व सोबतीत

आनंद वाटावा अशी स्थिति व्हायला पाहिजे. माणसाला जेव्हा स्वत:चा उबग येत नसेल आणि दुसऱ्याची भीति किंवा कंटाळा वाटत नसेल तेव्हा तो सहजीवनाला पात्र बनतो. पारस्परिकता अथवा अन्योन्यता हाच सामाजिकतेचा आधार आहे. संबंधावाचून सहजीवन कसलें ! माणसाला सहजीवनाची आवश्यकता आहे म्हणून आकांक्षा आहे आणि म्हणूनच अपेक्षाहि आहे.

**माणसाचें आध्यात्मिक व मौलिक सत्त्व**

मनुष्य जर शेजाऱ्याला भीत राहील, तर त्याच्या जीवनाचीं आणखी दोन गोलार्धें बनून जातील. एक कौटुंबिक आणि दुसरें सामाजिक. या दोन गोलार्धांपैकी स्त्रीचें जग कौटुंबिक गोलार्धा-पुरतें मर्यादित राहील. सामाजिक गोलार्धात फक्त पुरुषच वावरू शकेल. मग आपण ज्या विश्वकुटुंबाचा, कौटुंबिक समाजाचा किंवा कौटुंबिक ग्रामाचा आदर्श आपल्यासमोर ठेवतो तो फक्त मनोराज्यातच राहील. ज्यांचें एकमेकांशी रक्तजन्य किंवा विवाहजन्य नातें नसेल अशीं माणसें ज्या कुटुंबात एकत्र राहतात त्यांचें नांव विश्व-कुटुंब. आज आपल्याकडे दोन राष्ट्रांमध्ये सीमा-वाद चालू आहे. अशा वेळी डॉ. लोहिया, जयप्रकाशबाबू, शंकररावजी यांच्यासारखीं मानवनिष्ठ माणसें म्हणतात की आमच्या देशातून काही लोकांनी सीमोल्लंघन करून त्या देशातील लोकांशी संबंध जोडला पाहिजे. हा संबंध म्हणजे राजदूतांचा परस्पर संबंध नव्हे, लोकदूतांमधील परस्पर संबंध हि नव्हे, तर व्यक्तीचा व्यक्तीशी संबंध. आणि तोहि हार्दिक, औपचारिक नव्हे. कौटुंबिक समाजाच्या स्थापनेच्या बाबतीत मूलभूत प्रश्न हाच आहे. ज्यांच्यांत विवाहाश्रित किंवा रक्ताश्रित

नात्याचा कुठलाहि संबंध नाही असे स्त्रीपुरुषांचें शुद्ध स्नेहाश्रित सहजीवन शक्य आहे काय ? तें जर शक्य नसेल, तर विश्व-कुटुंब किंवा कौटुंबिक समाजाचीं आपलीं स्वप्नें स्वप्न-सृष्टीतच राहतील. काही लोक मानतात तितका हा प्रश्न उथळ नाही. ही समस्या मूलगामी आहे. ही माणसाच्या आध्यात्मिक व मौलिक सत्त्वाची समस्या आहे.

स्त्री व पुरुष यांचें स्वत्व भिन्न असेल, पण दोघांचेंहि सत्त्व मात्र काही बाबतीत समान व सर्व बाबतीत तुल्य आहे. म्हणूनच स्त्री मुक्त होऊ शकते असें आपण मानतो. जनाबाई, संत सखूबाई, भक्त मीराबाई, आनंदमयी मां, पांडीचेरीच्या माताजी किंवा रामकृष्ण संप्रदायाच्या शारदामाता यांना आपण मुक्त मानतो. त्यांचें सत्त्व जर सिद्ध पुरुषांच्या बरोबरीचें नसतें तर त्या मुक्त मानल्या गेल्या नसत्या. विश्वकुटुंबाच्या दृष्टीने ब्राह्मण व भंगी यांचें सत्त्व मुळात तुल्य आहे. म्हणूनच अस्पृश्यता-निवारणावाचून विश्व-कुटुंब अशक्य आहे.

### मतदानाचा घटक

नागरिक या नात्याने ब्राह्मण आणि भंगी व त्याचप्रमाणे स्त्री आणि पुरुष तुल्यसत्त्व आहेत. त्यांच्यांपैकी दरेक मतदानाचा संबंध घटक आहे. त्यांच्यांपैकी कुणाचेंहि नागरिकत्व आंशिक नाही. म्हणूनच दरेकाला एक एक व्होट आहे. आमच्या विद्यमान लोकतंत्रात व्यक्तीच प्राथमिक घटक आहे. संस्था किंवा कुटुंब नाही. पण स्विट्झर्लंडसारख्या अत्यंत पुढारलेल्या लोकतांत्रिक देशातहि स्त्रीला मत (व्होट) नाही. अलीकडे आपल्या देशातहि असा एक विचार पुढे येऊ लागला आहे की मतदानाकरता

व्यक्तीच्या ऐवजी कुटुंब हाच घटक मानला जावा. विनोबा व जयप्रकाशबाबूदेखील मधून मधून याचें प्रतिपादन करतात. या ठिकाणी प्रस्तुत विचाराच्या गुणदोषांचें विवेचन अनाठायी होईल. पण त्यांच्या सूचनेतील एक मुद्दा आपल्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. ते म्हणतात, कुटुंबाच्या वतीने ज्या व्यक्तीला मतदानाचा अधिकार देण्यात येईल ती स्त्रीहि असू शकेल. पुरुषानेच कुटुंबाचें प्रतिनिधित्व करावें असा आग्रह नाही.

## कुलीनता आणि संपत्तीची भावना

या बाबतीत एका मुद्याचा विचार करणें जरूरीचें आहे. समजा, कुटुंब नागरिकतेचें घटक मानण्यात आलें, तर कौटुंबिकतेबरोबर कुटुंबाचे सगळे सहचारी भावहि नागरिकतेत येतील काय ? आजची कुटुंबसंस्था रक्ताच्या व विवाहाच्या नात्यांवर आधारित आहे. कुलीनता व कौटुंबिक संपत्तीची मालकी अथवा वारशाचा हक्क या तिच्यातील मुख्य भावना आहेत. कुलीनतेत स्वतःच्या कुळाचा अभिमान दडलेला असतो. आपली वंशपरपरा अखंड राहावी अशी प्रबल आकांक्षा तिच्या पोटी उत्पन्न होते. वंशपरंपरा अविच्छिन्न राहावी म्हणून सतति पाहिजे. घराण्याचें नांव चालविण्याकरता व उत्तरक्रिया करण्याकरता पुत्र पाहिजे. एरव्ही 'लुप्तपिंडोदकक्रियाः' हा भगवद्-गीतेत उल्लेखिलेला अनर्थ ओढवतो. घराण्याचें नांव चालविण्याकरता मुलीचा उपयोग नाही. कारण कन्या ही अन्याची. शकुंतलेला पतीच्या घरी पाठविल्यानंतर 'प्रत्यार्पितान्यास इवान्तरात्मा' या शब्दात कालिदासाने कण्व मुनीच्या समाधानाचे वर्णन केलें आहे. ज्याची ठाव त्याला परत केल्यासारखा त्याला संतोष झाला. पुत्र हा उत्तराधिकारी आहे, कन्या दुसऱ्याची ठेव आहे. म्हणून

कुलीनतेच्या भावनेचा आधार पुत्र आहे. जुन्या वैय्याकरणांच्या बाबतीत असें सांगतात की एखाद्या वाक्यातून एखादी मात्रा जर कमी करता आली तर त्यांना पुत्रजन्माचा आनंद होत असे.

कौटुंबिक संपत्तीची भावना कुलाभिमानाशी निगडित आहे. पिंडदानाकरता ज्याप्रमाणे पुत्र हवा त्याचप्रमाणे मालमत्तेलादेखील वारसदार पाहिजे. आतापर्यंत उत्तरक्रियेप्रमाणेच कौटुंबिक संपत्तीचा उत्तराधिकारी पुत्रच मानला गेला. म्हणून ज्यांना अपत्य नसेल अशा आई-बापांनी, म्हणजे पित्याप्रमाणेच मातेनेहि पुत्रकामेष्टि यज्ञ केल्याचें आपण ऐकतो. कन्याकामेष्टि काही कोणी करीत नाही. दशरथाने केलेल्या पुत्रकामेष्टि अज्ञात त्याच्या तिन्ही राण्या सामील होत्या. कौटुंबिकतेत या भावना अंतर्भूत आहेत. आजची कुटुंबसंस्था जर नागरिकतेचा घटक मानली गेली तर आपण पुन्हा जुन्या गोत्रप्रवरांच्या समाजाकडे वाटचाल करू लागू.

अर्थात् एका गोत्राचें एक गांव होईल. दरेक गांव एक कौटुंबिक गांव, गोत्रग्राम किंवा वांशिक ग्राम बनेल. हें लक्षात यावें म्हणूनच मी कौटुंबिक मतदानाचें इतकें विश्लेषण केलें. कुटुंब हा नागरिकतेचा घटक व्हावा हें मुळीच इष्ट नाहीं. पण ज्या कुणाला तें इष्ट वाटत असेल त्याला कुटुंबात स्त्री व पुरुष यांची भूमिका समान व्हावी येवढा आग्रह तरी धरावाच लागेल. पिण्डोदकक्रियेकरता पुत्रप्राप्तीची कामना आणि कौटुंबिक संपत्तीची आकांक्षा दोन्ही नाहीशी व्हायला पाहिजेत. तेव्हा कुटुंब समाज-प्रवण बनेल, आणि कौटुंबिकतेत नागरिकतेची लक्षणें येऊ

लागतील. आजचें कुटुंब बहुतांशी ट्रायबल म्हणजे वंशनिष्ठ आहे. त्याचें समाजीकरण होणें आवश्यक आहे. आजच्या कुटुंबसंस्थेत स्त्रीचें व्यक्तित्व गौण आहे. देवी, संपत्ति किंवा सुखाचें साधन अशा प्रयोजनपरत्वे विविध भूमिका तिला प्राप्त होतात. पण कुठल्याहि भूमिकेत व्यक्ति म्हणून तिची गणना होत नाही. गाय ही देवता आहे आणि गुरुहि आहे. प्रसंगपरत्वे तिचें पूजन होऊ शकते, पण माणसाच्या बरोबरीची व्यक्ति म्हणून तिची गणना होऊ शकत नाही. कुटुंबसंस्थेत सहजीवनाला अनुकूल असें परिवर्तन करायचें झाल्यास तिचें मुळापासून पुनस्संस्करण व परिस्कार करणें अगत्याचें आहे. या पुनस्संस्करणाच्या दोन आवश्यक अटी आहेत. एक, स्त्रीची भूमिका गौण असता कामा नये. आणि दुसरी, कौटुंबिक संपत्ति असता कामा नये.

### स्त्रीमध्ये अधिक देहात्मवाद

कुटुंबाची निर्मिती विवाहसंबंधातून होते, म्हणून या बाबतीत आणखी एक गोष्ट ध्यानात घ्यावी लागेल. ती म्हणजे विवाहात अवांतर हेतु नसावा. कम्युनिस्टांचें एक सूत्र आहे-- जितके विवाह होतील ते सारे प्रेमाच्या आधारावरच झाले पाहिजेत, त्यात दुसरा कोणता हेतु अथवा उद्देश असू नये. आर्थिक किंवा संरक्षणाच्या हेतूने विवाहसंबंध होता कामा नयेत. आम्ही या विचाराचें स्वागत केलें पाहिजे, स्वीकारहि केला पाहिजे आणि एक पाऊल पुढे टाकलें पाहिजे. समाजवादी क्रांतिकारक इतके तर अवश्य मानतात की स्त्रीचें शरीर प्रदर्शनाचा किंवा विक्रीचा विषय बनता कामा नये. स्त्रीदेहाची विक्री होता कामा नये किंवा पुरुषांना रिझवण्यासाठी, भुरळ

पाडण्यासाठी तो सजवलाहि जाता कामा नये. ते हेंहि मानतात की एका पुरुषाचें शरीर दुसऱ्या पुरुषाचा आणि एका स्त्रीचें शरीर दुसऱ्या स्त्रीचा विषय बनता कामा नये. परंतु आता असें मानण्याची आवश्यकता आहे की पुरुषाने स्त्रीच्या शरीराला आपला विषय मानता कामा नये. जोपर्यंत पुरुष स्त्रीदेह विषय मानील, आणि स्त्रीहि स्वतःचा देह विषय मानील तोपर्यंत ती पुरुषाच्या बरोबरीच्या भूमिकेवर येऊ शकणार नाही. आज स्त्री आपलें शरीर हें आपलें स्वतःचें धन आणि पुरुषाचा विषय आहे असें मानते. म्हणून पुरुष गुणधन, विद्याधन किंवा यशोधन आहे; परंतु स्त्री रूपधन, शरीर-धन आहे. रूपाचा अर्थच शरीर आहे. विचार करण्यासारखी गोष्ट आहे की स्वतःला रूपधन मानायचें यापेक्षा अधिक अधम शारीरिकता आणखी कोणती असू शकते ? एखादा पहिलवान आपल्याला रूपधन मानतो; त्याचें वज्रप्राय शरीरच त्याची संपत्ति आहे. म्हणून तो आपलें शरीर दाखवण्याचेहि पैसे घेतो. तसेंच प्रत्येक स्त्रीला तिचें शरीर तिचें ऐश्वर्य आहे. जेव्हा गुलामीची प्रथा प्रचलित होती, तेव्हा पुरुष त्याच्या श्रमशक्तीसाठी विकत घेतला जात असे आणि स्त्री विकत घेतली जात असे केवळ ती स्त्री आहे म्हणून. वास्तविकता अशी असायला हवी की पुरुषाने स्त्रीच्या शरीराला उपभोग्य विषय मानू नये आणि स्त्रीनेहि आपल्या शरीराला उपभोग्य विषय मानू नये. आज स्थिति अशी आहे की पुरुष आपल्या शरीराला उपभोग्य विषय मानीत नाही, परंतु स्त्री आपल्या शरीराला भोग्य वस्तु मानते. परिणाम हा झाला की समाजात पुरुष भोक्ता मानला जातो आणि स्त्री भोग्य! म्हणून या नैतिक क्रांतीचा आरंभ स्त्रीलाच करायला हवा!

हें आणखी थोडें समजून घेऊ. पहा, फरक कसा सुरू होतो—बाजारात एक पुरुष बसला आहे आणि एक स्त्री बसली आहे. पुरुषाला जो विकत घेईल तो हें पाहील की हा पुरुष किती मेहनत करू शकतो. स्त्रीला जो विकत घेणारा असेल त्याला फक्त ही स्त्री आहे येवढेंच पुरेसें आहे. आता स्त्रीला विकत घेणारी दुसरी एखादी स्त्रीच असेल तर ती एखादें अवांतर प्रयोजन पाहील. पण पुरुषाला विकत घेणारी व्यक्ति पुरुष असो की स्त्री असो, ती त्या पुरुषाचा पराक्रम किंवा त्याची श्रमशक्तिच पाहील. परिणाम हा झाला की पुरुषापेक्षा स्त्री कितीतरी अधिक शरीरनिष्ठ बनली आहे. पुरुषापेक्षा तिच्यात देहात्मवाद फार जास्त आहे. आणि यातून सारी विचित्र परिस्थिति निर्माण झाली आहे. मुलगी जर रूपवान नसेल तर तिचा विवाह होणे जड जातें. म्हणून तिचें स्थान गौण आहे. समाजात तिची भूमिका दुय्यम आहे.

याचा आणखी एक भयंकर परिणाम झाला आहे. शरीर हेंच ज्याचें धन आहे, त्याची प्रतिष्ठा कोणी वाचवू शकत नाही. जो प्रतिष्ठेसाठी प्राण द्यायलाहि तत्पर असतो त्याच्या प्रतिष्ठेचें संरक्षण होऊ शकतें. परंतु शरीरच ज्याचें धन आहे आणि शरीरच ज्याची प्रतिष्ठा आहे, त्याची प्रतिष्ठा कोण वाचवू शकणार ! शरीरच धन झाल्याकारणाने आज स्त्री सांभाळून ठेवण्याची, वाचवण्याची वस्तु झाली आहे. तिला सांभाळणारा हवा आहे. संरक्षकाची प्रतीक्षा आहे. आता हें सांगायला नकोच की वस्तु जितकी जास्त किमती तितकीच तिला सांभाळण्याची खबरदारी जास्त घ्यावी लागते. आम्ही घरात प्रवेश करताना जोडा बाहेर काढून ठेवतो. परंतु जोडा जर किंमतवान असेल,

तर वारंवार ध्यान तिकडे जातें. घड्याळ तर स्नानघरातहि बरोबर घेऊन जातो. स्त्री तर उंची मूल्यवान रत्नापेक्षाहि अधिक मूल्यवान आहे; मग ती आमची आई असो बहिण असो की पत्नी असो! त्यांना नीट सांभाळून अंतःपुरात, घराच्या आत ठेवलें पाहिजे. संकटाचें वेळी स्त्री दुसऱ्याच्या हातात सापडू नये म्हणून तिचें शरीरहि नष्ट करून टाकलें पाहिजे एकतर तिने स्वतः जोहार करावा किंवा मग आम्हीच तिच्या शरीराचा अंत करून टाकू! स्त्री रूपधन असल्याचा हा परिणाम आहे. स्त्री शृंगार करते, आपल्या शरीराची सुंदरता वाढवते; नेलपेंट, लिपस्टिक, पावडर हें सारें ती करे, सौंदर्य आणि प्रसाधनाचा निषेध नाही. पुरुषहि प्रसाधन करतो. आपल्या शरीराला सजवतो. फरक इतकाच आहे की पुरुष रूपधन नाही आणि स्त्री रूपधन आहे. सुंदरता ईश्वराचा गुण आहे. जीवनातील ती एक विभूति आहे. आज काही प्राप्तीच्या हेतूने, दुसऱ्यांवर छाप पाडण्यासाठी, विलासी लोकांना रिझवण्यासाठी जें प्रसाधन आणि प्रदर्शन होतें त्यात ना सुंदरता आहे ना कला. ती तर 'व्हलगॅरिटी'–अभद्रता आहे. एक माणूस जर पन्नास कोट आणि पांच मोटारी आपल्याजवळ बाळगीत असेल, तर तें केवळ दुसऱ्यांना आपल्या संपत्तीचा, ऐश्वर्याचा दरारा वाटावा म्हणून. ही सभ्यताहि नाही आणि संस्कारिताहि नाही. ही सुंदरता नाही, 'स्नॉबरी' आहे. श्रीमंतीची विद्रूप नक्कल!

शांति सैनिक विद्यालय
साधना-केन्द्र, काशी.
२३-१२-६०

९८७०९

# ४
# सौंदर्य-मीमांसा

मुख्य प्रश्न हा आहे की स्त्री-पुरुषांत कामवासना आणि कौटुंबिक नातें या व्यतिरिक्त काही स्नेहसंबंध असू शकतो किंवा नाही ? सहजीवनाचा मुख्य अर्थ आहे – कुटुंब बाह्य सहजीवन. आजपर्यंतच्या धर्मशास्त्रकारांनी आणि सामाजिक मर्यादांच्या प्रणेत्यांनी स्त्री-पुरुषांचें कुटुंबबाह्य सहजीवन असंभव आणि म्हणूनच निषिद्ध मानलें. म्हणून या बाबतीत त्यांना अगदी कडक नियम बनवावे लागले. स्त्री आणि पुरुष यांचें एकमेकांबद्दलचें आकर्षण दुर्धर आहे, हें तथ्यच शास्त्रकारांनी आणि शिष्टजनांनी सदाचाराचा मूळ आधार मानला आहे. म्हणून सारी सामाजिक नीति याच तथ्यावर अधिष्ठित आहे–येथपर्यंत की माता आणि

पुत्र, पिता आणि पुत्री, सख्या भावाबहिणींनाहि एकांतात एक दुसऱ्याबरोबर राहण्याचा निषेध आहे. कुटुंबात हीं सारीं नातीं अत्यंत पवित्र आणि उत्तम मानलीं जातात. तरीहि स्त्री-पुरुषांचें एकांतातील सहजीवन आपत्तिजनक मानलें गेलें आहे. आणि कारण हें सांगितलें गेलें आहे की, 'बलवान् इंद्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति '-हा इंद्रियांचा समूह फार प्रबळ आहे, विद्वानालादेखील खेचून घेतो.' इंद्रियाणि प्रमाथीनि हरंति प्रसभं मनः '– हीं इंद्रियें फार उद्दंड आहेत, जबरदस्तीने मनाला ओढून घेऊन जातात. म्हणून प्रत्येक स्त्री-पुरुषाने, मग त्यांचें कौटुंबिक नातें कितीहि पवित्र का असेना, एक दुसऱ्यापासून नेहमी सावधान आणि जागरूक राहिलें पाहिजे. तात्पर्य हें, की स्त्री-पुरुषांतील साऱ्या सांस्कृतिक सबंधांपेक्षा त्यांचा नर आणि मादी या रूपांतील प्राकृतिक संबंधच नीतिवेत्त्यांनी आणि समाजधुरंधरांनी अधिक प्रबळ मानला आहे.

## विवाह स्वभाव नाही, संस्कार

मनुष्यात सहजीवनाची प्रेरणा नैसर्गिक आहे. एकमेकांबरोबर राहण्याची इच्छा नैसर्गिक आहे, पण सहजीवनाचें संयोजन, सहजीवनाच्या मर्यादा सांस्कृतिक आहेत. एकमेकांबरोबर रहावयाचें तर परस्परांना सांभाळणें आवश्यक आहे. जे एकमेकांचें जीवन संपन्न करतात त्यांचेंच सहजीवन खऱ्या अर्थाने सार्थ आहे. स्त्रीपुरुषांच्या सहजीवनात निसर्गापेक्षा संस्कार अधिक महत्त्वाचा आहे हें स्पष्टच आहे. संस्कारच स्वभावात परिणत व्हावा हें प्रगतीचें लक्षण आहे. सारांश हा की स्त्रीपुरुषांच्या नैसर्गिक संबंधापेक्षा सांस्कृतिक संबंधच समाज-

जीवनाला आधारभूत होऊ शकतात. पतिपत्नींच्या संबंधाचेंच उदाहरण घ्या. केवळ नैसर्गिक दृष्टचा कोणताही पुरुष पति नाही आणि कोणतीहि स्त्री पत्नी नाही. एक नर, दुसरी मादी. जेव्हा त्यांचा विवाह होतो तेव्हाच त्यांच्यात पतिपत्नीचें नातें निश्चित होतें हा नात्याचा संबंध प्राकृतिक नाही, सांस्कृतिक आहे. म्हणून, विवाह स्वभाव नाही, संस्कार आहे. जे स्त्री-पुरुष जन्मभर एकमेकांबरोबर राहतात ते केवळ शरीरनिष्ठ राहू शकत नाहीत. ते शरीरनिष्ठ राहतील तर यावज्जीवन त्यांना एकत्र राहणें असंभव आहे. समजा, एका पुरुषाने एका अत्यंत लावण्यवती स्त्रीशी विवाह केला. काही दिवसांनी त्या स्त्रीला अर्धांगवायू झाला, स्त्री कुरूप झाली. त्या पुरुषाचें त्या स्त्रीवर प्रेम नाही, तिचें शरीर हा आपल्या उपभोगाचा विषय मानतो. हा केवळ काम-संबंध आहे. यात प्रेमाला काही स्थान नाही. त्याने विवाह तर सौंदर्य पाहून केला; परंतु आजाराने त्याची पत्नी विद्रूप झाली. आता त्याला आपल्या पत्नीच्या जीवनात कोणती रुचि अगर आस्था उरली नाही. अशा परिस्थितीत संबंध-विच्छेदच होऊ शकतो. दुसरा काही मार्ग नाही. तर मग विवाहाला संस्कार मानणेंच व्यर्थ आहे. विवाह जर संस्कार आहे तर पतिपत्नींचा संबंध कामसंबंधापेक्षा प्रेमसंबंध अधिक असेल. तो शरीर-संबंध नाही, दोन व्यक्तींच्या व्यक्तित्वाचा मधुर योग आहे. त्याचा आरंभ शारीरिकतेपासून होतो, एरव्ही विवाहाची आवश्यकताच राहिली नसती. परंतु, वैवाहिक जीवनात दोघांची शारीरिकता क्षीण होत जाते. काम क्षीण होत जातो, त्याचें स्थान प्रेमाला मिळत जातें, वैवाहिकतेच्या जागी अवांतर हेतु दाखल होत जातात.

कोणी म्हणतात, आम्ही विवाह प्रजेसाठी, संततीसाठी केला. आता येथे कामुकतेच्या जागी कौटुंबिकता किंवा सामाजिकता आली. परंतु सहजीवनासाठी इतकें पुरेसें नाही. कुलधर्मासाठी किंवा समाजधर्मासाठी जे पतिपत्नी एकत्र राहतील, त्यांच्यात कर्तव्याची भावना असेल प्रेमपूर्ण हार्दिकता नसेल. धर्माची आज्ञा आहे, समाजाची मर्यादा आहे, कुटुंबाच्या प्रतिष्ठेचा विचार आहे, म्हणून एकत्र राहतात. रूढि, परंपरा आणि धर्मविचारामुळे जें सहजीवन होतें त्यात कर्तव्यबुद्धि असते, स्नेह नसतो. दोघांचीं मने तर दूर गेलीं, केवळ शरीराने एकमेकांच्या बरोबर राहतात. वास्तविक हा विवाह-विच्छेदच झाला. औपचारिक रीतीने तो भले न होवो, पण आता ते एक-दुसऱ्याचे नाहीत आणि तरीहि एकत्र राहतात. हें सहजीवन नाहीं, सह-अवस्थान आहे – कोएक्झिस्टंस आहे. रशियात आणि अमेरिकेत असेच आहे. त्यात ना मन आहे ना हृदय, केवळ शरीरांचें सान्निध्य आहे. हें सहजीवन नाही, सहमरण आहे. गृहस्थाश्रम नाही, स्मशानातील साहचर्य आहे.

### सहजीवनात मित्रत्वाची प्रधानता

स्त्रीपुरुषांच्या परस्पर संबंधात शारीरिकता, म्हणजे वैषयिकता, जितकी कमी होईल आणि प्रेम, म्हणजे हार्दिकता जितकी जास्त वाढेल तितका त्यांचा संबंध स्थायी आणि पवित्र होईल, कायम स्वरूपाचा आणि निर्मल होईल. यात संयम, नैतिकता, धार्मिकता, कर्तव्यबुद्धि वगैरेंचें काही स्थानच नाही. दोन व्यक्तींच्या एकमेकांबरोबर राहण्यासाठी ही अनिवार्य अट आहे की दोघांमध्ये शारीरिकता कमी असावी. आता प्रश्न हा

येतो की दोघेहि जर अशरीरी असतील, त्यांना एकमेकांच्या शरीराची जरूर नाही तर काय ते परस्परांच्या आत्म्याबरोबर राहतात ? आत्मा तर अव्यक्त आहे. आत्म्यांचें सहजीवन कसें होईल ? अर्थात् ते राहतात एकमेकांच्या शरीराबरोबरच. परंतु त्यांच्या सहजीवनात शारीरिकता मुख्य नसते. शरीरच मुख्य झालें तर अशा परिस्थितीत तें दोन प्रेताचें सह-अवस्थानच होईल. दोन व्यक्तींच्या संयुक्त आणि परस्पराभिमुख जीवनाचें नांव सहजीवन आहे. म्हणजे शरीराबरोबर मन आणि हृदय यांचाहि मेळ हवा. दोन व्यक्ति जेव्हा मन:पूर्वक एकमेकांबरोबर राहतात तेव्हा शारीरिकता गौण होऊन जाते. म्हणून सहजीवनात मित्रताच मुख्य बनते.

गांधी काही कोणी रूपवान व्यक्ति नव्हती. पण त्यांचें शरीर आम्हा सर्वांना प्रिय होते. आमच्यातील कित्येक जणांचे चेहरे तर व्यंगचित्रांसारखे आहेत, तरीहि आम्ही एकमेकांवर प्रेम करतो. सगळ्यांचेच बाप सुंदर नसतात. प्रत्येकाची आई काही अप्सरा नसते, आणि तरीहि आमच्यापैकी प्रत्येकाला आपल्या आईचें शरीर शोभनीय आणि सुंदर वाटतें. ही शोभनीयता आणि सुंदरता प्रेमपुनीत डोळेच पाहू शकतात.

**सहवास आणि सहजीवन यांत अंतर**

जगात जे स्वार्थाश्रित संबंध म्हणून ओळखले जातात, त्यांत सहकार्याचा भाग असला तरी यथार्थ सहजीवन नसतें. मुलाला जोपर्यंत आईची आवश्यकता असते तोपर्यंतच ती त्याला प्रिय असते. मुलगा जोपर्यंत कमाई करून आईला खाऊ घालतो, तोपर्यंतच तो तिचा लाडका आहे. भाऊ जोपर्यंत बहिणीची हौस

पुरवतो तोपर्यंतच ती त्याच्यावर माया करते, आणि जोपर्यंत बहीण भावाची सेवा करते तोपर्यंतच ती त्याची लाडकी बहीण असते. 'आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति' चा हा व्यावहारिक अर्थ आहे. हा सर्व औपाधिक संबंध आहे. यात इंटरेस्ट, हेतु, गरज, जरूरत प्रधान आहे, प्रेम गौण आहे. हेतु, गरज, जरूरत या सर्वांपेक्षा प्रेम ही वेगळीच वस्तु आहे. सहजीवनात स्वार्थाचा जितका अंश असेल, ज्या प्रमाणात हेतु असेल, तितक्या प्रमाणात सहजीवन मिथ्या आणि नकली ठरेल. वैवाहिक आणि कौटुंबिक संबंधात संपत्तिहि एक आधारभूत साधन आहे. ज्या घरात काही संपत्ति असेल तिथेच आपली मुलगी पडावी अशी आमची इच्छा असते. जेथून चांगला हुंडा मिळण्याची शक्यता असेल अशा ठिकाणची मुलगी सून म्हणून मिळावी असें आपल्याला वाटतें. ही तर आणखीनच निकृष्ट स्थिति झाली. जेथे एकमेकांच्या सेवेची, सहाय्याची गरज असते, तेथे तरीहि प्रीति आणि पवित्रतेला अवकाश आहे; परंतु येथे तर आर्थिक प्रेरणाच मुख्य होऊन बसते. प्रेम तर गौण होतेंच, पण संस्कारहि निरर्थक ठरतो. जेथे सांस्कारिकता गौण होते आणि द्रव्याकांक्षा मुख्य बनते तेथे मनुष्याचा विक्रय होतो, शरीर विकलें जातें. जी स्त्री विक्रय आणि व्यापार करते, तिला आपण 'गणिका' म्हणतो. समाजात ती हीन आणि त्याज्य मानली जाते. समाज आणि कायदा तिचा धिक्कार करतात. परंतु विवाहात हुंड्यासाठी मुलगा आपला आत्मा विकतो आणि मोटार-बंगल्यासाठी मुलगी आपलें शरीर विकते तेव्हा त्याला आम्ही बाजार-धर्म मानीत नाही. हा खरा धर्म आहे काय? ही रूढि शिष्टमान्य आणि समाजमान्य असली तरी तो संस्कार नाही, धर्मविहीन रीतसर व्यभिचार आहे. दोन

व्यक्तींची हृदयें एक झालेलीं नसतील, अर्थ आणि काम यांसारखे अवांतर हेतूंसाठीच जर त्या दोन व्यक्ति एकत्र राहत असतील, तर त्यांचा सहवास होईल पण सहजीवन नाही. संस्कारिता असेल तिथेच आर्यता असते, शारीरिकता अनार्यतेचें लक्षण आहे. इंग्रजीत 'व्हल्गॅरिटी' शब्द आहे, संस्कृतात 'अनार्यता' म्हणतात. भगवान अर्जुनाला म्हणतातः 'तुझें वागणें अनार्यजुष्ट आहे, अनार्यांप्रमाणे आहे.' म्हणून, स्त्रीला एक शपथ घेतली पाहिजे. शपथ ही की कुठल्याहि स्त्रीच्या शरीराचा उपयोग, कोणत्याहि स्त्रीच्या शरीराचा विनियोग, विक्रीसाठी आणि विनिमयासाठी होणार नाही.

## पुत्र आणि कन्या यांत महान अंतर

विवाहात हुंडा घेण्यात मुलगा आपला आत्मा गमावतो आणि मोटार-बंगल्यासाठी मुलगी आपलें शरीर विकतें. यात काम-प्रेरणेपेक्षा अर्थप्रेरणा बलवान आहे. वैषयिकतेच्या आणि रूपाच्या आसक्तीपेक्षा धन-लालसा तीव्र आहे. मुलगी रूपवान आहे पण हुंडा देऊ शकत नाही; दुसरी मुलगी कुरूप आहे पण चांगली वरदक्षिणा देऊ शकते. धन-लोलुप पुरुष त्या कुरूप मुलीशीच विवाह करेल. कामाचा तर संयम झाला, पण त्याची जागा लोभाने घेतली. जेथे लोभ आहे तेथे प्रेम राहू शकत नाही हें सांगण्याची गरज नाहीच. सारांश हा की अर्थ आणि काम हे दोन्ही हेतू विवाहात असता कामा नयेत. स्त्रीपुरुषांचे संबंध घराच्या चार भिंतींच्या बाहेर शुद्ध राहिले पाहिजेत येवढेंच आमचें म्हणणें नाही, तर आमचा असाहि आग्रह आहे की घराच्या आतहि त्यांचे संबंध निर्व्याज असले पाहिजेत.

आज कुटुंबातहि आमचे एकमेकांबरोबरचे संबंध शुद्ध आणि निर्व्याज नाहीत. आज कुटुंबात स्त्री आणि पुरुष बरोबरीचे मानले जात नाहीत. दोघांचें जीवन समान पातळीवर नाही. ही धारणा वेगळी की आई वृद्ध आहे म्हणून तिचें रक्षण करणें हें माझें कर्तव्य आहे; परंतु आई स्त्री आहे म्हणून तिचें पालन आणि रक्षण केलें पाहिजे ही भावना अगदी वेगळी आहे. वय, गुण, कर्तृत्व या सगळ्या बाबतीत माझ्यापेक्षा श्रेष्ठ असूनहि केवळ स्त्री असल्यामुळे ती रक्षणीय बनते आणि मी तिचें परिपालन करतो. वडील वृद्ध असतील, अशक्त किंवा रुग्ण असतील तरच ते रक्षणीय बनतात; परंतु आई तरुण असली, समर्थ असली, निरोगी असली तरीदेखील ती रक्षणीय आहे. त्याचप्रमाणे पुत्र सहारा आहे, कन्या जबाबदारी आहे; पुत्र मदतगार आहे, कन्या जोखीम आहे. पुत्राच्या विवाहाने पित्याची जबाबदारी वाढते, पण त्याचबरोबर त्याचा आनंदहि वाढतो. कन्येचा विवाह करून दिल्याने तो निश्चिंत होतो. या मुलीमुळे आपण संसारात अडकून राहिलो होतो, आता मुक्त झालो, आता देवाचें बोलावणें आलें तरी हरकत नाही असें त्याला वाटतें. शकुंतला पतीच्या घरी जाऊ लागली तेव्हा कण्वासारखा विरक्त मुनि देखील म्हणतो : 'प्रत्यर्पितन्यास इवान्तरात्मा,'– कोणाची ठेव परत करावी असें समाधान मला आज होत आहे. कन्या नेहमी दुसऱ्याची समजली जाते. म्हणून ती ठेव आहे, जबाबदारी आहे. तिला ओझें मानलें जातें. पुत्र आधार आहे, प्रतिपालक आहे, अभिभावक आहे. माता आणि पिता, पुत्र आणि कन्या हे कौटुंबिक संबंध खरे, पण दोघांच्या पातळीत महान अंतर आहे.

## समाजात कौटुंबिकता

सामाजिक संबंधांत कौटुंबिकता दाखल झाली पाहिजे असें आम्ही म्हणतो; परंतु हें तेव्हाच होऊ शकेल जेव्हा कौटुंबिक संबंधहि परिष्कृत आणि परिमार्जित होतील. भाऊ-बहीणहि एकमेकांवर पूर्ण विश्वास टाकू शकत नाहीत. एकदा एक भाऊ-बहीण यात्रेला निघाले. चालता चालता रात्र झाली. एका शेतकऱ्याच्या झोपडीत थांबले. शेतकऱ्याने खूप आदरातिथ्य केलें, नंतर हात जोडून अत्यंत नम्रपणाने म्हणाला, 'अतिथिदेव, मी अतिशय दरिद्री आहे. माझ्या झोपडीत एकच खाट आणि एकच अंथरूण आहे. आम्ही दोघेच असल्याने आमचें भागून जातें. आज मी आणि माझी पत्नी–खाली गवत आंथरून झोपू. आपण भाऊ-बहीण या खाटेवर झोपा.' भाऊ-बहीण संकोचाने त्या एकाच खाटेवर झोपतात. एकमेकांकडे पाठ करून झोपतात, तरीहि निर्भय होऊ शकत नाहीत. भाऊ आपल्या कौटुंबिक मर्यादाचें रक्षण करण्याकरता आपल्या आणि बहिणीच्या मध्ये तलवार ठेऊन देतो. तलवारीखेरीज आश्वासनहि नाही, आपल्यावर आणि दुसऱ्यावर विश्वासहि नाही. ही तलवार कधी कौटुंबिक मर्यादेची असेल, कधी सामाजिक शिष्टाचाराची, कधी संस्थेच्या विधानाची – पण कुठल्या ना कुठल्या रूपात अवश्य असेल.

आज स्त्री-पुरुषांचें सहजीवन सफल आणि प्रशस्त ठरत नाही, याचें कारण हें आहे की कौटुंबिक जीवनच कलुषित झालेलें आहे. विशुद्ध कौटुंबिक मूल्यें सामाजिक जीवनात दाखल झालीं पाहिजेत. असा समाज फॅमिलिस्टिक सोसायटी – कौटुंबिक समाज बनेल.

### सहजीवनाचें अधिष्ठान : कौटुंबिक आत्मीयता

सामुदायिकता म्हणजे कौटुंबिकता नव्हे. सहजीवन आणि सह-अवस्थान यात मूलभूत फरक आहे. नात्याचा संबंध हा कौटुंबिकतेचा आधार आहे. एखाद्या समूहाचा अगर समुदायाचा घटक बनल्याने नातें निर्माण होत नाही. नातें दोन प्रकारचें असतें, स्वाभाविक आणि भावनात्मक. कुटुंबात जे स्वाभाविक नात्याचे संबध असतात त्यांचाच विस्तार भावनेच्या आधारावर आम्ही समाजात करतो. आपल्या आईच्या बरोबरीच्या असणाऱ्या स्त्रीला आपण मावशी, काकी किंवा आत्या म्हणू लागतो. जो पुरुष आपल्या वडिलांच्या बरोबरीचा असेल त्याला काका-मामा म्हणतो. ही सहजीवनाची साधना नुसत्या बरोबर बसून जेवण्याने, बरोबर परिश्रम करण्याने अगर एकत्र अध्ययन किंवा प्रार्थना करण्याने होत नसते. ही तर सामुदायिकता झाली. यातून निकटता तर येते पण नातें नाही निर्माण होत. सहजीवनाचें अधिष्ठान कौटुंबिक आत्मीयता आहे.

### आत्मीयतेचा आधार–भावनात्मक संबंध

ग्राम-परिवार बनावा असें आम्ही म्हणतो, यात एक संकेत आहे. आजहि गावात काही प्रमाणात नात्याचे संबंध आढळतात. परंतु कुटुंबात अशा संबंधांचा जो आधार आहे तो बदलला पाहिजे. कौटुंबिक जीवनात आत्मीयतेचा आधार जन्म आणि विवाह आहेत. सामाजिक जीवनात आत्मीयतेचा आधार जन्म आणि विवाह बनू शकत नाहीत हें स्पष्टच आहे. तेथे तर भावनात्मक नातेंच राहू शकतें. पति-पत्नीचें नातें सोडून बाकी सर्व कौटुंबिक नातीं समाजात दाखल झालीं पाहिजेत. वैवाहिक

नात्याचे परिणाम सामाजिक असले तरी तें नातें व्यक्तिगत आहे. दुसरीं सर्व नातीं कौटुंबिक आहेत. म्हणून तीं सामाजिक होऊ शकतात. पतिपत्नींचा संबंध अपवित्र नाही, परंतु इतर संबंधापेक्षा त्यात शारीरिकता अधिक आहे. म्हणून तो संबंध व्यापक होऊ शकत नाही.

## साधकाची सूक्ष्म इन्द्रिय-शक्ति

ऐहिक जीवनाची प्राप्ति करण्यासाठी आपल्याजवळ ज्ञानाचीं आणि कर्माचीं जीं साधनें आहेत त्यांना आपण करण किंवा इंद्रिय म्हणतो. हीं पांच ज्ञानेंद्रियें आहेत आणि पांच कर्मेंद्रियें. या इंद्रियांच्या द्वारे आपण सुखदु:खाचा अनुभव घेतो. इंद्रिय द्वारा जो सुखोपभोग केला जातो त्याला विषय किंवा विलास म्हटलें जातें. परंतु याच इंद्रियांचा उपयोग दुसऱ्या प्रकारें केला, तर त्याला सौंदर्य-प्रियता अगर रसिकता म्हटलें जातें. खरें म्हणजे इंद्रिय जितकें शुद्ध बनेल, तितकी त्याची शक्ति वाढेल. ज्याची दृष्टि किंवा कान मंद आहेत, जो कमी बोलतो तो खरा संयमी नव्हे; तो तर आंधळा, बहिरा किंवा मुका असू शकतो. जडता म्हणजे आध्यात्मिकता नव्हे. एखादें तंतुवाद्य उत्तम स्थितीत असेल तरच त्यातून शुद्ध स्वर निघू शकतात. ज्याचे डोळे शुद्ध असतील तो दूरचें आणि सूक्ष्म पाहू शकेल. कान शुद्ध असेल तो जास्त चांगलें ऐकू शकेल. शुद्ध रसना निरनिराळ्या स्वादांतील सूक्ष्म भेद चटकन् ओळखू शकेल. नाक शुद्ध असेल तर तें सुगंधांत फरक करूं शकेल. योग्याचीं, साधकाचीं इंद्रियें सूक्ष्म बनतात. म्हणून, इंद्रियें जड बनणें साधनेच्या प्रगतीचें लक्षण नाही.

## सौंदर्यानुभूतीत वासना आणि विकार बाधक

वासना आणि विकार यांनी प्रेरित होऊन इंद्रियांचा उपयोग केला जातो तेव्हा तो विषय होतो. विकारात सौंदर्याची भावना असू शकत नाही. मोहाचा प्रवेश झाल्याबरोबर प्रेम अंतर्धान पावतें, तसेंच विकार आल्याबरोबर रसिकता नाहीशी होते. प्रेम कधी विकारयुक्त आणि वासनामय राहू शकत नाही. म्हणूनच तें अपवित्र आणि असुंदर नसतें. विकार किंवा वासना जेथे असते, तेथे आसक्ति असते. सौंदर्याच्या अनुभूतीसाठी वासना आणि विकार बाधक ठरतात.

चित्त जर एखाद्या विशिष्ट भावनेने अगर संस्काराने प्रभावित झालेलें असेल तर सुंदर वस्तु असुंदर दिसू लागते आणि असुंदर वस्तु सुंदर दिसू लागते. बुलगानिनबरोबर क्रुश्चेवनेहि ताजमहाल बघितला. ताजमहाल कसा वाटला असें त्यांना विचारलें गेलें, तेव्हा उत्तर मिळालें: 'कोणाला माहीत किती मजुरांचें शोषण या इमारतीसाठी झालें असेल. येथील कोरीव काम करतांना त्यांचें रक्त आटलें असेल.' त्यावेळी क्रुश्चेवच्या डोळयांना ताजमहाल दिसत नव्हता, मजुरांचे शोषण दिसत होते. वास्तविक शोषण बघण्यासाठी त्याला प्रत्यक्ष ताजमहाला-पर्यंत जाण्याची गरज नव्हती.

सारांश हा की चित्ताचा संस्कार वस्तूच्या दर्शनात आणि प्रत्यक्ष अनुभूतीत विघ्न आणतो.

## सुंदरता भगवंताची मूर्ति

काही जण नियम करतात की आम्ही आपलें शरीर सजवणार नाही, विभूषित करणार नाही, लंगोटी लावून राहू—

फार तर सदरा-धोतर वापरू. मग ईश्वराच्या मूर्तीला का सजवलें जातें ? ईश्वर विलासी, विषयलंपट आहे ? केवळ श्रीमंत मनुष्यच देवाच्या मूर्तीचा शृंगार करतो असें नाही, अत्यंत गरीब माणूसहि आपल्या ऐपतीप्रमाणे मूर्ति सजवतो. ईश्वराची मूर्तिहि जास्तीत जास्त सुंदर बनविली जाते. जीं मुलें फार सुंदर असतील त्यांनाच राम-लक्ष्मणाची भूमिका दिली जाते आणि लावण्यवती मुलगीच सीता बनते. सारांश, रसिकता वैषयिकता नाही, सौंदर्य विषय नाही. सौंदर्य भगवंताची विभूति आहे. सौंदर्याभिरुचि जीवन आहे.

हिमालय भव्य आणि सुंदर आहे. तेथील जल-प्रपात नितांत रमणीय वाटतात, कारण आपली वासना अगर संस्कार त्यांच्याशी जोडले गेलेले नाहीत. परंतु मानससरोवर भारताचें नाही, तिबेटचें आहे ही भावना मनात आल्याबरोबर सौंदर्याची भावना लुप्त होते आणि प्रभुत्वाची भावना प्रकट होते. ही अरसिकता आहे.

### रसिकतेत स्वामित्व आणि भोगासक्तीचा अभाव

एक उदाहरण घ्या. आपण खादीच्या दुकानात गेलो. बरोबर एक तरुणहि आहे. भांडारात तऱ्हेतऱ्हेचे ऐटदार कोट आणि पँट आहेत. त्या तरुणाला विचारलें, तुला काही घ्यायचें आहे ? तो म्हणतो, 'माझ्याजवळ पुष्कळ कपडे आहेत' मी त्याला परत म्हणतो 'अरे हा कोट फार सुंदर आहे, तुला शोभून दिसेल.' त्यावर तो म्हणतो, 'भांडारातहि तो कोट सुंदरच दिसतो, दुसऱ्या कोणी विकत घेतला तर त्यालाहि शोभून दिसेल, शक्यता अशी आहे की माझ्यापेक्षा त्यालाच तो अधिक शोभून दिसेल. मी स्वतःच

तो कोट घातला तर आरशाखेरीज त्याची शोभा मला दिसणारहि नाही. 'अगोचरत्वात् अप्रमाणम्'–जें दिसणार नाही, तें मानू कसें ? उलट दुसऱ्या कोणी तो कोट घातला तर त्याची शोभा मी पाहू शकेन.' ही रसिकता आहे. यात स्वामित्व नाही, भोगाची आसक्ति नाही.

### परिग्रहाचें सूक्ष्म रूप

भोगाचीं साधनें जवळ बाळगणे हाच केवळ परिग्रह आहे असें नव्हे. परिग्रहाचें स्वरूप सूक्ष्महि असू शकते. रसिकतेचा अभाव असतानाहि वस्तु जवळ बाळगण्याची भावना प्रबळ असणें हा सूक्ष्म परिग्रह आहे. बगीच्यात गुलाब फुलले आहेत, सुंदर दिसतात. कितीहि बघितलें तरी तृप्ति होत नाही; परंतु फुलें तोडण्याची इच्छा होत नाही, झाडावरच सुंदर वाटतात. ही रसिकता आहे. पण तीं फुलें तोडून आपल्याजवळ ठेवून घ्यावीत असें वाटलें, किंवा झाडच उचलून नेण्याची इच्छा झाली तर तेथे सौंदर्याची भावना क्षीण झाली, प्रभुत्वाची भावना प्रबळ झाली. हें झाड आपल्या आंगणात असलें तर तें पाहून लोक प्रशंसा करतील. फुलांपेक्षा प्रशंसा माझी जास्त असेल. ही परिग्रहाची भावना आहे. परिग्रहाची भावना रसिकतेला क्षीण करते.

### इंद्रियांचा अधम उपयोग

संगीत ऐकण्याची इच्छा मला आहे, पण मनात काही हेतु आहे. आनंदासाठी संगीत ऐकत नाही, काही स्वार्थ साधण्यासाठी ऐकतो. म्हणजे संगीत गौण आहे, स्वार्थ मुख्य

आहे. येथे संगीत माझा विषय बनतो. इंद्रियांचा हा अधम उपयोग आहे. आम्ही याला अनार्य म्हटलें, इंग्रजीत 'व्हल्गर' म्हणतात. समोर गंगा वाहत आहे, आकाशात चंद्र-सूर्य आहेत. गंगेला किंवा चंद्र-सूर्यांना आपल्या घरात आणून ठेवण्याची इच्छा कोणी करू लागला, चंद्र-सूर्यांना आपल्या रथाचीं चाकें बनवण्याची मनीषा कोणी करू लागला तर तो रसिक नव्हे, लोलुप आहे.

**विषयाच्या जागी समर्पणाची भावना**

यातून नीति-शास्त्रज्ञांनी एक मार्ग शोधून काढला आहे. इंद्रियांचा उपयोग देवासाठी करा.

गोविंदं प्रणमोत्तमांग रसने तं घोषयाहर्निशम् ।
पाणी पूजयतं मनः स्मर पदे तस्यालयं गच्छताम् ।।

मस्तका, तू गोविंदाला प्रणाम कर; जिव्हे, तू दिवसरात्र त्याच्या नांवाचा उच्चार कर; हातांनो, तुम्ही त्याची पूजा करा; मना, त्याचें स्मरण कर. आणि हे पायांनो, तुम्ही मंदिराकडे जा. डोळ्यांनाहि भक्त असेंच सांगतो, तुम्ही त्याला पहा; कानांनो, तुम्ही त्याचें श्रवण करा; नासिके, त्याच्या चरणांवर वाहिलेल्या तुळसमंजिरांचें आघ्राण करा. इंद्रियांच्या अधम उपयोगातून वाचण्यासाठी नीतिकारांनी ही युक्ति सांगितली. यातहि खरी रसिकता किंवा सौंदर्यभावना नाही. तुळशीपेक्षा मोगऱ्याच्या फुलाला अधिक सुगंध असतो; परंतु भोगासक्ति नष्ट करण्यासाठी एक दुसरा संस्कार निर्माण केला. यानेहि सौंदर्यभावना क्षीण होते. रसिकतेत ही देखील भावना नसते. भावनेमुळे वस्तूचें वास्तविक रूप अदृष्य होतें. भावनेत रसिकतेपेक्षा संस्कार प्रबळ असतो. कृष्ण जेव्हा कंसाच्या सभेत

गेला तेव्हा ज्याची जशी भावना होती त्याला त्या रूपात दिसला अशी गोष्ट आहे. म्हणजे वस्तु किंवा व्यक्ति आपल्या वासनेचा किंवा विकाराचा विषय बनते तेव्हा कलाभिरुचि आणि संस्कारिता यांची हानि होते.

प्रत्येक वस्तु आपल्या परीने एक विभूति आहे, विषय नाही. तिला रूप आहे, स्वाद आहे, सुगंध आहे. सबंध चराचर सृष्टीतील वस्तु माझ्या उपभोगासाठी उत्पन्न झालेल्या आहेत असें मानणें हा वस्तु आणि विधाता, दोघांचा अपमान आहे. गंगेच्या पाण्याचा उपयोग मी आपल्या कामांसाठी करतो, पण गंगा माझ्यासाठी उत्पन्न झालेली नाही. समाजात ही धारणा प्रचलित आहे की रसिकता, कलात्मकता, सौंदर्याभिरुचि पुरुषांपेक्षा स्त्रियांत अधिक असते. त्यांच्यात सहृदयता आणि कोमलता अधिक असते असें मानलें जातें. म्हणून त्यांनी रसिकता आणि सौंदर्यभावना यांचें वास्तविक स्वरूप काय आहे हें जाणून घ्यावें.

शांति-सैनिक विद्यालय,
साधना केंद्र, काशी
२४-१२-६०

५

# सख्य-भावना

**व्यवहाराची सुसंस्कारजन्य मर्यादा**

या सर्व भाषणांमध्ये आपला विषय हा आहे की स्त्री-पुरुषांच्या सहजीवनाचा आधार आणि स्वरूप काय असावें? तें सहजीवन नैसर्गिकतेवर आधारित असावें की मानवतेवर? स्त्री-पुरुषांच्या नैसर्गिक संबंधात शारीरिकता प्रमुख असते, त्यात एकाचें शरीर दुसऱ्याच्या उपभोगाचा विषय बनतें हें आम्ही बघितलें. पशूंना या बाबतीत एक मोठें संरक्षण आहे; तो नैसर्गिक मर्यादांचें उल्लंघन करू शकत नाही. अमर्याद आणि अनियंत्रित उपभोगाची संधि त्याला नाही. परंतु मनुष्याच्या बाबतीत अशी काटेकोर मर्यादा नाही. तो आपल्या इच्छेनुसार

उपभोग करू शकतो. त्याबद्दल निसर्ग त्याला शिक्षा करू शकतो, पण त्याच्या स्वैराचाराचें नियमन नाही करू शकत. म्हणून स्त्री आणि पुरुष यांच्या परस्पर संबंधांचा आधार निसर्ग नव्हे, संस्कारच होऊ शकतो. या संबंधांची मर्यादा ही आहे की त्यांनी एकमेकांच्या शरीराला, श्रमाला किंवा गुणांना आपल्या उपभोगाचा विषय मानू नये. या मर्यादेचें पालन करणें हीच सभ्यता आहे.

उपभोग इंद्रियांच्या द्वारा केला जातो. इंद्रियांचा स्वभाव आहे की तीं आत्मोपभोग करू शकत नाहीत. कान स्वतःला ऐकत नाही, डोळा स्वतःला पाहू शकत नाही — या सर्वांना बाह्य विषयांची आवश्यकता असते. बाह्य वस्तूंना इंद्रियांचा विषय मानला जातो. पण मनुष्य जेव्हा मनुष्याचा विषय बनतो तेव्हा त्याला आम्ही शोषण म्हणतो. स्त्री जर पुरुषाचा विषय बनली, तर तिची मनुष्यताच आम्ही नष्ट करतो असें झालें.

**दोन प्रकारचा स्पर्श-निषेध**

सर्व विषयांमध्यें सर्वांत जास्त निषेध स्पर्शाचा आहे. वास्तविक तर स्पर्शाची कामना अगर भावनाहि निषिद्ध आहे. स्त्रीच्या सान्निध्याने, तिचें रूप पाहिल्याने, तिचा नुसता आवाज ऐकल्यानेहि, पुरुषाचें चित्त चंचल बनत असेल, तर तोहि एक प्रकारचा स्पर्शच आहे. तरीहि प्रत्यक्ष स्पर्शाचा निषेध विशेष आहे. आपण प्रथमच बघितलें की स्पर्श-निषेधाचे दोन प्रकार आहेत. पुराणमतवादी ब्राह्मण भंग्याला अस्पृश्य मानतो. यात स्पर्शाचा निषेध आहे, परंतु वैषयिकता नाही. पवित्रतेची, शुद्धतेची भावना आहे. याचा स्वच्छतेशीं काही संबंध नाही. तो भंगी आंघोळ करून, स्वच्छ कपडे नेसून आला तरी परंपरागत

ब्राह्मण त्याला स्पर्श करणार नाही. भंगी स्वच्छ असला तरी ब्राह्मणाच्या दृष्टीने तो पवित्र नाही. पवित्रतेची ही भावना मिथ्या आहे, अमंगल आहे, आसुरी आहे.

परंतु स्त्रीच्या बाबतीत जो स्पर्शनिषेध आहे, तो आणखीनच वेगळ्या प्रकारचा आहे. स्त्रीचा स्पर्श विषयवासना उत्तेजित करणारा समजला जातो. याचसाठी ज्या समाजसुधारकांनी अस्पृश्यतानिवारणासाठी अथक प्रयत्न केले, त्यांनीहि स्त्रीपुरुषांच्या स्पर्शाच्या विषयाला हात घातला नाही. स्वच्छता आणि पवित्रतेच्या भावनेवर आधारलेल्या स्पर्शनिषेधापेक्षा स्त्री-पुरुषांच्या स्पर्शनिषेधाची भावना अगदी निराळी आहे. या दुसऱ्या स्पर्शाला काही लोकांनी अग्नि आणि लोण्याची उपमा दिली आहे. म्हणून ब्राह्मण व भंगी यांच्यातील किंवा एखाद्या संक्रामक रोगाने पछाडलेला रोगी आणि त्याची शुश्रूषा करणारा यांच्यातील अस्पृश्यतेचें निवारण करणें समाजाच्या उन्नतीच्या दृष्टीने समाजसुधारकांनी प्रशस्त आणि वांछनीय मानलें; परंतु स्त्री आणि पुरुष यांच्यात जी अस्पृश्यतेची भावना आहे ती दूर करण्याचा प्रयत्न धार्मिकतेवर आणि नैतिकतेवर विश्वास ठेवणाऱ्या धर्मसंप्रदायांच्या प्रवर्तकांनी आणि सदाचाराच्या प्रवक्त्यांनी केला नाही. ज्या काहींनी हा प्रयत्न केला ते अधिकतर सुखवादी आणि भौतिकवादी होते. त्यांनी असें मानलें होते की स्त्री-पुरुषांची नैसर्गिक भूमिकाच परस्पर उपभोगाची आहे, म्हणून त्यांच्यात स्वेच्छाप्रेरित अनियंत्रित शरीरसंबंध होऊ शकतो, दुसऱ्या पक्षाची संमति असावी एवढीच मर्यादा त्यात असावी. परस्पर संमतीने केलेला स्वैराचार विहित मानला जावा. विवाह-संस्काराने झालेल्या स्त्री-पुरुष संबंधात एक दोष ते

मानीत होते की त्यात प्रेम गौण बनतें, अवांतर प्रेरणा महत्त्वाच्या बनतात. व्यावहारिक प्रयोजनासाठी जो विवाह होतो तो एक प्रकारचा करार असतो. करारात प्रेमाला स्थान कोठलें? विवाह जितका भौतिक तितकाच शारीरिक आणि अधमहि. विवाह-संस्कारात सामाजिक आणि धार्मिक मर्यादांची प्रधानता असेल तेथेहि हृदयाचा संबंध नसतो. अशा प्रकारचा विवाहहि धर्म-संमत शारीरिकतेचाच प्रकार आहे. अर्थ हा की जेथे प्रेम-भावना गौण असेल आणि अवांतर भावनाच प्रमुख असतील तेथेहि स्त्रीपुरुषांच्या चित्तात परस्परांबद्दल जी अस्पृश्यतेची भावना आहे, तिच्यावर प्रहार होत नाही.

**संस्काराची परिणति मनोभूमिकेत**

विवाहाच्या विषयात दुसऱ्याहि एका पैलूचा विचार करणें आवश्यक आहे. विवाह एक संस्कार आहे. संस्कार कशासाठी आहे ? वैषयिकता क्षीण व्हावी यासाठी. परंतु केवळ धार्मिक संस्कारांनी वैषयिकता कमी होत नाही. म्हणून संयमाचें प्रतिपादन केलें जातें आणि दमनालाहि प्रोत्साहन दिलें जातें. वस्तुस्थिति अशी आहे की केवळ दूर राहण्याने वासना क्षीण होत नाही. लाडू कपाटात ठेवून दिले आहेत. मुलाला बाहेरून ते दिसत आहेत, त्याच्या जिभेला पाणी सुटत आहे, नजरेतून तो सारखें लाडूंचें सेवन करीत आहे. मुलाला लाडूंपासून दूर ठेवलें आहे, पण त्याची लालसा कमी झालेली नाही. लाडू खाण्यासाठी तो जास्तच अधीर होतो. स्त्रीपुरुषांच्या स्पर्श निषेधाने कामवासना क्षीण होत नाही, उलट जास्तच तीव्र बनण्याची शक्यता असते.

परंतु मुलगा एखाद्या कट्टर शाकाहारी कुटुंबातील आहे. आई सांगते लाडूत मांसहि घातलें आहे, मुलाची लाडू खाण्याची वासना कुठल्या कुठे पळून जाईल. याला संस्कार म्हणतात. संस्काराची परिणति मनोभूमिकेत होते. स्त्रीच्या संबंधातहि धर्माने आणि सामाजिक अशाच प्रकारचें काही संस्कार समाजात रूढ केले आहेत. स्त्री आणि पुरुष आपल्या निरुपाधिक अवस्थेत परस्परांना विषयीभूत आहेत. परंतु तुमच्यात पिता-पुत्रीचा, मातापुत्राचा किंवा भावाबहिणीचा संबंध आहे असें त्यांना सांगितलें गेलें, तर वासना लुप्त होऊन जाते. परंतु अशा प्रकारचे संस्कार होऊनहि स्त्रीपुरुषातील निरुपाधिक संबंध शुद्ध आणि पवित्र होत नाहीत. परस्परांबद्दलची विषयत्वाची भावना नाहीशी होत नाही.

म्हणूनच काही धार्मिक नेत्यांनी आणि फ्राईडसारख्या मनोवैज्ञानिकांनी स्त्रीपुरुषांची परस्परांबद्दलची दृष्टि काममूलक असते असें मानलें. परिणाम असा झाला की ब्रह्मचर्याचें व्रत धारण करणारांनी स्त्रीचें तोंड बघणेंहि निषिद्ध मानलें. तुकारामासारख्या सुधारक संतानेहि म्हटलें की स्त्री, मग ती दगडाची अगर लाकडाचीच का असेना, तिच्यापासून सावध राहिलें पाहिजे, स्त्री म्हणजे नरकद्वार. याचा अर्थ हा की पुरुष स्त्रीपासून जितका अधिक दूर राहील तितका तो अधिक शुद्ध, अधिक पवित्र. येथे एक मूलभूत प्रश्न असा निर्माण होतो की स्त्री काय कोणत्याहि भूमिकेत पुरुषाचा विषयच आहे ? यावर धर्मशास्त्राचें उत्तर आहे, नाही. मातेच्या भूमिकेत ती पावन आणि धन्य आहे. ज्या मूलभूत प्रश्नाचा आपण आता उल्लेख केला तो असा आहे की, काय विवाहाखेरीज मातृत्व संभव

आहे ? पुरुषाच्या दृष्टीने स्त्रीची पवित्रता तिच्या मातृत्वावरच अवलंबून असेल, तर प्रत्येक स्त्रीला विवाह् करणें अनिवार्य आहे. म्हणजे, प्रत्येक स्त्रीला माता बनलेंच पाहिजे. या सगळयाचा अर्थ हा झाला की जें ब्रह्मचर्य पुरुषाच्या बाबतीत श्रेयस्कर आहे, तेंच स्त्रीच्या बाबतीत अश्रेयस्कर आहे ; कारण तिच्या जीवनाची सार्थकता मातृत्वात आहे. पुरुषाला ब्रह्मचर्य प्रशस्त आहे आणि स्त्रीला मातृत्व !

**मानवमात्राचें शरीर तीर्थक्षेत्र**

स्त्रीचा स्पर्श पुरुषाच्या दृष्टीने विहित आणि पवित्र तेव्हाच ठरू शकतो जेव्हा स्त्री त्याची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रूपाने माता असते. जी मातृतुल्य तीच तीर्थस्वरूप आहे. माता बनल्याबरोबर तिचा स्पर्श गंगेसारखा पवित्र होतो. मग तर शंकराचार्यांसारखे बालब्रह्मचारीहि तिला गंगेप्रमाणे पूज्य आणि शुचिकारक मानतात.

'सकलकलुषभंगे स्वर्गसोपानसंगे
तरलतरतरंगे देवि गंगे प्रसीद ।'

अशी शंकराचार्यांनी गंगेची आराधना केली. तशीच माताहि तीर्थरूप झाली. परंतु मातेचें स्थान कुटुंबात आहे, समाजात नाही. कुटुंबातहि एक गाभाऱ्यासारखें स्थान असतें, सँकटम सँकटोरम (Sanctum Sanctorum) – मंदिरातील गाभाऱ्याप्रमाणें. तेथे समाजाचा प्रवेश झालेला नाही. त्याचा परिणाम म्हणजे स्त्री-पुरुषांच्या संबंधातील पवित्रता आणि मातृवात्सल्याची उदात्त उत्कटता कुटुंबापुरतीच मर्यादित राहिली आहे. आणि कुटुंबाच्या बाहेर समाजात जेव्हा ही उत्कटता प्रवेश करते तेव्हाहि ती मातृत्वाच्या भावनेपुरतीच सीमित असते.

स्त्रीपुरुषांच्या पवित्र सहजीवनासाठी एवढें पुरेसें नाही. आमचा आदर्श हा आहे की प्रत्येक स्त्रीचा स्पर्श प्रत्येक पुरुषाला आणि प्रत्येक पुरुषाचा स्पर्श प्रत्येक स्त्रीला गंगेइतका पवित्र वाटला पाहिजे. शंकराचार्यांनी म्हटलें आहे की हे गंगे, तुझ्या पाण्याच्या एका कणाचा जरी मला स्पर्श झाला तरी माझ्या साऱ्या पापांचा नाश होऊन जाईल. संस्कृतीचें आणि सामाजिक प्रगतीचें जास्तीत जास्त उच्च ध्येय 'मनुष्याला मनुष्याचें शरीर तीर्थ-क्षेत्राइतकें पवित्र वाटावें' हेंच असू शकतें. अशा स्थितीत स्पर्शभावना निरुपाधिक आणि निरपेक्ष अशीच असेल.

स्पर्शभावना, संगति आणि संपर्क यांची आकांक्षा हा मनुष्याचा मूळ स्वभाव आहे. माणसांना एकमेकांना भेटण्यासाठी कोणत्याहि प्रयोजनाची, निमित्ताची आवश्यकता नाही. धीरेंद्रभाई ज्याला 'नाहक मीलन' म्हणतात, तें एक आध्यात्मिक मूल्य आहे. गुरुदेव म्हणत असत की विनाकारण भेटण्याची कला आता आम्ही विसरलो आहोत. वास्तविक मनुष्य स्वभावतःच सामाजिक प्राणी आहे. त्याला दुसऱ्यांना भेटण्याची इच्छा असते. तो दुसऱ्यांबरोबर राहू इच्छितो. सोबतीशिवाय त्याला दुसरी गति नाही. सोबतीतून संबंध, नाती निर्माण होतात. एकटेपणात तो घाबरा होतो. एकटेपणा त्याला असह्य वाटतो. संपर्क आणि संबंध म्हणजेच जीवन.

### पलायनवाद

आज आपण ज्याला संगत किंवा सोबत म्हणतो ती वेगळी वस्तु आहे. ती निरुपाधिक नाही. जीवनाच्या जबाबदारीतून निसटून जाण्यासाठी आपण सोबत शोधतो. जीवन कसेंतरी घालवायचें आहे. जीवन एक शिक्षा आहे, संकट आहे. वेळ घाल-

वण्यासाठी, मनोरंजनाची साधनें शोधली जातात. ही वृत्ति मानवोचित नाही, आणि यात कोणती वैज्ञानिकताहि नाही. मृत्यूची आठवण विसरणें, मृत्यूला हुलकावणी देणें, लक्षात येऊ शकतें, परंतु जीवनालाच हुलकावणी कशी देता येईल ? ही स्थिति कृत्रिम आहे, असह्य आहे. मन रिझवण्याची आवश्यकता वाटणें मानसिक व्याधीचें चिह्न आहे. मग माणूस कुठल्या तरी बाह्य उपायांनीं जीवनात रंग आणण्याचा प्रयत्न करतो. किंवा जीवनातील वास्तविकताच विसरण्याचा प्रयत्न करतो. प्रथम पत्ते खेळायला सुरवात करतो, नंतर त्यांची मजा वाढवण्यासाठी मसाल्याप्रमाणे त्यात जुगार जोडून देतो. काही दिवसांनंतर मनोरंजनाचे हे प्रकारहि फिक्के वाटू लागतात. म्हणून एखाद्या मादक पदार्थाचें सेवन सुरू होतें. त्या नशेत दंग राहून जीवनातील वास्तविकता तो विसरून जातो. हें काही जीवन जगणें झालें नाही, जीवनातून सुटका करून घेणें आहे, वास्तविकतेपासून वाचणें आहे. हा एक प्रकारचा पलायनवाद आहे.

**सोबत आणि समाजशीलता यांत अंतर**

अशा प्रकारची सोबत आणि मनुष्याची स्वाभाविक समाजशीलता यांत फार अंतर आहे. या सोबतीतून अड्डेबाजी आणि क्लबचें वातावरण निर्माण होतें. समाजशीलतेतून कम्युनिटीची संख्या, शेजाऱ्यांची संख्या वाढत जाते. अड्ड्यातील लोकांची परस्परांना सोबत आणि शेजाऱ्यांचा सहनिवास या समान वस्तु नाहीत. मनुष्याची स्वाभाविक समाजशीलता, आणि प्रत्येक वस्तूबरोबरचा त्याचा जो सहज आत्मीयतेचा संबंध त्याला उद्देशूनच असें म्हटलें जातें की मनुष्य एकटा राहू शकत नाही, एकाकी राहू शकत नाही.

हें झालें मनुष्याचें सामान्य लक्षण. आता यात स्त्रीची आणखीच एक विशेषता आहे. तो तिचा स्वभाव नसेल, संस्कारच असेल; परंतु तो संस्कार इतका खोलवर गेलेला आणि दृढ आहे की जवळ जवळ तो स्वभावच बनला आहे. स्त्री एकटेपणाला घाबरते. दुसऱ्या स्त्रिया बरोबर असल्या तरी भिते. स्त्रीला स्त्रीची सोबत पुरेशी वाटत नाही. दोन पुरुषांना जर एकमेकांची सोबत मिळाली तर दोघांची हिंमत वाढते. दोन स्त्रियांना जर परस्परांची सोबत मिळाली तर दोघींची भीति कमी होते, पण दोघीहि स्वतःला पूर्णपणे सुरक्षित समजत नाहीत. सुरक्षितता त्यांना तेव्हाच वाटते जेव्हा एखाद्या पुरुषाचा सहारा किंवा आश्वासन मिळते. यातहि मजा अशी आहे की तिला साधारण-पणाने प्रत्येक पुरुषाची भीति वाटत असते. तिला पुरुषाचा सहाराहि हवा असतो आणि पुरुषाचें भयहि वाटत असते.

## स्त्रीजीवनात मित्रतेचा अविकास

यातून एकच मार्ग दिसतो. मनुष्यामधील पारस्परिक संबंधांचा आधार भयहि असता कामा नये आणि लोभहि असता कामा नये. स्नेहच त्या संबंधांचें आलंबन असावें. असें दिसून येते की जेथे जास्तीत जास्त निरपेक्ष संबंध असतो तेथे कुठलें ना कुठलें नातें असतेंच. आणि अडचण अशी आहे की नातें कुटुंबापुरतें सीमित असतें, तें समाजव्यापी बनू शकलेलें नाही. नात्यांचा समाजात विस्तार होतो तोहि कौटुंबिकतेच्या आधारा-वरच. नात्याचे संबंध साऱ्या समाजभर अद्याप व्याप्त होऊ शकलेले नाहीत. कुटुंबात बाकी सर्व नात्यांचा विकास होऊ शकतो, पण मित्रत्वाचें नातें विकसित नाही होत. सख्खे भाऊ

आणि सख्ख्या बहिणी आहेत पण अभिन्न मित्र क्वचित सापडतात. मैत्रीसाठी, सख्यासाठी कुटुंबाच्या बाहेर जावें लागतें. स्त्रीच्या बाबतीत अडचण ही आहे की तिचें अधिकांश जीवन कुटुंबापुरतें परिमित आहे. म्हणून पुरुषाच्या जीवनात मैत्रीच्या संबंधाचा जितका विकास झाला तितका स्त्रीच्या जीवनात होऊ शकलेला नाही.

### प्रेमपूर्ण मित्रता

मित्रता एक निराळीच वस्तु आहे. जीवनाचें तें एक अनुपम मूल्य आहे. त्यात जितकी घनिष्ठता आहे, तितकीच पवित्रताहि आहे. संस्कृतात सूर्याला 'मित्र' अशीहि एक संज्ञा आहे. तो सुखद उष्णताहि देतो आणि प्रकाशहि. म्हणूनच मित्राचें सान्निध्य प्रियहि आहे आणि उज्ज्वलहि. त्यात रतिभरहि स्वार्थ किंवा वैषयिकता नसते. मैत्रीमधे प्रेम ओतप्रोत असते. प्रेमात अग्नीची दाहकता नाही, परंतु पावकता आहे. प्रेमात मित्राचे सारे अवगुण आणि दोष भस्मसात् होऊन जातात. 'वह्नेः सर्वभुजो यथा'— अग्नि ज्याप्रमाणे साऱ्या वस्तूंचें भक्षण करतो त्याप्रमाणे मित्रता सगळे दोष पचवून टाकते. मित्रांना कधी एकमेकांचा कंटाळा येत नाही. विनोबांच्या शब्दांत याला सख्य-भक्ति किंवा कृष्णार्जुनयोग म्हणता येईल. कृष्णार्जुनयोग पुरुषांतील स्नेहसंबंधाचा द्योतक आहे.

परंतु, समाजात स्त्रीपुरुषांच्या स्नेहसंबंधाचे काही सांकेतिक शब्द आहेत काय? सीताराम, गौरीशंकर, उमा-महेश्वर असे काही शब्द स्त्रीपुरुषांचे संबंधवाचक आहेत. परंतु त्यांच्यात मित्रतेचा संकेत नाही. भीमार्जुन, रामलक्ष्मणौ हे

समास आहेत, पण कृष्णार्जुनाप्रमाणे या समासांत मैत्रीचा संकेत नाही, एका विशिष्ट नात्याचा आहे. राधाकृष्ण एक दुसराच संकेत आहे. त्यातहि नितांत पवित्रता आणि चरम उत्कटता आहे. परंतु तो संबंध प्रियकर-प्रेयसीचा आहे, उदात्त आणि पवित्र असला तरी समाजव्यापी होऊ शकत नाही. कृष्ण-द्रौपदी एक असा संबंध आहे, जो समाजव्यापी होऊ शकतो. कृष्णार्जुनयोग आणि कृष्णाकृष्णयोग (कृष्णा–द्रौपदी) सामाजिक स्नेहसंबंधाचे अनुकरणीय असे आदर्श आहेत. मैत्री दोन माणसांचा प्रत्यक्ष अन्योन्य संबंध आहे. सर्वच नात्यांमधे तो सर्वात अधिक साक्षात्कारी आहे.

**गांधींची अमर देणगी**

आपण वर हें पाहिलें, की स्त्रीला एकटेपणाची जशी भीति वाटते तशीच पुरुषाच्या सोबतीतहि वाटते. याला उपाय एकच आहे की स्त्रीपुरुषांत विशुद्ध पारस्परिक सख्य-भक्तीचा संबंध स्थापन व्हावा. याचा आरंभ म्हणून कुटुंबातील नात्याची भावना समाजात केली पाहिजे हें आपण पूर्वी पाहिलेंच आहे. पण हें पहिलेंच पाऊल आहे. आपल्याला याच्याहि पुढे जायचें आहे. समाजात स्त्रीपुरुषांमधे मैत्रीचे संबंध वाढले पाहिजेत. शेंकडो वर्षांनंतर गांधीच पहिला असा पुरुष झाला असावा ज्याने आपल्या जीवनात दोन्ही प्रकारचे प्रयोग केले. स्त्री आणि पुरुष दोघेहि एकमेकांबरोबर सख्याच्या तुल्य भूमिकेवर राहू शकतात हे सिद्ध करण्याचा त्याने प्रयत्न केला. सामाजिक क्षेत्रात या तथ्याचा स्वीकार केला गेला नाही तर स्त्रीचें मानवत्व गौण आणि हीन राहील. अर्थात् गांधीने नैसर्गिक संबंध गौण मानले.

केवळ प्राकृतिक संबंध तर पशूंमधे असतो. स्त्रीच्या मातृत्वाची उपासना समाजात होते, तिच्या भगिनीत्वालाहि पवित्र आणि शुभ मानलें; परंतु मैत्रीचा संबंध या दोन्ही नात्यांपेक्षा कितीतरी अधिक शुद्ध आणि मंगलमय आहे. समाजात स्त्री-पुरुषांमधे परस्पर अस्पृश्यतेची जी भावना आमच्या परंपरागत नीतिशास्त्राने प्रशस्त मानली होती, तिचें निवारण करण्याचें नैतिक साहस गांधींनी दाखवलें. त्याने आपली अब्रूहि पणाला लावली. लोक म्हणतात गांधींची तपासणी सायको-ॲनॅलिसिसने म्हणजे फ्राईडच्या मनोविश्लेषण पद्धतीने केली पाहिजे. भगवान् कृष्णाच्या बाबतीत अद्याप या लोकांनी असें म्हटलें नाही हें नशीबच म्हणायचें. भगवान् कृष्ण तर पूर्णावतार मानले जातात. परंतु एक स्वातंत्र्यप्रिय आणि चारित्र्यवान् माणूस जितके धोके पतकरू शकतो तेवढे सगळे गांधीने शौर्याने आणि धैर्याने पतकरले.

गांधीचा ब्रह्मचर्याच्या बाबतीतील आग्रह सर्वविदित होता. गांधी विलासप्रिय व्यक्ति नव्हती. पवित्रता आणि संयम हीं त्याचीं व्रतें अगदी दृढ होतीं. तो सत्याचा पुजारी होता आणि सौंदर्याचा मर्मज्ञ होता. एकदा कृष्णमूर्तींनी एक फार मार्मिक गोष्ट सांगितली : Beauty is Austere' सौंदर्यात शृंगार नसतो. विलासिता एक वेगळी वस्तु आहे, जीवनातील प्रसन्नता अगदी वेगळीच वस्तु आहे. प्रसन्नता स्नेहजन्य असते, विलासितेतून आसक्ति निर्माण होते. गांधीचें तर तत्त्वज्ञानच अनासक्ति-योगाचें होतें. म्हणून त्याच्या दृष्टीने जें मंगल तेंच सुंदर होतें आणि जें सुंदर होतें तेंच सत्य होतें. सुंदरता स्वतःच

मनोवेधक असते. तिला अलंकाराची जरूर नसते. ती कोणत्याहि वेशात आणि कोणत्याहि रूपात असुंदर नसते. 'किमिव हि मधुराणां मंडनं आकृतीनाम् ।' स्त्री-पुरुष निरोगी आणि शील-संपन्न असतात तेव्हा ते परस्परांना नितांत रमणीय आणि सुंदर वाटतात. त्या सुंदरतेत अभिलाषा नसते. स्त्री-पुरुष-संबंधाच्या विषयीं मानव समाजाला गांधीची ही अनुपम देणगी आहे.

शांति सैनिक विद्यालय

साधना केंद्र, काशी

२५-१२-'६०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

# ६

# भक्तियुक्त सख्य-भावना

आमच्या सर्वच धर्मशास्त्रांमधे आणि परंपरागत सामाजिक रूढींमधे स्त्रीधर्मावर अनुशासन असलेलें दिसून येतें. परंतु स्त्री आणि पुरुष यांच्यातील मैत्री संबंधाचें विधान स्त्रीधर्मात तर नाहीच, पण पुरुषधर्मातहि नाही. वास्तविक मैत्री दोघांचा धर्म असला पाहिजे. संस्कृत भाषेत मित्र हा शब्द पुल्लिगीहि नाही आणि स्त्रीलिंगीहि नाही उभयलिंगी आहे, म्हणून नपुंसकलिंगी आहे, इंग्रजीत 'फ्रेंड' उभयलिंगी आहे. हिंदी, मराठी आदि भाषांत पुल्लिगी आहे. मराठीत 'मित्र'चें स्त्रीलिंग 'मैत्रीण' आहे. परंतु हिंदी भाषेत तर 'मित्र' चें स्त्रीलिंग नाहीच. निदान प्रचलित तरी नाही. 'सखा' चें स्त्रीलिंग 'सखी' आमच्या

भाषांतून प्रचलित आहे. पण त्याचा प्रयोग स्त्रीपुरुषांच्या पारस्परिक संबंधात होत नाही. अजाने इंदुमतीविषयी 'गृहिणी-सचिव: प्रिया सखी' म्हटलें आहे. इंदुमती त्याची पत्नी होती म्हणून त्याने हें म्हणण्याचें साहस केलें. स्त्री आणि पुरुषाची विषयनिरपेक्ष मैत्री मानवसमाजासाठी एक अपूर्व वरदान ठरेल.

**स्त्रीपुरुषांच्या समान मर्यादा**

मातृत्व स्त्री जीवनाचें गौरीशंकर आहे. त्याखालोखाल तिचा कोणता परमधर्म असेल तर तो आहे पातिव्रत्य. तुलसी-दासांनी अनसूया आणि सीता यांच्या संवादात तीन प्रकारच्या पतिव्रतांचा उल्लेख आणला आहे :

'जग पतिव्रता चारी बिधि अहहीं । बेद पुरान संत अस कहहीं ।।
उत्तम के अस बस मन माहीं । सपनेहु आन पुरुष जग नाहीं ।।
मध्यम पर-पति देखहिं कैसे । भ्राता पिता पुत्र निज जैसे ।।
धर्म बिचारि समुझि कुल रहहिं । सो निकृष्ट तिय स्रुति अस कहहीं ।।'

जिला या जगात स्वप्नातहि पतीखेरीज दुसरा पुरुष दिसत नाही ती उत्तम पतिव्रता. जसें मीराबाईला वृंदावनात वृंदावनविहारीशिवाय दुसरा पुरुषच माहीत नव्हता. पतीखेरीज अन्य सारे पुरुष जिला पिता, भ्राता किंवा पुत्र यासमान आहेत ती मध्यम श्रेणीची पतिव्रता. सामाजिक पवित्रता आणि स्त्रीची स्वतंत्रता या दिशेने आम्ही यालाच प्रथम चरण मानलें. कौटुंबिक संबंधांचें आपण सामाजीकरण करू इच्छितो. ही मर्यादा स्त्री आणि पुरुष दोघांनाहि समान रूपाने लागू आहे. विवेकाने लोकलज्जा आणि कुळमर्यादा सांभाळून जी संयम करते

तिला तुलसीदासांनी 'निकृष्ट तिय' म्हटलें आहे. उत्तम आणि मध्यम पतिव्रतांचीं जीं लक्षणें आहेत तीं पत्नीव्रती पुरुषालाहि लागू आहेत. पत्नीखेरीज ज्याला दुनियेत दुसरी स्त्री माहीत नाही तो उत्तम पति; जो पर-स्त्रियांना आई, बहिण किंवा पुत्री म्हणून पाहतो तो मध्यम पति आहे, आणि जो कुल-मर्यादेच्या आणि समाजमर्यादेच्या भयाच्या विचाराने संयम करतो तो निकृष्ट पति आहे. अशा तऱ्हेने एका दृष्टीने दोघां-साठीहि समान मर्यादांचें विधान केलें गेलें आहे, परंतु हा केवळ आभास आहे.

## शीलवान पुरुषाचें उदाहरण

ज्या अर्थाने पातिव्रत्य स्त्रीचा धर्म मानला गेला, त्याच अर्थाने पत्नीव्रत हा पुरुषाचा धर्म मानला नाही. पुरुषाच्या वैराग्याचें लक्षण केवळ त्याची विषयविमुखता नाही, स्त्री विमुखता आहे. लक्ष्मणाने म्हटलें, सीतेचीं कुंडलें आणि केयूर मी ओळखू शकणार नाही, तिच्या पायांतील पैंजणच फक्त मी बघितलेले आहेत. 'नित्यं पादाभिवंदनात् ।' शीलवान पुरुषाचें हें उत्तम उदाहरण मानलें गेलें. लक्ष्मणाने कधी असें म्हटले काय की मी रामचंद्राचें मुख बघितलेलें नाही? सुमित्रा, कैकेयी, कौसल्या यांची तोंडें बघितलेलीं नाहीत असेहि तो कधी म्हणत नाही. ज्या स्त्रीला मातृतुल्य मानलें, तिचें मुख पाहण्यासहि ज्याचें मन कचरतें त्याला आम्ही सुशीलतेचा आदर्श मानतो, आदर्श ब्रह्मचारी म्हणतो.

## ब्रह्मचर्यात स्त्री-द्रोहाचा अभाव

परंतु धर्मशास्त्रात आणि सामाजिक शिष्ट व्यवहारात स्त्रीचा स्पर्श विषय स्पर्श मानला गेला असला तरी मातेचा स्पर्श

पुण्यस्पर्श मानला आहे. मग जानकीमातेचें मुख अदर्शनीय का होतें? लक्ष्मणाचें ब्रह्मचर्य दीरभावजयीच्या नात्याने सीमित झालें होते.

यात एक रहस्य लपलेलें आहे. 'नित्यं पादाभिवंदनात्'–मी नेहमी चरणांनाच वंदन करीत आलो आहे असें म्हणण्यात काहीच दोष नाही, कारण वंदन तर चरणांनाच करतात. मी मुखावलोकन केलें नाही असें म्हणण्यात दोष आहे. मुख माझा विषय होऊ शकतो ही भावना त्यात अध्याहृत आहे. जो पुरुष स्त्रीच्या शरीराला विषय मानतो, त्याला तें शरीर अमंगल, अपवित्र वाटतें. हें ब्रह्मचर्याचें लक्षण नव्हे. ही तर स्त्रीशरीराविषयी जुगुप्सा झाली. ब्रह्मचर्य म्हणजे स्त्रीद्रोह, स्त्रीनिंदा, स्त्रीनिषेध नव्हे. निषेध असेलच तर तो स्त्रीत्व आणि पुरुषत्व दोहोंचा आहे.

आमच्या लहानपणी एक बालब्रह्मचारी स्वामी हरिकथा करीत असत. कधी कधी आम्ही त्यांच्या मुक्कामावर त्यांना भेटायला जात असू. पण त्यावेळीं आपल्या बहिणींना बरोबर नेऊ शकत नव्हतो. एखादी स्त्री त्यांच्या निवासस्थानावरून जात असेल तर तिचें दर्शन होऊ नये म्हणून ते आपल्या डोळ्यांवर उपरणें ओढून घेत असत. ब्रह्मचारी म्हणून त्यांची फार प्रसिद्धी होती. ते तर स्त्रीचें मुखावलोकनहि करीत नाहीत असें लोक म्हणत. दुसरेहि एक सुप्रसिद्ध तपस्वी संन्यासी होते. एकदा चुकून एका स्त्रीने त्यांच्या चरणांना स्पर्श केला. ते आपल्या शिष्याला म्हणाले, अरे, विंचवाचा दंश झाला. आणि सरळ त्यांनी सरोवरात डुबकी मारून सचैल स्नान केलें.

कदाचित् हे सारे नैष्ठिक ब्रह्मचारी ईश्वराजवळ अशी तक्रारहि करीत असतील की त्यांचा जन्म स्त्रीच्या पोटीं कां झाला? सरस्वतीचा जन्म ब्रह्मदेवाच्या पोटीं झाला, तसाच जन्म भगवान या ब्रह्मचाऱ्यांना देऊ शकला नसता? नाही तर भगवंताच्या अवतारांप्रमाणे हे 'अयोनिसंभव' होऊ शकले असते. कौसल्या आणि देवकी यांच्यासमोर भगवान आपल्या खऱ्या स्वरूपात प्रथम प्रकट झाले आणि नंतर बालस्वरूप धारण केलें. 'भये प्रकट कृपाला दीनदयाला कौसल्या हितकारी'। सारांश हा की ब्रह्मचर्यात मातृत्वाची प्रतिष्ठा असेल, तर स्त्रीविषयी जुगुप्सा असता कामा नये.

**सदाचार आणि नैतिकता यांचे दोन आदर्श**

स्त्रीविषयी ही जी गौणभावना आहे ती आमच्या धार्मिक आणि नैतिक परंपरेचा आधार बनली आहे. हा संस्कार आमच्या जीवनात बद्धमूल झाला आहे. अतिप्राचीन व अकुंठित परंपरेमुळे हा संस्कार एका प्रकारे स्वभावच बनला आहे. 'नारि सूनि एक पुरुष बिना'—पुरुषाशिवाय स्त्री सुनी आहे. परंतु, स्त्रीशिवाय पुरुष अधिक पवित्र आहे असे सदाचाराचे आणि नैतिकतेचे दोन आदर्श प्रचलित झाले. ब्रह्मचर्याचा आदर्श पुरुषाला अनुष्ठेय आहे, स्त्रीसाठी त्याचा निषेध आहे. आपण रोज स्त्रीपुरुष मिळून एकादशव्रतांचा पाठ करतो. पण केवळ उच्चारणाने काय होणार? स्त्रीच्या हृदयातून त्याचा काही प्रतिध्वनि उमटत नाही. 'कलदार' रुपयाप्रमाणे तो शब्द 'खणखण' वाजत नाही. अहिंसा आणि सत्याचा उच्चार करताच हा खणखण आवाज उमटतो पण ब्रह्मचर्याचा प्रतिध्वनि उमटत नाही. पुरुषाच्या हृदयात उमटतो,

पण त्याचा आशय काही वेगळाच आहे. ज्याने शंभर वर्षे स्त्रीचें मुखावलोकनहि केलेलें नसेल त्याने तर गौरीशंकरच गाठला. याला अपवाद त्याच्या बाल्यावस्थेचा आहे. आणि याच्या उलट ब्रह्मचर्याचा उच्चार करीत असताहि स्त्री ही भावना विसरू शकत नाही, की तिच्या जीवनाचें सार्थक मातृत्वातच आहे.

**ब्रह्मचर्याविषयी मतभेद**

पुरुषाच्या ब्रह्मचर्याविषयीदेखील जुन्या धर्मज्ञांमधे मतभेद आहे. एक मत म्हणतें:

'शैशवेऽभ्यस्तविद्यानां यौवने विषयैषिणाम् ।
वार्धक्ये मुनिवृत्तीनां योगेनांते तनुत्यजाम् ।।
रघूणामन्वयं वक्ष्ये'

कालिदास म्हणतो : जे बाल्यावस्थेत विद्याध्ययन करीत असत, तारुण्यात गृहस्थाश्रमी बनत असत, वृद्धावस्थेत मुनिवृत्तीने राहत आणि शेवटीं योगाने शरीर-विसर्जन करीत अशा त्या रघुवंशीयांचें मी वर्णन करीत आहे. या वर्णनात चारी आश्रमांचा संकेत आहे. गृहस्थाश्रमाखेरीज कोणी संन्यासाचा अधिकारी होऊ शकत नाही. संन्यास चतुर्थाश्रम आहे. हा एक पक्ष झाला. दुसरा पक्ष म्हणतो : 'यदहरेव विरजेत् तदहरेव प्रव्रजेत्, यदि वा ब्रह्मचर्यादेव प्रव्रजेत् ।' ज्या दिवशी विरक्ति येईल त्याच दिवशीं माणूस परिव्राजक होऊ शकतो. ब्रह्मचारीहि संन्यासी होऊ शकतो. शंकराचार्य अशा प्रकारचे संन्यासी होते.

**विधि शब्दाची व्याख्या**

प्रश्न हा येतो की मग धर्मशास्त्रात पुरुषासाठीहि विवाहाचें विधान केलेलें आहे काय ? पारिभाषिक भाषेत विधान किंवा

विधि या शब्दाचा अर्थ आहे आदेश, आज्ञा. ब्रह्मचारी जेव्हा गुरुकुलातील अध्ययन संपवल्यानंतर समावर्तन करतो तेव्हा धर्मशास्त्र त्याला सांगतें की त्याने सवर्ण भार्येबरोबर विवाह करावा : 'सवर्णां भार्यां उद्वहेत् ।' याचा अर्थ तर असा झाला की जो विवाह करीत नाही तो धर्माच्या अनुशासनाचा भंग करतो. शेवटीं या विधीचें स्वरूप काय ?

### अपूर्व विधि

मीमांसकांनी तीन प्रकारचे विधि मानले आहेत: अपूर्व विधि, नियम विधि आणि परिसंख्या विधि. ज्या विषयाचें आपल्याला काही ज्ञान नाही अशा विषयाची आज्ञा असेल तर तो अपूर्व विधि म्हटला जातो. 'स्वर्गकामो यजेत'– स्वर्गात जायचें असेल तर यज्ञ करा. आम्हाला स्वर्गहि अज्ञात आहे आणि यज्ञहि अज्ञात आहे. पण शास्त्र आम्हाला स्वर्गहि सांगतें आणि तेथें पोंचण्याचें साधनहि सांगतें. यात विकल्प काही नाही, कर्मस्वातंत्र्य अवश्य आहे. आम्हाला स्वर्गात जायचें नाही असें आपण म्हणू शकतो पण जर जायचें असेल तर यज्ञाखेरीज दुसरें कोणतें साधन नाही. चंद्रावर जाण्याचें साधन आता उपलब्ध झालें आहे. पूर्वी साऱ्या ग्रहांची माहिती आपल्याला नव्हती. आता कितीतरी नवीन ग्रह-ताऱ्यांची माहिती होऊ लागली आहे. आणि तेथे पोंचण्याचीं साधनें शोधलीं जात आहेत, बनवलीं जात आहेत. परंतु, स्वर्गात पोंचण्याचा कोणताहि मार्ग आपल्याला माहीत नाही, कारण स्वर्ग अज्ञात आहे. अज्ञात विषयासंबंधी किंवा अज्ञात साधनासंबंधी जो विधि सांगितलेला असतो त्याला अपूर्व विधि म्हणतात.

**नियम विधि**

दुसरा विधि आहे नियम विधि. कोणी तुम्हाला सांगितलें मुगलसरायला पायी जा. तुम्ही विचाराल पायी म्हणण्याची काय जरूर? जरूर अशासाठी आहे की तुम्ही मुगलसरायला बसने जाऊ शकता, आगगाडीने जाऊ शकता, रिक्षाने किंवा टांग्यानेहि जाऊ शकता. तरीहि सांगितलें जातें पायी जा. कारण या जाण्यात पायी चालण्याचें महत्त्व आहे. एखादें काम करण्याच्या दोन किंवा अधिक पद्धति असतात आणि त्यापैकी एकाच पद्धतीचें विधान केलेलें असतें तेव्हा तो नियम विधि म्हटला जातो. अनेक विकल्पांपैकी एकाच विकल्पाचा आदेश असतो. मीमांसकांनी विवाह नियम विधि मानला आहे, म्हणून ते संन्यास मानीत नाहीत. अग्निहोत्र यावज्जीवन चालवावें लागतें. अग्निहोत्रातील अग्नि विझता कामा नये. दररोज त्यात आहुति पडली पाहिजे. अग्निहोत्राची पूजा एकटयाने करता येत नाही. पूजा करताना पत्नी बरोबर असावी लागते. सीतात्यागानंतर रामचंद्राने यज्ञ केला तेव्हा सीतेची सोन्याची मूर्ति बनवण्यात आली. कोणी विधुर पुरुष धार्मिक विधि करीत असेल तर सुपारी कडोसरीला लावून घेतो. विधवा स्त्रीला ही सोय नाही. कारण स्त्रीला वैदिक कर्माचा अधिकार नाही. तेव्हा अग्निहोत्र्याला गृहस्थाश्रम अनिवार्य मानला जात होता. यामुळेच कित्येक अग्निहोत्री ऐंशी वर्षांच्या वयात बारा वर्षांच्या कुमारिकेशी विवाह करीत असत. असा विवाह शुद्ध धार्मिकतेसाठीच होत असतो.

**परिसंख्या विधि**

तिसरा विधि आहे परिसंख्या विधि. यात आज्ञा नसते, अनुज्ञा असते. आदेश किंवा हुकूम नसतो, केवळ काही सूट

असते. एखाद्याला तंबाखू पिण्याचें व्यसन आहे, तर त्याला सांगितलें जातें हुक्का पी. गुरूची ही आज्ञा ऐकून दुसरा म्हणाला, आजपर्यंत मी कधी तंबाखू ओढली नाही. आता गुरूजींची आज्ञा झाली की हुक्का पी, तेव्हा नाइलाजानें प्यावाच लागेल. तेव्हा गुरुजी त्याला म्हणतात, अरे बाबा, मी तुला तंबाखू पी म्हणून सांगितलें नाही. मी इतकेच म्हणतो की जर तुझें तंबाखूचें व्यसन सुटत नसेल तर हुक्का पी. मुलगा विचारतो, अतिबातच प्यालो नाही तर ? गुरुजी म्हणतात, फारच उत्तम. शास्त्राचें एक वचन आहेः 'पंच पंचनखाः भक्ष्याः ।' पांच नखें असलेले प्राणी खा. येथे खा म्हणजे. खाऊ शकता. अजिबात न खाल तर सर्वात उत्तम. परंतु खायचेंच असेल तर पांच नखें असलेले पांच प्रकारचे प्राणी खा. हुक्का पी असें सांगण्यातील अभिप्राय हा आहे की बिडी, सिगरेट, चिलीम पिऊ नकोस. 'पंच पंचनखाः भक्ष्याः' मधे दुसरे प्राणी खाण्याबद्दलचा निषेध आहे. भागवतात एकादश स्कंधात हीच गोष्ट सांगितली आहे. 'आसु निवृत्तिरिष्टा' अशा ठिकाणीं शास्त्राचा अभिप्राय निवृत्ति असा आहे. म्हणून शास्त्र जेव्हा म्हणतें विवाह कर तेव्हा त्याचा अर्थ असा की कोणत्याहि स्त्रीशी विवाहबाह्य संबंध ठेवू नकोस. दुसरा अभिप्राय हा आहे की स्वतःच्या पत्नीखेरीज कोणत्याहि स्त्रीकडे पत्नित्वाच्या भावनेने पाहू नकोस. विवाहपूर्व अवस्थेत साऱ्या स्त्रिया माता किंवा बहिणीच आहेत विवाह केल्यावर त्यातली एक कमी होते. अजिबात विवाहच न करणें श्रेयस्कर आहे. परंतु करायचाच असेल तर एकाच स्त्रीशी करा. अशा प्रकारे वासना स्थानबद्ध केली. म्हणून शास्त्रकारांच्या दुसऱ्या पक्षाने विवाहाला परिसंख्या विधि मानलें.

## मातेचा स्पर्श पुण्यकारक

साऱ्याच स्त्रियांना कामिनी मानीत असेल तो ब्रह्मचारी नव्हे. उलट प्रत्येक स्त्रीला माता मानतो तोच ब्रह्मचारी आहे. मंडनमिश्र आणि शंकराचार्य यांचा संवाद प्रसिद्ध आहे. मंडनमिश्र शंकराचार्यांचा धिक्कार करताना म्हणतो: स्त्रीच्या कुशीत तुझा जन्म झाला, स्त्रीचें दूध तू प्यायला आहेस, त्या स्त्रीचाच तू तिरस्कार करतोस ? तुझ्या ब्रह्मचर्याचा धिक्कार असो ! शंकर उत्तरादाखल म्हणतो : जिचें स्तन्य तू प्यायला आहेस, जिच्या कुशीतून तू जन्मलास त्या स्त्रीशीच तू शरीरसंबंध ठेवतोस. मातृद्रोही कोण आहे, तू की मी ? यात एक रहस्य लपलें आहे. मातेचा स्पर्श निरंतर पुण्यकारक आहे. बाल्यावस्थेत तिच्या स्तनाचा स्पर्शहि विषयस्पर्श नसतो. ब्रह्मचर्यात, प्रौढ अवस्थेतहि तीच भावना अक्षुण्ण राहिली पाहिजे. परंतु ब्रह्मचाऱ्यांनी तर स्त्रीमात्राचाच स्पर्श अनर्थकारक मानला आहे. त्यामुळे नीतिमत्तेचे दोन स्तर कसे निर्माण होतात त्याचा आपण विचार केला आहे.

## कृष्णार्जुन आणि कृष्णकृष्णायोग

भगवान श्रीकृष्णांचें ब्रह्मचर्य कधी खंडित झालें नाही अशी आपल्याकडे धारणा आहे. भगवंताचीं अनेक रूपें आहेत. भिन्न भिन्न प्रयोजनांशी आणि भूमिकांशी संबंधित अशीं नानाविध रूपें आहेत. त्या प्रत्येक रूपाला ध्यान म्हणतात. गोपीवल्लभाचें किंवा राधावल्लभाचें रूप ध्यानासाठी इष्ट मानलें जात नाही. आपल्या प्रयोजनाला तें अनुरूप नाही. अनुरूप अशीं दोनच ध्यानें आहेत– कृष्णार्जुन आणि कृष्ण-

कृष्णा. हे दोन सामाजिक योग असे आहेत की ज्यात सख्याला भक्तीचा उजाळा मिळाला आहे. म्हणून त्यात संकोच, भीति यांना वाव नाही. द्रौपदीच्या बाबतीत तर 'वसनरूप भये श्याम ।' श्याम स्वतःच द्रौपदीचें वस्त्र बनले. दोघांच्या मध्यें कोणता पडदा उरला ? यापेक्षा अधिक निकटता आणि अधिक मुक्ति काय असू शकते ! गोपी, राधा, रुक्मिणी किंवा सत्यभामा यांच्यासाठी वस्त्र बनावें लागलें नाही. त्याहि संबंधांत संकोच, लज्जा किंवा मर्यादा यांचा आत्यंतिक अभाव होता. परंतु कृष्ण-दौपदी संबंधाची भूमिका अगदी भिन्न आहे. भय नाही, संकोच नाही आणि तरीहि शारीरिकतेचें नांव नाही. किती अद्भुत आदर्श आहे ! मुलामुलींनी एकत्र शिक्षण घ्यावें की नाही, स्त्री-पुरुषांनी एकत्र काम करावें की नाही, खेळावे की नाही, फिरायला जावें की नाही हे सारे प्रश्न अगदीच वरवरचे आहेत, त्या आदर्शाच्या मानाने अगदीच क्षुल्लक आहेत. कृष्णद्रौपदीच्या संबंधाचा विचार करताना तर हे प्रश्न अगदी क्षुद्र वाटतात. समस्येच्या खऱ्या स्वरूपाचें दर्शन या प्रश्नांनी होत नाही. कृष्णार्जुनयोग म्हणजे धनुर्धर पार्थ व योगेश्वर कृष्ण यांचा योग नव्हे, कृष्ण आणि सुदामा यांचाहि योग नव्हे. भगवंतांनी अर्जुनासाठी काहीच केलें नसतें तरी ते परस्परांचे अभिन्न मित्र राहिले असते. ते एकमेकांबरोबर खेळले असते, बागडले असते, जेवले असते आणि मारामारीहि खेळले असते.

'यच्चावहासार्थमसंत्कृतोऽसि, विहारशय्यासनभोजनेषु ।'– खेळण्याबागडण्यात, शय्येवर, विनोदात, खाण्यापिण्यात हे देवा, मी तुझा अनादर केला. म्हणून अर्जुन भगवंताजवळ क्षमा मागतो

आणि म्हणतो, तू सारे सहन करावेस हें तुला उचितच आहे. पुत्राचे अपराध पिता सहन करतो, प्रियाचे अपराध प्रिय सहन करतो आणि सख्याचे अपराध सखा सहन करतो. अर्जुनाचें कृष्णाशी असलेलें नातें अतर्क्य आहे, कारण मैत्रीचा महिमाच अनिर्वचनीय आहे.

**प्राणिमात्र एकाच जीवनतत्त्वाचे प्रतीक**

ही सख्यभावना एक आध्यात्मिक मूल्य आहे. हल्ली कॉमरेडशिप, कॉमरेडरी, साथीपन, सोहबत असे शब्द बरेच प्रचलित झाले आहेत. यात एकमेकांबद्दलचें प्रेम आहे, परंतु सख्य भक्तीमधे असलेली वस्तु नाही. मातापित्याचें किंवा देवाचें शरीर जितके पवित्र वाटतें तितकेंच प्रत्येक मानवाचें शरीर आपल्याला पवित्र वाटलें पाहिजे.

अग्नि: यथैको भुवनं प्रविष्टो रूपंरूपं प्रतिरूपो बभूव ।
एकस्तथा सर्वभूतान्तरात्मा रूपंरूपं प्रतिरूपो बहिश्च ।।

आस्तंभब्रह्मपर्यंत सारे विग्रह भगवंताचेच आहेत. सर्वांच्यात एकच जीवनतत्त्व विराजमान आहे. म्हणून गाढवापासून मोठ्यात मोठ्या संतापर्यंत सर्व एकाच जीवनतत्त्वाचे प्रतीक आहेत. सर्वच पवित्र आहेत.

**सख्याबरोबर भक्ति**

जीवनातील पवित्रता म्हणजे केवळ आत्म्याची पवित्रता नव्हे. तुम्ही कोणाला माराल आणि नंतर म्हणाल आम्ही तर फक्त त्या माणसाच्या शरीरालाच मारलें आहे. शरीर तर नश्वरच आहे आणि आत्म्याचें हनन होऊच शकत नाही. म्हणून आमच्यावर हिंसेचा आरोप होऊ शकत नाही. स्वदेशी

आंदोलनाच्या वेळीं पुष्कळसे क्रांतिकारी तरुण अशाच प्रकारचें समर्थन देत असत. त्यांच्याजवळ एक एक भगवद्गीता असायची. ते म्हणायचें, 'नायं हंति न हन्यते ।' हा कोणाला मारीत नाही आणि स्वतः मरतहि नाही. सेनापति बापटां-सारख्या व्युत्पन्न क्रांतिकाऱ्यांने गांधींना म्हटलें होतें, तुमची अहिंसा मूढ अहिंसा –– Stupid Non-Violence आहे. माझ्या सत्याग्रह यथार्थ सत्याग्रह आहे, कारण तो अहिंसा-आग्रह-रहित सत्याग्रह आहे. या शरीराची हिंसा न करण्याने काय तें वाचणार आहे ? तें तर एक दिवस स्मशानात जाणारच आहे.

परंतु हा अप्रतिष्ठित तर्क झाला. खरी गोष्ट अशी आहे की आपण स्वतःचें आणि दुसऱ्याचेंहि शरीर अवध्य मानतो. सेवा करावीशी वाटते ती या शरीराचीच ना ? शांति हवी असते तीहि या शरीराच्याच संरक्षणासाठी की नाही ? साऱ्या योजना शरीरसंरक्षणासाठीच आहेत. दुसऱ्याच्या शरीरासाठी आपल्या शरीराचा उत्सर्ग केला तर हुतात्मा म्हटलें जाईल, कारण तो शरीरयज्ञ आहे. म्हणून मनुष्यमात्राचें शरीर पवित्र मानणें हेंच जीवनातील पवित्रतेचें व्यावहारिक रूप होऊ शकते. म्हणून केवळ सख्य पर्याप्त नाही, त्यात भक्तीची भावना जोडली गेली पाहिजे.

यात हा विचारहि अंतर्भूत आहे की स्त्रीने आपलें शरीर संपत्ति मानू नये. सध्याची परिस्थिति फार विचित्र आहे. पुरुष-स्त्रीला आपली संपत्ति मानतोच. परंतु स्त्री स्वतः–देखील आपल्या शरीराला संपत्ति समजते. काही डाकू पुरुषांना

पळवून नेतात आणि मग त्यांना परत करण्यासाठी काही धनाची मागणी करतात. पुरुषाचें शरीर त्यांच्या दृष्टीने उपयोगाचें नसतें. तेंच स्त्रियांना पळवून नेलें तर त्याचा अर्थ एकदम वेगळा होतो. एका टोळीतील लोक दुसऱ्या टोळीतील स्त्रियांना पळवून नेतात. देवांच्या स्त्रिया राक्षसांकडून अपहरण केल्या जात होत्या. स्त्रीचें शरीरच भोग्य वस्तु, संपत्ति मानली गेली आहे. ही धारणा समाजातून नष्ट झाली पाहिजे. त्याबरोबरच स्त्री नरकाचें द्वार आहे, तिचा स्पर्श पुरुषाच्या अधोगतीचें कारण आहे ही भावनाहि पुरुषांच्या चितातून नष्ट झाली पाहिजे.

शांति-सैनिक विद्यालय
साधना-केंद्र, काशी
२६-१२-'६०

# ७
# माता-पित्यांची सांस्कृतिक भूमिका

**कुटुंबाबाहेर पत्नी शब्द अपमानजनक**

स्त्री पुरुषांच्या न्यूनाधिक मूल्यांवर आधारलेले काही वाक्प्रचार आणि म्हणी आमच्या भाषांतून रूढ झाल्या आहेत. एखाद्या पुरुषाचा गौरव करावयाचा झाल्यास आपण म्हणतो, हे आमच्या येथील प्रमुख सार्वजनिक पुरुष आहेत, लोकनायक आहेत, विश्वपुरुष आहेत. 'प्रॉमिनंट पब्लिक मन' आहेत. परंतु स्त्रीच्या बाबतीत असा शब्दप्रयोग होऊच शकत नाही. 'प्रॉमिनंट पब्लिक वूमन' म्हणणें अत्यंत निंदास्पद मानलें जाईल. सार्वजनिक स्त्री, विश्वयोषिता, नगरभवानी आदि शब्द गणिकावाचक आहेत. सार्वजनिक जीवनात लोकनायक होणें गौरवास्पद

आहे. लोकनायिका निंदास्पद आहे. स्त्रियांना जेव्हा मतदानाचा अधिकार मिळाला तेव्हा प्रश्न आला, संसदीय परिभाषेत ज्या जुन्या संज्ञा आहेत त्यांचें काय करावें ? इंग्रजी शब्दांचा बरोबर अनुवाद करणेंहि कठिण आहे. प्रेसिडेंटचा अनुवाद 'राष्ट्रपति' केला, स्पीकरला 'सभापति' म्हटलें. इंग्रजीत प्रेसिडेंट आणि स्पीकर दोन्ही शब्द उभयलिंगी आहेत. परंतु राष्ट्रपति आणि सभापति हे शब्द पुल्लिंगी झाले. आता एखादी स्त्री प्रेसिडेंट किंवा स्पीकर बनली तर तिला 'राष्ट्रपत्नी' किंवा 'सभापत्नी' म्हणणें आक्षेपार्ह मानलें जाईल. पति शब्द सर्वत्र गौरवाचा द्योतक आहे. गृहपति, कुलपति इत्यादि. परंतु पत्नी शब्द कुटुंबाच्या बाहेर अपमानजनक ठरतो. म्हणून स्त्री कुटुंबिनी होईल, धर्मपत्नी होईल, गृहपत्नी होईल; परंतु सभापत्नी, राष्ट्रपत्नी, ग्रामपत्नी नाही होऊ शकणार. या वाक्प्रचारांमागे हजारो वर्षांचे संस्कार लपलेले आहेत आणि या संस्कारांमुळे स्त्री आणि पुरुष दोघांची मनोरचना भिन्न आणि विशिष्ट बनली आहे.

**भीरुता स्त्रीचें भूषण**

या संस्कारांचा परिणाम असा झाला की स्त्री आणि पुरुष यांच्या बाबतीत अत्यंत विरोधी गुण शिष्टसंमत मानले गेले. पुरुषाच्या बाबतीत जो दोष मानला गेला तो स्त्रीच्या बाबतीत गुण मानला गेला. भीरुता आणि कायरता पुरुषाचें दूषण आहे आणि स्त्रीचें भूषण. वाल्मीकि रामायणात, किंवा उत्तर रामचरितात असेल, रामचंद्र सीतेला अत्यंत प्रेमाने संबोधतात, 'अयि भीरु !' पुरुषाला हें विशेषण क्षणभरहि सहन होणार नाही. पण स्त्री भीरुतेला अलंकार मानते. दशरथाने

सुमंताला राम, लक्ष्मण, सीता यांना परत आणण्यासाठी पाठवलें तेव्हा एक शिकवण दिली :

'ज़ब सिय कानन देखि डराही, कहहु सीख मोर सुअवसर पाई ।' सीता जंगल पाहून घाबरेल तेव्हा ती संधि साधून तू माझा संदेश सांग. राम लक्ष्मण घाबरतील असें म्हणणें शक्य नव्हतें. सीतेच्या बाबतीत शक्य होतें. हा भिन्न संस्कारांचा परिणाम आहे.

**स्त्रीजीवनाचें तथ्य : पुरुषपरायणता**

याचा आणखी एक पैलू आहे. मातृत्व म्हणजे संस्कृतीचें उच्चतम शिखर असें आम्ही मानलें; निर्व्याज आणि निरपेक्ष प्रेमाची उपमा मातृत्वाच्या उदाहरणाने दिली जाते. मातेचें प्रेम बावनकशी असतें, त्यात थोडीहि उणीव नसते. म्हणून तें निर्व्याज आहे. तें अकारण प्रवृत्त होत असतें. त्याला निमित्ताची, बहाण्याची किंवा व्याजाची गरज नसते. या अर्थानेहि तें निर्व्याज आहे. ज्या मातृत्वाला आम्ही मानवीय संस्कृतीचा आधार मानला आणि शिखरहि मानलें, ज्याला आम्ही पूज्य आणि पवित्र मानलें, तेंच स्त्रीची विवशता, परवशता आणि लाचारीचा आधार बनलें परिणाम हा की पुरुषपरायणता आणि पति-परायणता हेंच स्त्री-जीवनाचें व्यावहारिक तथ्य बनलें.

दशरथाच्या तिन्ही स्त्रिया त्यांच्या आज्ञेत असत्या तर त्यांचा फार गौरव झाला असता. पण जेव्हा कैकेयीने वरदान मागितलें तेव्हा ती दुष्ट, कुलटा, अकुलीन ठरली. लक्ष्मणाने तर आपल्या पित्याच्या बाबतीत एकदा असेंहि म्हटलें की हे म्हातारे झाले, यांची मति भ्रष्ट झाली आहे, स्त्रियांचें म्हणणें

ऐकतात, लंपट आहेत. हेंच स्त्रीने जर पुरुषाचें म्हणणें ऐकलें तर समाजातील आदरणीय व्यक्ति ती बनते.

शिवमहिम्न स्तोत्रात परम शिवभक्त पुष्पदंत आपल्या आराध्य देवतेला म्हणतो : तू आपल्या अर्ध्या शरीरात भगवतीला जागा दिली आहेस, तर भगवतीला असा भ्रम झाला आहे की तू स्त्रैण आहेस. हे पित्या, तू आपल्या अर्ध्या शरीरात मातेला जागा दिली आहेस म्हणून ती तुला लंपट समजत आहे असें हा भक्त म्हणतो. काय करावें, स्त्रिया अशाच मूर्ख असतात – 'बत वरद मुग्धा युवतयः ।' पत्नीला पतीबद्दल प्रेम असणें हा धर्म समजला जातो; पतीला पत्नीबद्दल जें प्रेम वाटतें त्याला काम असें नांव दिलें जातें.

**स्त्रीची गौण भूमिका**

आता एक तिसरा पैलू पहा. विवाहाची आवश्यकता तर स्त्रीप्रमाणे पुरुषालाहि प्रतीत होत असते. कामप्रेरणा दोघात आहे; परंतु स्त्रीला पुरुषाची आवश्यकता वाटते ती केवळ शारीरिकतेमुळे नाही, संरक्षणासाठीहि वाटते. तो तिचा पालक-हि आहे आणि भर्ताहि आहे. हें पालन आणि पोषण साधारण नाही. राजा राणीचें पालन करतो, शेटजी शेटाणीचें पालन करतो, एखादा शास्त्रीपंडित आपल्या पत्नीचें पालन करतो, त्या अर्थाने मजूर मजुरिणीचें पालन करीत नाही. आर्थिक-दृष्ट्या मजुराची पत्नी पतिनिर्भर नसते. तरीहि तिचा पति तिचा संरक्षक असतो. आपण वर पाहिलें की स्त्रीला मातृत्व अनिवार्य मानलें गेलें आहे. परंतु त्याच मातृत्वाच्या आकांक्षेमुळे ती पुरुषाच्या दारीं अभ्यर्थिनी बनून जाते ही किती खेदाची आणि दुर्भाग्याची

गोष्ट आहे ! मातृत्व समाजाचा गौरव आहे, संस्कृतीचें प्रतीक आहे. मातृत्वात धन्यता आहे, स्त्रीजीवनाचा प्रसाद आहे. परंतु स्त्रीजीवनात मातृत्व अनिवार्य मानलें गेलें, त्यामुळे स्त्री केवळ पुरुषाधीनच नव्हे पुरुषपरायण बनली.

याचमुळे ती विवाहाकांक्षी बनते, विवाहाची भिक्षा मागते. पुरुषहि विवाहाकांक्षी नसतो काय ? त्यालाहि विवाहाची आवश्यकता आहे आणि आकांक्षाहि आहे. परंतु तो अभ्यर्थी नाही बनत, विवाहासाठी पदर पसरण्याची गरज त्याला वाटत नाही. स्त्री मातृत्वाकांक्षिणी आहे, म्हणून विवाहाची अभ्यर्थिनी बनली. जो भिक्षा मागतो, त्याला आपल्या पसंतीची, आपल्या आवडीची भिक्षा मागण्याचें स्वातंत्र्य नसतें. भिकारी असें म्हणू नाही शकत की मला अमुकच भिक्षा वाढा हं ! मला भिक्षा देण्यात तुमचें कल्याण होणार आहे असें म्हणणारा आपल्या रुचीची भिक्षा मागू शकतो. त्याच्या भिक्षा मागण्यात गुर्मी असते. पण स्त्री असें म्हणत नाही की मी पुरुषाचीहि माता आहे, माझ्याशी विवाह करण्याने पुरुषाचाहि गौरव होणार आहे. म्हणून ती दीन होऊन विवाहाची भिक्षा मागते.

हा विचार करण्यासारखा विषय आहे की मातृत्वामुळे स्त्रीची भूमिका गौण का बनली ? काय याचें हेंच कारण आहे की स्त्री जेव्हा गर्भवती बनते आणि माता बनते तेव्हा तिला शारीरिक सहाय्याची आवश्यकता असते ? की तिची शरीर-रचनाच भिन्न आहे हें कारण असावें ? हीं दोन्ही कारणें अशी नाहीत की ज्यामुळे सभ्य समाजात स्त्रीचें स्थान गौण मानलें जावें. यातील खरें रहस्य असें आहे की स्त्रीला मातृत्व अनिवार्य मानले गेलें, परंतु पुरुषाला पितृत्व अनिवार्य नाही मानलें.

शास्त्रात असें म्हटलें आहे की ज्या विवाहित पुरुषाला पुत्रप्राप्ति झालेली नसेल, तो नरकात जाईल. पुत्राऐवजी कन्या असल्याने निष्कृति होत नाही, म्हणून तो दुसरा आणि तिसराहि विवाह करू शकतो. परंतु जो गृहस्थ विवाहच करीत नाही, तो पिता न बनताहि अधिक दिव्यलोकाला प्राप्त होतो. एका बाजूला जो पुरुष पिता बनत नाही, तो ब्रह्मचर्याच्या बळावर सरळ ब्रह्मलोकात पोचतो आणि दुसऱ्या बाजूला जी स्त्री माता होत नाही, ती वन्ध्या किंवा वृषली, 'स्पिस्टर' नरकात जाते. ही परिस्थिति चिंताजनक आहे.

### सवती-मत्सर

याचा आणखी एक परिणाम झाला. पुत्र-प्राप्तीसाठी पुरुष एकापेक्षा जास्त स्त्रिया करू शकतो. परिणामी बहुपत्नित्वाची प्रथा पुराणप्रिय समाजात प्रचलित झाली. काही जातींमध्ये बहुपतित्वाची प्रथा आहे, पण तेथेहि एक स्त्री अनेक पुरुषांची दासी असते, स्वामिनी नाही. बहुपत्नीत्व आणि बहुपतित्व यांत हा मूलभूत फरक आहे. सभ्य मानल्या गेलेल्या समाजात बहु-पत्नीत्व प्रचलित आहे, बहुपतित्व अनाचार मानला जातो. यज्ञात एक स्तूप असतो, त्याला अनेक दोऱ्या बांधलेल्या असतात. स्त्रीपुरुष संबंधासाठी श्रुतीत त्या स्तूपाचें उदाहरण दिलें गेलें आहे. एका खांबाला अनेक दोऱ्या असू शकतात, पण एका दोरीचें अनेक खांब असू शकत नाहीत. त्याचप्रमाणे एका पुरुषाच्या अनेक सहपत्नी असू शकतात, परंतु एका स्त्रीचे अनेक सहपति असू शकत नाहीत. पुरुषांतहि ईर्ष्या, मत्सर कमी नसतो; परंतु सवतीमत्सर, सापत्न भाव समाजात जितका प्रसिद्ध आहे, तितका

१८७००

पुरुषाचा मत्सर प्रसिद्ध नाही. कारण सहपत्नीत्वाची प्रथा शिष्ट समाजात प्रचलित आहे. ज्या पत्नीला मातृपद प्राप्त झालेलें नाही तिला मातृपद प्राप्त झालेल्या दुसऱ्या पत्नीबद्दल मत्सर वाटू लागतो. सवतीमत्सर, सावत्र आई, सावत्र भाऊबहीण इत्यादि शब्द आमच्या साहित्यिक आणि लौकिक भाषेत रूढ आहेत. एवढेंच काय, धार्मिक साहित्यातहि जागोजाग त्याचा उल्लेख आलेला आढळून येतो. देवी पार्वतीचें गुणगान करताना एक भक्त म्हणतो :

> 'त्वदीयं सौंदर्यं निरतिशयमालोक्य परया
> भियैवासीद् गंगा जलमयवपुः शैलतनये ।'

—हे शैलतनये, तुझी निरतिशय सुंदरता पाहून भीतीने गंगेचें अगदी पाणी पाणी झालें. संतापलेल्या गंगेचें तें रूप पाहून शंकराला तिची दया आली, त्याने तिला आपल्या शिरावर धारण केलें. 'प्रतिष्ठा माते नो निजशिरसि वासेन गिरिशः ।' जगन्नाथ पंडिताच्या गंगालहरीमधे गंगेचें वर्णन करताना भक्त म्हणतो, पार्वतीने चिडून जाऊन तुला थप्पड मारली म्हणून तुझ्या या लाटा इतक्या उंच उसळत आहेत. दुसरा भक्त म्हणतो : गंगे, तू आमची माता आहेस, वसुधाशृंगारहारावलि आहेस, स्वर्गारोहण-वैजयंती आहेस; पण शैलसुता सपत्नी आहे– 'मातः शैलसुता-सपत्नि वसुधाशृंगारहारावलि. . . !'

आज या समाजात काही क्रांतिकारी परिवर्तनें झालेलीं दिसतात, परंतु स्त्रीच्या मूळ भूमिकेत फारसा फरक पडला नाही. दोन स्त्रियांना एकाच पतीविषयी असणारें प्रेम दोघींना गौरवास्पद आहे. परंतु दोघींमध्ये एक दुसरीच्या मत्सराचा, ईर्ष्येचा विषय आहे. पुरुषाच्या आणि स्त्रीच्या प्रेमात हें जें मूलभूत अंतर मानलें

गेलें, त्यामुळेच पतीच्या शवाबरोबर सहगमन करणाऱ्या स्त्रिया धन्य मानल्या गेल्या. त्यांना सतीपद प्राप्त झालें. पत्नीच्या मागे सहगमन करणारा एखादा पुरुष असता, तर तो सत्पुरुष म्हणवला गेला नसता.

### भ्रष्टाचाराचीं साधनें : कांचन, सत्ता, स्त्री

स्त्रीने आपल्या शरीरालाच संपत्ति मानलें, म्हणून ती भ्रष्टाचाराचें साधन बनली. समाजात कांचन आणि सत्ता हीं भ्रष्टाचाराचीं साधनें आहेत. कांचनाच्या लोभाने आणि सत्तेच्या प्रभावाने मनुष्याला भ्रष्ट केलें जाऊ शकतें. नीतिशास्त्रकारांनी कांचन आणि सत्ता यांबरोबरच स्त्रीचीहि गणना केली आहे. कांचनाप्रमाणेच कामिनीहि लालूच दाखवण्याचें साधन मानली गेली. जिचें शरीरहि स्वतःच धन आहे तिला लोक स्वाभाविकच भ्रष्टतेची मूर्ति मानतात. जोपर्यंत या संस्काराचें निर्मूलन होत नाही तोपर्यंत बाह्य उपचारांनी काही काम होणार नाही. घटना आणि कायदा अनुकूल परिस्थिति निर्माण करू शकतात. आज एखादी स्त्री राजेंद्रबाबूंच्या आणि जवाहरलालजींच्या खुर्चीवर बसू शकते, पण तेथे बसूनहि ती आपल्या शरीराविषयी निरंतर साशंक राहिली, तर तिचें शरीर अपहरणाचा विषय होऊ शकतें. राजेंद्रबाबूंचेहि शरीर-रक्षक आहेत, पण त्यांच्या जागी येणाऱ्या स्त्रीला लागणारें संरक्षण अत्यंत भिन्न प्रकारचें असेल.

आजकाल स्त्रिया युद्धातील सैनिकहि बनतात. परंतु, युद्धाचे वेळीं स्त्रीचा गुप्त हेराच्या रूपात ज्या प्रकाराने उपयोग करून घेतला जातो तो फारच आक्षेपार्ह आणि अपमानकारक आहे. शत्रूच्या छावणीत जाऊन तेथील गुप्त गोष्टींची माहिती

मिळविण्यासाठी स्त्रियांचा उपयोग केला जातो. तेथे जाऊन या स्त्रिया शत्रुपक्षाच्या प्रमुख लोकांवर आपल्या रूपाची मोहिनी घालतात, त्यांना वश करून घेतात, त्यांचीं रहस्यें जाणून घेतात. राजांनी पूर्वीपासूनच स्त्रीचा अशा प्रकाराने उपयोग करून घेतला आहे. इंद्राने स्वतःच तपस्व्यांची तपश्चर्या भ्रष्ट करण्यासाठी रंभा, मेनका, उर्वशी आदि अप्सरांना पाठवलें होतें. देशभक्तांना, वीर पुरुषांना त्यांच्या व्रतापासून भ्रष्ट करण्यासाठी सत्तालोलुप राज्यकर्त्यांनीहि स्त्रीचा असा उपयोग केला आहे. स्त्रियांनी हा कलंक धुऊन काढला पाहिजे.

माता म्हणून ज्या स्त्रीचें शरीर पवित्र मानलें, नारी म्हणून त्याच स्त्रीचें शरीर व्यापाराचा विषय आणि भ्रष्टाचाराचें साधन बनवलें. एखादा तरुण एखाद्या लाचलुचपतखोर अधिकाऱ्याकडे नोकरी मागण्याकरता गेला तर तो अधिकारी त्याच्याजवळ पैशांची लाच मागतो. तेंच जर एखादी तरुणी नोकरी मागण्यासाठी गेली तर तो अधिकारी पैसे मागत नाही, तिच्या शरीराचीच मागणी करतो. स्त्रीचें शरीर हीच एक मोठी लाच आहे. धनासाठीहि स्त्रीला आपलें शरीर विकावें लागतें. पुरुषाला परिश्रमाचें मूल्य मिळतें. परंतु स्त्रीला तर तिच्या शरीराची व रूपाचीहि किंमत मिळते. अर्थात्, जी स्त्री माता आहे तीच एका अर्थाने गणिका व कंचनीहि आहे. जगात पुरुषांचीं वेश्यागृहें नाहीत, स्त्रियांचे कुंटणखाने आहेत. ज्या पुरुषांनी कुंटणखाने काढले आहेत ते देखील व्यापार स्त्रियांच्याच शरीराचा करतात. वेश्यागृहांची समस्या वस्तुतः स्त्रियांची समस्या आहे. पुरुष ती सोडवू शकणार नाहीत. जो आपल्या शरीरालाच धन मानतो त्याची शरीरनिष्ठा निकृष्ट स्वरूपाची असते. त्यामुळेच

स्त्री शरीरनिष्ठ बनली आहे. जो जितका अधिक शरीरनिष्ठ असेल तो तितकाच कमकुवतहि असेल हें तर स्पष्टच आहे. जो जीव पणाला लावायला तयार नसेल तो सैनिक होऊ शकत नाही. जी स्त्री पुत्र व पति यांच्यावरून आपला जीव ओवाळून टाकायला तयार होते, आपल्या सतीत्वाकरता प्राणांची कुरवंडी करते; तीच स्वतःला पुरुषरक्षित मानते; रक्षणाकांक्षिणी बनते हें केवढें आश्चर्य ! हा मिथ्या विरोधच तिच्या परवशतेचें मूळ आहे. प्रसूतीच्या वेळीं स्त्री रणांगणावरील शिपायाइतकीच मृत्यूच्या जवळ असते. परंतु, प्रसूतिकालाची वीरता प्राकृतिक विवशतेतून उत्पन्न होते आणि सैनिकाची वीरता स्वेच्छाप्रेरित असते. स्त्रीच्या जीवनात देखील स्वेच्छाप्रेरित वीरता जागृत झाली पाहिजे.

**स्त्रीच्या कौमार्यात आणि वैधव्यात विवशता**

हें तर निर्विवादच आहे की समाजात नव्वद टक्कयाहून अधिक स्त्रिया माता बनतील तसेंच नव्वद टक्कयाहून अधिक पुरुष पिते बनतील. तरीहि स्त्रीची प्रतिष्ठा वाढवण्यासाठी समाजात एक संकेत प्रस्तुत करावा लागेल. पुरुषाच्या जीवनात ब्रह्मचर्याचा जो महिमा आहे तोच स्त्रीजीवनात असला पाहिजे. जी स्त्री ब्रह्मचारिणी राहील ती एखाद्या ब्रह्मचाऱ्याइतकीच श्रेष्ठ मानली गेली पाहिजे. समाजात अविवाहित पुरुषाचें आणि अविवाहित स्त्रीचें स्थान समान असलें पाहिजे.

आज समाज अविवाहित स्त्रीकडे आणि अविवाहित पुरुषाकडे भिन्न-भिन्न दृष्टीने पाहतो याचें कारण काय आहे ? तू कुमारिका का राहिलीस असें अविवाहित स्त्रीला विचारलें

तर ती म्हणेल, लग्न होऊच शकलें नाही. या विवशतेमुळे तिचें चित्त कमजोर बनतें, कारण त्यात आत्मनिर्णय नाही. हेंच पुरुषाला विचारा, तर तो म्हणेल, विवाह करणें योग्य वाटलें नाही. त्याने ब्रह्मचर्याचे व्रत धारण केलेलें नाही, परंतु त्याच्या अविवाहित राहण्यात स्वयंनिर्णय आहे. पुरुषाचें ब्रह्मचर्य आणि संन्यास, दोन्ही स्वेच्छाप्रेरित आहेत. स्त्रीच्या कौमार्यात आणि वैधव्यातहि विवशता आहे. पतीच्या मृत्यूनंतर स्त्री विधवा – विगतधवा होते. स्त्रीच्या जीवनात याहून अधिक दुर्भाग्य दुसरें असू शकत नाही. आणि पत्नीच्या मृत्यूनंतर पुरुष विधुर होतो. त्यालाहि दुःख असतें, शोक असतो; तरीहि तो विधुर– धुरामुक्त झाला. आतापर्यंत जोतला गेला होता, आता मोकळा झाला. तुकाराम म्हणतात, बाईल मेली, चांगलें झालें. आतापर्यंत प्रपंच होता कटकट होती. आता सुटका झाली. स्त्रीचा आणि घराचा मोह सोडला, फार त्यागी आहेत असें देशभक्तांच्या स्तुतिदाखल म्हटलें जातें, पण एखाद्या स्त्रीने पतीचा आणि घराचा त्याग केला, तर ती दुराचारिणी मानली जाते. संन्यास घेतलेल्या पुरुषाची समाजात योग्यता आणि प्रतिष्ठा वाढते. परंतु विधवा झालेली स्त्री सामाजिक व्यवहारात आणि धार्मिक आचारात अप्रतिष्ठित मानली जाते. वैधव्य म्हणजे परम दुर्भाग्य असें ती स्वतःच मानते. वैधव्य तिच्या हातची गोष्ट नाही. लाचारी असेल तेथे कदर, इज्जत कशी होईल ?

मानवीय जीवनाची विशेषता पुरुषार्थात आहे. पुरुषार्थाची वस्तु अशी असावी लागते की जी पराक्रमाने केली जाऊ शकते. अर्थात् जी गोष्ट मनुष्याच्या हातची असते तिच्याच बाबतीत

माणूस आपलें कौशल्य दाखवू शकतो. जी गोष्ट प्राकृतिक किंवा नैसर्गिक असते तिची प्राकृतिक अवस्था बदलण्यात पुरुषार्थ असतो. नैसर्गिक प्रवृत्ति मनुष्य वाढवू शकतो, कमी करू शकतो. भूक, तहान, काम-वासना आदि सगळ्या नैसर्गिक प्रेरणांच्या बाबतीत हाच नियम लागू आहे.

**वैदिक संकेत**

पुराणामधे एक फार मजेचा प्रसंग आला आहे. इंद्राने वृत्रासुराचा वध केला. वृत्रासुर ब्राह्मण होता. तीहि एक गंमतच आहे. बहुतेक राक्षस एक तर ब्राह्मणांचे किंवा तपस्व्यांचे पुत्र होते, किंवा पतित भगवद्‌भक्त होते. रावण पुलस्त्य मुनींचा मुलगा होता. काही अवतारांचे राक्षसांशी नात्याचे संबंध होते. श्रीकृष्णाचा मामा कंस होता. परम भगवद्‌भक्त प्रह्लादाचा पिता राक्षस होता. तेव्हा, हा वृत्तासुर स्वतः ब्राह्मण होता. इंद्राला ब्रह्म-हत्येचें पाप लागलें. तेव्हा इंद्र स्त्रियांना शरण गेला, म्हणू लागला, तुम्ही माता आहात, तुमचें चित्त कोमल आहे. माझ्यावर दया करा, माझें पाप तुम्ही घ्या. स्त्रिया म्हणाल्या, ठीक आहे, तुझें पाप आम्ही धारण करतो. दर महिन्याला तीन दिवस तें आमच्या शरीरात प्रकट होत राहील. इंद्राने प्रसन्न होऊन म्हटलें, याच्या बदल्यात मी तुम्हाला एक वरदान देतो. गर्भधारणेनंतरहि तुमची काम-वासना क्षीण होणार नाही. अशा प्रकारच्या ज्या आख्यायिका श्रुतीत येतात त्यांना लिंग किंवा संकेत म्हटलें जातें. त्यांच्या आधारावरच धर्मशास्त्राचे नियम बनतात.

**मानवजीवनाचें वरदान : बुद्धिमत्ता**

या आख्यायिकेत एक गर्भित संकेत आहे. नैसर्गिक प्रेरणांच्या बाबतीतहि मनुष्य स्वतंत्र आहे. याला पुरुषकार किंवा कर्मस्वातंत्र्य म्हणतात. हाच त्याच्या आनंदाचा आधार आहे. मातृत्व-पितृत्व, भ्रातृत्व-भगिनीत्व नैसर्गिक आहेत. पशु ही नातीं विसरून जातात. मनुष्य त्यांचा परिपोष करतो, म्हणून हीं नातीं तो समाजव्यापी बनवू शकतो. मनुष्याची बुद्धिमत्ता त्याच्या जीवनातील श्रेष्ठतम वरदान आहे.

**उपासनेचें स्वरूप**

कौटुंबिक संबंध व्यापक रूप धारण करतात तेव्हा त्यांत क्रांतिकारक परिवर्तन होत असतें. सगळ्या गांवाची माता कोणाची पत्नी उरत नाही. राष्ट्रपिता सर्वांचा पिता आहे, तो कोणाचाहि पति नाही. यांना सामाजिक नातीं म्हटलें जातें. समाजात याची साधना करावी लागते. या संकेतांची उपासना शिक्षणप्रक्रियेचें एक अंग आहे. जी वस्तु जशी नाही, तशी ती वस्तु आहे अशी भावना करणें याला उपासना म्हणतात. एका वस्तूवर दुसऱ्या वस्तूची भावना करण्याचा अभ्यास म्हणजे उपासना. दगड देव नाही. आम्ही त्याच्यावर देवत्वाची भावना करतो. स्वतःच्या जन्मदात्रीव्यतिरिक्त दुसरी कोणतीहि स्त्री माता नाही. पण आपण दुसऱ्या स्त्रीवर मातृत्वाची भावना करतो. हा अभ्यास आहे. हीच उपासना आहे.

विनोबांच्या जीवनातील एक घटना आहे. त्यांच्या घरीं एक मुलगा शिकत असे. तो काही त्यांचा सख्खा भाऊ नव्हता. विनोबांची आई त्याला आपल्या इतर मुलांप्रमाणेच सांभाळीत

होती. कधी आपल्या मुलांना शिळें वाढीत असे, पण त्या मुलाला वाढीत नसे. तिला विचारलें, यालाहि तू आपला मुलगा मानतेस. आपल्या मुलांना शिळें वाढतेस तर याला कां वाढत नाहीस ? आणि याला वाढत नाहीस तर मग आपल्या मुलांना कां वाढतेस ? ती म्हणाली, माझीं मुलें तर माझीं मुलें आहेतच; त्यांना मुलें समजण्याची गरज नाही. त्यांना शिळें वाढण्यात माझें प्रेमच प्रकट होईल. पण याला तर मुलगा मानायचें आहे. म्हणून त्याच्याशी विशेष व्यवहार करावा लागतो. याचेंच नांव साधना किंवा उपासना आहे. या साधनेचा परिपाक जेव्हा स्थिर वृत्तीत होतो तेव्हा ती निष्ठा बनते. मग साधनेची गरज राहत नाही. जो माझा मुलगा अगर मुलगी नाही त्याच्या विषयी मला जेव्हा मुलगा किंवा मुलगी अशी भावना करावी लागत नाही तेव्हा आपोआप ते माझा मुलगा किंवा मुलगी बनलेले असतात.

### विश्वमानवच संन्यासी

सामाजिक व्यापक मातृत्वालाहि हाच नियम लागू आहे. कोणत्याहि घरात जाऊन तिथल्या लहान मुलाला विचारा घरात कोणकोण आहे ? तो सारीं नातीं सांगेल, आईचें आणि वडिलांचेंहि सांगेल. तुझी आई तुझ्या वडिलांची कोण आहे असें विचारलेंत तर सांगेल आई सर्वांची आई आहे, वडिलांचीहि. आणि वडील सर्वांचे वडील आहेत, आईचेहि. हें पतित्वनिरपेक्ष पितृत्व आणि पत्नीत्वनिरपेक्ष मातृत्व अद्‌भुत सामाजिक मूल्य आहे. परमेश्वर सर्वांचा पिता आहे आणि पार्वती सर्वांची माता. जी स्त्री सर्वांचीच माता बनली तिचा पति कोणी नाही, जो

पुरुष सर्वांचा पिता बनला त्याची पत्नी कोणी नाही. याचेंच नांव वानप्रस्थ-स्थिति आहे. याच्या पुढची अवस्था आहे विश्वमानवाची, ज्याला संन्यास म्हणतात. सर्व नातीं तेथे एक होऊन जातात. तो विश्वमित्र बनतो. बाकी नात्यांचा उपसंहार होतो. उपसंहाराचा अर्थ आहे समाहार – एकत्रीकरण – साम्यीकरण.

## पति-पत्नीत्व भावनेचा परित्याग

या साधनेची आवश्यकता स्त्रीपेक्षा पुरुषाला अधिक आहे. साधारणपणे आपल्या समाजात अद्याप असें मानलें जातें की एका विशिष्ट वयोमर्यादेनंतर स्त्री विवाहयोग्य राहत नाही. नंतर तिचें मातृत्वच बाकी उरतें. परंतु पुरुष मात्र वाटेल त्या वयात लग्न करू शकतो, लग्नाचा उमेदवार समजला जातो. या धारणांमधे आमूल परिवर्तन होण्याची आवश्यकता आहे. समाजात तरुण स्त्री, प्रौढ कुमारिका आणि विधवा सुरक्षित रहाव्यात यासाठी ज्यांनी पतित्व आणि पत्नीत्व या भावनांचा संकल्पपूर्वक परित्याग केला आहे असे काही स्थविर स्त्रीपुरुष असले पाहिजेत.

मातृत्व आणि पितृत्व हाच त्यांचा जीवनाचा आता परिशिष्ट आहे. असे स्त्रीपुरुषच सामाजिक पवित्रतेचे यथार्थ अभिभावक आहेत. राज्याचे व्यवस्थापक, नीतीचे उपदेशक किंवा धर्माचे रक्षक हें काम करू शकत नाहीत. केवळ आपल्या व्यक्तिगत उद्धारासाठीच ज्याने वानप्रस्थाश्रम किंवा संन्यासाश्रम स्वीकारला तो मातृत्व आणि पितृत्व सामाजिक मूल्यें बनवू शकत नाही. त्याच्या व्यक्तित्वामुळे साऱ्या नात्यांचा अंत होतो.

साऱ्या नात्यांच्या समावेशाने त्याचें व्यक्तित्व विशद होत नाही.

**समाजात कौटुंबिक नात्यांचा अंतर्भाव**

सार्वजनिक हुद्यांच्या संबंधांच्या बाबतीत आजहि काही प्रमाणात ही गोष्ट लागू होते. एक स्त्री कॉर्पोरेशनची अध्यक्ष आहे आणि तिचा पति तेथेच कारकून आहे. पण ती मेयर म्हणून जोपर्यंत खुर्चीवर बसलेली असेल तोपर्यंत ती पतीपुढेहि मेयरच आहे. किंवा समजा ती एखाद्या वसतिगृहाची मेट्रन आहे आणि तो वसतिगृहाचा मंत्री आहे. वसतिगृहात असेपर्यंत ती स्त्री आपल्या पतीच्या दृष्टीनेहि मेट्रनच आहे. सार्वजनिक पदाची ही मर्यादा आहे.

असेंच, मातृत्व आणि पितृत्व सार्वजनिक झालें म्हणजे कौटुंबिक मर्यादा त्यात विलीन होऊन जातात. एखादा पुरुष पार्लमेंटचा सदस्य आहे आणि त्याची पत्नी पार्लमेंटची स्पीकर असेल तर तो तिला स्पीकर महोदया असेंच म्हणेल. पार्लमेंट एक संस्था आहे, पण समाज समुद्रासारखा आहे त्यात सगळयाचा समावेश आहे. त्यात सगळ्या कौटुंबिक नात्यांचा अंतर्भाव होतो.

कुटुंबात राहूनहि ही साधना होऊ शकते. माझी पत्नी ही माझी पत्नी नाही; माझ्या अपत्यांची माता आहे. माझी आई माझ्या पित्याची पत्नी नाही, माझी माता आहे. अशा प्रकारे कुटुंबात मातृत्वाची आणि पितृत्वाची भावना प्रस्थापित होते.

वाल्मीकि रामायणात एक प्रसंग आला आहे. वरील संदर्भात तो प्रसंग स्मृतीत ठेवण्यालायक आहे. कौसल्या दुःखाच्या आवेगात साऱ्या स्त्रीजातीचाच धिक्कार करते. स्त्रिया विश्वासपात्र नसतात. 'अनित्यहृदया हि ताः ।' त्या चंचलचित्त

असतात. शेक्सपिअरच्या नाटकात हॅम्लेट आपल्या आईवर नाराज होऊन म्हणतो : 'Frailty, thy name is Woman'. चंचलते, तुझें नांवच स्त्री आहे. परंतु दशरथ कौसल्येचें गुणगान करताना काय म्हणतो ? ही कौसल्या माझ्या सखीप्रमाणे, पत्नीप्रमाणे, बहिणीप्रमाणे आणि मातेप्रमाणे सदैव तत्पर असते. प्रशंसा एकएक पायरीने वर चढवतो. कौसल्येला प्रथम सखी म्हणतो. नंतर भार्या म्हणतो आणि शेवटीं, 'भगिनीवत्मातृवच्चैव उपतिष्ठति।' कुटुंबात ज्या उदात्त भावनांचा विकास होतो, त्या भावना सार्वजनिक बनवण्यास सुगमता येते.

स्त्रीने शारीरिकतेतून वर येऊन मानवतेच्या दिशेने प्रगति केली पाहिजे, आणि हाच तिच्या शक्तीचा आधार होऊ शकतो. काही जण याला आध्यात्मिकता म्हणतात, विनोबा ब्रह्मविद्या म्हणतात. हे शब्द भारी आहेत. परंतु त्या शब्दांचा जो आशय आहे त्याचा अंगीकार स्त्रियांना करावा लागेल. ही आध्यात्मिकता किंवा ब्रह्म-विद्या पुरुषांना जितकी आवश्यक आहे, त्यापेक्षा कितीतरी अधिक स्त्रियांना आवश्यक आहे. एक दृष्टांत घ्या. एका बाजूला गांधी उभा आहे, दुसऱ्या बाजूला गामा पहिलवान. दोघांचा सामना आहे. गांधीजवळ अशी कुठली शारीरिक ताकद नाही की तो गामाला तोंड देऊ शकेल. पण आपण पाहतो की सगळ्या जगाने गांधीला गामापेक्षा किती तरी श्रेष्ठ मानलें. किंगकाँगपेक्षा जवाहरलाल किंवा विनोबा जास्त ताकदवान आहेत. ही ताकद शारीरिक नाही हें सांगण्याची गरज नाही. शारीरिक शक्तीव्यतिरिक्त जी दुसरी शक्ति आहे ती पुरुषाइतकीच स्त्रीलाहि सुलभ आहे. स्त्रीच्या जीवनात

शारीरिकता गौण झाली, तर ती स्वतःतच वर येईल, आणि पुरुषालाहि वर काढेल. आज तर ती आपल्याला रूपधन मानते आहे. ह्या संस्काराचा तिने त्याग केला पाहिजे.

**स्त्री-पुरुष परस्परावलंबी**

स्त्रीच्या जीवनात ब्रह्मचर्याची प्रतिष्ठा स्थापन झाली तर मातृत्व तिच्या विवशतेचें कारण बनणार नाही. उलट तो तिचा विशेष अधिकार होईल. समाजासाठी ती एक विशेष सेवा मानली जाईल. मातृत्वामुळे तिच्या आत्मनिर्भरतेची क्षति होणार नाही. समाजात कोणीच स्वावलंबी राहू शकत नाही. सर्वच परस्परावलंबी असतात. एखादी व्यक्ति कितीहि महान असली तरी ती आपल्याच भरवशावर जगू शकत नाही. स्त्री आणि पुरुष दोघेहि परस्परालंबी राहतील. दोघांची योग्यता, मान बरोबरीचा राहील. स्त्रीच्या जीवनात मातृत्वाला जितकी प्रतिष्ठा आहे, तितकीच ब्रह्मचर्य आणि संन्यास यांना मिळेल तेव्हा मातृत्व आणि पितृत्व यांची सांस्कृतिक भूमिका समान होईल. यात स्त्रियांनाच पुढाकार घ्यावा लागेल.

शांति-सैनिक विद्यालय,
साधना केंद्र, काशी
२७ - १२ - '६०

# ८
# स्त्री-पुरुषांत समानता

आपण पाहिलें की कुटुंबात जे अंतर्गत संबंध असतात ते सापेक्ष असतात. एकच स्त्री एकाची आई असते, दुसऱ्याची भावजय तर तिसऱ्याची पत्नी ! एकाची जी मुलगी ती दुसऱ्याची आई, तिसऱ्याची काकी तर आणखी चौथ्या कोणाची मावशी. परंतु तीच स्त्री सार्वजनिक मावशी, आत्या काकी किंवा आई बनते तेव्हा त्यात निरपेक्षता येते. जी मावशी आहे ती सर्वांचीच मावशी, काकी आहे ती सर्वांचीच काकी. काका कालेलकर सगळ्यांचे काका आहेत. मामा फडके सगळ्यांचे मामा आहेत. महाराष्ट्रात गणेश व्यंकटेश जोशी नांवाचे एक सज्जन होते. त्यांचें नांवच पडलें होतें सार्वजनिक काका. ईश्वर आमचा

पिता आहे आणि माताहि आहे. त्याचें पितृत्व मातृत्वाने संपन्न आहे आणि मातृत्व पितृत्वाने समृद्ध आहे. त्याचप्रमाणे कौटुंबिक संबंध जेव्हा उदात्त सार्वजनिक रूप धारण करतात तेव्हा त्यांत निरपेक्षता आणि समग्रता येते.

**शिवाची विभूति**

आपल्या या देशात शिवाची विभूति अद्वितीय आहे, त्याचबरोबर अतिशय लोकप्रियहि. अनेक कवींना, मनीषींना, विचारकांना आणि साहित्यिकांना या विभूतीने मुग्ध केलें आहे. भगिनी निवेदिता, डॉ. संपूर्णानंद, राममनोहर लोहिया आदि लोकांना शिवाचें फारच आकर्षण आहे. आपल्या देशात शिवाचीं देवालयेंहि खूप आहेत. अशा या विभूतींत अनेक विशेष आहेत. तो स्मशानात राहतो, मृत्यूच्या वातावरणात जीवनाचा प्रसाद निर्माण करतो. वेशहि विचित्रच आहे. नरमुंडांची माळ गळचात घालतो, हत्तीचें आणि वाघाचें चर्म नेसतो, चंदनाच्याऐवजी चिताभस्माचेंच उटणें बनवतो. आणि जे आंधळे आहेत, बहिरे आहेत, कुबडे आहेत, नकटे-चपटे आहेत, कुरूप आहेत, विद्रूप आहेत, अपंग आहेत, मूर्ख-जड आहेत, परित्यक्त, समाजबाह्य आहेत ते त्याचे गण आहेत. त्याच्या वरातींत हे सगळे सामील होतात. कशी भव्य विभूति आहे !

अमांगल्यं शीलं तव भवतु नामैवमखिलम् ।
तथापि स्मर्तृणां वरद परमं मंगलमसि ।।

**उभयसत्त्वसंपन्न पुरुषात समग्र मानवाचीं लक्षणें**

शिवाच्या विभूतीत दुसरी एक असामान्य विशेषता अशी आहे की तो अर्धनारीश्वर आहे. संपूर्ण व्यक्तित्व असलेल्या

मनुष्यात, जर तो पुरुष असेल तर स्त्रीतत्त्व असलें पाहिजे आणि स्त्री असेल तर पुरुषतत्त्व असलें पाहिजे. अशा प्रकारे जो उभय सत्त्वांनी संपन्न असेल तोच समग्र मानव असेल. रामचंद्राच्या व्यक्तिमत्वात स्त्रीचे सुभगता, शोभनीयता, कोमलता आदि गुण हजर होते. सुंदरता आणि शोभनीयता जे स्त्रीचे अलंकार मानले जातात, ते कृष्णाच्या व्यक्तिमत्वात होते. हेंच संस्कृतीचें लक्षण आहे. शिव अर्धनारीश्वर आहे. त्याच्या ज्या मूर्ति बनवल्या गेल्या आहेत त्यांत अर्धे शरीर पुरुषाचें आणि अर्धे स्त्रीचें असतें. परंतु हा केवळ स्थूल संकेत आहे. याचें मर्म खूप खोलवर गेलेलें आहे. मनुबहेन गांधींनी एक पुस्तक लिहिलें आहे, 'बापू मेरी मां'. भूदान-यज्ञात् एक लेख आला, 'मां विनोबा' हे असे पिते आहेत ज्यांच्यांत मातेची वत्सलता आहे. आपला सगळा जीवनरस आपल्या आत्मजांना देण्यासाठी ते नेहमी उत्सुक असतात.

### बाळाचें पोषण, रक्षण आणि शिक्षण आईवर निर्भर

मातृत्वाचा एक अत्यंत विचारणीय पैलू आहे. समाजात मनुष्याच्या भरण-पोषणाच्या अनेक योजना असतात, पण त्या साऱ्या नंतरच्या. संपूर्ण पोषणाची अगदी प्राथमिक योजना आईच्या दुधात आहे. ती आपल्या जीवनाचें सत्त्व, आपल्या व्यक्तित्वाचा सारा रस बालकाला देते. वैद्य अनेक वनस्पतींचें सत्त्व काढून आपल्याला पौष्टिक औषध देतात, आई आपल्या प्राणांचें सत्त्व आपल्याला पाजते. आईचें दूध मनुष्याचें पहिलें पोषण आहे. आईची मांडी त्याचें पहिलें आश्रय-स्थान आहे. थंडीवाऱ्यापासून त्याचें रक्षण करणारें पहिलें आवरण आहे

आईचा पदर. अन्न, आच्छादन आणि आश्रय सर्वांत प्रथम माते-कडूनच मिळतें, आणि अशा अवस्थेत की जेव्हा मनुष्य या तिन्ही गोष्टी स्वतः प्राप्त करून घेण्याच्या अवस्थेत नसतो. कवि म्हणतो, 'मातेव रक्षति...।' माता पोषण आणि रक्षण दोन्ही करते आणि हे दोन्ही करता करता शिक्षणहि देते.

विनोबा वारंवार म्हणतात मातृशक्तीचा विकास झाला पाहिजे. याचा अर्थ आज एका स्त्रीला जितकीं मुलें असतात त्यापेक्षा अधिक असलीं पाहिजेत असा आहे ? स्त्री अष्टपुत्रा झाली म्हणजे तिच्या मातृशक्तीचा विकास झाला असें मानता येईल ? मातृशक्तीचा अर्थ हा आहे की स्त्रीजीवनात ब्रह्म-चर्याची प्रतिष्ठा वाढली पाहिजे. पत्नीत्वाच्या भावनेत ब्रह्म-चर्याच्या विकासाला कमी अवकाश असतो. मातृत्वाची भावना ब्रह्मचर्याच्या विकासाला अधिक अनुकूल आहे. महापुरुषांच्या जीवनावर त्यांच्या मातांचा प्रभाव दिसून येतो. आपण म्हणतो की त्यांना महानतेचे संस्कार आईच्या दुधातून मिळाले होते. शिवाजीच्या बाबतीत म्टटलें जातें, त्याने आपल्या आईच्या दुधा-बरोबर वीरवृत्तीचें पान केलें होतें.

### शिव-पार्वती एकदुसऱ्यात ओतप्रोत

आज स्त्री स्वतःच्या जीवनातील अधिकांश भागाच्या बाबतीत पुरुषाची आश्रित आहे. परंतु, प्रत्येक स्त्रीपुरुषाला प्राथमिक संरक्षण, पोषण आणि शिक्षण तीच देते. घरात अन्नापूर्णा तीच आहे. जी अन्नापूर्णा असते ती सदापूर्णा मानली जाते. शिवाची विभूति ज्याप्रमाणे अद्‌भुत आहे त्याप्रमाणे जगदंबेची विभूतिहि अद्‌भुत आहे. ती काली कराली आहे, शिवा आहे, दुर्गा आहे,

अन्नपूर्णा आहे, अंबिका आहे आणि भद्राहि आहे. चंडिकेच्या रूपात प्रत्यक्ष शिवालादेखील ती आपल्या पायांखाली चिरडून टाकते. रुद्ररूपात ती दशप्रहरणधारिणी आहे, सतीच्या रूपात प्रखर तपस्येची प्रतिमा आहे, आणि चतुर तर इतकी आहे की रामचंद्राच्या परीक्षेसाठी सीतेचेंच रूप घेते. कधी भिल्लीण बनून शिवाचें मनोरंजन करते. लक्ष्मी नेहमी विष्णूच्या पायाशी बसलेली पाहतो, पण ही गौरी तर भरल्या सभेत शंकराच्या मांडीवर बसलेली दिसते. दंतकथांमध्ये कधी ती महादेवाबरोबर प्रवासाला निघाली असेल तर वाटेत दिसणाऱ्या दीनदु:खितांचें संकट हरण करायला आपल्या पतीला भाग पाडते. रिकाम्या वेळीं पट खेळताना भोळ्या शंकराला हरवूनहि टाकाते. अशाप्रकारे विविध रंगांनी रंगलेली पार्वतीची विभूति अतिशय रमणीय आहे. हे शिव आणि पार्वती एकदुसऱ्यात ओतप्रोत आहेत. दोघांच्या विभूति परस्परांमधे मिसळून गेल्या आहेत. कालिदासाने म्हटलें आहे : 'वागर्थाविव संपृक्तौ ।' शब्द आणि त्याचा अर्थ हे जसे अभिन्न असतात तितके पार्वती आणि परमेश्वर हे परस्परांपासून अभिन्न आहेत. शब्द आणि अर्थ दोन्ही संपूर्ण आहेत आणि दोन्ही एकरूप आहेत. अर्धा शब्द आणि अर्धा अर्थ असें भाषेचें स्वरूप नसतें, त्याचप्रमाणे भव आणि भवानी यांच्या विशिष्ट गुणांच्या समुच्चयाने संपूर्ण मानव, समन्वित मानवीय विभूति बनते. एकदा काकासाहेब म्हणाले होते, आधुनिक मनुष्यात ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्य-शूद्र सर्वांचे गुण एकत्रित झाले पाहिजेत. एकाच व्यक्तीत बुद्धिवैभव आणि श्रमकुशलता दोन्ही असलीं पाहिजेत. ज्या व्यक्तीत हृदय, बुद्धि आणि हात तिन्हीचा विकास झालेला आहे तें समग्र सांद्र व्यक्तित्व म्हणता

येईल, इंग्रजीत ज्याला Integrated Personality असें म्हणतात.

## मातृमुखी पुत्र आणि पितृमुखी कन्या

पुरुषात स्त्रीचे गुण असले पाहिजेत आणि स्त्रीत पुरुषाचे गुण असायला हवेत हें म्हणणें पौरुषाभिमानी पुरुषांना आणि स्त्रीत्वाभिमानी स्त्रियांना खटकतें. परंतु स्त्रीत्व आणि स्त्रैणता यांत अंतर आहे. इंग्रजीत दोन शब्द आहेत– Feminine आणि Effeminate. पहिल्या शब्दाचा अर्थ आहे स्त्रीत्व आणि दुसऱ्याचा स्त्रैण. पुरुषात स्त्रैणता असावी, तो She-Man असावा असें आम्ही म्हणत नाही. पुरुषात पुरुषी गुण तर नाहीतच पण स्त्रीचे भीरुता, सुकुमारता आदि दोष असतात तेव्हा त्याला स्त्रैण म्हणतात. तसेंच स्त्रीने He-Woman व्हावें असेंहि कोणी म्हणत नाही. ज्या स्त्रीत शालीनता, कोमलता आणि शोभनीयता तर नाहीच, पण पुरुषातील कठोरता, उद्दंडता आहे ती पुरुषी स्त्री मानली जाते. या दोन्ही स्त्रीच्या आणि पुरुषाच्या विभूतींच्या विकृति आहेत. स्त्रीपुरुषांच्या या यथार्थ प्रतिमा नाहीत, व्यंग चित्रें आहेत. ईश्वराला आई म्हटल्याने त्याचा अपमान होत नाही. शिवाजीमधे त्याच्या आईचे गुण उतरले होते हें म्हणण्यात शिवाजीचा कमीपणा व्यक्त होत नाही, प्रशंसाच होते. मातृमुखी पुत्र आणि पितृमुखी कन्या मोठे भाग्यवान मानले जातात. यात हा संकेत आहे की मुलीमधे पित्याचे गुण उतरले आहेत आणि मुलामधे मातेचे गुण आले आहेत. म्हणजे, दोघांमधे संपूर्ण मानवतेचीं लक्षणें आलीं. केवळ पुरुषाचेच गुण पुरुषात यावेत आणि स्त्रीचे स्त्रीमधे यावेत असें असतें तर मग मातापित्यांची आवश्यकताच राहिली नसती. पुरुषांना केवळ बाप आणि

स्त्रियांना केवळ आई असें झालें असतें. पण वस्तुस्थितीमध्ये प्रत्येक व्यक्तीला बापहि आहे आणि आईहि आहे. म्हणून प्रत्येक मुलामधे कमीअधिक प्रमाणाने आई आणि बाप दोघांचे गुण उतरतातच. हे त्या संतानाचें अहोभाग्य आहे.

## संपूर्ण नारीनरेश्वर

पुरुषाचा गुण पुरुषता नाही, पौरुष आहे. Manliness आहे, Mannishness नव्हे. पुरुषातहि कोमलता हवी, ओबडधोबडपणा नको. सीतेप्रमाणेच राम आणि लक्ष्मणहि लोभस, सुकुमार होते. श्रीकृष्ण कामदेवाप्रमाणे सुस्वरूप होते. पुरुषाचें रूप भीतिदायक असावें असें काही नाही. तें काही पौरुषाचें लक्षण नव्हे. जवाहरलालजींचा चेहरा लोभस आहे, त्यांचा चेहरा पाहून कोणी भीत नाही. राम, कृष्ण या अवतारांना नयनाभिराम म्हटलें आहे. यांच्यांत का पौरुषाचा अभाव होता असें म्हणायचें ? आपल्या देवांमधे बहुतेक कोणालाच दाढीमिशा नसतात. याचा अर्थ कदाचित् असा असेल की देवांचें रूप स्त्रीच्या रूपाप्रमाणे सुंदर असतें. या सगळ्याचा अर्थ हा की पुरुषाने नकली स्त्री बनायचें नाही किंवा स्त्रीला पुरुषाची प्रतिलिपि बनायचें नाही. तिला Amazon (रणचंडी) नाही व्हायचें. ती काही पुरुषाची सेकंडहँड कॉपी नव्हे. नकली स्त्रिया आणि नकली पुरुष नाटकात असतात. स्त्रीमधे स्त्रीच्या गुणांचा पूर्ण विकास झाल्यानंतर पुरुषाच्या गुणांच्या संयोगाने तिचें व्यक्तित्व संपन्न होतें. तसेंच पुरुषामधे पुरुषाच्या गुणांचा विकास झाल्यानंतर स्त्रीच्या गुणांचा संयोग झाल्याने त्याचें व्यक्तित्व संपन्न होतें. ही संयुक्त विभूति अर्धनारीश्वरहि नाही आणि अर्धनरेश्वरहि नाही, संपूर्ण नारीनरेश्वर आहे.

आधुनिक स्त्रीमधे ही फार मोठी उणीव आहे. खरें म्हणजे तिच्यात आधुनिकताच नाही. उच्च वर्गातील आणि मध्यम वर्गातील अधिकांश स्त्रिया नाजूक आणि नटणाऱ्या, मुरडणाऱ्या बाहुल्या आहेत, जणू Plastic Mannequin आहेत. Mannequin म्हणजे शिप्याच्या किंवा कपडयाच्या दुकानात सजवून ठेवलेल्या मानवाकार बाहुल्या किंवा बाहुले. त्याला वाटेल तसें नाचवावें. आजच्या स्त्रीत संयम व दृढता कमी आहे. प्रसाधन आणि प्रदर्शनप्रियता अधिक आहे. दुसऱ्याच्या लोभाचें आणि ईर्ष्येचें साधन बनावें अशा तऱ्हेने ती आपल्या शरीराला नटवते, सजवते आणि त्याचें प्रदर्शन करते. स्त्रीचें शरीर सुंदर असावें, तिचें शरीर निरोगी, सुदृढ आणि बांधेसूद असावें; परंतु इंग्रजीत म्हणतात तसें Blue Stocking— शृंगारप्रिय नटी तिने बनू नये.

**साधेपणा आणि विद्रूपता यांत अंतर**

विद्रूपता म्हणजे साधेपणा नव्हे. पूर्वीच्या काळीं स्त्री विधवा झाली की तिला विद्रूप करून टाकीत असत. तिला पाहून दुसऱ्या कोणत्या पुरुषाला मोह पडू नये हा हेतु असायचा. तिचें मुंडण करून अलंकार काढून घेतले जात. तिला रंगीत वस्त्रें नेसण्याची मनाई असे. फार पांढरे कपडेहि रंगीतच समजले जात. म्हणून तिचे कपडे मलीन असत आणि चेहरा म्लान दिसायचा. हाहि भ्रष्टाचाराचाच एक पैलू आहे. सामाजिक पवित्रतेच्या संरक्षणासाठी एखाद्या मानवीय व्यक्तीला असें रूपहीन बनविलें जावें हा केवळ भ्रष्टाचारच नाही जंगलीपणाहि आहे. विद्रूपता वेगळी वस्तु आहे आणि साधेपणा एक अगदीच निराळी वस्तु आहे. साधेपणात सुंदरता

असते. शृंगारात सुरूपता नसते, अभद्रता असते. पुरुषाला आकर्षित करण्यासाठी आणि दुसऱ्या स्त्रियांचा मत्सर जागृत करणारें प्रसाधन करण्यात कुठली सुंदरताहि नाही आणि संस्कृतिहि नाही. तें तर वारांगनेचें शील झालें. आपल्या शरीराला प्रदर्शनाचा विषय बनवण्याने स्त्रीचें सत्त्व क्षीण होईल. एखादी स्त्री तपस्विनी, ब्रह्मचारिणी अगर विधवा असेल तर तिने आपलें शरीर जास्तीत जास्त असुंदर बनवावें अशी आवश्यकता नाही. हाहि प्रदर्शनाचाच एक पैलू आहे. पुरुष त्यागी आहे, तपस्वी आहे तर त्याने आपलें रूपच असें बनवून टाकावें की त्याच्याकडे दुसऱ्यांदा पाहण्याची कोणाला इच्छाच होऊ नये– यात 'उदरनिमित्तं बहुकृतवेशः' नसलें तरी सूक्ष्म प्रदर्शनपटुता आहेच. सुंदरता हा अन्यत्र ईश्वराचा गुण आहे, तर स्त्री आणि पुरुषातहि तो गुणच आहे. तो उपभोगाचा किंवा प्रदर्शनाचा विषय होऊ शकत नाही. सुंदरता भगवंताची विभूति आहे. पुरुषाची पराक्रमशीलता स्त्रीत आली आणि स्त्रीची सुललित कलात्मकता पुरुषात आली, तर मनुष्य जातीत विकसित मानवतेचें अनुपम वैभव प्रकट होईल.

### बंधुभगिनीत्वात सामासिक विभूति

आपल्याकडील भाषांमधे स्त्री आणि पुरुष दोघांसाठी समान शब्दाचा प्रयोग करावयाचा झाल्यास मनुष्य किंवा मानव या शब्दांचा उपयोग केला जातो. इंग्रजीत 'मॅन' या शब्दाचा प्रयोग केला जातो. 'मॅन' म्हटलें की त्यात 'वूमन'हि येते. Manhood मध्ये Womanhood हि अंतर्भूत आहे काही स्त्रीत्ववादी व्यक्तींनी 'मॅन' ऐवजी 'वूमन' म्हणणें सुरू केलें,

पण ती केवळ प्रतिक्रिया म्हणूनच. जॉर्ज बर्नार्ड शॉने आपल्या पुस्तकाला Intelligent Man's Guide to Socialism' न म्हणता Intelligent Woman's Guide to Socialism म्हटलें, आणि त्या पुस्तकात सर्वत्र मानवीय प्राण्यासाठी 'मॅन'च्या जागी 'वूमन' आणि 'ही' च्या जागीं 'शी' लिहिलें आहे. ही देखील प्रतिक्रियाच होती. वस्तुस्थिति कायमच राहिली, फक्त 'मॅन' च्या जागीं 'वूमन' शब्द आला. सुधारणा काहीच झाली नाही. स्त्री आणि पुरुष, दोघांचें द्योतक असणारा एखादा सामासिक शब्द बनवण्याची आवश्यकता आहे.

मदनपल्लीमधे एकदा काही दिवसांसाठी मी डॉ. कजिन्स यांच्याकडे राहिलो होतो, तेव्हाची आठवण येते. डॉक्टर आणि त्यांच्या पत्नी मार्गरेट दोघेहि वृद्ध होते. मार्गरेटशी माझी स्वाभाविकच जास्त मित्रता झाली. त्या मातृवत् तर होत्याच, परंतु त्यांचा व्यवहारहि मातृसुलभ होता. एक दिवस चर्चा चालली असता मी म्हटलें. 'आजच्या युगात केवळ नागरिकता आणि साथीपण पुरेसें नाही Brother-hood (बंधुत्व) असलें पाहिजे. मार्गरेटबाई म्हणाल्या, 'तुम्ही फक्त Brotherhood का म्हणता ? Brotherhood पाहिजे तर Sisterhood हि पाहिजे.' मी म्हणालो: बंधुत्वात भगिनीत्व येऊनच जातें. याबर त्यात काहीशा उत्तेजित होऊन म्हणाल्या, असें चालणार नाही, त्यात Sisterhood जोडलेंच पाहिजे. मी म्हटलें, प्रत्येक वेळीं Brotherhood and Sisterhood असें म्हणणें म्हणजे फारच बेडौल, बेढब होईल. त्यावर त्यांनी एक शब्द सुचवला– Brosterhood अर्थात् Brotherhood + Sisterhood (बंधुभगिनीत्व). एक उपयुक्त सामासिक शब्द बनला. मनुष्याची ही सामासिक

विभूति तीर्थरूप बनेल. या तीर्थरूप प्रयागात स्त्रीत्वाचा आणि पुरुषत्वाचा संगम होईल आणि त्यात मानवतेच्या गुप्त सरस्वतीची धारा अदृश्य रूपाने निरंतर वाहत राहील.

प्रतिक्रियाजन्य भूमिका दोघांच्याहि दृष्टीने अनर्थकारी आहे. आपण हें बघितलें की स्त्री आणि पुरुष दोघेहि Free आहेत, परंतु Independent नाहीत; स्वतंत्र आहेत, परंतु स्वावलंबी नाहीत ! दोघेहि ब्रह्मचर्याचें पालन करू शकतात, परंतु त्यांचें मातृत्व आणि पितृत्व परस्पर सापेक्ष आहे. तरीहि स्त्रीच्या मातृत्वाचा आधार घेऊन तिच्या परवशतेचें समर्थन केलें जातें. प्राणिशास्त्रातून आणि समाजशास्त्रातून किती तरी प्रकारचीं प्रमाणें उपस्थित केलीं जातात. परंतु तीं आपल्या-परीने पर्याप्त नाहीत. वर्तमानपत्रांतून कधी कधी अशा प्रकारच्या बातम्या छापून येतात की कालपर्यंत जो 'श्यामलाल' होता, तो एकाएकी ऑपरेशननंतर 'श्यामा' बनला आणि कालपर्यंत 'भगवती' असलेली आज एकाएकी 'भगवान' बनली. याचा अर्थ हा आहे की स्त्रीत्वाचीं आणि पुरुषत्वाचीं मूलतत्त्वें स्त्री आणि पुरुष दोघांत विद्यमान आहेत. प्रत्येक पुरुषाच्या शरीरावर स्त्रीत्वाचीं काही चिह्नें अवशिष्ट आहेत. श्री. किशोरलालभाईंची या संदर्भातील काही पुस्तकें वाचण्यासारखीं आहेत. स्त्री आणि पुरुष यांचें पृथक्करण विकासक्रमात कशा प्रकारे झालें याचें वर्णन त्यांनी फार रोचक भाषेत केलें आहे. या पृथक्करणाच्या पूर्वी एकाच प्राण्यात मातृत्वाचे आणि पितृत्वाचे गुणधर्म वर्तमान असत. आत्तादेखील काही प्राणी उभयलिंगी आहेत. आजच्या उत्क्रांत अवस्थेतहि एकहि पुरुष असा सापडणार नाही की ज्याच्यात नारीत्वाचीं अवशिष्ट चिह्नें नसतील. परंतु, आता आपण म्हणतो

की अमुक पुरुषात स्त्रीचीं लक्षणें नाहीत, त्याच्यात स्त्रीचें सत्त्व असलें पाहिजे. नेपोलियन जगद्‌विख्यात सेनापति होता. परंतु त्याचा चेहरामोहरा पुष्कळसा मुलींसारखा होता असें म्हणतात.

प्रतिक्रियेचा आणखीहि एक पैलू विचारणीय आहे. पुरुषांनी म्हटलें की स्त्रीचें शरीर गर्भधारणेसाठी बनलें आहे म्हणून तें स्वतंत्रतेला पात्र नाही. वास्तविक असें असायला पाहिजे होतें की स्त्री मानवाला जन्म देते म्हणून समाजात तिची अधिक प्रतिष्ठा झाली पाहिजे. तो तिचा दोष नाही, गुण आहे; त्रुटि नाही, विशेषता आहे. एका नव्या मानवाला जगात आणण्याची, त्याचें भरणपोषण करण्याची जबाबदारी स्त्री घेते. कदाचित् ईश्वराला आणि प्रकृतीला पुरुषाबद्दल इतका विश्वास वाटला नसेल, म्हणून स्त्रीवर हें कार्य सोपवून त्यांनी तिच्यावरचा आपला विश्वास व्यक्त केला.

**स्त्रीत्ववादी आंदोलन**

परंतु जें व्हायला हवें होतें त्याच्या विपरीतच झालें. मातृत्वामुळे स्त्रीची मानवता ऊर्जित व्हायला हवी होती ती उलट गौण झाली. स्वाभिमानी स्त्रियांवर याची भयानक प्रतिक्रिया झाली. त्यांना वाटलें, ठीक आहे, मातृत्वच आमच्या परवशतेचें कारण असेल तर मातृत्वाचा राजीनामा द्यायला आम्ही तयार आहोत. तुम्हाला संततीची जरूर नाही तर आम्हीहि आपल्या आकांक्षेला तिलांजलि देतो. जो उत्पादन करतो त्याची समाजात प्रतिष्ठा आहे, तर तो उत्पादक काय स्वावलंबी आहे? मडके बनवायचें की सुरई बनवायची हें स्वातंत्र्य कुंभाराला आहे, पण माती आणि चक्र यांच्या अभावी तो काहीच बनवू शकणार नाही. समाजात उत्पादकाची सत्ता राहील असें म्हटलें

जातें. परंतु जी नवीन मानवीय प्राण्याला जन्म देते, एक प्रकारे मौलिक उत्पादन करते, तिचा अधिकार मात्र मान्य केला जात नाही, तर ह्या मातृत्वाचें त्यागपत्रच देऊन टाकतो आम्ही.

ही प्रतिक्रिया फार भयानक आहे. उत्पादनाच्या आणि उपार्जनाच्या क्षेत्रात स्त्रियांनी पुरुषांशी चढाओढ सुरू केली. शारीरिक शक्तीच्या क्षेत्रातहि तिने प्रतिस्पर्धा आरंभिली. जें जें काम पुरुष करू शकतो तें तें काम स्त्रीहि करू लागली. आर्थिक क्षेत्रात तिने पुरुषाची बरोबरी सुरू केली. प्रो. राममूर्ति जर चालती मोटार थांबवू शकतो तर पो. ताराबाई का थांबवू शकणार नाही !

समाजाने स्त्रीच्या बाबतीत आणखी एक अन्याय केला आहे. पशु आणि गुलाम यांच्या कामाला दाम दिला जात होता तसा स्त्रीच्या कामाला दिला गेला नाही. म्हणून स्त्रीला वाटलें, पुरुषांच्या कामाचा दाम मिळतो तर पुरुष करतात तींच कामें आम्हीहि करू. म्हणूनच गुलामीच्या प्रथेचें निर्मूलन करण्यात स्त्रियांचा हिस्सा फार मोठा राहिला.

अशाच तऱ्हेने स्त्रियांच्या नागरिकतेसाठी, त्यांच्या मतदानाच्या अधिकारासाठी आंदोलन झालें. त्याला Suffragette Movement म्हणतात. आतापर्यंत ज्या प्रतिक्रियेचा आपण विचार केला, ती प्रतिक्रियाहि त्या आंदोलनाचाच एक भाग आहे. तिला Feminist Movement — स्त्रीत्ववादी आंदोलन म्हणतात.

शांति-सैनिक विद्यालय
साधना केंद्र, काशी.
२८-१२-६०

# ९
# स्त्री-जीवनाची धन्यता

समाजाचा आधार समानता आहे. समानता नसली तर समाज बनणार नाही. स्त्री-पुरुषातील समानतेचा किंवा साम्याचा आधार त्या दोघातील तुल्यताच होऊ शकते. मनुष्य या नात्याने दोघे समान आहेत. स्त्री आणि पुरुष या नात्याने दोघे तुल्य आहेत. अर्थात् दोघांत काही समान गुण आहेत आणि काही विशेष गुण. या गुण-विशेषतेचें कारण प्रकृतिहि आहे आणि संस्कारहि. म्हणजे स्त्री-पुरुषांमधे काही वैशिष्टचें अशीं असतात की जीं नैसर्गिक असतात आणि काही सवयीमुळे आलेलीं असतात. हीं संस्कार-जन्य वैशिष्टचें जीं आहेत त्यांत काही अशीं आहेत की ज्यामुळे स्त्रीमधील मनुष्यत्वहि कमी

झालें आहे, ती पुरुषाच्या जीवनातील उपकरण बनली आहे. स्त्री पशु आणि गुलामाप्रमाणे विकली जात असे या गोष्टीला फार काळ लोटला नाही. स्त्रियांचा मीना बाजार भरत असे. आजहि लपवूनछपवून स्त्रियांचा अनैतिक व्यापार होत असतो. गुलामाचें शरीर आणि त्याचा श्रम दोहोंवर त्याच्या स्वामीची सत्ता असते. गुलाम स्वत:चा राहू शकत नाही, तो दुसऱ्या कोणाचा असतो. गुलामीच्या प्रथेचा विरोध करणाऱ्या सामर्थ्यशालिनी स्त्रियांपैकी एकीने म्हटलें आहे: Slavery is not to belong to yourself, to be robbed of yourself– गुलामीचा अर्थ आहे स्वत:वर स्वत:चा हक्क न राहणें, आत्मा गमावून बसणें, गुलामी आहे आणि स्वत्व राहिलें नाही म्हणजे सत्त्वहि राहत नाही. स्त्रीचें स्वत्व संपलें त्याच वेळीं तिचें सत्त्वहि संपुष्टात आलें.

### स्त्री-जीवनाचें कोडें

माझी इज्जत जर माझ्या बरोबर असणाऱ्या व्यक्तीच्या भरवशावर असेल, तर ती इज्जत माझी नाही, माझ्याबरोबर असणाऱ्या व्यक्तीची आहे. जोपर्यंत तो ठेवेल तोपर्यंत ती राहील; ज्या दिवशीं त्याची बुद्धि पालटेल त्या दिवशीं माझी इज्जतहि मातीला मिळेल. निसर्गाने आपल्याला शरीरच असें दिलें आहे की ज्याचें संरक्षणच असंभव आहे; म्हणून आपण आपल्या पवित्रतेचें संरक्षण करू शकणार नाही असा निर्णय स्त्रीने घेतला. स्त्रीला असा निर्णय घ्यावा लागावा असा अशुभ मुहूर्त समाजाच्या विकासात का उपस्थित झाला समजत नाही. याला प्राकृतिक न्याय म्हणतात. नैसर्गिक परिस्थितीच्या आधारावर जो तर्क केला जातो त्याला प्राकृतिक तर्क म्हणतात.

आपली अब्रू आपण स्वतः सांभाळू शकत नाही हें जेव्हा स्त्रीच्या लक्षात आलें, तेव्हा तिने आपलें सर्वस्वच पुरुषाच्या हातात सोपवून दिलें. विवश होऊन जो आपलें सत्त्व दुसऱ्याच्या हातात देतो त्याचा आत्माहि विकल होतो. अशा विकल आत्म्यात प्रत्ययहि राहत नाही आणि सामर्थ्यहि राहत नाही. गुलामहि आपल्याला मालकाच्या पायावर वाहून घेतो. त्यात त्याची स्वतःची प्रतीति आणि शक्ति वाढत नाही, मालकासाठी स्वतःचे प्राण देण्यास तो सदैव तयार राहतो. तसेंच स्त्रीदेखील आपल्या पतीसाठी आणि मुलांसाठी प्राण देण्यास मागेपुढे पाहत नाही. आगगाडीतून मुलगा खाली पडला तर बाप साखळी ओढेल, पण आई व्याकुळ होऊन मुलाच्या मागोमाग उडीच घेईल. आत्मसमर्पणाची एवढी शक्ति जिच्यामधे आहे, तिच्यात स्वसंरक्षणाची क्षमता नाही, आत्मरक्षणाचा प्रत्यय नाही. आपली पवित्रता सुरक्षित ठेवण्यासाठी ती आत्मसमर्पण करते. ज्या धनाचें संरक्षण करावयाचें तेंच धन ती दुसऱ्याच्या हातीं देते; ज्याच्यापासून संरक्षण करावयाचें त्याच्याच हातात सोपवते. हेंच स्त्रीच्या जीवनाचें कोडें आहे.

### पवित्रता आणि आत्मबल हीच स्त्री-शक्ति

प्रकृतिवाद्यांचा हा तर्क अकाट्य मानला जातो. हा निसर्गाचा वाद बिनतोड मानला जातो. म्हणून या प्राकृतिक वादाचें थोडें अधिक विश्लेषण करणें आवश्यक आहे. निसर्गाने स्त्री आणि पुरुष दोघांसाठी वेगवेगळ्या मर्यादा निश्चित केल्या आहेत. पुरुषाच्या शरीरात अमर्याद कामशक्ति नाही. कामवासना एक वस्तु आहे, कामशक्ति अगदीच वेगळी वस्तु आहे. भोगाची इच्छा एक गोष्ट आहे, भोगाची शक्ति निराळीच गोष्ट आहे.

शंभर वाट्या खीर खाऊन टाकावी अशी इच्छा होते, परंतु खाण्याच्या शक्तीची मर्यादा येते. जगातील उत्तमातील उत्तम कपडे आपण नेसावेत असें वाटतें, परंतु शरीर एकच आहे. उंची किमतीच्या वीस मोटारींत बसायचें आहे, पण शरीराला बैठक एकच आहे. वासनेला सीमा नाही, ती असीम आहे; सामर्थ्य सीमित आहे. कामोपभोगाने पुरुषाची शक्ति क्षीण होते. स्त्रीची शक्ति क्षीण होत नाही, परंतु वासनेवरच मर्यादा येते. पुरुष आणि स्त्री--दोघांनाहि मर्यादा येतात. पण स्त्रीला जास्त किंमत द्यावी लागते, शारीरिक परिणामांच्या स्वरूपात आणि जबाबदारीच्या स्वरूपात. परंतु हाच संयम आणि पवित्रता यांचा प्राकृतिक आधार होऊ शकतो. म्हणून स्त्रीची शक्ति तिच्या पवित्रेत आणि आत्मबलात आहे.

**आत्महानीच्या अंधकूपात पतन**

परंतु दुर्भाग्याने स्त्रीच्या चित्तात भ्रम पैदा झाला, जणू एखाद्या कुटिल आणि स्वार्थी देवतेने तिची मति पालटवली. आपल्या नैसर्गिक मर्यादांना आणि जबाबदाऱ्यांना घाबरून तिने पुरुषाचा आश्रय घेतला. वास्तविक निसर्गाचें तिला जें वरदान होतें, त्याला तिने अभिशाप मानलें आणि तिचें जीवन पुरुषांकित बनलें. पुरुषाशिवाय तिचें चालणार नाही असें ती मानू लागली. एका बाजूला तर ती पुरुषाशिवाय राहू शकत नाही आणि दुसऱ्या बाजूला तिच्या चित्तावर पुरुषाबद्दलच्या भयाची छाया सदा वावरत असते. ही गोष्ट तर साफच आहे की आपल्याला ज्याची भीति वाटते त्याच्याबरोबर आपण राहू शकत नाही. भय कधी सहजीवनाचा आधार होऊच शकत नाही. हिने त्याल

घाबरत रहावें आणि त्याने समजत रहावें की ही माझा आश्रय घेत आहे, माझ्या खेरीज हिचा संरक्षक कोणी नाही. हा आपल्या ऐटीत वावरतो आहे आणि ती आपल्या विवशतेने संकोचत आहे. कवि मोठ्या खुशीने गाऊ लागले :

'विनाश्रये न शोभन्ते पंडिता वनिता लता : ।'

एखादा दणकट वृक्ष उभा असावा आणि सुकुमार लता त्याच्या भोवती वेढलेली असावी. वादळात वृक्ष हालू लागला तर वेल त्याला आणखीच घट्ट पकडून ठेवते. हें त्या लतेचें प्रेम नाही, विवशता आहे.

यातून एक भयानक तथ्य निष्पन्न होतें. ज्या स्त्रीला आपल्या सत्त्वाचें रक्षण करावयाचें असेल तिला पुरुषाचा आश्रय घ्यावा लागतो किंवा मग आपलें शरीर भस्मसात् करावें लागतें. याचा परिणाम असा होतो की दुसऱ्या साऱ्या पुरुषांपासून सुरक्षित राहण्यासाठी ती एका पुरुषाचा आश्रय घेते आणि समाजापासून वेगळी होऊन एका घरट्यात आपल्याला बंद करून घेते. नागरिकतेचा त्याग करून कौटुंबिकतेत कैद होऊन बसते. स्त्रीजीवनातील हें दुसरें कोडें आहे. एकीकडे आपली प्रतिष्ठा, आत्ममर्यादा सुरक्षित ठेवण्यासाठी शरीरयज्ञ करावा लागतो, तर दुसरीकडे आपली प्रतिष्ठा वाचवण्यासाठी आपलें सत्त्वच दुसऱ्याच्या हातात सोपवावें लागतें. समस्या बिकट आहे आणि परिस्थिति अनुकंपनीय आहे. येथे दुसरें एक अनर्थकारक तथ्य निष्पन्न तें, होतें हें की स्त्रीचें शरीरच तिचें सत्त्व आहे. ज्याचें शरीरच सत्त्व बनतें त्याला आत्मा कुठून राहणार ? म्हणून स्त्री आत्महानीच्या गर्तेत--अंधकूपात--जाऊन पडते.

**नैतिक शक्तीने स्त्री स्वरक्षित**

ही स्त्रीजीवनाची अंतिम आघाडी आहे. या आघाडीवरहि ती आपलें सत्त्व सांभाळू शकली नाही तर तिला काही आशा उरत नाही. स्त्री स्वरक्षित होऊ शकते काय ? शेवटचा प्रश्न आहे. पुरुष म्हणतो, सुरक्षित होऊ शकते; परंतु स्वरक्षित कदापि होऊ शकणार नाही. समाजवाद, साम्यवाद, विज्ञानवाद आणि धर्म या प्रश्नाचें उत्तर देऊ शकत नाहीत. अध्यात्म याचें उत्तर देतें. स्त्री ज्या दिवशीं जीवनात ब्रह्मचर्याला प्रतिष्ठा देईल त्या दिवसापासून आपल्या देहाला संपत्ति मानणें सोडून देईल. तिचें रूप तिचें भाग्य ठरणार नाही. आनंदमयी मां आहेत. त्या सिद्धावस्थेला पोचल्या आहेत की नाही मला माहीत नाही. परंतु कामवासनेच्या संबंधात त्या अतिशय शुद्ध आहेत. आनंदमयी अशी माता आहे, जी कोणाची जननी नाही. अशा प्रकारें जी स्त्री आपल्या पवित्रतेलाच संपत्ति समजेल, मग ती विवाहित असो की अविवाहित; तिचें सत्त्वहरण करण्याची शक्ति कुठल्या पुरुषात असू शकणार नाही. अधिकांश पुरुषांना तिला छेडण्याची इच्छाच होणार नाही आणि अधिकांश अधम पुरुषांनाहि तिला छेडण्याची हिंमत होणार नाही. अशी स्त्री बलात्काराने भ्रष्ट होत नाही. अशा सामर्थ्यशाली स्त्रियांचीं उदाहरणें आणखीहि आहेत. पांडीचेरीच्या माताजी तर सर्वविदितच आहेत येथे ब्रह्मचर्याचा अर्थ संयमाची वृत्ति असा आहे. विवाहित ब्रह्मचर्य यात अंतर्भूत आहे. जी स्त्री आपल्या मनाची स्वामिनी आहे, आपल्या वाणीवर जिचा संयम आहे, तिच्यात नैतिक शक्तिच इतकी प्रबळ असेल, की तिच्यावर संकटाचे प्रसंगच कमी येतील; आणि जे येतील त्यांना ती आपल्या नैतिक बलाच्या जोरावर तोंड देऊ शकेल.

नैतिक बलासमोर शारीरिक बल टिकू शकत नाही. गांधीचें आत्मबल शस्त्रबलापेक्षा आणि बाहुबलापेक्षा अधिक तेजस्वी ठरलें.

येथे कदाचित असा प्रश्न उपस्थित केला जाईल की पुरुष तर केवळ पुरुष म्हणूनच नेहमी सुरक्षित राहतो. त्याला स्वतःच्या संरक्षणासाठी नैतिकतेची आवश्यकता नाही की पवित्रतेची नाही. दुराचारी, दुःशील आणि व्यभिचारी पुरुषहि स्वरक्षित असतो. परंतु स्त्रीकडून आपण अशी अपेक्षा करता की स्वरक्षित बनण्यासाठी तिच्यात पवित्रता व नैतिकता असलीच पाहिजे ?

प्रश्न स्वाभाविक आणि मूलगामी आहे. परंतु आपल्याला हें समजून घेतलें पाहिजे की समोर एका पक्षात शरीरबल, शरीरश्रेष्ठता हजर आहे, तेव्हा या दुसऱ्या पक्षात एक तर त्याहिपेक्षा जास्त शरीरबल किंवा शरीरश्रेष्ठता असायला हवी किंवा मग शरीरबलापेक्षा उच्च, श्रेष्ठ अशी कोणती तरी शक्ति हवी. शारीरिक पात्रता तर स्त्रीमध्ये नाहीच. अशा स्थितीत नैतिक बलच एकमात्र बल ठरू शकते. हा मूल्यपरिवर्तनाचा प्रश्न आहे. यासाठी क्रांतिकारी स्त्रियांना आपल्या नैतिकतेचाच प्रयोग करावा लागेल. सर्व स्त्रियांना सर्व काळ नैतिकबलाचाच आधार घ्यावा लागेल अशातली गोष्ट नाही. मूल्यपरिवर्तनासाठी काही स्त्रियांनी आपल्या आत्मबलाचा आणि मनोबलाचा प्रयोग करावा इतकें पर्याप्त होईल. एकदा मूल्यपरिवर्तन झाल्यावर मग सामाजिक परिस्थिति अनुकूल होईल आजहि जेथे जेथे सभ्य समाज आहे तेथे तेथे स्त्री सुरक्षित आहे. इथल्यापेक्षा युरोपात आजहि स्त्री अधिक सुरक्षित आहे. तिला तेथे अत्याचाराचें आणि बलात्काराचें भय कमी आहे. कमीत कमी द्वितीय

महायुद्धापूर्वी ही स्थिति होती. हा परिवर्तित सामाजिक मूल्यांचा परिणाम आहे. असेंच स्त्रीचें सत्त्व नैतिक शक्तीवर आधारित राहील तेव्हा ती स्वरक्षित बनेल ज्या समाजात स्त्री स्वरक्षित होईल, त्या समाजात तिला प्रतिकूल असलेली परिस्थिति फार दिवस टिकणार नाही.

शक्ति तर स्त्री आणि पुरुष दोघातहि आहे. अपत्यामधे बापाच्या वीर्याचा अभिमान प्रकट होतो आणि आईच्या दुधाचा. दोघांत सत्त्व आहे. पुरुषात जितका संयम असेल, तितकेंच त्याच्या बीजात सत्त्व अधिक असेल. अर्थात्, पुरुषाच्या सामर्थ्याचा आधार ब्रह्मचर्य आहे. स्त्रीमधेहि जितकी अधिक पवित्रता असेल, तितका गुण तिच्या दुधात उतरेल. या दोघांच्या सत्त्वांची मिळून जी मानवीय विभूति बनेल तिच्यात उभयविध सामर्थ्य असेल. स्त्रीचें सत्त्व आणि पुरुषाचें सत्त्व भिन्न असलें तरी तुल्य आहे. स्त्री आणि पुरुष दोघेहि आपल्या परीने स्वतंत्र आहेत, परंतु दोघांच्या विवेकपूर्ण आणि पवित्र सहयोगानेच नवीन मानवाचा जन्म होतो. त्याचप्रमाणे नवीन मानवीय विभूतीचा अवतार स्त्री आणि पुरुष, दोघांच्या सत्त्वांच्या संयोगातूनच होईल.

प्रकृतिवाद्यांचें एवढ्याने समाधान होत नाही. ते पशुजीवनातील उदाहरणें घेतात. गायींच्या कळपात एकच वृषभ असतो. अन्य प्राण्यांच्या बाबतीतहि हीच गोष्ट लागू आहे. या संदर्भात आपण हें पाहिलें आहे की माणसाचा सारा व्यवहार, अगदी त्याचा प्रकृतिधर्मंहि, काही संपूर्णपणाने आणि काही जवळजवळ मनोवांछित आहे. म्हणून माणसाच्या जीवनात संस्कार महत्त्वाचा आहे.

## पवित्रतेचें अधिष्ठान मानवी मन

मनुष्याच्या मनात संस्कार फार खोलवर रुजलेला असतो. म्हणून जुन्या संस्कारांचीं पाळेंमुळें खोदून काढून नव्या संस्कारांचें बीजारोपण करायचें हें काम क्रांतिकारी स्त्रियांनाच करावें लागेल. अत्याचाराचा आणि बलात्काराचा मनुष्याच्या शरीरावर दोन प्रकारचा परिणाम होतो. असें समजा, एकाद्या दांडग्या माणसाने माझ्या तोंडात गायीचें मांस कोंबलें. माझा असा संस्कार आहे की याने मी धर्मभ्रष्ट झालो, माझें व्रत खंडित झालें ! कोणी माझें नाकच कापलें. मला वाटतें की माझी अब्रू गेली. लोक मला अपशकुनी मानतात. शारीरिक परिणाम झाला, तो स्थायी आहे. परंतु जो भावनात्मक परिणाम झाला, तो संस्कारजन्य आहे, अस्थायी आहे. तरीहि त्यातून नेहमीचीच एक आत्मग्लानि निर्माण होते. हा संस्कार बदलण्यासाठी मला आपल्या मनाचा हा निश्चय करावा लागेल की अत्याचाराने किंवा अंगभंगाने मनुष्य भ्रष्ट होत नाही. तसेंच समाजात या संस्काराचें बीजारोपण करावें लागेल की बलात्काराने कोणीहि स्त्री भ्रष्ट होत नाही. बलात्काराचे परिणाम एकटचा स्त्रीलाच भोगावे लागावेत हें योग्य नाही. बलात्कार एक सामाजिक व्याधि आहे. त्याचा परिणाम साऱ्या समाजाने भोगला पाहिजे. समाजातील सगळ्या सभ्य पुरुषांनी त्याचें प्रायश्चित्त केलें पाहिजे. पुष्कळांना ही गोष्ट माहीत नसेल की जेलमध्ये कित्येकदा कैद्यांना अपमानित करण्यासाठी त्यांचा तोंडात मानवाची विष्ठा आणि मूत्र कोंबलें जात असे. अशींहि उदाहरणें आहेत की पुरुषांच्या शरीराचा जबरदस्तीने स्त्रीशरीरासारखा उपयोग केला जातो. हा अत्याचार काय बलात्कारापेक्षा कमी गंभीर आहे ?

तेव्हा, समाजात हा एक संस्कार प्रस्थापित झाला पाहिजे की पवित्रतेचें अधिष्ठान मनुष्याचें मन आहे, शरीर नाही. शरीर निरोगी, बलवान, सुंदर आणि तेजस्वी राखण्यासाठी प्राणपणाने प्रयत्न केला जावा. शरीर शुद्ध रहावें म्हणून प्रसंगीं प्राणहि दिले जातील; परंतु शेवटीं आमच्या पवित्रतेचें अधिष्ठान आमचें मन आणि हृदयच असेल. पापपुण्याचा आधार मनुष्याचें मन आहे, शरीर त्याचें साधन आहे. आज विज्ञानाच्या युगात शारीरिक शक्तीचें महत्त्व कमी होत चाललें आहे, शस्त्रशक्तीची प्रतिष्ठा घटत चालली आहे. वैज्ञानिक सामर्थ्याचा बोलबाला होत आहे. वैज्ञानिक सामर्थ्याचा मुकाबला नैतिक किंवा आध्यात्मिक सामर्थ्यानेच होऊ शकतो. दुसरा काही उपाय नाही. हेंच आत्मबल आहे, हीच अहिंसेची शक्ति आहे, हेंच मानवीय सामर्थ्य आहे. पुरुष काय अन् स्त्री काय दोघांचीहि मुख्य शक्ति यात निहित आहे; परंतु स्त्रीची विशेष रूपाने.

मी म्हटलेंच आहे की स्त्रीजीवनातील ही अंतिम आघाडी आहे. धीरोदात्त संकल्पाने या आघाडीवर तिने अतुल पराक्रम करायचा आहे. मनुष्य आत्मनिर्भर आहे, कारण तो आत्मरक्षित आहे. शस्त्रप्रयोगातहि शस्त्रशक्ति गौण असते, आत्मशक्तिच प्रधान असते. ज्याच्यात मनोबल असतें, तोच निष्णातयोद्धा बनतो. नुसताच हत्यारबंद माणूस असतो त्याच्या हातात जीवन नसतें, मृत्यु असतो. जो मारेकरी आहे, कसाई आहे, हत्यारवाला आहे तो जीव घेऊ शकतो, देऊ शकत नाही. आज समाजाचें नेतृत्व त्यांच्या हातात आहे, ज्यांची मानसिक शक्ति शारीरिक शक्तीपेक्षा श्रेष्ठ आहे. ही परिस्थिति स्त्रीला फार अनुकूल आहे.

**संवादी मानवीय विभूतीचा जन्म**

स्त्रीने आपलें शरीर ईश्वराच्या मंदिरापेक्षाहि पवित्र मानलें पाहिजे. वर म्हटलेंच आहे की प्रत्येक मनुष्याचें शरीर ईश्वराचाच विग्रह आहे. विश्वनाथाचें मंदिर फोडलें गेलें, विष्णूच्या मूर्तीचे तुकडे तुकडे करून टाकले, म्हणजे काय महादेव आणि विष्णु भ्रष्ट झाले ? संभाजीच्या शरीराचे तुकडे करण्यात आले, त्याने काय तो भ्रष्ट झाला ? जबरदस्तीने विष पाजण्यात आलें तर माणसाच्या शरीराचा नाश होईल, पण तो माणूस तर भ्रष्ट होणार नाही ! त्याचप्रमाणे समाजात हा नवीन संस्कार स्थान झाला पाहिजे की केवळ शरीर भ्रष्ट होण्याने स्त्री भ्रष्ट होत नाही. बलात्कारजन्य संतति विवाहजन्य संतति-इतकीच पवित्र समजली जाईल. हा संस्कार जेव्हा समाजात दृढमूल होईल, तेव्हा स्त्रीजीवनात स्वाधीनतेचें तेज येईल. त्या दिवशीं पुरुषाची प्रतिकारशक्ति आणि स्त्रीची निर्माणशक्ति, पुरुषाची श्रमशक्ति आणि स्त्रीची कलात्मकता – दोहोंच्या संयोगातून संवादी मानवीय विभूतीचा जन्म होईल.

भारतवर्षातील परिस्थिति आत्मबलाच्या प्रयोगाला अनुकूल होती, म्हणूनच गांधीने आपल्या अहिंसेचा ऐतिहासिक योग याच देशात केला. स्त्रीचें तर सर्व जीवनच आत्मबलाला आवाहन आहे. विज्ञानयुगात परिस्थितिहि अनुकूल आहे. विज्ञानयुगात बुद्धिबलाला महत्त्व आहे. बुद्धिबलाला जेव्हा भावनासंपन्न हृदयाच्या सामर्थ्याची जोड मिळते, तेव्हा तें आत्मबलात परिणत होतें. हें आत्मबल अगम्य आहे, अमोघ आहे. स्त्रीजीवनाची कृतार्थता आणि धन्यता त्याच्याच उपासनेत आहे.

शांति-सैनिक विद्यालय,
साधना केंद्र, काशी. २९-१२-'६०

## १०

# उपसंहार

सहजीवन आणि आत्मनिर्भरता परस्पर विरोधी भावना नाहीत. उलट हे दोन्ही एकमेकांचे सहचारी भाव आहेत. समाजात कोणीहि स्वयंपूर्ण नाही. प्रत्येकजण इतरांच्या मध्ये राहतो-इतरांच्या बरोबर राहतो; सहयोगाची आणि सहाय्याची त्याला अपेक्षा असते. म्हणून व्यक्ति स्वयंपूर्ण नाही. तरीहि आत्मनिर्भर अवश्य आहे. याचा अर्थ हा आहे की समाजात प्रत्येक व्यक्ति दुसऱ्या व्यक्तीबरोबर जगेल, परंतु दुसऱ्याच्या भरवशावर नाही जगणार, दुसऱ्याच्या जिवावर नाही जगणार. सहयोगी सर्वांचा असेल, आश्रित कोणाचा नाही. तो परभृत असणार नाही. हीच आत्मनिर्भरता आहे.

स्त्रीपुरुषांनाहि हाच नियम लागू आहे. ते एकमेकांबरोबर जगातील, तन्मय आणि तल्लीन होऊन जगतील. परंतु एकमेकांच्या भरवशावर जगणार नाहीत. उदाहरण घ्या. वडील आईबरोबर राहतात. आईवर प्राणापेक्षा अधिक प्रेम करतात. जरूर पडली तर तिच्यासाठी ते आपले प्राण द्यायलाहि तयार असतात. परंतु ते आईच्या भरवशावर राहत नाहीत. त्याचप्रमाणे आई वडिलांच्या बरोबर राहील, पण त्यांच्या भरवशावर नाही राहणार. आज ती त्यांच्याबरोबर केवळ राहत नाही, त्यांच्या भरवशावरच राहते. ही स्थिति अवांछनीय आहे. वडिलांचे आईवर अतिशय प्रेम आहे, पण ते तिचे आश्रित नाहीत. आणि यात त्यांना गौरव वाटतो. आईहि वडिलांची आश्रित म्हणून राहणार नसेल त्या दिवशीं तिच्या जीवनात एका नवीन अध्यायाचा उपक्रम होईल. त्या दिवशीं 'न मातुः परदैवतम्' एका उदात्त अर्थाने प्रत्यक्षात येईल.

### लोकतांत्रिक समाज

प्रश्न विचारला जातो की हें केव्हा होईल ? याचें काही पंचांग नाही. क्रांतीला तर प्रत्येक क्षणच शुभ मुहूर्त आहे. ज्या दिवशीं स्त्रियांना याची जरूर वाटेल त्याच दिवशीं हें घडून येईल. यात पुरुषाचा सहयोग मिळेल की नाही ? अवश्य मिळाला पाहिजे. गौरीशंकरावर दोन व्यक्ति चढत आहेत, दोघेहि परस्परांना वर चढण्यासाठी मदत करतात. दुसऱ्याला खाली पाडण्याचा प्रयत्न करणारा स्वत:हि पडेल. स्त्रीच्या मानवतेच्या विकासात पुरुषहि सहाय्य करेल. दुसऱ्याच्या मानवतेचा विध्वंस करणारा स्वतः मानवतेला वंचित होतो; हें त्याच्या

लक्षात येईल, त्याला तसा अनुभव येईल. ज्या समाजात स्त्री-पुरुष दोघे आत्मनिर्भर आहेत आणि तरीहि परस्परांचे सहयोगी आहेत, तो यथार्थ लोकतांत्रिक समाज आहे.

लोकतांत्रिक समाजात मुख्य घटक व्यक्ति आहे. राज्यतांत्रिक समाजात समुदाय मुख्य घटक असतो. आपल्याला लोकतांत्रिक समाजाची स्थापना करावयाची आहे. तो समाज असा असेल, ज्यात स्त्रीची योग्यता पुरुषाच्या बरोबरीची असेल आणि मानवीय व्यक्ति या नात्यानेहि तिची भूमिका पुरुषाच्या समकक्ष असेल--केवळ सिद्धांततःच नाही, वस्तुतः आणि व्यवहारतः ! आज तत्त्वतः ती पुरुषाची समकक्ष नागरिक आहे; परंतु आजहि यथार्थ लोकतांत्रिक समाजाचें हें लक्षण मानलें जातें की त्यात वृद्ध, बाल, आजारी आणि स्त्रिया सुरक्षित राहतील. मुलांची गोष्ट सोडून द्या. तीं प्रायः पूर्णपणानें परोपजीवी असतात. परंतु वृद्ध आणि आजारी माणसेंहि केव्हा केव्हा आपलें तेज प्रकट करतात. सनातनी हिंदु आजाऱ्याला म्हटलें की गोमांस खाण्याने तुझा जीव वाचणार आहे, तर तो मरणच पत्करील. मोटारच्या धक्क्याने घायाळ होऊन रस्त्यात पडलेल्या म्हाताऱ्याला म्हटलें की तुला आम्ही दवाखान्यात पोचवून देतो, पण तू आपल्या इष्टदेवतेचें नांव सोडलें पाहिजेस; तर तो रस्त्यातच बेवारशासारखें मरून जाणें पसंत करील. शेवटीं माणसाची ताकत त्याच्या चित्तात असते, त्याच्या शरीरात किंवा हत्यारात नसते. शूर-वीर योद्धा युद्धात शस्त्र घेऊन जातो. तिथे त्याची तलवारच तुटली तर बिनशस्त्राचाच तो समोरच्यावर तुटून पडतो. शस्त्रधाऱ्याची वीरता सुद्धा त्याच्या चित्तात असते. बहादुरी हृदयात असते. स्त्रीच्या हातातील हत्यार माहीत

नाही केव्हा काढून घेतलें गेलें असावें ! परंतु याचा अर्थ असा नाही की त्यामुळे तिने भित्रें बनावें. शूरता मनाचा धर्म आहे, शरीराचा नाही; एवढी गोष्ट तिने लक्षात घेण्याची आवश्यकता आहे.

स्त्रीसाठी अशी स्थिति कोण निर्माण करील ? उत्तर स्पष्ट आहे, स्त्रीच निर्माण करील. भारतातील लोक शस्त्रहीन होते. शस्त्रहीन भारतीय गांधीनेच त्यांना वीरता प्रकट करण्याची परिस्थिति उपस्थित करून दिली. एका पुरुषाला दुसऱ्या पुरुषाचें भय वाटतें, एका स्त्रीला दुसऱ्या स्त्रीचें भय वाटतें; परंतु प्रत्येक स्त्रीला प्रत्येक पुरुषाचें जें भय वाटतें, तीच स्त्री-जीवनातील खरी व्याधि आहे. याला उपाय दोन आहेत. एक तर हा की आपली मर्यादा राखण्यासाठी स्त्रीने आपले प्राण देण्यासाठी तत्पर रहावें आणि दुसरा हा की बलात्काराने शरीर क्षत झालें तर आपल्याला दुष्ट आणि भ्रष्ट न मानावें. यातून निर्माण होणारी प्रजा धर्माची मानली जाईल. यामुळे कुलीनतेचा आणि रक्ताचा अभिमान नष्ट होईल. समाजातील सारे बालक-बालिका कुलीनच होतील.

स्त्रीच्या उत्थानात मूळ पराक्रम स्त्रीचाच असेल. समाजात जेव्हा एखाद्या नवीन विचाराचा प्रादुर्भाव होतो तेव्हा त्याचा जनक एखादा समूह अगर संगठन नसतें, व्यक्तिच असते. संस्था, संगठन नंतर बनतात. सतीच्या प्रथेचा अंत करण्याचा विडा राजा राममोहन रायांनी उचलला. भारतात ती प्रथा परंपरेने अत्यंत पवित्र मानली जात होती. आनंद के. कुमारस्वामी यांच्यासारख्या आदर्शवादी रसिक विद्वानाने त्या प्रथेचें समर्थन केलें होतें. भगिनी निवेदितेसारख्या ध्येयनिष्ठ महिलेने या

प्रथेची स्तुति केली होती. तरीहि राजा राममोहनांनी आपल्या तीक्ष्ण आणि सूक्ष्म दृष्टीने त्या प्रथेतील असमानता हेरली. त्यांनी त्या प्रथेच्या विरुद्ध आंदोलन केलें. विधवांची विवशता आणि असहायता पाहून ईश्वरचंद्र विद्यासागर, महादेव गोविंद रानडे, गोपाल कृष्ण गोखले, आगरकर इत्यादींनी विधवा विवाह-प्रतिबंध निवारणाचें आंदोलन केलें. ब्रिटनमध्ये लोकतंत्र-वादी जॉन स्टुअर्ट मिलने स्त्रीच्या स्वाधीनतेचें प्रतिपादन केलें. अस्पृश्यनिवारणाचें आंदोलन सुरू करणाऱ्या व्यक्ति स्वतः स्पृश्य होत्या. तसेंच स्त्रीस्वातंत्र्याच्या आंदोलनाचा उपक्रम पुरुष करू शकतो. त्याने केलाहि आहे, परंतु तें आंदोलन तेव्हाच सफल होईल, तेव्हा स्त्रियांमध्ये अंतःस्फूर्ति, स्वयंप्रेरणा आणि अदम्य आकांक्षा जागृत होईल.

### आदर्शनिष्ठ स्त्रीमध्ये स्त्री-पुरुष-भावना नाही

अशा आदर्शनिष्ठ पराक्रमी स्त्रियांची आज आवश्यकता आहे. जगात अनेक अविवाहित पुरुष आहेत, परंतु त्या सर्वांचीच इज्जत होते असें नाही. विनोबा, शंकरराव, अण्णा सहस्रबुद्धे, अप्पा पटवर्धन यांची इज्जत होते, कारण त्यांचें जीवन समर्पित आहे. हें आधुनिक ब्रह्मचर्य आहे. जवाहरलालजी, ढेबरभाई यांच्या पत्नी त्यांच्या तारुण्यात मरण पावल्या. परंतु त्यांनी दुसरें लग्न नाही केलें. ही इज्जत पवित्रतेची आहे, संयमाची आहे. केवळ अविवाहित राहण्याने स्त्रीमध्ये शक्ति येणार नाही. तिच्यात आत्मनिर्भरता आली पाहिजे. अशा स्त्रिया स्त्रीपुरुष भावनेतून वर उठलेल्या असतील. याचा अर्थ असा नव्हे की त्या स्त्रिया स्त्रीहि नसतील आणि पुरुषहि नसतील, तृतीय प्रकृति

असणार. उलट त्या स्त्री आणि पुरुष दोन्ही असतील असा आहे. ज्या महापुरुषांनी स्त्रीच्या उत्थानाचा प्रयत्न केला ते स्त्रीच्या भूमिकेशी समरस झाले होते. विशुद्ध मानवतेच्या भूमिकेवर आरूढ झाले होते. ते पुरुषहि होते आणि स्त्रीहि होते. झाशीची राणी, डॉक्टर ॲनी बेझेंट, मां आनंदमयी या स्त्रिया स्त्री-पुरुष-भेदाच्या वर उठलेल्या होत्या म्हणूनच आपलें जीवन सफल बनवू शकल्या. अशा स्त्रियांमध्ये बलिदानाची शक्ति सहजच असते.

आपल्या देशाचेंच उदाहरण घ्या. शस्त्रास्त्रांनी आम्ही ब्रिटनशी सामना करू शकत नव्हतो तेव्हा गांधींनी हत्याराशिवायच आपला आत्मसन्मान सुरक्षित ठेवण्याची युक्ति भारतवासियांना शिकवली. पस्तीस कोट लोकांपैकी किती जणांनी बलिदान केलें ? तरीहि त्याचा प्रभाव पडला स्त्रिया जास्त संख्येने आपल्या सत्त्वरक्षेसाठी बलिदान करायला सिद्ध होतील तर समाजाचा कायापालट होईल. अशा बलिदानासाठी फार मोठ्या संख्येची गरज नाही. बागेतील सुगंधी फुलांचें एकच झाड साऱ्या बागेला पुष्पित आणि सुगंधित करून टाकतें. वीरतेमुळे स्त्रीचें व्यक्तित्व खुलू लागेल. तिच्या चारित्र्यात विलक्षण क्रांति येईल.

आज तरुण आणि तरुणी दोघेहि शांतिसेनेत आहेत. शांतिसेनेतील पुरुष शांतिस्थापनेचे अहिंसात्मक उपाय शोधण्याच्या प्रयत्नात आहेत. ज्या उपायांत स्निग्धता आणि मधुरता आहे ते अहिंसक उपाय. कठोरता आणि निष्ठुरता हे काही वीर पुरुषाचे गुण नव्हेत. दुसऱ्याचें दुःख पाहून जो द्रवित होत नाही तो स्थितप्रज्ञ थोडाच आहे ? तो निर्घृण आहे, त्याचें हृदय दगडासारखें

बनलेलें आहे. सीमेंट-काँक्रीटच्या रस्त्याप्रमाणे मग त्याच्यावर काही चिह्ने उमटत नाहीत. हें सजीवतेचें लक्षण नाही, निर्जीवतेचें लक्षण आहे.

### वीरतेचें लक्षण

या उलट स्त्रीमधे हृदयदौर्बल्य असतें. दुसऱ्याचें दुःख पाहून ती व्याकुळ आणि विह्वल होते. करुणेपेक्षा तिच्यात ग्लानिच अधिक असते. जी दुसऱ्याचें ऑपरेशन पाहून मूर्छित होते, तिला सहृदय स्त्री म्हटलें जातें. परंतु ही चित्ताची कोमलता नाही, हें तर चित्ताच्या दुर्बलतेचें लक्षण आहे. आज अनेक स्त्रिया उत्कृष्ट सर्जन आहेत. याचा अर्थ हा नाही की त्यांचें चित्त मजबूत बनलें आहे. उलट असाहि अर्थ होऊ शकतो की तेथे चित्त बधिर झालें आहे, हृदय संवेदनाशून्य बनलें आहे.

सारांश हा, की सहृदयता आणि व्यवहार-सौंदर्य वीरतेचीं लक्षणें आहेत. हीं लक्षणें पुरुषाचीं नाहीत की स्त्रीचीं नाहीत. ही मानवतेची आपली असाधारण विशेषता आहे. शांतिसेनेत पुरुष असोत की स्त्रिया असोत, दोघांत या गुणांचा उत्कर्ष झाला पाहिजे. ध्येयनिष्ठा आणि संकल्पशक्ति, साहस आणि धैर्य केवळ पुरुषाचे गुण नाहीत. स्त्रीने आजपर्यंत आपलें व्यक्तित्व पुरुषाच्या हवाली केलें होतें, म्हणून तिच्यात सत्त्वनिष्ठेपेक्षा स्वामीनिष्ठा आणि व्यक्तिनिष्ठा अधिक आली. हरिश्चंद्र आणि रामचंद्र आपापल्या निष्ठेचें पालन करण्याकरता स्वतःच्या पत्नीचा वध आणि त्याग करण्यास कचरले नाहीत. अशी उदाहरणें स्त्रीजीवनात पाहण्यास मिळत नाहीत. ती पतीसाठी, पुत्राचें बलिदान देईल. कारण सौभाग्यालाच ती आपलें सत्त्व मानतें.

त्याशिवाय जीवनात तिचें दुसरें काही ध्येय नाही. आपल्या पतीचे प्राण वाचविण्यासाठी स्त्री आपल्या सतीत्वाची किंमत कधी देईल ? वीर पुरुषांची आत्मनिष्ठा– मी अहंनिष्ठा म्हणत नाही– वीरांगनामध्येंहि आली पाहिजे, तेव्हाच दोघांचें संयुक्त जीवन चरितार्थ होईल.

पूर्वी स्त्रीला जें स्थान प्राप्त होत असे तें पुरुषामुळे होत असे. राणी असली तरी ती राजाची पत्नी या नात्याने. आज ती नागरिक बनली आहे आपल्या अधिकाराने सामाजिक पद तिने प्राप्त केलें आहे. आता ती राष्ट्राध्यक्ष आणि प्रधानमंत्री आपल्या अधिकारात बनू शकते. त्यासाठी तिला पुरुषाचा आधार घ्यावा लागत नाही. परंतु तरीहि सामान्य स्त्री आणि सामान्य पुरुष, तसेंच असामान्य स्त्री आणि असामान्य पुरुष दोघांच्या आत्मनिर्भरतेत फार अंतर आहे. बाप ज्या अर्थाने आत्मनिर्भर आहे त्या अर्थाने आई आत्मनिर्भर नाही. आपण बाप आणि आई दोघांचे प्रजाजन आहोत. आपली वडिलांवर जितकी श्रद्धा आहे, तितकीच आईवरहि आहे. माझा असा दृढ विश्वास आहे की, वडिलांमध्ये जो आत्मप्रत्यय आहे, जें सामर्थ्य आहे, तें आईमध्येंहि जागृत होऊ शकतें. आईमधे ती शक्ति आज सुप्त आहे, ती प्रकट करायची आहे. या सुप्त शक्तीला पुरुषाने गायिलेली भूपाळी जागे करू शकणार नाही. ती भैरवी स्त्रीच्या कोमल कंठातूनच निघायला हवी. तेव्हा समग्र मानव-संवादी मानवीय व्यक्तीचा पुण्यावतार समाजात होईल. कोणी त्याला अतिमानव म्हटलें, कोणी श्रेष्ठ मानव म्हटलें; परंतु तो अतिमानवहि नाही आणि श्रेष्ठ मानवहि नाही. तोच खऱ्या अर्थाने साधारण संपूर्ण मनुष्य, नॉर्मल मानवीय व्यक्ति असेल.

## अंतिम अभिलाषा

जमनालालजींनी महिलाश्रमाची स्थापना केली तेव्हा त्यांच्या पत्नी जानकीदेवी म्हणाल्या होत्या, स्त्रियांतहि कोणी गांधी निर्माण व्हावा, कोणी विनोबा व्हावा. विनोबाची आकांक्षा आहे, की स्त्रियांत कोणी शंकराचार्य निर्माण व्हावा. आज आपल्याला आदर्श पुरुषांचीं उदाहरणें आदर्श मानवाच्या रूपात समोर ठेवावीं लागत आहेत. आदर्श स्त्रियांचीं उदाहरणें आदर्श मानवाच्या रूपात जगासमोर ठेवता यावींत अशा क्षणाची प्रतीक्षा आहे. तेव्हा आपण असें म्हणू शकू की या महान स्त्रियांप्रमाणे कोणी पुरुषहि निघावेत. कित्येक वर्षांपासून ही अभिलाषा चित्तांत अंकुरित होत राहिली आहे. पुरुषाच्या पराक्रमाने ती बहरत नाही. त्यासाठी स्त्रीच्या पराक्रमाचीच आवश्यकता आहे. जुन्या पिढ्यांतील स्त्रिया पुराणमतवादी होत्या. त्या आता पितरात जमा झाल्या. सारी आशा आधुनिक युगातील तरुणीमधे केंद्रित झाली आहे. आता स्त्रीजीवनात जी क्रांति होईल, ती तिच्याच पराक्रमाने होईल. जवळजवळ ४०-४५ वर्षें ज्या आशेचें आणि आकांक्षेचें पोषण केलें ती आधुनिक युगाच्या त्या युवतीच्या चरणीं समर्पित आहे.

शांति-सैनिक विद्यालय
साधना-केंद्र, काशी
३०-१२-६०

# ११ प्रश्नोत्तरे

**प्रश्न** : आपण म्हटलें की क्रांतीचा आधार मनुष्याचें मतपरिवर्तन आहे. याचा हा अर्थ झाला की मनुष्याचें मत परिवर्तनीय आहे. त्याचें चित्त तर चंचल आहेच, त्याचें मनहि निरंतर बदलत राहील. अशा स्थितीत ईश्वर, सत्य किंवा ब्रह्म यासारखा एखादा शाश्वत आधार जीवनात राहिला नाही तर सारें जीवन अप्रतिष्ठित आणि अशाश्वत होईल. प्रत्येकाच्या चित्ताचा कल वेगळा असेल. अशा स्थितीत कोणी कोणाचें का मानेल ? आणि मग मतपरिवर्तनाचा आधारच नाहीसा होईल.

**अध्ययन** : आपण प्रश्न समजाऊन घेऊ. प्रत्येक व्यक्तीचे मनोव्यापार पृथक्-पृथक् असतात. तरीहि मनुष्याचा एक सर्व सामान्य मनोधर्म असतोच. तो केवळ पुरुषांचाच अगर केवळ

स्त्रियांचाच असा नसतो; पुरुष आणि स्त्री दोघांचा सामान्य मनोधर्म असतो. त्याच्याच आधारावर समाज सदसद् व्यवहाराचा निर्णय करतो. कोणी क्रूरतापूर्ण दुष्टतापूर्ण व्यवहार करीत असेल तर दुसरे त्याला अपराधी मानतात. परंतु दुसरा कोणी जेव्हा निर्दयतेचा आणि वक्रतेचा व्यवहार करतो, तेव्हा हा पहिला अपराधी ठरलेला मनुष्य त्याला दुराचारी म्हणतो. अर्थात्, सदाचाराच्या आणि दुराचाराच्या काही सामान्य कसोटचा आहेत, काही सार्वत्रिक निकष आहेत. त्यांच्यामुळे मानवीय व्यवहाराचें नियमन होतें. म्हणून जीवन अप्रतिष्ठित आणि चंचल नाही, तें क्षणिक नाही. प्रत्येक क्षणाला त्यात नित्य नूतनता येते. स्त्रियांच्या विशिष्ट जीवनपद्धतीमुळे त्यांचे काही मनोधर्म बनले आहेत. हे विशेष मनोधर्म जोपर्यंत सामान्य मानवीय मनोधर्मांच्या अविरुद्ध आहेत, तोपर्यंत ते ग्राह्य आणि उपादेय आहेत. परंतु स्त्रीचे मनोधर्म जेव्हा मानवीय मनोधर्मांना प्रतिकूल ठरू लागतात तेव्हा मात्र ते निराकरणीय ठरतात. उदाहरणार्थ, पुरुषाला सत्कर्मासाठी जीं पारितोषिकें मिळतात त्यांत एक फार मोठें पारितोषिक स्त्री आहे. नचिकेत्याला लालूच दाखविताना सुवर्णपदक आणि रत्नपदक यांहीपेक्षा बहुमूल्य प्रलोभने यमराज दाखवितो त्यांत स्त्रीचेंहि प्रलोभन असतें—

**'इमाः रामाः सरथाः सतूर्याः नैतादृशा लंभनिया मृत्युलोके ।'**

या सुंदर स्त्रिया, हे रथ, हे घोडे, मृत्युलोकात प्राप्त होणार नाहीत. रथांच्या आणि घोडयांच्या पंक्तीत स्त्रीचीहि गणना आहे. हा स्त्रीच्या मानवतेचा उपमर्द आहे. यमराजाने हें सांगितलें असलें तरी हा कुसंस्कार आहे. मनुष्यमात्राच्या चित्तात चंचलता आहे, त्याचबरोबर विवेकशक्तिहि विद्यमान आहे. विवेक म्हणजे

सारासार-विचार, हित-अनहिताची ओळख, सत्य आणि असत्य याची समज. याचें नांव मानवीय अंतरात्मा आहे. हा पुरुषातहि आहे आणि स्त्रीतहि आहे. म्हणून दोघांनीहि असें म्हटलें पाहिजे की यमराजाच्या उक्तीमधे जो संकेत आहे, तो अत्यंत अवांछनीय आहे. ईश्वर, ब्रह्म, सत्य आदि विषय फार गंभीर आहेत, गहन आहेत. शिवाय आपल्या प्रस्तुत विषयात या गोष्टींच्या विचाराची आवश्यकताहि वाटत नाही.

**प्रश्न** : आज विज्ञानामुळे भिन्न भिन्न राष्ट्रांत आणि समाजांत पारस्परिक संपर्क आणि निकटता वाढत आहे. चंद्रलोक आदि जे परलोक आहेत तेथेहि पोचण्याचा प्रयत्न होत आहे. म्हणजे आता दुसऱ्या लोकांशी संबंध प्रस्थापित होतील. या संपर्काचें आणि संसर्गाचे मनुष्याच्या चित्तावर काही इष्ट अनिष्ट परिणाम होतील किंवा नाहीत ?

**अध्ययन** : मनुष्याचें चित्त तटस्थ आणि अनासक्त रहावें अशी आपली अपेक्षा आहे. हीच त्याची स्वाभाविक स्थिति आहे. तटस्थतेत विवेक असतो. हीच चित्ताची शुद्धावस्था आहे. परंतु याचा अर्थ असा नव्हे की शाळिग्रामाप्रमाणे चित्त गुळगुळीत बनावें आणि त्यात नवे संस्कार ग्रहण करण्याची क्षमताच राहू नये. मानवीय चित्त गतिशील आहे. त्यात परिवर्तनाची क्षमता राहील. तें संवेदनशील असेल. त्यात रसिकता असेल. सौंदर्याच्या आकलनाचें सामर्थ्य असेल. असें चित्त संपर्कामुळे आणि संसर्गामुळे जे संस्कार ग्रहण करील, त्या संस्कारांमुळे त्याचा विकासच होईल. इसलामशी आपला संबंध आला. इसलाममध्ये जी सामाजिक समानता आहे, ती जर आम्ही आपल्या 'आत्मवत् सर्वभूतेषु' शी जोडली तर आपलें चित्त अधिक सुसंस्कृत होईल. न्यायालयात आणि घटनेत मनुष्यमात्राची समानता या देशात

प्रथम इंग्रजांनीच दाखल केली. ख्रिस्ती धर्मातील मानवसेवेची प्रेरणा आणि पापांच्या क्षमेचें तत्त्वज्ञान युरोपीय व्यक्तींनी आपल्याबरोबर येथे आणलें. या साऱ्या प्रेरणा आपण आपल्या गोरक्षण आणि मांसनिवृत्तीशी जोडल्या तर आपला समाज अधिक सभ्य बनेल. अशा तऱ्हेने विवेकपूर्वक संस्कार ग्रहण करण्यासाठी शुद्ध आणि सावधान चित्ताची आवश्यकता आहे. शुद्ध चित्ताची आवश्यकता आहे. शुद्ध चित्ताचीं लक्षणे आणि सामान्य माननीय मनोधर्माचीं लक्षणें अभिन्न आहेत. अशा लक्षणांनी संपन्न आत्मवान पुरुषाच्या आणि आत्मवान स्त्रीच्या सहयोगाने परस्परांवर जो प्रभाव पडेल तो उभयकल्याणकारीच ठरेल.

**प्रश्न** : कुटुंबातील इतर साऱ्या नात्यांचा समाजात विस्तार केला पाहिजे असें आपण म्हणतो. मग पतिपत्नीचें नातेच कुटुंबापुरतें सीमित का ठेवतो.

**अध्ययन** : एक गोष्ट विसरून चालणार नाही. आज कुटुंबसंस्थेचा जो आधार आहे, तो कौटुंबिक समाजात दाखल करावयाचा नाही. त्याच्या ऐवजी प्रेमाचा आधार बनवायचा आहे. कुटुंबसंस्था विवाहमूलक आणि स्नेहप्रधान आहे. विवाहाचा प्रेमाशी अनिवार्य संबंध नाही. प्रेम नसेल तर विवाह होऊ नये हें खरें; परंतु जेथे प्रेम असेल तेथे विवाह झालाच पाहिजे. हे आवश्यक नाही. अग्नि नसेल तेथे धूरहि नसेल, पण बिनाधुराचा अग्नि असू शकतो. कुटुंबसंस्थेतील प्रेमाच्या तत्त्वाचा स्वीकार करावयाचा आहे आणि कुटुंबसंस्थेच्या स्थूल आधाराचा अस्वीकार. विवाहात प्रेमाचें प्राधान्य असलें तरी कामप्रेरणाहि असते. ही कामप्रेरणा सार्वत्रिक बनवायची नाही. म्हणून पतिपत्नींचा

संबंध कुटुंबापुरताच सीमित राहील. केवळ पतिपत्नी संबंधच नाही, पतिपत्नी भावनादेखील. कुटुंबात पतिपत्नी संबंधाखेरीज इतर सारे संबंध कामनिरपेक्ष आहेत. या संबंधांचा मुख्य आधार आत्मीयतेची भावना आहे. त्याचा विस्तार समाजात व्हावयास हवा. हें कुटुंबसंस्थेचे उपादेय मूल्य आहे.

कुटुंबसंस्थेत जननी, जनक, सहोदर, सहोदरा हीं नातीं नैसर्गिक, रक्तमूलक आहेत. त्यांचा आधार जन्म आहे आणि जन्माचा आधार यौनसंबंध आहे. हीं नातींहि कौटुंबिक समाजात आम्ही दाखल करू इच्छित नाही. परंतु, मातृत्व, पितृत्व, भ्रातृत्व, भगिनीत्व जन्ममूलक असूनहि स्नेहप्रचुर आहेत. या संबंधात कामना नाही आणि भयहि नाही. म्हणून या संबंधाचा विस्तार कौटुंबिक समाजात व्हावयास हवा. कुटुंबात दंड-शासन, लोभ-पारितोषिक, प्रतिमूल्य-विनिमय या गोष्टींना स्थान नाही. कौटुंबिक समाजात हें झालें पाहिजे. कौटुंबिक समाजात श्रमाचा मोबदला असणार नाही, किंवा त्याचा विक्रयहि होणार नाही. वस्तूहि विक्रीसाठी असणार नाही. श्रमाची प्रेरणा पारितोषिकातून किंवा दंडातून येणार नाही. परस्परांच्या सुख आणि आनंदासाठी सहज प्रेरणेने मनुष्य आपल्या पात्रतेप्रमाणे श्रम करील.

कुटुंबसंस्थेतील प्रशासन आणि नियंत्रण औपचारिक नसतें. आई-वडील, भाऊ-बहीण, कन्या-पुत्र सर्वच आपापलीं कामें सहज-पणाने करतात, परस्परांविषयीच्या भावनेमुळे करतात. यातून सहज व्यवस्था आणि स्वाभाविक नियमन होतें. शासनमुक्त समाजाच्या दृष्टीने या मूल्याचें फार महत्त्व आहे.

आपल्या समाजात आज कुटुंब संपत्तिमूलक आहे. संपत्तीचा वारस, औरस किंवा दत्तक घेतलेला मुलगा-मुलगी असते.

हें देखील अवांतर मूल्य आहे. तें स्नेहात बाधा आणतें, आप्त-जनात वैमनस्य निर्माण करतें. म्हणून कुटुंबातून परिग्रहाची भावनाच नष्ट करण्याचा विचार आला. अशा तऱ्हेने कुटुंब-संस्थेच्या उपादेय मूल्यांचा आणि व्यापक होऊ शकणाऱ्या कौटुंबिक नात्यांचा कौटुंबिक समाजात स्वीकार करावा आणि त्यांचें संवर्धन करावें.

या विचारानंतर कुटुंबसंस्था मातृसत्ताक असेल की पितृ-सत्ताक, कुटुंबात स्त्रीचें नांव चालेल की पुरुषाचें, मुलें कुटुंबाचीं असतील की समाजाचीं आदि काही विषय विचार करण्यासाठी शिल्लक उरतात. नागरिक नात्याने या मातापित्यांची सामाजिक भूमिका समान आहे. प्रौढ मुलेंमुलीहि या दृष्टीने बरोबरचीच आहेत. परंतु, कुटुंबसंस्थेतील व्यवहाराचा आधार, अधिकार नसतो, आत्मीयता आणि कर्तव्याची भावना असते, जबाबदारीची जाणीव असते. म्हणून, त्यात मातेची सत्ता असेल की पित्याची हा विचारच अप्रस्तुत आहे.

मुलांबद्दलची संपूर्ण जबाबदारी आजहि कुटुंबाची मानली जात नाही. कुटुंबाची ऐकांतिक सत्ताहि मानत नाही. आजहि कुणी आईबाप आपल्या मुलाची हत्या करू शकत नाहीत. त्यांना अशिक्षित ठेवू शकत नाहीत. याचा अर्थ हा की आपल्या अपत्यांच्या बाबतीत आईबाप स्वच्छंदानुवर्तन करू शकत नाहीत. या भावनेचा विकास झाला पाहिजे. परंतु त्याचबरोबर आई-वडिलांची ममता आणि आत्मीयता अक्षुण्ण राहिली पाहिजे. मातेचा आणि अपत्याचा संबंध समाजातील एक अद्‌भूत मूल्य आहे, काहीहि झालें तरी तें नाहीसें होता कामा नये. सारा समाजच कुटुंब बनलें, तर मातृत्वाची आणि पितृत्वाची भावना

संबंध कुटुंबापुरताच सीमित राहील. केवळ पतिपत्नी संबंधच नाही, पतिपत्नी भावनादेखील. कुटुंबात पतिपत्नी संबंधाखेरीज इतर सारे संबंध कामनिरपेक्ष आहेत. या संबंधांचा मुख्य आधार आत्मीयतेची भावना आहे. त्याचा विस्तार समाजात व्हावयास हवा. हें कुटुंबसंस्थेचे उपादेय मूल्य आहे.

कुटुंबसंस्थेत जननी, जनक, सहोदर, सहोदरा हीं नातीं नैसर्गिक, रक्तमूलक आहेत. त्यांचा आधार जन्म आहे आणि जन्माचा आधार यौनसंबंध आहे. हीं नातींहि कौटुंबिक समाजात आम्ही दाखल करू इच्छित नाही. परंतु, मातृत्व, पितृत्व, भ्रातृत्व, भगिनीत्व जन्ममूलक असूनहि स्नेहप्रचुर आहेत. या संबंधात कामना नाही आणि भयहि नाही. म्हणून या संबंधाचा विस्तार कौटुंबिक समाजात व्हावयास हवा. कुटुंबात दंड-शासन, लोभ-पारितोषिक, प्रतिमूल्य-विनिमय या गोष्टींना स्थान नाही. कौटुंबिक समाजात हें झालें पाहिजे. कौटुंबिक समाजात श्रमाचा मोबदला असणार नाही, किंवा त्याचा विक्रयहि होणार नाही. वस्तूहि विक्रीसाठी असणार नाही. श्रमाची प्रेरणा पारितोषिकातून किंवा दंडातून येणार नाही. परस्परांच्या सुख आणि आनंदासाठी सहज प्रेरणेने मनुष्य आपल्या पात्रतेप्रमाणे श्रम करील.

कुटुंबसंस्थेतील प्रशासन आणि नियंत्रण औपचारिक नसतें. आई-वडील, भाऊ-बहीण, कन्या-पुत्र सर्वच आपापलीं कामें सहजपणाने करतात, परस्परांविषयीच्या भावनेमुळे करतात. यातून सहज व्यवस्था आणि स्वाभाविक नियमन होतें. शासनमुक्त समाजाच्या दृष्टीने या मूल्याचें फार महत्त्व आहे.

आपल्या समाजात आज कुटुंब संपत्तिमूलक आहे. संपत्तीचा वारस, औरस किंवा दत्तक घेतलेला मुलगा-मुलगी असते.

हें देखील अवांतर मूल्य आहे. तें स्नेहात बाधा आणतें, आप्तजनात वैमनस्य निर्माण करतें. म्हणून कुटुंबातून परिग्रहाची भावनाच नष्ट करण्याचा विचार आला. अशा तऱ्हेने कुटुंबसंस्थेच्या उपादेय मूल्यांचा आणि व्यापक होऊ शकणाऱ्या कौटुंबिक नात्यांचा कौटुंबिक समाजात स्वीकार करावा आणि त्यांचें संवर्धन करावें.

या विचारानंतर कुटुंबसंस्था मातृसत्ताक असेल की पितृसत्ताक, कुटुंबात स्त्रीचें नांव चालेल की पुरुषाचें, मुलें कुटुंबाचीं असतील की समाजाचीं आदि काही विषय विचार करण्यासाठी शिल्लक उरतात. नागरिक नात्याने या मातापित्यांची सामाजिक भूमिका समान आहे. प्रौढ मुलेंमुलीहि या दृष्टीने बरोबरचीच आहेत. परंतु, कुटुंबसंस्थेतील व्यवहाराचा आधार, अधिकार नसतो, आत्मीयता आणि कर्तव्याची भावना असते, जबाबदारीची जाणीव असते. म्हणून, त्यात मातेची सत्ता असेल की पित्याची हा विचारच अप्रस्तुत आहे.

मुलांबद्दलची संपूर्ण जबाबदारी आजहि कुटुंबाची मानली जात नाही. कुटुंबाची ऐकांतिक सत्ताहि मानत नाही. आजहि कुणी आईबाप आपल्या मुलाची हत्या करू शकत नाहीत. त्यांना अशिक्षित ठेवू शकत नाहीत. याचा अर्थ हा की आपल्या अपत्यांच्या बाबतीत आईबाप स्वच्छंदानुवर्तन करू शकत नाहीत. या भावनेचा विकास झाला पाहिजे. परंतु त्याचबरोबर आईवडिलांची ममता आणि आत्मीयता अक्षुण्ण राहिली पाहिजे. मातेचा आणि अपत्याचा संबंध समाजातील एक अद्भुत मूल्य आहे, काहीहि झालें तरी तें नाहीसें होता कामा नये. सारा समाजच कुटुंब बनलें, तर मातृत्वाची आणि पितृत्वाची भावना

समाजव्यापी बनेल. मातापित्याची अपत्यवत्सलता आणि समाजाची अभिभावकता यांमुळे बालकांचें जीवन द्विगुणित धन्य होईल.

**प्रश्न :** प्राकृतिक भेद असल्यामुळे स्त्री विवश आहे. शेवटी निसर्ग निसर्ग आहे. त्यावर काय इलाज चालू शकतो ?

**अध्ययन :** आपण हें पाहिलें की मनुष्याचें जीवन नैसर्गिक कमी आहे, संस्कारी जास्त आहे मनुष्य निसर्गाशी हार मानीत नाही, यातच त्याचा पुरुषार्थ आहे. कोणी जन्मापासून आंधळा आहे, कोणी बहिरा आहे, कोणी निर्बुद्ध आहे. या सर्वांना निसर्गाच्या हवाली करून मनुष्य मोकळा होत नाही. अपंगतेमुळे येणारी अपात्रता कमी करण्याचा प्रयत्न केला जातो. जो दोष मनुष्य-कृत म्हणजे संस्कारजन्य आहे त्याचें निवारण केलें जातें. जो दोष प्राकृतिक आहे, त्याची तीव्रता कमीत कमी करण्याचा प्रयत्न केला जातो. स्त्री आणि पुरुष, दोघांची सामान्य मानवता तर प्राकृतिकच आहे. सामान्य मानवतेचा जसजसा विकास होत जाईल, प्राकृतिक उणीवा त्या प्रमाणात भरून निघतील.

**प्रश्न :** स्त्रीपुरुषांचे संबंध निरापद झाले, तर समाजात स्वैराचार आणि व्यभिचार वाढणार नाहीत काय ?

**अध्ययन :** आपण ज्या समाजाचा विचार करीत आहोत तो कौटुंबिक समाज आहे. जन्ममुलक आणि विवाहमूलक कुटुंबाच्या जागीं समानतामूलक व मैत्रीप्रधान कौटुंबिक समाज बनेल. त्यात कौटुंबिकतेचें स्वातंत्र्य असेल आणि भावनात्मक नात्यांना मर्यादा असेल. म्हणून बलात्कार व व्यभिचार यांची संभावना कमीत कमी राहील. आत्मवान आणि चारित्र्यवान स्त्री तेजस्वी असेल, सत्ता-संपत्तीची गुलाम नसेल, आपल्या शरीराला विषय आणि रूपाला संपत्ति मानणार नाही. आजहि आपण असें पाहतो की

ज्यांचा परिग्रह आणि वैषयिकता अगदी अल्प मर्यादेपर्यंतच सीमित आहे त्यांना चोर, डाकू, बदमाश फार कमी त्रास देतात. अशा स्त्रीवर बलात्कार करणें सोपें नाही. बलात्काराची प्रेरणाच कमी होईल. आज समाजात, आणि कुटुंबातहि व्यक्तिव्यक्तीत पवित्र प्रेमाची आणि आत्मीयतेची भावना कमी दिसते, प्रभूत्वाची भावना अधिक आहे. सिकंदरामधे किंवा एखाद्या चक्रवर्ती राजामधे या समुद्रवलयांकित पृथ्वीबद्दल प्रभुत्वाची भावनाच मुख्य आहे. बुद्ध, येशू किंवा अशाच अन्य ब्रह्ममय विभूतींमधे स्वकीयतेची आणि आत्मयतेची भावना प्रधान आहे. ही भावना मानवीय आहे. ही केवळ ऋषि, मुनि आणि त्यागी महाभागांसाठीच आहे असें नाही, हीच भावना आपल्या सामाजिक मूल्यांचा आधार बनेल. साऱ्या कौटुंबिक भावनांची परिणति निरपेक्ष आणि पवित्र मित्रतेच्या भावनेत होईल.

**प्रश्न** : एक तरुण स्त्री आहे. सामाजिक कार्य करण्याची इच्छा आहे. आईबाप तिला घराच्या बाहेर जाऊ देत नाहीत. ती कुमारिका आहे. काय उपाय करावा ?

**अध्ययन** : आईवडिलांच्या मनात कन्येबद्दल जी भीति आहे, ती नाहीशी होत नाही तोंपर्यंत या तरुण मुलीला नम्रतापूर्वक आणि प्रेमपूर्वक त्यांचा विरोध सहन करावा लागेल. जेव्हा आईवडिलांना असा विश्वास वाटायला लागेल की आपली मुलगी आत्मरक्षा करायला समर्थ आहे, संयमाची मर्यादा पाळेल, तेव्हा त्यांचा विरोध संपून सहयोग सुरू होईल. आईबापांच्या मर्जीविरुद्ध कितीतरी लग्नें होतात. सुरुवातीला आईबाप मुलावर सुनेवर बहिष्कार घालतात; परंतु नवविवाहितामध्ये जर नम्रता असेल, विवेक आणि स्नेह असेल तर मातापित्यांचें स्वाभाविक प्रेम व

विश्वास प्रकट होतात आणि मग त्यांचा व्यवहार पूर्ववत् चालू होतो.

**प्रश्न** : केरळमधे मातृसत्ताक कुटुंबपद्धति होती. आता तिला मर्यादा पडत आहेत. ब्रह्मदेशात स्त्रियाच अधिक काम करतात. काही प्रदेश असेहि आहेत की जेथे एक स्त्री अनेक पति करते. असें असताहि समाज पुरुष-सत्ताकच कां राहिला ?

**अध्ययन** : उत्तर स्पष्ट आहे. स्त्री रक्षणाकांक्षिणी बनली आणि तिने पुरुषाला आपला संरक्षक मानलें, म्हणून पुरुषाच्या सावलीतच तिच्या जीवनाचा विकास झाला. समाज मातृसत्ताक असो की पितृसत्ताक, स्त्री आपल्या आत्माभिमानाचें संरक्षण पुरुषाच्या भरवशावरच करीत आली आहे. तेव्हा वस्तुतः सत्ता पुरुषाचीच राहणार. आजहि स्त्री पुरुषापेक्षा अधिक श्रम करते, आणि तरीहि तिचें जीवन पुरुषाच्या अधीन आहे. जेथे एका स्त्रीचे अनेक पति असतात, तेथेहि त्या सर्वांची मिळून ती स्त्री संपत्ति असते. तिचे पति तिची संपत्ति बनत नाहीत, कारण संरक्षणाची गरज तिला आहे. एका पुरुषाच्या अनेक स्त्रिया असतात तेव्हाहि त्या सर्वांचा त्राता आणि पालक तो पुरुषच असतो !

**प्रश्न** : ब्रह्मचर्य आणि संयम यांत काय फरक आहे ? ब्रह्मचर्य मानवाचें ध्येय आहे काय ?

**अध्ययन** : ब्रह्मचर्याचा अर्थ मी सामाजिक दृष्टिकोणातून स्पष्ट केला होता. यात व्यापक चिंतन आणि ईश्वरनिष्ठा या गोष्टी मी मुद्दामच वगळल्या. स्त्रीचें शरीर पुरुषाच्या उपभोगाचा विषय बनता कामा नये एवढ्यापुरतेंच तें ब्रह्मचर्य सीमित होतें. दोघांनी निश्चितपणाने जगावें यासाठी ही अट आवश्यक आहे. दोन पुरुषांत अगर दोन स्त्रियांतहि या मर्यादेची जरूर आहे की

एका स्त्रीला दुसऱ्या स्त्रीने अगर एका पुरुषाला दुसऱ्या पुरुषाने स्वतःच्या सुखाचें साधन बनवता कामा नये. अन्यथा त्या दोन व्यक्ति स्वातंत्र्यपूर्वक बरोबर राहू शकणार नाहीत. दोघांच्या जीवनात स्वतंत्रता, सहयोग आणि पवित्रता असली पाहिजे. त्यांच्यांत शोषणाची भावना नसावी. हाच सिद्धांत स्त्रीपुरुषांच्या जीवनाला लागू केला की त्याला आपण ब्रह्मचर्य म्हणतो.

ज्याला आपण कामसंयम म्हणतो तो हा नव्हे. हा एक वेगळ्या प्रकारचा संयम आहे आणि समाजात स्त्रीपुरुषांच्या सहजीवनासाठी तो आवश्यक आहे. पतिपत्नींच्या सहजीवनातहि संयमाची आवश्यकता आहे, परंतु तो संयम वेगळा. त्यात अनेक प्रकारचे विचार असू शकतील. परंतु हा संयम निरपेक्ष आहे. स्त्रीला असें वाटू नये की पुरुषांचें शरीर रक्षणाचें साधन आहे, आणि पुरुषाला असे वाटू नये की स्त्री उपभोगाचा विषय आहे. सहजीवनासाठी इतकें ब्रम्हचर्य आवश्यक आहे.

केवळ व्यक्तिनिष्ठ ब्रह्मचर्यासाठी एका ब्रम्हतत्त्वाची अपेक्षा असते. त्या ब्रह्मतत्त्वावर एकाग्र होण्यासाठी लोक विरक्त बनतात. याचा विचार मी येथे केलेला नाही. जे एकाद्या विषयावर एकाग्रतेने चिंतन करतात त्या सर्वांमध्ये अशा प्रकारचें ब्रम्हचर्य असतें. न्यूटन, आर्किमिडीज आदि जे सर्व वैज्ञानिक होऊन गेले ते इतके एकाग्र होऊन जात असत की बाकी सर्व काही विसरून जात. आपल्या समोर जेवणाचें ताट आहे हें देखील विसरून जात. हें एकाग्रतेचें लक्षण आहे. तसेंच ज्यांच्या जीवनाच्या साऱ्याच क्षेत्रात ब्रह्मनिष्ठेचा संचार झाला असेल, तो नित्य समाधिस्थ राहू शकेल. अशा व्यक्तींचीं लक्षणें सांगणें मोठें कठिण आहे. न्यूटनच्या एकाग्रतेविषयीची एक

दंतकथा प्रसिद्ध आहे. त्याच्याकडे एक मांजर होती. तिला पिलें झालीं. न्यूटन आपल्या प्रयोगात गढून गेला होता. त्याने विचार केला, मांजरीला खोलीत येण्याजाण्यासाठी एक मोठें छिद्र आहे, परंतु आता या पिल्लांसाठीहि एक छिद्र पाहिजे. म्हणून दरवाजाला आणखी एक लहान छिद्र त्याने बनवून घेतलें. हा एकाग्रतेचा महिमा आहे.

या प्रश्नाशी एक मोठा प्रश्न निगडित आहे. इंद्रियदमन करविणारें ब्रह्मचर्य – समाज, व्यक्ति सर्वांसाठीच – अनावश्यक किंवा अवांछनीय नाही काय ? त्यामुळे समाजाचें नुकसान होणार नाही काय ?

दमन कुठल्याहि प्रकारचे असो, त्यापासून नेहमी नुकसानच होतें. संयम अर्थात् विवेकयुक्त, बुद्धिपूर्वक इंद्रियांचा उपयोग किंवा निग्रह एक वेगळी वस्तु आहे. पण दमनात विवेकापेक्षा जबरदस्ती अधिक असते. म्हणून शास्त्रकारांनी दोन भिन्न शब्दांचा उपयोग केला – शम आणि दम. दमन म्हणजे केवळ बाह्य इंद्रियांचा निग्रह. बाह्य इंद्रियांना जबरदस्तीने आळा घातला जातो.

‘ कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।
इंद्रियार्थान्विमूढात्मा मिथ्याचार : स उच्चते ।। ’

भगवद्गीतेत याला मिथ्याचार म्हटलें आहे. जो विषयांचें मनात चिंतन करीत राहतो आणि इंद्रियांचाच केवळ संयम करतो, त्याच्या आचरणाला दमन म्हणतात. अशा प्रकारच्या दमनाने मनुष्याचें मन रुग्ण बनतें, तो मनुष्य स्वस्थ-चित्त राहत नाही. फ्राईडने Suppression शब्दाने याच दमनाचा उल्लेख केला आहे. या दमनामुळे जी वासना राहून जाते ती राखेने झाकलेल्या

अग्नीप्रमाणे आतल्या आत धुमसत राहते. पुढेमागे तिचा स्फोट होऊ शकतो न झाला तर ती मनाला जाळीत राहते. म्हणूनच अशा प्रकारचें दमन कोणाच्याहि दृष्टीने कल्याणकारी नाही.

आता दुसरा प्रश्न हा आहे की आत्यंतिक ब्रह्मचर्य समाजाच्या हिताचें आहे काय ? याबाबत विचारकांमध्ये थोडा मतभेद आहे. परंतु, याचें मुख्य उत्तर असें आहे की विवाह-संस्थेचाहि आधार ब्रह्मचर्य आहे. वैवाहिक जीवनात शारीरिकतेचा विकास कमी झालेला असेल आणि प्रेम अधिक असेल तो विवाह स्वयंपूर्ण मानता येईल.

स्त्रीपुरुषांच्या पतिपत्नी संबंधात संयमापेक्षा प्रेमावर अधिक भर असला पाहिजे. दुसरे संबंध तर प्रेमावरच आधारलेले आहेत. केवळ हा पतिपत्नींचा संबंधच असा आहे ज्यात शरीरसंबंध येतो. दुसऱ्या संबंधांतहि शारीरिकता आहे, परंतु हा संबंध विशेष अर्थाने शरीरनिष्ठ आहे. हा फार जवळचा संबंध आहे. म्हणून यात काम गौण आणि प्रेम मुख्य बनलें पाहिजे. संयम वगैरेचा विचार फार गौण आहे. त्यामुळे दोघांच्याहि व्यक्तित्वात दोष निर्माण होऊ शकतो. परंतु प्रेम जितकें अधिक असेल, त्या प्रमाणात शारीरिकता कमी होत जाईल.

**प्रश्न** : आपण ज्या प्रकारच्या समाजाची कल्पना करीत आहोत त्यात वर्ण आणि जाति राहणार नाहीत. परंतु आश्रमांचें काय होईल ? आणि वर्णाश्रम नाहीसे झाल्यावर हिंदु धर्माची खूण काय राहील ?

**अध्ययन** : वर्णाविषयी आपल्याला ताबडतोब या निर्णयावर यावें लागेल की समाजात वर्ण म्हणून काही वस्तु राहता कामा नये. मानवीय समानतेच्या दृष्टीने ही फार आवश्यक गोष्ट आहे. यात एक फार विचारणीय मुद्दा आहे. गुणकर्मावरून स्त्रीचा विचारच

केला जाऊ शकत नाही. वर्ण पुरुषाचाच असू शकतो. स्त्रीचे गुणकर्म कसे ठरवायचे ? तिचीं दोनच कर्मे – स्वयंपाक व प्रसूति. स्त्रीमात्रासाठी हीं समान आहेत. याशिवाय दळणकांडण, पाणी भरणें, कपडे धुणें घरोघरीं आहेच. हिंदु आणि मुस्लिम दोन्हीत गुणकर्मांवरून स्त्रीचा वर्ण ठरवला जात नाही. देशाची घटना तयार केली जात होती. स्त्रियांच्या अधिकारांची चर्चा चालू होती, माझ्या आजूबाजूला काही मुसलमान मित्र बसलेले होते. त्यांच्यात एक बेगम रसूल होती. ती मधून मधून स्त्रियांच्या हक्कांविषयी बोलत असे. अमुक हक्क असला पाहिजे, तमुक अधिकार असला पाहिजे. इतर मुसलमान मित्र म्हणत असत ही बाई काय बोलते आहे ! स्त्रियांना कसला आला आहे धर्म ? स्त्री स्त्री आहे. जगभरच्या स्त्रिया सर्व समान आहेत. तिने मुसलमानाशी विवाह केला तर ती मुसलमान होईल. ज्या घरात ती प्रवेश करील तिथल्यासारखी ती होईल. इस्लाममध्ये तर संस्कार पुरुषांनाच केला जातो, स्त्रियांना नाही. ख्रिस्त्यांमध्ये स्त्रियांवरहि काही संस्कार केले जातात, पण तेथे जाति नाहीत. असे काही धर्मांनी स्त्रियांसाठी थोडे संस्कार मानले आहेत. पण स्त्री स्वतः शूद्रतुल्य आहे. तिची जात जन्माने ठरते, दुसऱ्या कोणत्या गुणकर्माने नाही. ज्या परिवारात, ज्या कुलात तिचा जन्म होईल तीच तिची जात.

बौद्धधर्मात व जैनधर्मात काही साध्वी आणि भिक्षुणी असतात. परंतु एकूण, गुरुगृहीं जाऊन स्त्रीने विद्याध्ययन केलें अशी संधि कधी आली नाही. स्त्रीशिक्षण एक प्रश्न, समस्या बनली. येथे विदुषी स्त्रिया झाल्या त्या कधी गुरुकुलात राहिल्या असतील असा दाखला क्वचितच मिळेल.

याचा दुसरा परिणाम हा झाला की स्त्रियांचा उपनयन संस्कारहि होत नसे. आर्यसमाज्यांनी स्त्रीचें उपनयन सुरू केलें. महाराष्ट्रातहि स्त्रियांचें उपनयन करणारी एक हिंदु रिफॉर्म सोसायटी नांवाची संस्था गजानन भास्कर वैद्यांनी चालविली होती, परंतु साधाणपरणे स्त्रीला विवाहाखेरीज अन्य संस्कार नाही.

आश्रमाचा विचार मांडला आहे, त्यातहि स्त्रीसाठी ब्रह्मचर्याचें आणि संन्यासाचें विधान केलेलें नाही – उपनयन केल्यानेहि ही अपात्रता दूर होत नाही. ब्रह्मचर्याचा येथे अर्थ आहे वेदाध्ययन करणें. आर्यसमाज्यांनी याचा आरंभ केला. आर्यसमाजापूर्वी ब्राह्मसमाज आणि प्रार्थनासमाजांनी याचा आरंभ केला होता. मध्यंतरी थिऑसाफिकल सोसायटीने या संदर्भात थोडेंबहुत काम करण्याचा प्रयत्न केला.

या साऱ्या मनीषींच्या दृष्टीने सर्वांना अस्वस्थ करणारी एक गोष्ट ही होती, की आपल्या सर्व सामाजिक योजनांमध्ये पुरुषांसाठी जें विधान आहे तें स्त्रियांसाठी नाही. याचें मुख्य कारण हें होतें की स्त्रियांना विद्याध्ययन करण्यासाठी अवसर किंवा अधिकार नव्हता. नंतर आर्यसमाजादि सुधारक संस्थांनी त्यांना वेद शिकविले. ॲनी बेझंट हि वेदाचें अध्ययन करू शकल्या, तर इतर स्त्रियांनीहि कां करू नये ? आर्यसमाजाची स्थापना तर थिऑसॉफिकल सोसायटीच्या नंतर झाली. स्त्रियांना वेदाचा अधिकार असेल तर विद्येचाहि अधिकार त्यांना असला पाहिजे. पूर्वी स्त्रीला एकच आश्रम ठरलेला होता–विवाहानंतर गृहस्थाश्रम. **अष्टवर्षा भवेत् गौरी**–आठ वर्षांची झाल्यानंतर तिचा विवाह होत असे आणि तोच तिचा गुरु-गृह-प्रवेश मानला जात असे. पुरुषाचें आठ ते वीस वर्षांपर्यंतचें वय म्हणजे ब्रह्मचर्याश्रम

मानला जात असे. परंतु स्त्री आठ वर्षांची झाली की पति-गृह-प्रवेश करीत असे आणि हेंच तिचें उपनयन होतें. पतीच्या घरचे संस्कार समजून घ्यायचे, शिकायचे हेंच तिचें अध्ययन असे. म्हणून आठ वर्षाच्या मुलीचा विवाह वीस वर्षांच्या ब्रह्मचाऱ्याशी होत असे. ही प्राचीन योजना होती.

वर्णाश्रमांची आरंभी काय स्थिति होती ? वेदांत गार्गी, मैत्रेयी, कात्यायनी आदींचीं नांवें येतात. यांच्यापैकी कात्यायनी व मैत्रेयी तर याज्ञवल्क्याच्या स्त्रिया होत्या. या उदाहरणांतून उपनयनाविषयीचें काही प्रमाण मिळत नाही. स्त्री आणि शूद्र यांच्यांत संस्काराच्या दृष्टीने काही फरक नव्हता. दोघांना वैदिक कर्मांचा व वेदाध्ययनाचा अधिकार नव्हता. ब्राह्मण स्त्रीलाहि हा अधिकार नव्हता. स्त्रीने एखादें धार्मिक कर्म केलें तरी त्यात वेदमंत्र नसतो ही आपली आजपर्यंतची परंपरा आहे.

### चार आश्रम

स्त्रीला सहधर्मिणी म्हणतात. तिचा स्वतंत्र धर्म काहीच नाही. पुरुषाचा धर्म तोच तिचा धर्म. परंतु, पुरुषाच्या धर्मातहि, अर्जुनाच्या बरोबर सुभद्रा किंवा अभिमन्यूबरोबर उत्तरा किंवा रामचंद्राबरोबर सीता युद्धासाठी रणांगणात गेल्या नाहीत. क्षत्रियस्त्रिया किंवा राजपुतांच्या स्त्रियाहि युद्धाच्या वेळीं रडत बसत किंवा मग जोहार करीत असत. वैश्यस्त्रिया स्वतंत्रपणे धनप्राप्ति करीत नसत.

वर्णव्यवस्थेचा आणि आश्रमव्यवस्थेचा मुख्य संबंध पुरुषांच्या जीवनाशी असे. हा फरक लक्षात यावा यासाठी मी हा विषय आपल्यासमोर मांडला.

स्त्रीपुरुषांत जो प्राकृतिक भेद आहे तो राहील. त्या भेदाचें कोणी निराकरण करू शकत नाही. परंतु असा प्राकृतिक भेद असूनहि स्त्रीपुरुषांतील सामान्य मनुष्यत्वाचा विकास आम्हाला करायचा आहे. स्त्री स्त्री राहील, पुरुष पुरुष राहील; परंतु दोघे माणूस बनतील. आज स्त्रीला माणूस बनण्याची संधि दिली जात नाही. त्यासाठी तिच्या शिक्षणाची व्यवस्था झाली पाहिजे. केवळ पतीच्या घरच्या संस्कारांचें शिक्षण नव्हे. पतीच्या घरीं स्वयंपाक करणें, मुलांना वाढवणें, कपडे धुणें, कशिदा काढणें एवढें शिक्षण पुरेसें नाही. तिला साक्षरतेचें आणि उदार शिक्षण मिळालें पाहिजे. असें शिक्षण स्त्रियांना मिळत नाही. संस्कृत भाषा राष्ट्रभाषा झाली पाहिजे कारण हिच्यातूनच साऱ्या भाषा निघाल्या आहेत असा वाद मांडला जातो. पूर्वी केव्हा संस्कृत सर्वांची भाषा राहिली याचा पत्ता नाही ! कारण साहित्यात, संस्कृत नाटकातून पुरुष संस्कृतात बोलतात, पण स्त्रिया प्राकृतात बोलतात. सीता रामचंद्राशी प्राकृतात बोलते. रामचंद्राला ती अज्जउत्त म्हणते. स्त्रीची भाषा म्हणजेच प्राकृत भाषा होती.

हा फरक नाहीसा करण्यासाठी स्त्रियांना उच्च शिक्षण मिळणें आवश्यक आहे. एक मातृत्वाचा फरक सोडून स्त्रीपुरुषांचें शिक्षण पुष्कळसें समान असलें पाहिजे. शरीरपरिश्रम असलेलीं जड कामें स्त्रिया करू शकणार नाहीत ही गोष्ट वेगळी. स्त्रीवर मातृत्वाची जाबबदारी असते. परंतु आज तर ज्याला आपण घरातील नोकराचीं कामें म्हणतो तीं सारीं स्त्रीच करीत असते. कामाचे दोन प्रकार असतात. Manual Labour (शरीरश्रमाचें काम) आणि Minial work (नोकराचाकराचें

काम). सडासारवण करणे, पाणी भरणें, दळणें, झाडणें हीं सर्व अप्रतिष्ठित कामें स्त्री करीत असते. तरीहि पुरुष म्हणत राहतो की स्त्री कमजोर आहे म्हणून आम्ही अवजड कामें तिच्याकडून करवीत नाही ? नोकराचीं कामें स्वत: करणें पुरुषाला कमीपणाचें वाटतें. तो जर थोडा पैसेवाला बनला तर आपल्या स्त्रीलाहि तो तीं कामें करू देत नाही. परंतु त्याच्या घरीं जो स्वयंपाकी असेल त्या स्वयंपाक्याच्या घरीं त्याची बायकोच स्वयंपाक करील, तो स्वत: करणार नाही. कोणी पुरुष दुसऱ्याकडे पाणी भरीत असेल तर त्याच्या घरीं त्याची बायकोच पाणी भरण्याचें काम करील. स्त्रीपुरुषांच्या परिश्रमात दिसणारा हा भेद समाप्त झाला पाहिजे.

**ब्रह्मचर्याश्रम**

पुरुषहि भोजन बनवण्यात प्रतिष्ठा मानू लागेल तेव्हा या कामाची प्रतिष्ठा वाढेल. स्वयंपाक करून दुसऱ्याला जेवायला घालणें हें प्रत्यक्ष परिश्रमाचें आणि संरक्षणात्मक कार्य आहे, तो प्रत्यक्ष पोषणाचा कार्यक्रम आहे. आज पुरुष स्वयंपाकी आहे पण तो पैसे कमावण्यासाठी. स्वतःच्या घरीं तो स्वयंपाकी नाही. राजसूय यज्ञात स्वयंपाकाचें काम हजार हत्तींची शक्ति असलेल्या भीमाला देण्यात आलें. म्हणून स्त्रीपुरुषांच्या कामांत हलके, भारी असा फरक असावा; परंतु मातृत्वासंबंधी शिक्षण सोडून इतर काहीहि फरक नसावा. याचा अर्थ हा की दोघांनाहि ब्रह्मचर्याश्रम असला पाहिजे. ब्रह्मचर्याश्रमासाठी जुन्या पद्धतीचें गुरुगृह असावें की आजच्यासारखे आश्रम असावेत हा वेगळा मुद्दा आहे. सध्या कदाचित् मुलामुलींना वेगळें रहावें लागेल, परंतु लवकरच अशी वेळ आली पाहिजे की सहशिक्षणाबरोबर,

सहनिवासहि झाला पाहिजे. सहपरिश्रम, सहशिक्षण, सहभोजन यांसाठी सहनिवास हवा.

ब्रह्मचर्य-आश्रमाचें स्वरूप काय असेल ? पूर्वीच्या गुरुकुलांत आणि आश्रमात ब्रह्मचारी राहत असत. तेथे गुरुपत्नी किंवा गुरुकन्या यांच्याखेरीज दुसऱ्या स्त्रिया राहत नसत. परंतु हा क्रम आता पुढे चालवला पाहिजे. कौटुंबिकता वाढविण्यासाठी याची जरूरी आहे. छात्रालयात तरुण पुरुष आणि स्त्रिया राहतात, विद्यालयात तरुण मुलेंमुली शिकतात, परंतु त्यांचा परस्परांशी काही संबंध नाही. भाऊबहिणीचें नातें त्यांच्या चित्तात ठसवलें पाहिजे. छोटया छोटया खेडयांत आजहि हें नातें दिसून येतें. दुसऱ्या गावी दिलेली मुलगी माहेरी येते तेव्हा ती साऱ्या गावाची मुलगी होते. असेंच आपल्या शिक्षणसंस्थांमधून कौटुंबिक भावनेचा विस्तार झाला पाहिजे.

या कौटुंबिक भावनेच्या विस्ताराबरोबर पवित्रता कशी येईल ? फार धाडसाचे प्रयोग आहेत. जेथे संघटना आहे आणि नियमन आहे–मी प्रशासन म्हणत नाही–तेथे स्त्री आणि पुरुष दोघांसाठी काही असे नियम बनवावे लागतील की ज्यामुळे हळूहळू त्यांच्यात कौटुंबिकता निर्माण होईल. सगळींच विद्यालयें कौटुंबिक विद्यालयें झालीं पाहिजेत. हा शब्द विनोबांचा आहे. छत्तीस वर्षांपूर्वी 'महाराष्ट्र धर्म' त्यांनी या शब्दाचा प्रयोग केला होता. या विद्यालयात दोघांचें जीवन वेगळें असू नये. वेगळें असलें तरी कमीत कमी वेगळें असावें. तेथे Isolation –विविक्त जीवन–नसावें. लाला लाजपतरायांनी राष्ट्रीय शिक्षणावर एक पुस्तक लिहिलें आहे. त्यात त्यांनी म्हटलें आहे :

"तरुण मुलेंमुली गुरुकुलातून बाहेर पडताच पहिल्याच मोहाला बळी पडतात. याचें कारण असें आहे की आतापर्यंत

मुलगा गुरुकुलात ब्रह्मचारी राहिला याचा आधार होता स्त्री-पासून दूर राहणें! आणि मुलींच्या ब्रह्मचर्याचा आधार होता, पुरुषापासून दूर राहणें. दोघांना एकमेकांच्या सान्निध्याची सवय नाही, म्हणून पहिली संधि येताच दोघेहि डगमगले."

याला Isolation म्हणतात. आता शिक्षणात हें होता कामा नये. सहशिक्षण किती असावें याची मर्यादा ठरवता येईल. गांधींची जी हिंमत असेल त्यापेक्षा कृष्णमूर्तींची निराळी असेल. प्रत्येक जण आपल्या हिंमतीप्रमाणे प्रयोग करील. एवढेंच आहे की दोघांचा जीवनक्रम फार वेगळा नसावा. नाही तर दोघांना एकमेकांच्या सान्निध्यात राहण्याची सवयहि होणार नाही आणि परिवाराबरोबर पवित्र सहजीवन शक्य होणार नाही. पवित्र सहजीवन वारंवार म्हणण्यामागे माझें तात्पर्य हें आहे की आजहि स्त्रीपुरुष एकमेकांबरोबर राहतात, पण बुजल्याप्रमाणे, संकोचून, लज्जित होत, घाबरत घाबरत! हें सहजीवन नाही. त्यात स्नेहाची मात्रा अधिक असली पाहिजे, पवित्रतेची भावना परिपूर्ण असली पाहिजे. हें आपल्यापरीने ब्रह्मचर्याचें शिक्षण आहे. हा संस्कार वातावरणातून आणि पुष्कळसा प्रत्यक्ष जीवनातूनच दिला जातो.

सन १९०६ मध्ये राष्ट्रीय शिक्षणासंबंधी जी पहिली समिति बनली तिचे मंत्री श्री अरविंद होते. त्यांनीहि राष्ट्रीय शिक्षणावर एक पुस्तक लिहिलें. त्यात 'नैतिक शिक्षणा' वर एक परिच्छेद आहे. त्यात म्हटलें आहे की नैतिक शिक्षण ग्रंथातून आणि शब्दातून दिलें जात नाही. ग्रंथ आणि शब्द यांचें शिक्षण सफल, सार्थक होत नाही. कारण नैतिक शिक्षण हृदयाचा संस्कार आहे आणि हृदय व बुद्धि यांत अंतर आहे.– Precisely

because the heart is not the head. बुद्धिमार्फत दिलें गेलेलें शिक्षण हृदयाची संपन्नता प्राप्त करवून देत नाही. भोवतालची परिस्थिति, तेथे राहणाऱ्या व्यक्ति आणि परिस्थितीमुळे आणि त्या व्यक्तींच्या जीवनामुळे होणारे संस्कार यांतूनच खरें नैतिक शिक्षण होत असतें. नैतिक शिक्षणहि काही मर्यादेपर्यंत शाब्दिक अवश्य राहील ; परंतु मुख्य शिक्षण वातावरणातून मिळेल. हें वातावरण बनवण्याचें काम मुले व मुली दोघांनी करावयाचें आहे. आता स्त्री आणि पुरुष दोघांच्या सहजीवनात निर्भयता आली पाहिजे.

निर्भयतेचा अभ्यास काही प्रमाणात कुटुंबातच होईल. पण मूल पांच वर्षांचें झालें की तें कुठल्यातरी शाळेत, विद्यालयात जायला लागतें. या संस्थामध्ये तर निर्भयतेचा अभ्यास होत नाही. यामुळे साराच्या सारा समाज नष्ट-भ्रष्ट होईल. त्यात कसलीहि पवित्रता उरणार नाही. ब्रह्मचर्याश्रम मुलांना व मुलींना समान लागू झाला पाहिजे. ब्रह्मचर्याचा अभ्यास पृथक् जीवनात नाही, सहजीवनात झाला पाहिजे. सहशिक्षण आवश्यक आहे. सहजीवनाची मर्यादा, काळ आणि सामर्थ्य यांना अनुसरून, त्याचप्रमाणे संस्थेच्या संचालकांत आणि विद्यार्थ्यांत जेव्हा व जेवढी हिंमत असेल तेव्हा व तेवढी असेल. यात विद्यार्थ्यांच्या संकल्पाचीहि जरूर लागेल. प्रौढ विद्यार्थ्यांचा संकल्प असला पाहिजे की आमचें सहशिक्षण होईल आणि सहजीवनहि होईल. विद्यार्थ्यांच्या सहजीवनाची आणि सहशिक्षणाची योजना विश्वविद्यालयाच्या अधिकाऱ्यांनी बनवावी आणि विद्यार्थ्यांनी समजावें की 'आपल्याला ही एक संधि मिळाली,' असें होऊ नये. अशा परिस्थितीतून शुद्ध सहजीवन निष्पन्न होणार नाही. म्हणून सहजीवनासाठी मुलामुलींचा संकल्प हवा.

मुलगा गुरुकुलात ब्रह्मचारी राहिला याचा आधार होता स्त्री-पासून दूर राहणें ! आणि मुलींच्या ब्रह्मचर्याचा आधार होता, पुरुषापासून दूर राहणें. दोघांना एकमेकांच्या सान्निध्याची सवय नाही, म्हणून पहिली संधि येताच दोघेहि डगमगले."

याला Isolation म्हणतात. आता शिक्षणात हें होता कामा नये. सहशिक्षण किती असावें याची मर्यादा ठरवता येईल. गांधींची जी हिंमत असेल त्यापेक्षा कृष्णमूर्तींची निराळी असेल. प्रत्येक जण आपल्या हिंमतीप्रमाणे प्रयोग करील. एवढेंच आहे की दोघांचा जीवनक्रम फार वेगळा नसावा. नाही तर दोघांना एकमेकांच्या सान्निध्यात राहण्याची सवयहि होणार नाही आणि परिवाराबरोबर पवित्र सहजीवन शक्य होणार नाही. पवित्र सहजीवन वारंवार म्हणण्यामागे माझें तात्पर्य हें आहे की आजहि स्त्रीपुरुष एकमेकांबरोबर राहतात, पण बुजल्याप्रमाणे, संकोचून, लज्जित होत, घाबरत घाबरत ! हें सहजीवन नाही. त्यात स्नेहाची मात्रा अधिक असली पाहिजे, पवित्रतेची भावना परिपूर्ण असली पाहिजे. हें आपल्यापरीने ब्रह्मचर्याचें शिक्षण आहे. हा संस्कार वातावरणातून आणि पुष्कळसा प्रत्यक्ष जीवनातूनच दिला जातो.

सन १९०६ मध्ये राष्ट्रीय शिक्षणासंबंधी जी पहिली समिति बनली तिचे मंत्री श्री अरविंद होते. त्यांनीहि राष्ट्रीय शिक्षणावर एक पुस्तक लिहिलें. त्यात 'नैतिक शिक्षणा' वर एक परिच्छेद आहे. त्यात म्हटलें आहे की नैतिक शिक्षण ग्रंथातून आणि शब्दातून दिलें जात नाही. ग्रंथ आणि शब्द यांचें शिक्षण सफल, सार्थक होत नाही. कारण नैतिक शिक्षण हृदयाचा संस्कार आहे आणि हृदय व बुद्धि यांत अंतर आहे. – Precisely

because the heart is not the head. बुद्धिमार्फत दिलें गेलेलें शिक्षण हृदयाची संपन्नता प्राप्त करवून देत नाही. भोवतालची परिस्थिति, तेथे राहणाऱ्या व्यक्ति आणि परिस्थितीमुळे आणि त्या व्यक्तींच्या जीवनामुळे होणारे संस्कार यांतूनच खरें नैतिक शिक्षण होत असतें. नैतिक शिक्षणहि काही मर्यादेपर्यंत शाब्दिक अवश्य राहील ; परंतु मुख्य शिक्षण वातावरणातून मिळेल. हें वातावरण बनवण्याचें काम मुले व मुली दोघांनी करावयाचें आहे. आता स्त्री आणि पुरुष दोघांच्या सहजीवनात निर्भयता आली पाहिजे.

निर्भयतेचा अभ्यास काही प्रमाणात कुटुंबातच होईल. पण मूल पांच वर्षांचें झालें की तें कुठल्यातरी शाळेत, विद्यालयात जायला लागतें. या संस्थामध्ये तर निर्भयतेचा अभ्यास होत नाही. यामुळे साराच्या सारा समाज नष्ट-भ्रष्ट होईल. त्यात कसलीहि पवित्रता उरणार नाही. ब्रह्मचर्याश्रम मुलांना व मुलींना समान लागू झाला पाहिजे. ब्रह्मचर्याचा अभ्यास पृथक् जीवनात नाही, सहजीवनात झाला पाहिजे. सहशिक्षण आवश्यक आहे. सहजीवनाची मर्यादा, काळ आणि सामर्थ्य यांना अनुसरून, त्याचप्रमाणे संस्थेच्या संचालकांत आणि विद्यार्थ्यांत जेव्हा व जेवढी हिंमत असेल तेव्हा व तेवढी असेल. यात विद्यार्थ्यांच्या संकल्पाचीहि जरूर लागेल. प्रौढ विद्यार्थ्यांचा संकल्प असला पाहिजे की आमचें सहशिक्षण होईल आणि सहजीवनहि होईल. विद्यार्थ्यांच्या सहजीवनाची आणि सहशिक्षणाची योजना विश्व-विद्यालयाच्या अधिकाऱ्यांनी बनवावी आणि विद्यार्थ्यांनी समजावें की 'आपल्याला ही एक संधि मिळाली,' असें होऊ नये. अशा परिस्थितीतून शुद्ध सहजीवन निष्पन्न होणार नाही. म्हणून सह-जीवनासाठी मुलामुलींचा संकल्प हवा.

## गृहस्थाश्रम

यानंतर येतो गृहस्थाश्रम. गृहस्थाश्रमाचा मुख्य आधार प्रेम असला पाहिजे. प्रेम जितकें अधिक, शारीरिकता तितकी कमी. शारीरिकता कमी करायला गृहस्थाश्रमात एक मोठा अवसर आहे. तो म्हणजे अपत्य. अपत्यात आईचें आणि बापाचें, दोघांचें जीवन केंद्रित होतें. स्त्रीचें स्त्रीत्व मातृत्वात आणि पुरुषाचें पुरुषत्व पितृत्वात लीन होतें. अपत्यासाठी केलेल्या त्यागाला कोणी त्याग मानीत नाही, आनंद मानतात.

गृहस्थधर्माची दुसरी विशेषता आहे आतिथ्य. दान वेगळी वस्तु आहे. आतिथ्यात दानाची भावना नाही. समाज असा असला पाहिजे, ज्यात दानाची आवश्यकताच राहू नये आणि सेवेची आवश्यकता कमीत कमी असावी. गरीबीतून, संकटातून सर्वांची सुटका व्हावी. सेवेची जरूर संकटात असते. दानाची जरूर गरीबीत असते. या दोहोंचीहि जरूर दुनियेतून नाहीशी व्हावी. मग आतिथ्याचा अर्थ काय ? आतिथ्याचा अर्थ आहे, कुटुंबाच्या पाहुण्याचें, पारिवारिक अतिथीचें, स्वजनासारखें स्वागत. पारिवारिक सहयोगाचें साधन सहजीवन असावें. अतिथीच्या आगमनाने आनंद होतो की आता बाहेरचें एक माणूस काही दिवस आपल्यात कुटुंबीयांप्रमाणे राहणार.

आतिथ्यभावना परिवाराला व्यापक बनवते. पण हें आतिथ्य प्रेमयुक्त असलें पाहिजे, केवळ व्यवस्थायुक्त नाही. त्यात जितकी हार्दिकता राहील तितकी कौटुंबिकता असेल. स्नेहभावना फार महान वस्तु आहे. आपल्या प्रत्येकाच्या घरीं उत्तम स्वयंपाक बनतो. माझ्याकडच्यापेक्षा तुमच्याकडे जास्त

चांगले पदार्थ बनले आहेत, परंतु तुम्ही मौजेने माझ्या घरीं येता आणि मी फार खुश होऊन, फार उत्सुकतेने माझ्या घरातील सर्वात उत्तम पदार्थ तुमच्यासमोर ठेवतो. तुम्ही खाता आणि मला प्रसन्नता वाटते. याला आतिथ्य म्हणतात. ही आतिथ्याची भावना प्रत्येक कुटुंबात असली पाहिजे आणि प्रत्येक संस्थेत दाखल झाली पाहिजे.

शिक्षणसंस्था कौटुंबिक बनाव्यात असा आपला प्रयत्न आहे, पण आज नेमका उलटा प्रकार आहे, संस्थाची यांत्रिकता परिवारात दाखल होत आहे. मी अशा कुटुंबातून राहिलो आहे, जेथे ताजमहाल हॉटेलापेक्षाहि जास्त चांगली व्यवस्था होती. तेथील स्वयंपाकी दोनदोन तासांनी येऊन मला विचारीत असे, 'आपण काय खाणार' म्हणून. शोफर येऊन विचारीत असे, बाहेर जायचें आहे ? पण त्या घरच्या यजमानांची व माझी भेट फक्त दोनदाच झाली ! एकदा मी आलो तेव्हा मोटारीतून उतरतांना आणि दुसऱ्यांदा मी परत जातांना मोटारीपर्यंत पोचवायला आले तेव्हा ! निरोप देताना म्हणू लागले, आपण येथे आलात फार चांगलें झालें, आम्हाला फार आनंद झाला. आता आपण जात आहात तर बरें वाटत नाही. मी त्यांच्या घरीं होतो तेव्हा तिकडे आपल्या खोलीत त्यांना आनंद होता आणि मी चाललो तेव्हा त्यांना दुःखहि झालें ! यात कोणती मानवता, मित्रता आणि हार्दिकता आहे ?

म्हणून मी आतिथ्य म्हणतो तेव्हा व्यवस्थेविषयी बोलत नाही. आपण विचार करीत असलेल्या समाजात व्यवस्था असेल आणि त्या व्यवस्थेत कौटुंबिकतेचा सुगंध असेल. गृहस्थाश्रमातील कौटुंबिकता संस्थेत दाखल व्हावी, पण संस्थेची यांत्रिकता

कुटुंबात येऊ नये अशा परिवर्तनाची आता आवश्यकता आहे. शेवटीं स्त्रीपुरुषांच्या सहजीवनाचें शिक्षण देणारी संस्था कुटुंबच आहे. समाजाची गुरुकिल्ली गृहस्थाश्रम आहे. चार आश्रमांत हा केंद्रीय आश्रम आहे. चार आश्रमांत सूर्याचें स्थान या आश्रमाला देता येईल. कारण साऱ्या समाजात मान्य होणाऱ्या मूल्यांची नर्सरी गृहस्थाश्रम असेल.

**वानप्रस्थाश्रम**

यानंतर वानप्रस्थाश्रम. यातहि पूर्वी मुख्य संकल्प पुरुषाचाच होत असे, त्यात स्त्रीची केवळ सहमति किंवा अनुमति असे. संन्यासातहि स्त्रीची केवळ अनुमति, आणि तरीहि ती पुरुषाबरोबर राहू शकत नसे. वानप्रस्थाश्रमात बरोबर राहत असे. आज कौटुंबिकता समाजव्यापी बनली आहे. आता आपला मुलगा आपला म्हणून चालणार नाही. समाजातील सारींच मुलें आपलीं होतील. सगळ्या मुली आपल्या मुली होतील. अशाप्रकारें कौटुंबिक भावना व्यापक बनण्याने समाजात कौटुंबिक संबंध स्थापित होतात. अमुक पुरुष आणि अमुक स्त्री यांचे कधी काळीं एक संस्कार होऊन लग्न झालें होतें. त्या संस्काराच्या जेवढ्या खुणा राहिल्या त्या राहिल्या; परंतु आता ते पतिपत्नी नाहीत. ते दोघेजण आता वानप्रस्थ आहेत. त्यांच्या जीवनात सख्यभावना प्रधान आहे. ते दोघे परस्परांचे मित्र आहेत.

आज समाजात प्रौढ कुमारिकांचें प्रमाण वाढलें आहे, अशा परिस्थितीत वानप्रस्थी व्यक्तींची फार आवश्यकता आहे. ज्या समाजात विश्वविद्यालयाचें शिक्षण दिलें जात आहे, त्या समाजात अशा मुलींना घराच्या बाहेर आईबाप असणार

नाहीत ? समाजात ज्या तरुण स्त्रिया आणि प्रौढ कुमारिका शिक्षण घेत आहेत किंवा सामाजिक कार्यात लागल्या आहेत त्यांना असा विश्वास वाटला पाहिजे की या समाजात माझे अनेक आईबाप आहेत.

म्हणून आता तो वानप्रस्थ वनात जाणार नाही. कुटुंबातून बाहेर पडून त्याला समाजात यायचें आहे. तो वनात गेला तर ही भावना समाजव्यापी बनणार नाही. उतारवयाच्या स्त्रीपुरुषांमध्ये कौटुंबिक भावना इतकी परिपक्व झाली पाहिजे की पति-पत्नी हें नातें घरात, बाहेर कोठेच त्यांच्यासाठी उरता कामा नये. मातृत्वाच्या-पितृत्वाच्या भावनेमधे त्यांनी तन्मय होऊन जावें. यामुळे तरुणतरुणींसाठी वातावरणात एक आश्वासन निर्माण होईल. साऱ्या समाजात हें वातावरण निर्माण होईल तेव्हा वानप्रस्थ सामाजिक मूल्य बनेल. याचा आरंभ शिक्षण संस्थांत झाला पाहिजे.

**संन्यासाश्रम**

शेवटीं येतो संन्यास. आजच्या समाजात संन्यासी नाहीत, ते असले पाहिजेत. 'संन्यासी'चा एक अर्थ आहे, सर्वात मोठी व्यक्ति. स्वत:साठी काही मिळवावयाचें आहे ही भावना ज्याच्यातून नष्ट झाली आहे, ती व्यक्ति समाजातीत झाली. किशोरलालभाईंच्या मृत्यूनंतर सर्वोदयात त्यांच्याबद्दल लिहिताना मी म्हटलें होतें की समाजात ते वसिष्ठसत्तेचे प्रतिनिधि होते. रामराज्यात वसिष्ठाची सत्ता होती. आज असा एक नियम आहे की न्यायाधीशावर कोणाचीच—पार्लमेंटचीदेखील-सत्ता चालणार नाही. पार्लमेंटला कायदा बनवण्याची सत्ता

आहे. न्यायाधीश कोणाला आणि कसें नेमावें याविषयीहि पार्लमेंट कायदा बनवू शकते. पण एकदा न्यायाधीश बनल्यावर मग त्याच्यावर राष्ट्रपतीचीहि सत्ता चालणार नाही. न्यायाधीश सत्तातीत असतो. राघोबा पेशव्याने आपल्या पुतण्याचा खून करवला तेव्हा रामशास्त्री न्यायाधीश होते. राघोबांना प्रायश्चित्त काय म्हणून विचारलें, तेव्हा रामशास्त्री म्हणाले, धर्मशास्त्रात खून करणाऱ्यासाठी एकच शिक्षा आहे, फाशी. राघोबा म्हणाला राज्य माझें आहे, शिक्षा माझ्याच आज्ञेने होईल. यावर रामशास्त्री म्हणाले, 'मी हा न्याय देत आहे की आपल्याला फाशीची शिक्षा झाली पाहिजे. ज्या राज्यात खुनी माणसाला न्यायाप्रमाणे शिक्षा होत नाही त्या राज्यात मी पाणीहि पिणार नाही. आपण माझी जीभ छाटून टाकली तरी हरकत नाही, पण मी आपल्याला हीच शिक्षा सांगणार, दुसरी नाही.' आणि असें म्हणून ते राघोबाचें राज्य सोडून निघून गेले होते.

असा स्वतंत्र न्यायाधीश तोच होऊ शकतो, ज्याला आपलें असें जीवन उरलें नाही, जो सामाजिक मानव बनला आहे. विनोबा त्याला विश्वमानव म्हणतात. त्याचा स्वतःचा असा कोणता देश नाही, कोणता समाज नाही, त्याचे स्वतःचें काही कुटुंब नाही असा तो निस्त्रैगुण्य–त्रिगुणातीत झाला. हें त्याचें एक लक्षण आहे.

आपल्याकडे संन्यासी पूर्वाश्रमीचें नांव बदलतात. स्त्रिया लग्नानंतर नांव बदलतात आणि पुरुष संन्यासी झाल्यानंतर नांव बदलतो. नांव बदलण्याचा अर्थ हाच आहे की आतापर्यंतच्या त्याच्या नागरिकतेचा अंत झाला. त्याचा Civic Death सामाजिक मृत्यु झाला. जंगलात निघून जाणें ही तर बाह्य प्रक्रिया आहे.

सामाजिक मृत्यूचा अर्थ आहे की समाजाकडून मला आता कसलीहि अपेक्षा नाही. मी जो परिश्रम करीन तो स्वतःच्या उपार्जनासाठी नाही, आपल्या चरितार्थासाठी नाही. माझा स्वतःचा असा चरितार्थ आता उरला नाही. म्हणून तो आपलें नांव बदलतो. भविष्यात नांव जरी बदललें नाही तरी, त्याने हें मानून घेतलें पाहिजे की, मला आता मत राहिलें नाही, समाजात माझा कोणी प्रतिनिधि नाही आणि मी कोणाचा प्रतिनिधि नाही. समाजात अशा काही व्यक्ति असल्या पाहिजेत ज्यांचा शब्दच उपदेश ठरेल. '**यास्तेषां स्वैरकथास्ता एक भवन्ति शास्त्राणि**–अशा पुरुषांचे स्वैर कथालाप, धीरेंद्रभाई ज्याला गपशप म्हणतात, पण शास्त्र-उपदेश असतात. ते दुसरें काही बोलूच शकत नाहीत. अशा पुरुषांचें समाजात अनुशासन चालतें. रामराज्यात म्हटलें आहे यति जंगलात जाणार नाही. ज्यांना आता समाजाकडून काहीहि नको आहे अशा यतींच्या हातात राज्यदंड सोपवला जावा. अशा व्यक्तींकडून जें शिक्षण समाजाला दिलें जाईल त्याच्या बदल्यात त्यांना कशाचीहि अपेक्षा नाही. त्यांच्या स्वैर कथालापांतहि शक्ति असते. अशा प्रकारच्या पुरुषाला समाज संन्यासी म्हणतो. अशा व्यक्ति कमीच असतील. विधिविधानाने अशा व्यक्ति निर्माण करता येत नाहीत.

शांति-सैनिक विद्यालय
साधना-केंद्र, काशी
१-१-६१ ते ५-१-६१.

## परिशिष्ट : २

(१९५३-५४ सालीं दादांनी मुंबई-पुण्यात स्त्री-जीवनावर भाषणें केलीं होतीं. त्यांतील १. सौभाग्याकांक्षा २. मातृत्वाकांक्षा ३. पुरुषनिर्भरता या मुद्यांवर 'साधना' साप्ताहिक व 'स्त्री' मासिक यांत बरीच उलट सुलट चर्चा झाली होती. कै० काकासाहेब बर्वे, श्री. शंकरराव देव, श्री. मालतीबाई बेडेकर, श्री. चंद्रकलाबाई हाटे, श्री. सीताबाई परुळेकर आदि प्रसिद्ध व्यक्तींनी त्या चर्चेत भाग घेतला होता. त्या साऱ्या चर्चेच्या उत्तरात दादांनी जो लेख प्रसिद्ध केला होता तो येथे देत आहोत. —प्रकाशक)

स्त्री-जीवनाच्या मुद्यावर महाराष्ट्रात गेले सहा महिने उद्बोधक चर्चा चालू असल्याचें मला कळून आलें आहे. माझ्या मतांचा मूलग्राही विचार आस्थापूर्वक करण्यात आला हा माझा फार मोठा गौरव आहे. या चर्चेत अनेक प्रगतिपरायण, सुविद्य आणि प्रबुद्ध स्त्रियांनीहि भाग घेतला, याबद्दल विशेष धन्यता वाटते. आमचे वडीलधारे सुहृद् व आप्त श्री. शंकराव देव यांनी एक मीमांसात्मक, ओजस्वी आणि कळकळीचा लेख लिहून चर्चेत मोलाची भर घातली. निदान एका तरी ब्रह्मचर्य-संपन्न विवेकी व समाजसेवानिरत पुरुषाने या चर्चेत भाग घेण्याइतके महत्त्व या जिह्वाळयाच्या विषयाला दिलें याबद्दल समाधान वाटतें. एखाद्या नैष्ठिक ब्रह्मचारिणीनेहि आपले विचार व्यक्त केले असते तर या सगळ्या चर्चेला अधिक सांगता आली असती. सतत प्रवासात असल्यामुळे फारच थोडे लेख वाचण्याचें

भाग्य मला लाभलें. तरी त्यापासून मला पुष्कळ बोध घेता आला. ज्यांनी ज्यांनी कृपापूर्वक हें बुद्धिदान दिलें त्या सगळ्यांचे माझ्यावर थोर उपकार झाले आहेत.

**माझी भूमिका**

कोणालाहि उत्तर देण्याची माझी वृत्ति आणि अधिकारहि नाही. समाजातील जिवंत, प्रचलित प्रश्नांविषयी तत्त्वजिज्ञासेच्या दृष्टीने विचार करून आपले निष्कर्ष प्रांजलपणें व नम्रपणें सादर करावे एवढीच माझी भूमिका आहे. याप्रकरणीं एवढेंच मला निवेदन करावयाचें आहे की ही सगळी चर्चा माझ्या लेखावर झालेली नाही. 'साधने'तील ज्या मजकुराचा उल्लेख माझा लेख म्हणून सतत करण्यात आला, तो मजकूर मी लिहिलेला किंवा सांगितलेला नाही. त्यात माझ्या मतांचा विपर्यास नसला, तरी त्यांतलीं वाक्यें अथवा शब्द सगळेच माझे नाहीत. शब्द माझे असले, तरी वाक्यांत ते ज्या अनुक्रमाने व ज्या संदर्भात मांडलेले असतात त्यावर असंदिग्ध अर्थबोध होणें अवलंबून असतें. पुण्यातील काही स्नेहशील मैत्रिणींनी मला मुद्दाम बोलावून घेण्याची कृपा केली. त्यांनी मोठ्या ऋजुतेने काही प्रश्न माझ्यापुढे मांडले. त्या प्रश्नांची यथामति विशद उत्तरें दिलीं. त्या उत्तराचें संकलन 'साधने'तील मजकुरात आलें आहे. माझ्यावर कुठल्याहि प्रकारचा अन्याय होऊ नये म्हणून माझ्या भूमिकेशी शक्य तितकें समरस होण्याचा प्रयत्नहि त्या संकलनात केला आहे. त्यात चूक किंवा दोष कुणाचाच्या नाही. पण तो मजकूर कशा स्वरूपाचा होता हें वाचकांचा निदर्शनाला आणून देणें जरूरीचें आहे म्हणून एवढें निवेदन केलें.

आता कुठल्याहि विशिष्ट लेखाला उत्तर देण्याचा प्रयत्न न करता मी माझी भूमिका शक्य तितक्या स्पष्टपणें आणि थोडक्यात मांडणार आहे.

पुत्र, भाऊ, पिता व पति या नात्यांनी स्त्रीच्या भूमिके-विषयी व जीवनाविषयी मला जें वाटलें आणि विचारांतीं पटलें तेवढेंच मी प्रतिपादन करीत आलो आहे. 'साधने'तील मजकुरात माझ्या मतांचा विपर्यास सहसा झालेला नाही; पण भाषा पुष्कळशी संदिग्ध राहून गेलेली आहे. त्यामुळे गैरसमजाला वाव मिळाला. श्री मालतीबाई बेडेकर यांचा आणि माझा मतभेद असण्याचें मुळीच कारण नाही, अशी माझी खात्री त्यांचा लेख वाचल्यानंतर झाली. माझें म्हणणें माझ्याच शब्दांत समग्र त्यांनी कोठेच वाचलेलें नसावें, म्हणून माझ्या मतांविषयी अनुमानें करून त्यांना काही विधानें करावीं लागलीं ! तरी पण त्यांच्या लेखाच्या उपसंहारातील निष्कर्ष बऱ्याच अंशीं मला मान्य होण्या-सारखे आहेत. पुरुषाकरिता जी पुस्ती त्यांनी सुचवली आहे, तशा प्रकारची सूचना पुरुषांच्या सभातून मी करीत असतो. पण स्त्रियांच्या सभेत तशा प्रकारची सूचना करणें मला अनावश्यकच नव्हे तर अनिष्टच वाटतें. स्त्रीचें जीवन स्वायत्त व आत्मनिर्भर असावें असा माझा कटाक्ष आहे.

**पुरुषनिरपेक्ष जीवन**

'पुरुषनिरपेक्ष जीवनाचा संकल्प करा' अशी बिनंति मी स्त्रियांना केली. 'पुरुषनिरपेक्ष जीवन' म्हणजे 'पुरुष-विरहित' जीवन नव्हे. आज स्त्रीचें शिक्षण, तिचें कर्तृत्व, परिश्रम आणि आयुष्य पुरुषाधीनच नव्हे तर पुरुषाकरिता आहे ! ती पुरुषनिष्ठ आहे. यापुढे तिचें जीवन तसें राहू नये, हा त्या संकल्पाचा अर्थ

आहे. स्त्रीने पुरुषांबरोबर जगावें, अत्यंत प्रेमाने जगावें; पण त्याच्या भरवशावर जगू नये. पुरुष स्त्रीबरोबर जगतो, पण तिच्या भरवशावर जगत नाही. स्त्रीला पुरुषाची नुसती सोबतच नको आहे तर त्याचा आधार व संरक्षणहि हवें आहे. हा दोघांच्या भूमिकेतील मूलभूत फरक आहे.

'सौभाग्याकांक्षा सोडा' असें मी म्हणत असतो. पण 'विवाहाकांक्षा सोडा' असें मी म्हटलेलें नाही. विवाहाकांक्षा स्त्री आणि पुरुष या दोघांनाहि समान आहे. पण विवाहाकांक्षेचा जो संयम करतो तो पुरुष श्रेष्ठ मानला जातो. स्त्रीच्या बाबतीत तशी स्थिति नाही. प्रौढ कुमारिका पूर्वी अपवित्र व अमंगळ मानली जात असे. आजहि सवाष्ण स्त्रीपेक्षा तिची प्रतिष्ठा अधिक मानण्यात येत नाही. स्त्रीच्या जीवनांतील सारें मांगल्य व ऐश्वर्य विवाहित जीवनात साठवलेलें आहे. हा न्याय पुरुषाला लागू नाही. त्यामुळे दोघांच्या नैतिक व सांस्कृतिक आदर्शात भेदच नव्हे, तर विप्रतिपत्ति आहे. विप्रतिपत्ति हा अंमळ अपरिचित शब्द मुद्दाम वापरलेला आहे. भेद, विषमता आणि गोंधळ यांचा निदर्शक तो शब्द आहे. पुरुषाने अगर स्त्रीने अविवाहाच्या राहिले पाहिजे असें मला म्हणावयाचें नाही. पण विवाहाच्या बाबतीत दोघांचीहि भूमिका आदर्श व तुल्य असावी एवढें मात्र मला म्हणावयाचें आहे. स्त्रीचा विवाह आजच्यापेक्षा अधिक सुलभ व्हावा आणि म्हणून तो स्वायत्त असावा असें मी म्हणतो. यात कुठे चुकलें तें अजूनहि माझ्या लक्षात आलेलें नाही.

**सैल वाक्य**

'मातृत्वाकांक्षा सोडा' हे जें वाक्य माझ्या तोंडी आलेलें आहे, तें अंमळ सैल आहे. मला अभिप्रेत असलेला अर्थ त्या

शब्दाने बिनचूकपणे व्यक्त होत नाही. स्त्रीचें मातृत्व हें वैशिष्टय नव्हें किंवा तिची मातृत्वाकांक्षा नैसर्गिक नाही असें मी कोठेच म्हटलेलें नाही. स्पॅनियल कुत्र्याच्या कानाचा दाखला स्त्रीच्या मातृत्वाला अनुलक्षून मी कोठेच दिलेला नाही. स्त्रीचा हल्लीचा भित्रेपणा, नाजुकपणा, तिची पुरुषनिष्ठा इत्यादि तिचे नैसर्गिक मानले गेलेले गुण संस्कारजन्य आहेत असें मात्र मी म्हणतो, आणि त्या संदर्भात स्पॅनियल मातृत्व नैसर्गिकच नव्हें तर तें तिचें वैशिष्टय आहे, हें मी मानतो. पण तिच्या मातृत्वाचें कौटुंबिक व सामाजिक स्वरूप जितकें स्वाभाविक तितकेंच सांस्कृतिकहि आहे हें विसरता कामा नये. मनुष्य हा निव्वळ 'प्राकृत' प्राणी नाही. म्हणूनच त्याच्या बाबतीत संयमाचें विधान संभवतें. संयमालादेखील त्याच्या विशिष्ट स्वभावाचा आधार आहे. पण त्या दृष्टीने पुरुषाची पितृत्वाकांक्षाहि केवळ सांस्कृतिक नाही. सृष्टीची परंपरा अविच्छिन्न रहावी म्हणून जर निसर्गाने पितृत्वाकांक्षेची योजना केली असेल तर पितृत्वाकांक्षा ही केवळ संस्कारजन्य आहे असें मानणें गैर होईल. पुरुषाच्या पितृत्वाकांक्षेची आणि स्त्रीच्या मातृत्वाकांक्षेत जें मूलभूत अंतर आहे तें मी डोळ्याआड कधीच केलेलें नाही. पितृत्वाकांक्षेची व मातृत्वाकांक्षेची गल्लतहि मी कधी केलेली नाही. फक्त ब्रह्मचर्याचें महत्त्व आणि मूल्य स्त्री आणि पुरुष या दोघांच्याहि जीवनांत सारखेंच असावें असा मात्र माझा कटाक्ष आहे. तसें नसलें तर दोघांच्याहि नैतिक आदर्शात भेदच नव्हे तर वैषम्य निर्माण होईल. माता ही ब्रह्मचारिणीपेक्षा श्रेष्ठ मानावीच लागेल. मातृत्वावांचून स्त्री-जीवनाचें सार्थक नाही, हा सामाजिक संकेत अबाधित मानावा लागेल. आणि मग त्या आकांक्षेच्या पूर्तते-

करिता स्त्रीला पुरुषाची आराधना करणें प्राप्त होईल. तिच्या विवाहाकांक्षेचें रूपांतर सौभाग्यकाक्षेत होईल. विवाहाच्या बाबतीत तिची भूमिका दुय्यम व गौण राहील. पितृत्वाकांक्षेतील मातृत्वाकांक्षेतील अवांतर भेदाचा विचार या ठिकाणीं अप्रस्तुत आहे. मातृत्वाकांक्षा हें स्त्रीचें वैशिष्टच असलें तरी त्यामुळे तिच्या सामाजिक व मानवी भूमिकेला गौणत्व येता कामा नये.

शरीररचना-शास्त्र, मातृत्व-पितृत्व-विज्ञान इत्यादि ज्ञान-कोशातील सगळ्याच विषयांचें विवेचन या प्रकरणीं अप्रासंगिक आहे. माता बनल्यावांचून स्त्रीच्या जीविताचें साफल्य नाही हें प्रमेय एकदा मानलें की मग स्त्रीचें स्वातंत्र्य, स्त्रीचें व्यक्तित्व, आणि स्त्रीचें नागरिकत्व हें सारेंच संपलें, हा त्या प्रमेयाचा अपरिहार्य निष्कर्ष आहे.

**सुलभ व सुखद मातृत्व**

विवाह करावा पण मातृत्व टाळावें असाहि ध्वनि माझ्या प्रतिपादनातून कुणी काढलेला आहे; तो माझ्यावर अन्याय करणारा आहे. स्त्रीच्या विवाहाप्रमाणे तिचें मातृत्वहि सुलभ व सुखद व्हावें आणि ते स्वायत्त असावें असें माझें मत आहे. पण स्त्री-पुरुष-विषयक संयमाचा एकमेव आधार ब्रह्मचर्यच आहे ही गोष्ट विसरता कामा नये. विवाहित स्त्री-पुरुषांच्या एकनिष्ठ-तेलाहि ब्रह्मचर्यावांचून दुसरा कोणता आधार असू शकेल ? अविवाहित पुरुषाच्या संपूर्ण संयमाला ज्याप्रमाणे ब्रह्मचर्य हा एकच आधार आहे, त्याचप्रमाणे विवाहित स्त्रीपुरुषांच्या परस्पर निष्ठेला व आंशिक संयमालादेखील ब्रह्मचर्याच्या तत्त्वा-चाच आधार असू शकतो हें निर्विवाद आहे. म्हणून याविषयी अधिक विस्तार करण्याचें कारण नाही.

आधुनिक नवमतवाद्यांची व माझी भूमिका समान आहे- एकच आहे- असाहि गैरसमज विनाकारण झालेला दिसतो. आधुनिक नवमतवाद्याला ब्रह्मचर्याचें वैयक्तिक, कौटुंबिक अगर सामाजिक मूल्य अजिबात मान्य नाही, आणि मी तर तो स्त्री-पुरुषाच्या सहजीवनाचा पाया मानतो ! हा ढळढळीत फरकहि सहज ध्यानात येऊ नये काय ? पुरुषाकरिता ब्रह्मचर्याचा आदर्श व स्त्रीकरिता मातृत्वाची अनिवार्यता अशी दुहेरी नीति समाजात नांदणें अशक्य आहे. पुरुषाने ब्रह्मचर्याच्या दिशेने प्रगति करण्याचा प्रयत्न करावा आणि स्त्रीने येनकेन प्रकारेण त्याला विवाहप्रवृत्त करावें असे अनर्थावह स्वरूप आमच्या सामाजिक नीतीला प्राप्त होईल. स्त्रीला रंभा, मेनका, उर्वशी यांची भूमिका स्वीकारण्यात धन्यता मानावी लागेल. स्त्रीचा पुत्र या नात्याने मला हें सहन होत नाही, असें मी म्हटलें तर त्यात काय वावगें आहे ?

**समान भूमिका असावी**

स्त्री व पुरुष यांची भूमिका समान असावी असे मी म्हणतो याचा अर्थ त्यांची भूमिका सारखी असावी असा मुळीच नाही, पण बरोबरची असावी असा मात्र खास आहे. समानता म्हणजे समानरूपता नव्हे, तर तुल्यता मात्र खात्रीने आहे. स्त्री आणि पुरुष यांचें वैशिष्टय नाहीसें करण्याचा भलता उपद्व्याप मी करू इच्छित नाही, पण दोघेहि माणसे आहेत याचा विसर पडू नये एवढेंच माझें सांगणें आहे. स्त्रीचें स्वातंत्र्य व नागरिकत्व तिच्या वैशिष्टयावर आधारलेलें आहे. दोघांचाहि जन्म एकमेका-पासून होतो, तेव्हा दोघांचेहि गुणधर्म एकमेकात उतरत नसतील असें कसें मानता येईल ? शिवाजी महाराजासारख्या. अत्यंत

पुरुषार्थवान लोकोत्तर पुरुषाच्या अंगीं त्यांच्या थोर आईचे गुण उतरले होते, असें आपण मोठ्या अभिमानाने सांगतो. तसे दरेक पुरुषाच्या अंगीं त्याच्या आईचे गुण उतरत नसतील का ? आणि दरेक स्त्रीच्या अंगीं तिच्या पित्याचे गुण उतरत नसतील का ? निर्भेळ पौरुषी पुरुष व स्त्रैण स्त्री हा प्राणी अजून तरी जगात निपजलेला नाही. मातापिता 'वागर्थाविव-संपृक्तो' आहेत. अर्धनारीश्वर हा काही विचित्रलीला नाटकातील नायकासारखा नाही. अर्ध्या ओठावर मिशी व अर्ध्या कपाळावर गंध आणि अर्ध्या कपाळावर कुंकू असें त्याचें भेसूर ध्यान नाही. त्याच्या व्यक्तित्वात नर आणि नारी ताण्याबाण्याप्रमाणे ओत-प्रोत आहेत. पुरुषाच्या पितृत्वाच्या मूल्यात आणि स्त्रीच्या मातृत्वाच्या मूल्यात मुख्य तफावत अशी आहे की पुरुषाच्या व्यक्तित्वाचें मूल्य त्याच्या पितृत्वावर अवलंबून नाही. कुणाचाहि पिता म्हणून तो धन्य होत नाही. स्त्री मात्र आई म्हणूनच धन्य मानली जाते. शिवाजीच्या व पांडवांच्या आईच्या ऐवजी जिजामातेची व कुंतीची आई धन्य मानली म्हणून काही या परिस्थितीत फरक पडत नाही. कुंती थोर म्हणून तिची आई थोर, जिजामाता थोर म्हणून त्यांच्या आई थोर आणि पांडव थोर म्हणून कुंती थोर आणि शिवाजी थोर म्हणून जिजाई थोर ! अर्थात् स्त्रीहि स्त्रीचीच का होईना माता म्हणून धन्य आणि पुरुष मात्र 'स्वनाम-धन्य' आहे; आणि असें आहे म्हणून स्त्रीला ब्रह्मचर्य आणि संन्यास विहित नाही ! तिच्याकरिता मातृत्वाचें निरपवाद विधान आहे. अर्थात् त्यामुळे विवाह अपरिहार्य आहे. सौभाग्याकांक्षा हा संकेत तिच्या या दुय्यम व गौण भूमिकेचा द्योतक आहे.

### समाजनीतीत बदल

एका मुद्द्याचा विचार आणखी करणें आवश्यक आहे. स्त्रीला तिच्या इच्छेविरुद्धहि मातृत्व प्राप्त होऊ शकतें. याबाबतीत आपल्या समाजनीतीत पहिला क्रांतिकारक बदल असा करावा लागेल की इच्छेविरुद्ध शरीर भ्रष्ट झाल्याने कुठलीहि व्यक्ति पतित होत नाही. इच्छेविरुद्ध तोंडात गोमांस कोंबल्याने माणूस बाटत नाही. हें झालें नैतिक परिणामाविषयी; पण मातृत्व हा शारीरिक परिणाम आहे, त्याचें काय ? कुठलीहि संतति अमंगल व अपवित्र मानण्यात येऊ नये, हा दुसरा फरक आम्हाला आपल्या सामाजिक धोरणात करावा लागेल. स्त्री ज्या प्रमाणात स्वरक्षित, तेजस्वी, पुरुषनिरपेक्ष बनेल त्या प्रमाणात तिच्यावर अवांच्छित मातृत्वाचे प्रसंग कमी ओढवतील. स्वतःच्या अब्रूसाठी प्राण देण्यास तयार असलेल्या स्त्रीचें सत्त्वहरण करू शकणारे पुरुष कुठल्याहि समाजात क्वचितच निपजतात. स्त्री-रक्षणाकांक्षिणी झाली म्हणूनच ती आक्रमणसुलभ बनली, आणि त्यामुळेच ती देहनिष्ठहि झाली. आपल्या अब्रूच्या संरक्षणाकरिता स्त्रीने पुरुषावर अवलंबून राहू नये हा पुनरुनिरपेक्ष जीवनाच्या संकल्पाचा खरा आशय आहे.

### स्त्रियांचाच प्रत्यय प्रमाण

शेवटीं स्त्रीजीवनाची भूमिका व सामाजिक मूल्य स्त्रियांच्याच आत्मप्रत्ययाने ठरणार आहे. मी कितीहि तर्कशुद्ध मीमांसा केली तरी अखेरीस स्त्रियांचाच प्रत्यय अंतिम प्रमाण मानला पाहिजे. सुबुद्ध व प्रबुद्ध स्त्रियांनाहि स्वातंत्र्य, नागरिकत्व आणि स्वायत्त जीवन मानवत अगर परवडत नसेल तर तसें त्यांनी

प्रांजलपणें कबूल करावें. ब्रह्मचर्य आणि संन्यास यांचें जर स्त्री-देहाला वावडें असेल, तर मानवोचित व्यक्तित्वाच्या संपूर्ण विकासासाठी त्यांना पुरुष-शरीरप्राप्तीची आकांक्षा धरावी लागेल. त्यासाठी या जन्मीं तप केलें तरच त्यांना जन्मांतरात ऐहिक व पारमार्थिक मोक्ष लाभेल. तोपर्यंत साम्राज्यांतर्गत स्वराज्यातच समाधान मानणें प्राप्त आहे. स्त्री-स्वातंत्र्य म्हणजे घरकुलाचें स्वातंत्र्य आणि स्त्रियांचें नागरिकत्व म्हणजे भातकुलीचें नागरिकत्व हा त्यांच्या भूमिकेचा आशय मानावा लागेल. यावर आमचें इतकेंच निवेदन आहे की अस्पृश्यता वेदविहित ठरली तरी जशी आम्हाला मान्य होणार नाही, त्याचप्रमाणे स्त्री-जीवनाचें गौणत्व परंपरागत नीति, सामाजिक संकेत व सांस्कृतिक धारणा यांनी मान्य केलेलें असलें तरी तें स्वीकारण्यास आमचें मन तयार होत नाही.

मातृत्वाचा सांस्कृतिक संकेत पुरुषाचा मात्र उद्धार करणारा आहे. यापुढे आपल्या आईला पित्याची भार्या मानण्या-ऐवजी जर त्याने आपल्या पत्नीला मुलाची आई मानण्याचें विवेकपूर्वक ठरविलें तर त्याच्या स्त्रीविषयक भूमिकेत क्रांतिकारक परिवर्तन घडून येईल, त्याची दृष्टि निवळेल आणि स्त्री-पुरुषांच्या सहजीवनात मांगल्याचा परिमळ दरवळू लागेल.

'स्त्री' मासिक
१९५४

परिशिष्ट : ३

# प्रमुख शब्दांची सूचि

आकडे पृष्ठांचे आहेत.


अग्निहोत्र ८८
अज ८२
अण्णा सहस्रबुद्धे १४१
अनासक्तियोग ७९
अनसूया ८२
अपूर्वविधि ८७
अप्पा पटवर्धन १४१
अमेरिका २३,२४,५५
अस्पृश्यतानिवारण २१,४५,७०
आगरकर १४१
आदम ११,३५,३७
आदमजाद ३७
आनंद ४३
आनंद के. कुमारस्वामी १४०
आनंदमयी मां ३२,४५,१३१,१४२
आर्किमिडीज १५५
आर्यसमाजी १५९
आस्तंभब्रह्म ९२
इलियड ८
इस्लाम १४८,१५८
इंदुमती ८२
ईश्वरचंद्र विद्यासागर १४१
ईव्ह ३५,३७
उत्तररामचरित ९९
उपनिषद ३५
एकादशव्रत ३,८५
एच. जी. वेल्स २७
एनी बेझंट १४२,१५९
(डॉ.) कजिन्स १२२
कण्व ४६,५९
कम्युनिटी ७५
कम्युनिस्ट ४८
कम्यूनियन ३३
काकासाहेब कालेलकर ११३,११७
काकासाहेब बर्वे १७२
कात्यायनी १६०
काशी ५,३९,४०
काशीविश्वनाथ ३
कालिदास ४६,८६
किशोरलालभाई १२३,१६९
किंगकाँग १११
कृष्णमूर्ति ७९,१६४
केरळ १५४
कोएक्झिस्टन्स ५५

कॉमरेडरी ९२
कॉमरेडशिप ९२
कॉंटेक्ट २
कॉंटेजीन २
कौटुंबिक समाज ४५,६०,१४९
१५०,१५२
क्रुश्चेव ६३
ख्रिस्ती १५८
ख्रिस्ती धर्म ४३,१४९
गजानन भास्कर वैद्य १५९
गणेश व्यंकटेश जोशी ११३
गंगालहरी १०१
गामा १११
गार्गी १६०
गांधी ३, ४, २७, ३२, ५६, ७८,
७९, ८०, ९३, १११,
१३२, १३६, १४०, १४२,
१४५, १६४
गिरिधर कविराय ७
गुरुदेव ७४
गृहस्थाश्रम १६६, १६७, १६८
गोपालकृष्ण गोखले १४१
चंद्रकलाबाई हाटे १७२
जगन्नाथ पंडित १०१
जनाबाई ४५
जमनालालजी १४५
जयप्रकाशबाबू ४४, ४६
जवाहरलाल १०२,१११,११९,१४१
जाजूजी ३
जानकीदेवी १४५
जिजामाता १७९
जैनधर्म ४३, १५८
जॉन स्टुअर्ट मिल १४१
जॉर्ज बर्नार्ड शॉ १२२
झाशीची राणी १४२
ढेबरभाई १४१
ताजमहाल ३१, ६३
ताजमहाल हॉटेल १६७
(प्रो.) ताराबाई १२५
तिबेट ६४
तुकाराम ७२, १०५
तुलसीदास २३, ८२, ८३
थिऑसोफिकल सोसायटी १५९
देहात्मवाद ४८, ५०
धीरेंद्रभाई ७४, १७१
नचिकेता १४७
नारीनरेश्वर ११९
नाहक मिलन ७४
नियम विधि ८७, ८८
नेपोलियन १२४
न्यूटन १५५, १५६
न्यू मेकियांव्हेली २७
परिसंख्या विधि ८७, ८८, ८९
पलायनवाद ७४, ७५
पवनार आश्रम ३
पंढरपूर ३

पांडीचेरीच्या माताजी (मदर) ३२, ४५, १३१
पुणें १७२, १७३
पुलस्त्य मुनि १०६
पुष्पदंत ९८
प्रजापति ३६
प्रह्लाद १०६
प्रार्थना समाज १५९
फर्स्ट फॉल ३५
फिमेल हेमिस्फिअर ३९
फॅमिलिस्टिक सोसायटी ६०
फ्राईड ३४,३५,३६,७२,७९,१५६
बापू मेरी मां ११५
बायबल ७, ३५
बुद्ध ४२, १५३
बुल्गानिन ६३
बेगम रसूल १५८
बौद्ध धर्म १५८
ब्रह्मचर्याश्रम १६२
ब्राह्म समाज १५९
भगवद् गीता ९,३३,३५,३६,४६, ९३, १५६
भगिनी निवेदिता ११४, १४०
भागवत ८९
भ्रमरजी २६
मदनपल्ली १२२
मनु ११, ३७
मनु बहेन गांधी ११५
मनुस्मृति १७
महनीय सूत्र ४१
महादेव गोविंद रानडे १४१
महाराष्ट्र ११३, १५९, १७२
महाराष्ट्र धर्म १६३
महिलाश्रम १४५
मंडनमिश्र ९०
मानससरोवर ६४
मामा फडके ११३
मार्गरेट १२२
मालतीताई बेडेकर १७२, १७४
मां विनोबा ११५
मीराबाई ४५, ८२
मुगलसराय ८८
मुंबई १७२
मेल हेमिस्फिअर ३९
मैत्रेयी १६०
यमराज १४७, १४८
याज्ञवल्क्य १६०
युरोप १३२
येशू २१, ३२, ३८, १५३
रशिया २३, २४, २५
रामकृष्ण परमहंस २७, ३२, ४५
रामकृष्ण मिशन ४३
रामचरितमानस ६
(प्रो.) राममूर्ति १२५
रामशास्त्री १७०
राघोबा पेशवा १७०

राजा राममोहन राय १४०, १४१
राजेंद्रबाबू १०२
लाला लाजपतराय १६३
लोकेंद्र २६
(डॉ.) लोहिया ४४, ११४
वसिष्ठसत्ता १६९
वानप्रस्थाश्रम १६८
वाल्मीकि रामायण ९६, ११०
विनोबा ३, २९, ३३, ३९, ४०, ४६, ७७,१०७,१११,११६,१४१, १४५, १६३, १७०
वृत्रासुर १०६
वेद ३९, १५९, १८१
वेदांत १६०
शकुंतला ४६, ५९
शतरूपा ३७
शंकरराव देव ४४, १४१, १७२
शंकराचार्य ७३,७४,८६,९०,१४५
शारदामाता ३२, ४५
शांतिसेना १४२, १४३
शिवमहिम्न स्तोत्र ९८
शिवाजी ११६,११८,१७८,१७९
शेक्सपिअर १११
श्रीअरविंद १६४
श्रुति १००, १०६
समाजवाद २४, २५, १३१
समाजवादी २४, ४८
समाजशास्त्र १२३
सह-अवस्थान १२, ५५, ६१
सहशिक्षण १४,१५,१६,१६२,१६३, १६४, १६५
संत सखूबाई ४५
संन्यासाश्रम १६९
(डॉ.) संपूर्णानंद ११४
संभाजी १३६
साधना १७२,१७३,१७४
साधनाकेंद्र ३
साम्यवाद १३१
सार्वजनिक काका ११३
सिकंदर १५३
सीताबाई परुळेकर १७२
सेनापति बापट ९३
स्त्री १७२
स्त्रीत्ववादी आंदोलन १२४,१२५
स्पर्श-भावना २, ३, ४, ७४
स्पॅनियल १७६
स्वदेशी आंदोलन ९२, ९३
स्विट्झर्लंड ४५
हरिश्चंद्र १४३
हिमालय ६४
हिंदुधर्म १५७
हिंदुरिफॉर्म सोसायटी १५९
हॅम्लेट १११
हेलन ८
होमर ८

Amazon 119
Brosterhood 122
Civic Death 170
Feminist Movement 125
Inteligent Man's Guide to Socialism 122
Inteligent Woman's Guide to Socialism 122
Plastic Mannequin 119
Suffragette Movement 125


---


REFBK-0018709

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८७०९

परंधाम प्रकाशन,
पो. पवनार, जि. वर्धा



मूल्य – चार रुपये